सप्टेंबर २०२६

# सुवार्ता

स्थापना १५ ऑगस्ट १९५५

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी




BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)
BCCB RETAIL LOANS
Your Dreams, Our Commitment.
Flexible Loans • Attractive Rates • Quick Approvals
HOME LOAN @ 7.35%*
PMLN LOAN @ 9.50%*
CAR LOAN @ 7.95%*
BDLN LOAN @ 10.25%*
EDUCATION LOAN @ 8.50%*
PERSONAL LOAN @ 12.50%*
• BCCB GURU GAURAV LOAN @ 9.50%*
• BCCB SAKHI LOAN @ 9.50%*
SOLAR LOAN @ 8.25%*
CASH CREDIT / BD ODCC LOAN @ 10.00%*
ORNAMENT LOAN @ 7.95%*
SHOP / GALA LOAN @ 8.60%*
LOW INTEREST
HIGH TRUST
BETTER TOMORROW
QUICK
PROCESSING
MINIMUM
DOCUMENTATION
YOUR TRUSTED
FINANCIAL PARTNER
SINCE 1918
* T&C Apply
Interest Rates are subject to change as per Bank's discretion.
TOLL FREE NO.:
08069420000
VISIT YOUR NEAREST
BCCB BRANCH TODAY!
www.bccb.bank.in

# सुवार्ता ८५४

स्थापना : १५ ऑगस्ट १९५५

**सप्टेंबर २०२६**

**वर्ष ७२ / अंक २ / मूल्य रु. २०/-**



**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट गोन्साल्वीस
फा. डॉमनिक डिआब्रिओ, फा. जॉनी निग्रेल

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस, जॉन परेरा
हेलन डिसिल्वा, नाझरेथ अथाईत

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा
**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे
**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज
वसई, महाराष्ट्र - ४०१ २०१.

**मोबाईल नंबर्स**
**'सुवार्ता' कार्यालय : 97 02 09 02 31**
**जीवन दर्शन केंद्र : 97 02 09 02 32**

**वेळ : सोमवार ते शनिवार**
सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


**अंर्तनाद**

**पोपमहोदयांचा सप्टेंबर महिन्यातील प्रार्थना हेतू**

**: पाण्याचे जतन करण्यासाठी :**



पाणी ह्या अत्यंत महत्त्वाच्या जीवसंरक्षक संसाधनाचे न्याय्य आणि टिकाऊ स्वरूपात व्यवस्थापन व्हावे, त्याद्वारे प्रत्येकाला त्याचा समान प्रमाणात लाभ घेता यावा, म्हणून आपण प्रार्थना करूया.



प्रेमाचा पुरावा कार्यात असतो. प्रेम वस्ती करते तेथे महान कार्य घडते. परंतु कार्य करणे बंद होते तेव्हा मुळात प्रेम अस्तित्व गमावते.

**- पोप संत ग्रेगरी महान (५४०-६०४)**

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| | : अंतर्नाद | ३ |
| बिशप थॉमस डिसोजा (अधिकृत) | : शिक्षण : चरित्र घडवते, मुक्त करते | ४ |
| संपादकीय | : जेन झी, सात पिढ्या, वैशिष्ट्ये | ६ |
| जॉन गोन्सालविस | : अखेर तरुणाईने करून दाखविले | ८ |
| संकलक : 'सुवार्ता' टिम | : संपादकांस पत्रे | १० |
| मॅकेन्झी डाबरे, डॉमिनिका डाबरे | : मुलाखत : पृथ्वीराज बी.पी.- आय.ए.एस. | १२ |
| अजय कैतान मेन | : नागरी समस्या, संविधानिक उपाययोजना | १५ |
| जॉन लुईस परेरा | : लोकशाही : दैनंदिन घडामोडींचे प्रतिबिंब | १६ |
| फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोझा | : संत जेरोमची आध्यात्मिकता | १७ |
| सायमन डाबरे | : द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ : फादर शॉख | १९ |
| जॉय जोसेफ फरगोज | : विकास हवा, पण वसई बुडवून नको! | २० |
| सतीश पुंडलिक नवघरे | : आल्या पावसाच्या सरी | २२ |
| स्मिता लोपीस | : POSH कायदा | २३ |
| विल्यम गोन्सालविस | : शिक्षक दिन | २४ |
| मेबल बेसील पिमेंटा | : ज्ञान संक्रमणातील शिक्षक | २५ |
| जॉना वि. फरेरा | : हाच माझा मोठा पुरस्कार | २६ |
| रोविना वाझ | : शिक्षकांच्या कथा आणि व्यथा | २७ |
| डॉ. सुभाष डिसोजा | : शिक्षकी पेशातील आनंदयज्ञ | २८ |
| फा. किरण लोपीस | : छडी वाजे छम् छम्, विद्या येई घम् घम् | २९ |
| शिल्पा कोरिया/डिकुन्हा | : अदृश्य शत्रू : बुलिंग | ३१ |
| वनिता पटवर्धन | : नवतरुणांना स्वत:चा जीव जड का होतो? | ३२ |
| प्रा. स्टीफन आय. परेरा | : धार्मिकतेतून आध्यात्मिकतेकडे | ४७ |
| फा. व्हॅलेंटाईन पावकर | : पवित्र मरियेचा जन्मदिवस | ४९ |
| अनिल एल. गोन्सालवीस | : मरिया मातेची तीर्थक्षेत्रे | ५० |
| फा. नितीन डिसोजा | : शांत शाश्वत मार्गदर्शक : पाद्रे पिओ | ५१ |
| ॲन्थनी मनवेल डाबरे | : संत कॉसमस व संत डेमियन-जुळे भाऊ | ५३ |
| फा. (डॉ.) पॅट्रिक डिसोजा | : तीन प्रमुख परमेश्वरदूत | ६९ |
| डॉ. ॲलिना गोन्सालविस | : क्रुसाखाली उभी असलेली मरिया | ७१ |
| जोसेफ एस. डाबरे | : भुशापासून राष्ट्रकुलच्या रौप्यपदकापर्यंत! | ७३ |
| प्रमिला मेलवीन डिसोजा | : शपथ (कथा) | ७४ |
| थॉमस ब्रिटो | : वधू-वर सूचक मंडळ : काळाची गरज | ७७ |
| सचिन इनास लोपीस | : आनंदी संध्याछाया | ७९ |
| ब्रिनल क्रास्टो, कॅथरीन फरगोज, जेम्स लोपीस, नागेश राऊत, जॅक गोम्स वनितामेरी डिमेलो, सेल्मा डिकुन्हा | : साद-प्रतिसाद | ८१ |
| फा. ओनिल फरोज, फ्रँक कोलासो | : कविता | ८३ |
| फ्रँक मिरांडा, मेल्सीना परेरा, डेव्हीस डाबरे | : माझे मत | ८४ |
| स्टॅन्ली गोन्सालविस | : पुस्तक परिचय | ८६ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८७ |
| संकलन | : वृत्तविहार | ८९ |
| अनिल घोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - १३ | ९६ |
| फा. (डॉ.) जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन : ज्ञान, सुज्ञान, प्रज्ञा | ९७ |
| धर्मप्रांतीय उपासना आयोग | : उपासना वर्ष दिनदर्शिका :सप्टेंबर२०२६ | ९८ |

# शिक्षण : चरित्र घडवते, माणसाला मुक्त करते, इतिहास घडवते

सारे विश्व आज एका विलक्षण संक्रमणकाळातून जात आहे. तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे, कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहे. राजकीय समीकरणे बदलत आहेत. सामाजिक माध्यमे लोकमत घडवीत आहेत आणि माहितीचा स्फोट झाला आहे. पण ह्या सर्व प्रगतीच्या मध्यभागी एक मूलभूत प्रश्न तीव्रतेने उभा राहतो : माणूस खरोखर मुक्त होत आहे का? आपण शिक्षित होत आहोत की फक्त प्रशिक्षित? कारण माहिती वाढणे म्हणजे ज्ञान वाढणे नव्हे; ज्ञान वाढणे म्हणजे विवेक वाढणे नव्हे, विवेक वाढणे म्हणजे नैतिक स्वातंत्र्य नव्हे.

ह्याच प्रश्नांना पोप लिओ चौदावे यांचे 'Magnifica Humanitasns' विश्वपत्र महत्त्वपूर्ण उत्तर देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या तंत्रज्ञानाच्या युगात मानवी व्यक्तीची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, संबंध, शिक्षण आणि सार्वजनिक हित ह्यांचे रक्षण कसे करावे, हा ह्या विश्वपत्राचा मध्यवर्ती प्रश्न आहे. विशेषत: शिक्षणावरील विवेचनात पोप सांगतात की शाळा ही केवळ माहिती देण्याची संस्था नसून सत्याचा शोध, जीवनाच्या अर्थाचे चिंतन, चिकित्सक विचार आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर शिकविणारी जागा असली पाहिजे. शिक्षण हे केवळ माहिती देण्याचे कार्य नाही; ते माणसाला सत्य शोधण्यास, विवेकाने जगण्यास आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्यास मुक्त करणारे कार्य आहे. आजचा प्रश्न असा नाही की 'आपण किती शिक्षित आहोत?' तर 'शिक्षणामुळे आपण किती मुक्त झालो आहोत?'



आपल्या काळातील सर्वांत मोठा विरोधाभास हा आहे की माणसाकडे माहिती पूर्वीपेक्षा अधिक आहे, पण सत्याचा शोध पूर्वीपेक्षा अधिक कठीण झाला आहे. आपल्या हातात स्मार्ट फोन आहे; पण शांतपणे विचार करण्यासाठी वेळ नाही. Google आहे; पण सत्य-असत्य ओळखण्यासाठी विवेक कमी पडतो. Artificial Intelligence आहे; पण 'मी हे का करीत आहे?' हा प्रश्न विचारण्याची क्षमता धोक्यात येत आहे. आपल्याकडे लोकशाही आहे; पण मतभिन्नता सहन करण्याची संस्कृती कमकुवत होत आहे. शिक्षणाचा विस्तार झाला आहे; पण शिक्षणाचे मुक्तीचे ध्येय आपण विसरत चाललो आहोत. ह्याच ऐतिहासिक क्षणी पोप चौदावे लिओ ह्यांचे 'Magnifica Humanitasns' आपल्याला मूलभूत प्रश्न विचारते : तंत्रज्ञानाच्या युगात आपण मानवतेचे रक्षण कसे करणार? १५ मे २०२६ रोजी प्रकाशित झालेले हे विश्वपत्र कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रश्नापासून सुरुवात करते; परंतु त्याचा अंतिम विषय AI नाही तर मानवी व्यक्तीची प्रतिष्ठा आहे. पोप मानवतेसमोर दोन मार्ग ठेवतात : नवा 'Tower of Babel' उभारण्याचा मार्ग किंवा देव आणि मानव एकत्र वास करतील अशी न्याय, बंधुता आणि प्रतिष्ठेवर आधारित सभ्यता उभारण्याचा संदेष्टा नहूमचा माग. ह्या दोन मार्गांच्या निवडीमध्ये शिक्षणाची भूमिका निर्णायक आहे. म्हणून आपला प्रश्न आहे : शिक्षण कशासाठी? नोकरीसाठी? स्पर्धेसाठी? उच्च पगारासाठी? सामाजिक प्रतिष्ठेसाठी? की मुक्तीसाठी? सत्यासाठी? न्यायासाठी? शांतीसाठी?

### शाळा म्हणजे राष्ट्राची खरी संपत्ती

शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हते. शिक्षण म्हणजे माणसाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून देणे आणि त्या गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी बौद्धिक शक्ती देणे. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद ह्यांनी शिक्षणाला राष्ट्रनिर्मितीच्या केंद्रस्थानी ठेवले. त्यांचा विचार होता की राष्ट्राची खरी संपत्ती त्यांच्या शाळांमध्ये असते. हा विचार आज पुन्हा उच्चारण्याची वेळ आली आहे. आपण मोठी शहरे उभी करतो. Digital India उभारतो. Artificial Intelligence मध्ये गुंतवणूक करतो. उद्योग उभारतो. पण ग्रामीण शाळेत प्रशिक्षित शिक्षक आहेत का? 'शैक्षणिक साहित्य' किंवा 'शैक्षणिक उपकरणे', पिण्याचे पाणी, मुलींना सुरक्षित स्वच्छतागृह, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रवेशयोग्यता आहे का? ह्याच प्रश्नांतून शिक्षणाचा खरा सामाजिक न्याय दिसतो.

### शिक्षण म्हणजे अंधाराविरुद्ध लढा/बंड

महाराष्ट्राच्या मातीने शिक्षणाला सामाजिक क्रांतीचे रूप देणारे दोन महान दीपस्तंभ जगाला दिले, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले. ज्योतिराव फुले ह्यांनी शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडली. सावित्रीबाई शाळेत जात असताना त्यांच्यावर दगड आणि शेण फेकले जात होते. पण त्या थांबल्या नाहीत. कारण त्यांना माहीत होते : एका मुलीला शिकवणे म्हणजे एका व्यक्तीला शिकवणे नव्हे; एका पिढीला जागे करणे आहे. त्यांच्या कार्याची आजच्या भाषेत व्याख्या करायची झाली तर ती अशी : Education is resistance. Education is dignity. Education is liberation. पण खरा प्रश्न असा आहे : आपण हे शिक्षणकार्य पुढे नेत आहोत का? गरीब विद्यार्थी अजूनही गुणवत्तापूर्ण

शिक्षणापासून वंचित असेल, तर ही क्रांती पूर्ण झाली आहे का? गरीब विद्यार्थ्याला आणि श्रीमंत विद्यार्थ्याला दोन वेगवेगळ्या दर्जाची शिक्षणव्यवस्था मिळत असेल, तर खरी समता अजून साधली आहे का?

**शिक्षण म्हणजे माहिती नव्हे - जीवनाशी सुसंवाद**

सर्वोच्च शिक्षण आपल्याला केवळ माहिती देत नाही, तर आपले जीवन सर्व अस्तित्वाशी सुसंगत बनवते. मात्र आजच्या AI युगासाठी ही एक भविष्यवाणीच वाटते. AI आपल्याला माहिती वेगाने देते. अधिक प्रमाणात देते. पण माहितीचे जीवनाशी नाते कोण जोडणार? विद्यार्थ्याला हवामाना बदलाची माहिती मिळू शकते. पण एकमेकांवर प्रेम करायला कोण शिकवणार? त्याला गरिबीची आकडेवारी मिळू शकते. पण गरीब माणसाजवळ बसायला कोण शिकवणार? त्याला संविधानातील समानता हा शब्द समजेल. पण दुसऱ्या व्यक्तीला समान मानण्याची अंतःप्रेरणा कोण देणार? ह्यासाठी शिक्षक आवश्यक आहे. ह्यासाठी समुदाय आवश्यक आहे. ह्यासाठी नैतिक शिक्षण आवश्यक आहे आणि ह्यासाठी मानवी उपस्थिती आवश्यक आहे. गांधी म्हणतात : शिक्षणाने मुलाच्या शरीरातील, मनातील आणि आत्म्यातील सर्वोत्तम शक्ती बाहेर आणणे.

शिक्षणासाठी आज आपण चार 'H'ची कल्पना पुढे करू शकतो: HEAD - विचार : सत्य, विज्ञान, इतिहास, परीक्षा, अभ्यासक्रम, गुण, संविधान, तर्क आणि विवेक. HEART - करुणा : प्रत्येक व्यक्तीची सहानुभूती, बंधुभाव, प्रतिष्ठा, विशेषत: गरीब आणि दुर्बलांची. HANDS - सेवा: कष्ट, श्रम, सामाजिक जबाबदारी, ज्ञानाचे समाजाच्या सेवेत रूपांतर. HOPE - आशा : जग बदलू शकते आणि आपण त्या परिवर्तनाचे सहभागी आहोत, हा विश्वास. Head + Heart + Hands + Hope हेच शिक्षणाचे मुक्तिमूलक स्वरूप आहे. जर एखादा विद्यार्थी अभ्यासात हुशार असेल पण मानवी दुःखाप्रति असंवेदनशील असेल, जातीय किंवा धार्मिक द्वेषाने भरलेला असेल, तर आपण त्याला सुशिक्षित म्हणू शकतो का? ब्राझिलियन शिक्षणतज्ज्ञ पाउलो फ्रेरे ह्यांच्या मते विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती 'ठेवून' देणे म्हणजे खरे शिक्षण नव्हे. त्यांनी मुक्तिवादी शिक्षणाची संकल्पना मांडली - ज्यात विद्यार्थी प्रश्न विचारतो, वास्तव समजून घेतो आणि ते बदलण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो. त्यांच्या विचाराचा सार : 'Education does not change the world. Education changes people. People change the world.' आज हा विचार आपल्या शाळेतील प्रत्येक वर्गात लिहून ठेवण्यासारखा आहे. वर्गखोलीतून फक्त परीक्षार्थी बाहेर पडणार नाहीत; तर परिवर्तनकर्ते? ह्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

**शाळा म्हणजे सत्याची प्रयोगशाळा**

पोप लिओ म्हणतात की डिजिटल माध्यमांची सततची गती आणि अति-उत्तेजना (hyper-stimulation) माणसातील सत्यशोधासाठी लागणारा संयम आणि प्रयत्न कमी करू शकते. AIचा वापर शिकवणे म्हणजे केवळ 'कसे वापरायचे' हे शिकवणे नव्हे, तर ते कधी आणि कोणत्या कारणासाठी वापरू नये, हेही शिकवणे आहे. मुलांना दिशाभूल (manipulation) ओळखायला आणि डिजिटल वातावरणात स्वतःच्या व इतरांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करायला शिकविणे गरजेचे आहे. "Teach not only how to use technology; teach when not to use it." हा विचार आपल्या शिक्षणाचे नवे घोषवाक्य ठरू शकते कारण प्रश्नाचे उत्तर Google देऊ शकते. पण जीवनाचा अर्थ Google देऊ शकत नाही. AI निबंध लिहू शकते. पण चरित्र घडवू शकत नाही. AI भाषण तयार करू शकते. पण सत्यासाठी बलिदान देऊ शकत नाही. AI चित्र निर्माण करू शकते पण जखमी माणसाला मदत करण्याची करुणा निर्माण करू शकत नाही. म्हणून पोप लिओ म्हणतात की शाळा ही सत्याचा शोध, जीवनाच्या अर्थाचे चिंतन आणि प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा ओळखायला शिकवणारी प्रयोग शाळा असायला हवी. जिथे विद्यार्थी तथ्य तपासशील, विरोधी मत ऐकील, इतिहासाचा अनेक दृष्टिकोनांतून अभ्यास करील, धार्मिक विविधतेचा आदर करील, संविधान समजून घेईल, AI-generated माहितीची पडताळणी करील, खोटी बातमी ओळखील, गरिबीला केवळ आकडेवारी न मानता मानवी वेदना म्हणून पाहील. हीच खरी डिजिटल व लोकशाही साक्षरता (democratic literacy)आहे.

आपले शिक्षण चांगले विद्यार्थी निर्माण घडविणारे बनावे. विद्यार्थी चांगले शमरोनी बनावेत, त्यांनी सत्याचा शोध करावा, ते शांतीचे दूत व्हावेत, त्यांनी न्यायासाठी झटावे व ते आशेचे विणकर व्हावेत हे अपेक्षित आहे. म्हणून शिक्षणात गुंतवणूक, संबंधांची जपणूक आणि न्याय व शांतीवरील प्रेम ही आपल्या काळातील बांधीलकीचा भाग आहे. त्यासाठी मुलांना समावेशक शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या करण्याची गरज आहे. मुलांना मानवी प्रतिष्ठा समजावून त्याप्रमाणे त्यांना घडवणे ही काळाची गरज आहे. आजचा विद्यार्थी उद्याच्या भारताचा चेहरा आहे. म्हणून शिक्षणाने नीतीचा शोध, चिकित्सक विचार, मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांना पुन्हा केंद्रस्थानी आणले पाहिजे. आपल्या सर्वांसमोर एक अत्यंत स्पष्ट आव्हान उभे आहे : शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, मुक्तिसाठी; स्पर्धेसाठी नव्हे, सेवेसाठी; सत्तेसाठी नव्हे, सत्यासाठी; यशासाठी नव्हे, अर्थपूर्ण जीवनासाठी; स्वार्थासाठी नव्हे, समाजासाठी; फक्त 'मी'साठी नव्हे, 'आपण'साठी आणि शेवटी, फक्त हुशार मनुष्य नव्हे; तर मुक्त मनुष्य घडविण्यासाठी.

**+ बिशप थॉमस डिसोजा**

संपादकीय

# जेन झी, सात पिढ्या, वैशिष्ट्ये

साधारणपणे २० ते ३० वर्षांच्या कालावधीचा एक गट म्हणजे 'पिढी' मानली जाते; म्हणजेच, एखादे मूल जन्माला येणे, मोठे होणे आणि स्वत: मुलाला जन्म देऊन पालक बनणे, ह्या कालखंडाला 'पिढी' असे संबोधले जाते. देश आणि संस्कृतीनुसार, पिढीचा कालावधी साधारणपणे २५ वर्षांचा मानला जातो. समाजशास्त्रज्ञांनी ह्या गटातील लोकांना 'आधुनिक काळाची वर्गवारी' (Modern Age Categories) म्हणून ८ गटांमध्ये वर्गीकृत केले आहे. ऐतिहासिक घटनांशी निगडित त्यांचे अंदाजित कालखंड पुढीलप्रमाणे :

१. महान पिढी (Greatest Generation) :१९०१–१९२७
२. मौनी पिढी (Silent Generation) :१९२८–१९४५
३. बाळजन्म पिढी (Baby Boomers) :१९४६–१९६४
४. जेन एक्स ( Generation X) :१९६५–१९८०
५. सहस्त्रक/जेन वाय ( Millennials/Gen Y) :१९८१–१९९६
६. जेन झेड / 'झी'(Generation Z/'Zee') :१९९७–२०१२ (२०२६मध्ये वय १४ ते २९ वर्षे)
७. जेन अल्फा (Generation Alpha) :२०१३–२०२४
८. जेन बीटा ( Generation Beta) :२०२५–२०३९

ह्या प्रत्येक पिढीला विशिष्ट आव्हाने, संकटे किंवा समस्यांचा सामना करावा लागला आणि त्यानुसार त्यांनी आपली जीवनशैली व आयुष्य घडवले. प्रमुख वैशिष्ट्ये :



**१. महान पिढी** (जन्म : १९०१–१९२७)

ह्या पिढीने 'महामंदी'चा काळ आणि पहिल्या महायुद्धाचा अनुभव घेतला; तसेच त्यांनी 'जॅझ' व 'स्विंग' संगीताला लोकप्रिय केले. विशिष्ट सांस्कृतिक आवडीनिवडी जपल्या. अत्यंत कठीण प्रसंगांना तोंड देत असतानाही, ह्या पिढीने अपार कष्ट व जिद्दीच्या जोरावर आपल्या कुटुंबांचे संगोपन केले. भारतीय संदर्भात विचार करता, स्वातंत्र्यलढ्याची भावना अन् ब्रिटिश राजवटीला सातत्यपूर्ण विरोध ही ह्या पिढीची प्रमुख वैशिष्ट्ये होत :

**२. मौनी पिढी** (जन्म : १९२८–१९४५)

मौनी पिढी हे नाव त्यांना त्यांच्या निष्क्रियतेमुळे आणि फॅसिस्ट, नाझीवादी, कम्युनिस्ट ह्यांच्यासारख्या हुकुमशाही विचारसरणीच्या नियमांचे पालन करण्याच्या प्रवृत्तीमुळे मिळाले. ह्या काळातील सर्वांत मोठी खळबळजनक घटना म्हणजे दुसरे महायुद्ध होय. ह्या काळात लोकांचे मुख्य लक्ष स्वतःचे आणि कुटुंबाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यावर होते. ह्या पिढीतील मुलांना कठोर परिश्रमाच्या वृत्तीद्वारेच आपले आयुष्य घडवावे लागले. भारतीय संदर्भात, जुलमी ब्रिटिश सत्तेशी जुळवून घेत असताना भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीची भावना बळावण्याचा हा काळ होता.

**३. बेबी बूमर्स पिढी** (जन्म : १९४६–१९६४)

दुसऱ्या महायुद्धानंतर जन्मलेल्या ह्या पिढीचे तारुण्य अतिशय उत्साही व बंडखोर होते. महायुद्धानंतरच्या काळात झालेल्या 'लोकसंख्या वाढीच्या स्फोटा'मुळे (population boom) त्यांना 'बेबी बूमर्स' असे संबोधतात. ह्या पिढीतील अनेक तरुणांनी आपल्या पालकांच्या विरोधात भूमिका घेतली आणि व्हिएतनाम युद्ध, शीतयुद्ध इत्यादींविरुद्ध आवाज उठवला. ह्या पिढीतील पालकांनी आपल्या मुलांचे भविष्य आणि कुटुंबाची संकल्पना ह्यांचा विचार करून पालकत्वाच्या (parenting) पद्धती नव्याने परिभाषित केल्या. भारतात लोकसंख्या नियोजन त्यानंतर सुरू झाले.

('जेन Z' ह्या पिढीतील लोक 'बेबी बूमर्स'ना 'काळाशी सुसंगत नसलेले आजी-आजोबा' मानतात.)

**४. जनरेशन एक्स** (जन्म : १९६५–१९८०)

ह्या गटातील व्यक्तींना 'स्लॅकर जनरेशन' (आळशी किंवा निवांत वृत्तीची पिढी) असे म्हटले जाते. जेन एक्सने एड्सची साथ, एमटीव्ही (MTV) संस्कृती, बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती आणि LGBTQ + हक्कांचा उदय ह्यांसारख्या गोष्टी अनुभवल्या आहेत. ह्या पिढीतील लोकांचा कल आपल्या मुलांच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासात अधिक सक्रिय सहभाग घेण्याकडे असतो; मुलांच्या उपक्रमांकडे ते केवळ मूक प्रेक्षक म्हणून पाहत नाहीत. भारतीय संदर्भात विचार करता, ह्या काळात प्रादेशिक पक्षांचा उदय झाला आणि देशाच्या भवितव्याची धुरा त्यांनी स्थानिक पातळीवर आपलीशी करायला सुरुवात केली.

**५. सहस्त्रक / जेन वाय** (जन्म : १९८१-१९९६)

ह्या पिढीने इंटरनेटविना आणि इंटरनेटसह असे दोन्ही कालखंड अनुभवले आहेत. तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे ही पिढी कदाचित 'स्व-केंद्रित' वाटू शकते, तरीही ती समुदाय-केंद्रित

आणि पर्यावरणविषयक जाणीव असलेली पिढी आहे. त्यांची ही वैशिष्ट्ये त्यांच्या मुलांमध्येही दिसून येतात. मिलेनिअल्स आपल्या मुलांना 'अस्सल स्वत्व' (authentic selves) जगण्यास आणि लिंगभेदाच्या पारंपरिक चौकटीत न अडकता (gender-non-conforming) वागण्यास, तसेच नवनवीन गोष्टींचा शोध घेण्यास प्रोत्साहित करतात. भारतीय संदर्भात, ह्या पिढीच्या काळात 'ऑपरेशन ब्लू स्टार', अयोध्या प्रकरण, आखाती युद्ध (Gulf War) आणि महागाई ह्यांसारख्या घटना घडल्या त्याचा परिणाम त्यांच्या वागण्या-बोलण्यातून व्यक्त होतो.

**६. जनरेशन झेड / झी** (जन्म : १९९७–२०१०)

जेन झेड / झी (किंवा iGen) मधील मुलांनी ११ सप्टेंबर २००१ चा 'ट्विन टॉवर'वरील हल्ला पाहिला आहे; त्यांना मोबाईल, स्क्रीन आणि टॅब्लेटच्या माध्यमातून एकमेकांशी जोडलेले राहणे आवडते. 'जेन झी'चे लोक अनेकदा पर्यावरणप्रेमी, सर्वसमावेशक, इतरांचा स्वीकार करणारे आणि राजकीयदृष्ट्या जागरूक असतात – त्यातील अनेकांचे वय अजून मतदानासाठी झालेले नसले तरीही. भारतीय संदर्भात, ह्या पिढीने – विशेषत: नवीन सहस्रकाच्या (millennium) सुरुवातीच्या काळात -भारताबाहेर नोकरीच्या संधी शोधण्यास सुरुवात केली. त्यामुळे 'ब्रेन ड्रेन'ची (बुद्धिमान मनुष्यबळाचे स्थलांतर) समस्या निर्माण झाली. हीच ती 'जनरेशन झी' आहे जिने - विशेषत: २० जून २०२६ पासून -NEET मधील भोंगळ कारभारावरून सरकारला हादरवून सोडले.

**७. जनरेशन अल्फा** (जन्म : २०१०-२०२४)

२०१० ते २०२४ ह्या काळात जन्मलेल्या व्यक्तींना 'जेन अल्फा' (Generation Alpha) म्हणून ओळखले जाते; ह्या पिढीचा सोशल मीडियाशी जवळचा संबंध आहे आणि ती तंत्रज्ञानाच्या बाबतीत अत्यंत कुशल (tech-savvy) आहे. ह्याचा परिणाम म्हणजे त्यांची एकाग्रता टिकवून ठेवण्याची क्षमता (attention span) आहे आणि प्रत्यक्ष मानवी संपर्कही मर्यादित झाला आहे. यातील काही जण कोविड-१९ संसर्गजन्य काळात जन्मले आहेत. इतर पिढ्यांच्या तुलनेत ही पिढी अधिक वैविध्यपूर्ण असून ती लहान कुटुंबांमध्ये वाढत आहे. शिक्षण आणि कार्यक्षेत्राचे स्वरूप नव्याने घडवण्याची क्षमता त्यांच्यात आहे. भारतीय संदर्भात विचार करता, १४० कोटी लोकसंख्येच्या देशात एकाच पक्षाचे वर्चस्व असलेल्या लोकशाही व्यवस्थेतून ही पिढी स्थित्यंतर करीत आहे.

**८. जनरेशन बीटा** (जन्म : २०२५-२०३९)

२०२५ व त्यानंतर जन्मणाऱ्या मुलांना 'जनरेशन बीटा' (Generation Beta) असे म्हटले जाते. त्यांच्याबद्दल काहीही जाणून घेण्यासाठी खूपच कमी वेळ आहे. बहुधा, 'जेन अल्फा'प्रमाणेच ही पिढीही तंत्रज्ञानात कुशल आणि सामाजिक जाणीव असलेली असेल. परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, व्यक्तिस्वातंत्र्य आणि टिकाऊपण ह्या गोष्टींना ते कदाचित प्राधान्य देतील. रशिया-युक्रेन आणि अमेरिका-इराण-इस्रायल यांच्यातील तणावाचा सामना त्यांना कदाचित करावा लागेल. आभासात्म बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी हे ह्या पिढीच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य भाग असतील. भारतीय संदर्भात, पालक आणि दीर्घायुषी आजी-आजोबा ह्यांचा त्यांना आधार मिळू शकेल.

जनरेटिव्ह लेबले उपरोक्त सूचित करतात :

(१) वर्णमालानुसार नामकरण पद्धती Z/Ze पर्यंत पाळली जाते व त्यानंतर पिढी अल्फा सुरू होते.

(२) ब्रिटिश/कॉमनवेल्थचा उच्चार 'Gen Z' आणि USA चा उच्चार 'Gen Zee' असा आहे.

(३) विशिष्ट श्रेणी तात्पुरत्या जीवनाच्या अवस्थेऐवजी विशिष्ट जन्म ठिकाण दर्शविते  उदाहरणार्थ, एक किशोरवयीन (उदा. १९९७-२०१२) मुलगा मोठा होतो आणि श्रेणी बदलतो, परंतु तो/ती कायमस्वरूपी त्याच लोकसंख्याशास्त्रीय गटाचा (जनरल Z) भाग राहतो.

(४) मार्केटर्स, समाजशास्त्रज्ञ आणि वृत्त माध्यमांसाठी प्रमुख जागतिक घटनांद्वारे आकारलेल्या त्या वर्षाच्या गटाची प्रसिद्धी वापरणे सोपे होते.

(५) ग्रुपद्वारे अनुभव, शेअर केल्यास, लोकांची ओळख देते उदा. स्मार्ट फोन, कोविड-१९, युद्ध इ.

(६) अशा श्रेणी संशोधकांचे वय आणि संस्कृतीतील समानता उदा. संवाद, लिंग, लैंगिकता, वैयक्तिक जीवनशैली, मूल्य-प्रणाली इ. सक्षम करतात.

(७) अशा प्रकारच्या श्रेणी मानवतेची, सभ्यतेची प्रगतीशील उत्क्रांती पाहण्यासाठी आणि मानवी संस्कृती समृद्ध करण्यासाठी ज्ञान पुरवितात.

आपल्या जनरेशन झी ने कमाल केली. सिद्ध केले की भारताच्या एका सरन्यायाधीशांच्या 'झुरळ' ह्या अनौपचारिक टिप्पणीने एक चळवळ निर्माण झाली; NEET, सरकार आणि सामाजिक एकात्मतेचा चेहरामोहरा बदलू लागला. हा बदल संपूर्ण भारतात सावकाश, हळूहळू सर्वदूर सुरू झाला आहे. खरोखर आशेचे किरण!

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

●

# अखेर तरुणाईने करून दाखविले

-जॉन गोन्सालविस
उमराळे

मूळचा महाराष्ट्रातील परभणी येथील ३० वर्षीय युवक अभिजित दिपके अमेरिकेत बॉस्टनमध्ये होता. त्याचा रोजचा दिनक्रम ठरलेला होता. दिवसभर नोकऱ्यांसाठी अर्ज करायचे. संध्याकाळी जिमला जायचे आणि रात्री PS5 वर FIFA खेळायचे. एके दिवशी तो FIFA खेळत होता. खेळताना सहज ट्विटर उघडले. तेव्हा भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत ह्यांनी एका खटल्याच्या संदर्भात बेरोजगार युवकांचा नामोल्लेख कॉकरोच (झुरळ) म्हणजे परजीवी ह्या अर्थाने केला होता. ह्यावर त्याने सहज एक ओळ लिहिली : "What if all Cockroaches come together?" एवढ्याच सिंगल लाईनचा एक ट्वीट केला. तासाभरात त्यावर ७००-८०० प्रतिक्रिया आल्या. मग 'कॉकरोच जनता पार्टी' नावाचा एक आभासी पक्ष तयार केला आणि काही दिवसात २.२ कोटी (२२ मिलियन) फॉलोअर्स झाले.

उपहासगर्भतेतून १५ मे २०२६ रोजी कॉकरोच जनता पार्टीचा जन्म झाला. प्रथम ह्या पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके ह्या तरुणाने ६जूनला दिल्ली येथील जंतर मंतरवर एक दिवसाचे आंदोलन केले. त्यानंतर भारतातील पुणे, लखनौ, अमृतसर, हैद्राबाद, जयपूर, बंगलुरू ह्या मुख्य शहरांमध्ये जनआंदोलने केली. त्यात त्याला आशुतोष रांका (जयपूर) आफरीन नवाज (बंगलुरू) आणि सौरव दास ह्यांबरोबर शेकडो साथीदार मिळाले. मग २० जूनपासून राजधानी दिल्ली येथे जंतर मंतरवर बेमुदत आंदोलन सुरू केले. तेथे त्यांना सर्व वयोगटातील, सर्व जाती, धर्म, लिंग, वयोगट, प्रांत लोकांनी क्रियाशील पाठिंबा दिला.

राम मनोहर लोहिया म्हणायचे,
''जब सडके खामोश हो जाती है
तो संसद आवारा हो जाती है ।''



संसदेला जागे करण्याचे काम युवक-युवतींनी रस्त्यावर येऊन केले. त्यांना आम जागृत नागरिकांनी साथ दिली. प्रश्न विचारणे म्हणजे देशद्रोह, सत्ताधारी मताच्या विरोधी मत मांडणे म्हणजे राष्ट्रद्रोह. शंका उपस्थित करणे म्हणजे तुम्ही परदेशी. अशा वेळी ह्या जागृत जेन झीने सत्ताधाऱ्यांना केवळ प्रश्नच विचारले नाही; तर अनेकांना निर्भय आवाज दिला. प्रश्नांचे उत्तर मिळेपर्यंत आपल्या मताशी, विचारांशी ठाम राहिले. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे जे १२ वर्षांत विरोधी पक्षाला जमले नाही, ते त्यांनी करून दाखविले. कवी हरिवंशराय बच्चन म्हणतात,

''नेहलसे डरकर नौका पार नहीं होती । कोशिश करनेवालो की कभी हार नहीं होती ।''

> **जेन झी ने केवळ प्रश्नच विचारले नाहीत; तर अनेकांना निर्भय आवाज दिला.**

हे आंदोलन चिरडण्यासाठी विविध प्रयत्न झाले. जंतर मंतरवरील युवक-युवतींवर पोलिसांनी खिळे ठोकलेल्या दंडुका वापरल्या. अश्रुधुराचा मारा केला. पॅलेट गनचा मारा केला. साध्या कपड्यातील बॅच नसलेल्या, तोंडाला मास्क लावलेल्या गुंडांनी त्यांच्यावर हल्ले केले. वीजपुरवठा खंडित केला. सोयीसुविधा दिल्या नाहीत. पण ही युवा पिढी जराही 'टस से मस नही हुई!'

युवकांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली भारतीय राज्यघटना आणि मुखावर वंदे मातरम् 'इन्कलाब जिंदाबाद', 'जय भीम'च्या घोषणा होत्या. अन्यायी, अत्याचारी, जुलमी, दडपशाही विरोधात उभ्या राहिलेल्या एका पिढीच्या अस्वस्थतेचा तो आवाज होता. पारंपरिक राजकीय पक्षांसारखे कार्यकर्त्यांचे जाळे, निधी, कार्यालये, संघटनात्मक यंत्रणा नव्हत्या तरीही ह्या जेन झी ने जगताला दाखवून दिले. ह्या आंदोलनात गांधीवादी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक ह्यांच्या २५ दिवसांच्या उपोषणाने पाठिंबा दिला. मात्र त्यांनी ऐन मध्यरात्री उपोषण मागे घेतले तरी ही युवा पिढी विचलित झाली नाही. आपल्या मागण्यापासून तसूभरही ढळली नाही. मुळात वायफाय, इंटरनेट, व्हॉट्‌अ‍ॅप, स्मार्ट फोन, यु ट्युब, ट्वीटच्या काळात जन्माला आलेली ही जेन झी कधी रस्त्यावर उतरेल हे कोणाला खरेही वाटले नसते. संपूर्ण आयुष्य ऑनलाईन होते; परंतु देशव्यापी परिस्थितीने त्यांना रस्त्यावर आणले.

'पापा की परी' रणरागिनी झाल्या. 'माँ का लाडला बेटा' तळपता अंगार झाला. ज्या दिल्लीत रात्रीत बसमध्ये निर्भयाचा आवाज दाबला गेला होता त्याच दिल्लीत आसमंतात रात्रीच्या गर्भात जेन झी च्या घोषणा, गीत, आवाज, आक्रोश घुमघुमला. युवक-युवती खांद्याला खांदा देऊन लढत होते. जात, प्रांत, धर्म, भाषा, लिंगभाव ह्या पलीकडे गेलेली ही जेन झी होती. ह्यासाठी त्यांनी पारंपरिक आंदोलनाचा मार्ग अवलंबला नाही. वेळोवेळी नावीन्यपूर्ण रील्स, सृजनशील मील्स, कौशल्यपूर्ण चित्रफित, सर्जनशील पोस्टर्स बनवली.

ह्या संपूर्ण आंदोलनातून दादा धर्माधिकारी ह्यांनी 'तरुणाई' ह्या पुस्तकात तरुणाईचे तेजस्विता, तपस्विता व तत्परता ह्या तीन गुणांचे जे वर्णन केले



आहे त्याचे दर्शन घडले. जंतर मंतरवर काही मुलं घरच्यांचा पाठिंबा घेऊन आलेली, तर अनेक मुलं घरच्यांचा विरोध डावलून आली होती. ज्या युवकांनी २०१४, २०१९ व २०२४ च्या निवडणुकीत सत्तारूढ पक्षाला मतदान केले होते, तेही सामील झालेले होते. पोलिसांनी मुलांवर पाण्याचा फवारा मारल्यावर त्यांनी 'रेन डान्स' केला. बॅरिकेट्स लावले तर त्यांनी ढकलगाडी केली. लाठ्या मारायला पोलीस आले तर मोठमोठ्याने राष्ट्रगीत म्हणायला सुरुवात केली. ज्या पोलिसांनी मारले त्यांना दुसऱ्या दिवशी फुले आणि पाणी देत होते.

कॉम्प्युटर, गॅझेटमध्ये डोकं खुपसून बसणाऱ्या ह्या पिढीला आपण आत्मकेंद्री म्हणत असतो. परंतु त्यांच्या प्रगल्भतेची, संवेदनशीलतेची आणि सृजनशीलतेची अनेक उदाहरणे जंतर-मंतरवर देशभरच्या लोकांनी पाहिली. मग एका हाताने पोलिसांची व्हॅन अडविणे असो, वा जेव्हा अश्रुधूर आणि लाठीमारामुळे लोकांना श्वास घ्यायला त्रास होत होता तेव्हा खूपशा युवतींनी स्वत:च्या ओढण्या फाडून अनेक मुलांना तोंडावर बांधण्यासाठी दिल्या, तर काही युवकांनी स्वत:चे शर्ट फाडून स्त्रियांच्या जखमा बांधल्या.

डॉ.राजेंद्रप्रसाद म्हणतात, ''तरुणांचे हात उगारण्यासाठी नाहीत तर उभारण्यासाठी असतात'', हे ह्या जेन झी शक्तीने दाखवून दिले. मात्र भारत देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे सडलेली, किडलेली आहे. केवळ 'नीट' पारदर्शन करून चालणार नाही. संपूर्ण शिक्षण व्यवस्था प्राथमिक स्तरापासून विद्यापीठीय स्तरावर मुळापासून स्थित्यंतर होणे आवश्यक आहे. हा केवळ हिमनगाचा एक दशांश भाग आहे. संपूर्ण हिमनग सागराच्या आत आहे तो बाहेर काढायला हवा.

हे मात्र खरे ह्या जेन झी च्या आंदोलनाने सत्ताधारी पक्षाला त्याची जागा दाखवून दिली. विरोधी पक्षाला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. सर्व देशभरात निर्भय बनण्याचा संदेश दिला आणि जेन झी शक्तीला चैतन्यदायी बनवले, काळानुसार बदलणाऱ्या युगासाठी आंदोलनाचा नवा आयाम दिला. केवळ दोन-अडीच महिन्यात कॉकरोच जनता पार्टी आणि त्या जेन झी च्या पिढीने जे करून दाखवले त्या संदर्भात कवी शेले ह्यांच्या -

'युवकांच्या मुखावरील गाणी सांगा  
मी त्या देशाचे भविष्य सांगतो'

ह्या ओळीचे स्मरण झाले.

देशाचे भविष्य आता बदलत्या युवा पिढीच्या हाती येईल आणि देशात स्थित्यंतर होईल की नाही ह्यावर निश्चित भाष्य करता येणार नाही. परंतु जागृतीचा दीप त्यांनी तेवत ठेवला आहे. सध्या लोकशाही देशातील सर्व चारही स्तंभ सत्ताधारीपुढे नांगी टाकत असताना युवाशक्तीचा आवाज कुणीही दाबू शकत नाही हे त्यांनी दाखवून दिले आहे.

''यह ता सिर्फ अंगडाई है ।  
आगेकी लढाई बाकी है ।।''

●

## निवेदन

'सुवार्ता' (धर्मप्रांतीय मराठी मासिक) हे 'श्रद्धेच्या प्रकाशात संपन्न जीवनासाठी' १५ ऑगस्ट १९५५रोजी चर्चद्वारे सुरू केलेले नियतकालिक आहे. ते भिन्न धर्मीय व विविध पक्षीय लेखनाची देखील दखल घेत असते.

सध्या वसई-विरार परिसर नानाविध समस्यांच्या तावडीत सापडलाय. म्हणून आम्ही महानगरपालिकेचे महापौर व उपमहापौर ह्यांची मुलाखत (जुलै अंक), आमदार स्नेहाताई दुबे-पंडित (वसई मतदारसंघ) व आमदार राजन नाईक (नाला-सोपारा मतदारसंघ) ह्यांच्या मुलाखती (ऑगस्ट अंक) प्रसिद्ध केल्या आहेत. ह्या अंकात महानगरपालिकेचे आयुक्त श्री. पृथ्वीराज बी.पी. IAS ह्यांचीदेखील मुलाखत घेतली आहे. ह्या सर्वांनी त्यांनी केलेले कार्य व आगामी कार्याचे सुतोवाच केले आहे. तरी कृपया, निवडलेल्या किंवा नियुक्त केलेल्या व्यक्तींकडे पक्षाच्या दुर्बिणीतून न पहाता, लोकहितार्थ त्या संकल्पांचा आपण सर्वांनी पाठपुरावा करावा ही त्यामागील प्रामाणिक दूरदृष्टी आहे. आपल्या 'सुवार्ता'चे चोखंदळ वाचक, सहृदय हितचिंतक व द्रष्टे समाजधुरीण ह्या बाबतीत सहकार्य करतील अशी आमची खात्री आहे. **- संपादक**

## नाताळ विशेषांक

सालाबादप्रमाणे यंदादेखील डिसेंबर २०२६चा अंक 'नाताळ विशेषांक' म्हणून प्रसिद्ध केला जाईल.

**विषय : भारतीय संविधान व विविध (धर्मीय) आध्यात्मिकता**

शब्दमर्यादा : २०० शब्द

अंतिम तारीख : ५ नोव्हेंबर २०२६

आपले विचार 'सुवार्ता' कार्यालयात सादर करावेत.

* * * *

## मुखपृष्ठ

आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन (९ऑगस्ट) आणि भारतीय स्वातंत्र्यदिनाचे (१५ऑगस्ट) औचित्य ओळखून, विविध धर्मीय सुसंवाद सभा (१६ ऑगस्ट) तसेच पवित्र कुमारी मरियेचा जन्मदिन (८ सप्टेंबर) हे सर्व सण-सोहळे-उत्सव साजरे करताना टिपलेली क्षणचित्रे आपल्या एकता व एकात्मतेचे प्रतीक दर्शविते.

## उद्‌बोधक

जुलै २०२६ चा ‘सुवार्ता’ नेहमी असतो त्यापेक्षा जास्त सुंदर वाटला. AI वरील उद्‌बोधक माहितीपर, फा. रॉबर्ट जोसेफ गोन्सालविस ह्यांचा लेख वाचकांना उपयुक्त ठरणारा आहे. संत शारबेल मखलुफ ह्यांच्यावरील लेखही अनोखा वाटला. जेनेरिक औषधांवरील थॉमस ब्रिटो ह्यांचा लेखही माहिती देणारा आहे. ‘इकिगाई’चे अनुसरण केल्यास निरोगी जीवनाचे रहस्य उलगडते, हा मंत्रही ह्या अंकातून मिळतो. अन्य लेखही वाचनीय आहेत. कविता विभागही उत्तम. पुस्तक परीक्षणात डॉ. सिसिलिया कार्व्हालो ह्यांचे ‘शायेलीचा झेला’ ह्या पुस्तकावरील परीक्षण तसेच स्टॅन्ली गोन्सालविस ह्यांचे ‘सहवेदना’ ह्या पुस्तकावरील परीक्षण वाचनाची उत्सुकता वाढवते. एकूण अंक चांगला झाला आहे. आपले अभिनंदन!

**- नारायण लाळे,** डोंबिवली
मो. : 99 87 92 41 99

## नव्या विचारांचा समावेश

बिशप थॉमस डिसोजा ह्यांचे ऑगस्ट महिन्यातील ‘अधिकृत’ आध्यात्मिक असून हृदयाला स्पर्शून गेले. प्रार्थना, बलिदान, समर्पण, त्याग, मौन, सेवा ह्या शब्दांचा खरा अर्थ समजतो आणि आत्मसात करून जीवन जगतो तेव्हा आपण खरे आध्यत्मिक बनतो. मी गुजरात प्रांतात येशू संघात गेल्या तीस वर्षांपासून मिशनरी धर्मगुरू म्हणून कार्य करीत आहे. प्रभू येशूमुळे आणंद, उनाई, बरडीपाडा, झन्खवाव, व्यारा, आंकलाव, पिंपरी-डांग मिशनमधील अनेक खेडेगाव पायाखालून घालू शकलो. ह्याद्वारे धर्म, संस्कृती, परंपरा, जात-पात, भाषा, कौटुंबिक आर्थिक असमर्थता, मानवीय सामाजिक व्यवहार काय असतात व खरी माणुसकी काय असते ह्याचा उलगडा झाला.

संपादकीय, संपादकास पत्रे, सर्व लेख, साद-प्रतिसाद ह्या माध्यमातून एकसूत्रता साधली आहे. ‘सुवार्ता’त नव-नव्या विचारांचा समावेश व अन्य धर्मीय लेखकांचा समावेश हा स्तुत्य उपक्रम आहे. ‘सुवार्ता’ आध्यात्मिक जडणघडण, समाज प्रबोधन, जबाबदार नागरिकत्व, सर्व समभाव या बाबींवर भर देते, हे खरोखर आनंददायक आहे.

**-फा. अँन्ड्र्यू जोसेफ डाबरे**, ये.सं.
पिंपरी डांग, गुजरात

## सकारात्मक बदल



‘सुवार्ता’ ह्या मासिकाच्या दर्जात झालेला सकारात्मक बदल विशेष जाणवतो. हे मासिक दिवसेंदिवस आशयपूर्ण, दर्जेदार आणि वाचनीय साहित्याने समृद्ध झालेले दिसते.

सध्याच्या अंकातील जवळजवळ प्रत्येक लेख काहीतरी वेगळे देऊन जातो. विषयाची निवड, लेखाची मांडणी, भाषेचा दर्जा, विचारांची समृद्धता ह्यांमुळे मासिकातील प्रत्येक लेख आवर्जून वाचावा आणि त्यावर मनन करावे असे झाले आहेत. मासिकाने केलेली ही दर्जात्मक वाटचाल तसेच संपादक मंडळाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची व उत्तम साहित्य दृष्टीची ही पावती आहे. ह्यापुढेही असेच विचारप्रवर्तक व समाजाला दिशा देणारे साहित्य वाचकांना मिळो, ही शुभेच्छा!

ऑगस्ट ‘सुवार्ता’ देखील वाचनीय आहे. बिशप महाशयांचा ‘धर्मगुरू देवाच्या हृदयात उमटलेला अनंत स्वर’ ह्या लेखातील प्रत्येक शब्द वास्तवाला धरून आहे. वास्तवाचे भान, परिवर्तनाची गरज आणि सकारात्मक विचारांची दिशा या तिन्हींचा सुंदर संगम ह्या लेखात जाणवतो.

**- इझाबेल जोकीम कोरिया**, नंदाखाल
मो. : 77 75 80 44 23

## आपुलकी

माझ्या ‘आस्वाद किचन’मधील गोष्ट लोकांपर्यंत पोहोचवली. धर्म, जात, पैसा बाजूला ठेवून फक्त आपुलकी शिल्लक राहते, हेच मला सांगायचं होतं. ते शब्द तुम्ही जपलेत. पुढेही नवीन विषयांवर लिहिण्याची संधी द्याल, अशी आशा आहे.

मी नेहमीच समाजातील चांगल्या गोष्टी, अनुभव व आपुलकीचे किस्से मांडण्याचा प्रयत्न करीन. असंच वाचकांच्या मनातलं मांडत रहा. पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा!

**- नागेश प्रमोद राऊत,** आगाशी
मो. : 90 28 28 38 75

## अभिनंदन आणि आभार

‘सुवार्ता’ ऑगस्ट २०२६च्या अंकात ‘नायगाव स्टेशनची सत्तरी’ हा लेख आजच्या तरुण पिढीसमोर आणल्याबद्दल सिडनी मोरायस ह्यांचे अभिनंदन! कार्यकर्त्यांना हाताशी धरून पालीचे सुपुत्र ख्रि. पॉलीकार्प कुटिनो ह्यांनी अथक प्रयत्नांनी नायगाव स्टेशनच्या निर्मितीस केंद्र सरकारला भाग पाडले. ह्या लेखाच्या वाचनातून कुणाला ख्रि. पी.ए.कुटिनो ह्यांचे उचित ठिकाणी स्मारक व्हावे, अशी प्रेरणा मिळावी, ही सदिच्छा! आमच्या संचालक मंडळातर्फे ‘सुवार्ता’ संपादक मंडळाचे आभार!

**- चंद्रकांत ह. धोंडेकर**
कार्यवाह, दयावर्दी वाचनालय, नायगाव

## संवादशील सुदृढ समाज

आंतरधर्मीय सुसंवाद ह्या एका चांगल्या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आपले व सर्व सहकारी मंडळींचे अभिनंदन! सद्य:स्थितीत संवादाची माध्यमे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. जग जवळ आलंय. मात्र माणूस माणसापासून दूर झालाय असं विदारक चित्र दिसतंय. समाजात संवाद कुंठीत होत असताना, अशा वातावरणात आपला संवाद पूरक कार्यक्रम प्रबोधनपर व उद्‌बोधक ठरणारा आहे.

भारतीय संविधान विषयाचा विद्यार्थी ह्या नात्याने हा कार्यक्रम मला विशेष भावला. संविधानाची उद्देशिका, भाग ३ मधील मूलभूत हक्क ( विशेष करून समतेचे तत्व मांडणारे आर्टिकल १४ ते १८, सप्त स्वातंत्र्य देणारे आर्टिकल १९,

जीविताचा व व्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क देणारे आर्टिकल २१, धर्मस्वातंत्र्य २५) आदि बाबत सामाजिक जागृती गरजेची आहे. भाग ४ मधील राज्याची मार्गदर्शक तत्वे आणि भाग ४ अ मधील मूलभूत कर्तव्य नागरिकांना ज्ञात असणे आवश्यक आहे. ह्यासाठी आगामी काळात विशेष प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा आहे. समुदायांना एकत्र आणण्याच्या ह्या अशाच प्रयत्नातून संवादशील सुदृढ समाज नक्कीच निर्माण होईल.

**- ॲड. सुरेश कामत**
संपादक, 'वसई समता'

### ज्वलंत नागरी समस्या

आज सर्व बांधकाम झालेल्या इमारती किंवा स्वतंत्र बंगल्याभोवती उघड्या जागेत लादी किंवा काँक्रिटीकरण करून जागा आच्छादित केली जाते त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही. अशी लाखो बांधकामे नगरपालिका हद्दीत आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याचा तुटवडा भासतो. ह्यावर उपाय एकतर अशा बांधकामांना परवानगी पूर्णता बंद करावी किंवा हा भाग प्रॉपर्टी टॅक्स म्हणून गणला जावा.

**- सायमन कार्व्हालो**, मुळगाव
मो. : 90 96 09 99 59

### वैविध्यपूर्ण

'सुवार्ता' ऑगस्ट २०२६चा अंक अत्यंत वाचनीय आहे. सर्वच लेख वैविध्यपूर्ण व दर्जेदार आहेत. 'अधिकृत'मधील बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या 'धर्मगुरू : देवाच्या हृदयात उमटलेला अनंत स्वर' ह्या लेखाने अंतर्मुख केले. धर्मगुरूच्या जीवनाने शिकवले की, पवित्र याजक तोच, जो स्वत:च्या नावाची सावली कमी करून ख्रिस्ताच्या चेहऱ्याला अधिक स्पष्ट करतो. धर्मगुरू करीत असलेल्या दीर्घकाळ सेवेबद्दल मनात कृतज्ञतेचे भाव उमटले. अतिवृष्टीने उभी केलेली आव्हाने, लोकप्रतिनिधींच्या मुलाखती वाचनीय व नागरी प्रश्नांबद्दल आश्वस्थ करणाऱ्या आहेत. संपादकीय विचार प्रवृत्त करणारे आहेत. 'स्त्रियांची सोड्यालिटी एक हुकमी सैन्यच' ह्या लेखाने नि:स्वार्थीपणे सेवाकार्य करणाऱ्या स्त्रियांची फौज डोळ्यांसमोर उभी राहिली. मुखपृष्ठ उत्तम. 'रोज एक तरी ओवी अनुभवावी' ह्या उक्तीनुसार मी चिंतन करते. उत्तम, दर्जेदार साहित्याबद्दल अभिनंदन! पुढील 'सुवार्ता'ची मी आतुरतेने वाट पाहते.

**- बेन्सी सिल्वेस्टर कोयलो**, रमेदी

### आरोग्याला गंभीर धोका

'सुवार्ता' ऑगस्ट अंकात 'माझे मत'मध्ये 'रेन हार्वेस्टिंग - एक वरदान' ह्याविषयी थेट गोळा केलेले किंवा न प्रक्रिया केलेले पावसाचे पाणी पिण्यामुळे आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. हवेतील प्रदूषण व विषारी घटक, छत व साठवणुकीच्या ठिकाणची घाण व हानिकारक सूक्ष्मजीव हे पावसाच्या पाणी पिण्याचे मुख्य तोटे आहेत. असे पाणी फिल्टर न करता किंवा न उकळता प्याल्याने पोटात संसर्ग, डायरिया (अतिसार), उलट्या, फूड पॉयझनिंग होऊ शकते. छतावर साचलेली धूळ, पक्ष्यांची विष्ठा किंवा पालापाचोळा पाण्यात मिसळल्याने जिवाणू व विषाणू शरीरात जातात. हे पाणी डिस्टिल्ड किंवा खनिजरहित असल्यामुळे शरीराला आवश्यक असणारी पोषके ह्यातून मिळत नाहीत.

**- लुईस लोपीस**, नानभाट
मो. : 98 90 22 19 81

### दर्जा उंचावला

फादर (डॉ.) जोएल डिकुन्हा ह्यांच्या समर्थ संपादकत्वाखाली 'सुवार्ता' आणि 'शांतिदूत' मासिकाचा दर्जा उंचावला आहे. पुन्हा एकदा बिशप आब्रियो व फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचा संपादनकाळ आठवला. बरेचशे लेखक नवोदित असूनदेखील त्यांचे साहित्य दर्जेदार व अभ्यासपूर्ण असतात. पूर्वी आम्ही जाहिरातींची पृष्ठे व लेख ह्यांची थट्टेने तुलना करायचो; परंतु सध्या लेखांची मांदियाळी इतकी वाढली आहे की जाहिरातीचे मोजमाप करायला आम्हांला अवसरच मिळत नाही. अभिनंदन

**- डेनिस से. लोपीस**, कातरवाडी, शिर्लय
मोबाईल : : 88 88 86 49 84

●

## 'सुवार्ता' साहित्य मेळावा

**वर्षे ४५वे**

एक स्नेहानुभव... साहित्यानुभव... विचारानुभव... जीवनानुभव...

**शुक्रवार दिनांक २ ऑक्टोबर २०२६.**

वेळ : सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० पर्यंत (अर्धा दिवस)

**प्रमुख पाहुणे : पर्यावरण व सध्याच्या परिस्थितीवरील तज्ज्ञ वक्ते**

**अध्यक्ष** : बिशप थॉमस डिसोजा (वसई धर्मप्रांत)

**स्थळ : कृपामाता सभागृह, पापडी**

* सर्वांना प्रवेश विनामूल्य *

आपण याच. सोबत इतरांना घेऊन या!

**- संपादक 'सुवार्ता' व 'सुवार्ता' परिवार**

# पर्यावरणपूरक विकसित शाश्वत शहर निर्माण करण्यासाठी कटिबद्ध

## पृथ्वीराज बी.पी., IAS : आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका

- **मॅकेन्झी डाबरे,** भुईगाव
- **डॉमिनिका डाबरे,** गिरीज



(माननीय श्री पृथ्वीराज बी. पी. हे २०१४ बॅचचे आय.ए.एस. ऑफिसर आहेत. त्यांनी आय.आय.टी. मुंबई येथून कॉम्प्युटर सायन्स व आय.आय.एम. अहमदाबाद येथून मॅनेजमेंटची पदवी संपादन केली आहे. लातूर, सोलापूर, नागपूर, भंडारा, पुणे आदी ठिकाणी त्यांनी सेवा बजावली आहे. १ एप्रिल २०२६ पासून ते त्यांची वसई-विरार शहर महानगरपालिकेचे 'आयुक्त' आहेत. एक कर्तव्यदक्ष अधिकारी व शहरी प्रश्नांचे अभ्यासक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

**प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना आपणाला काय अनुभव आले आहेत?**

* मसुरी येथील भारतीय प्रशासकीय सेवेच्या प्रशिक्षणानंतर उपजिल्हाधिकारी, महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त म्हणून, शहरी व ग्रामीण भागात काम करण्याची मला संधी मिळाली. ग्रामीण वा शहरी भागातले प्रश्न, तेथील विविधता व भौगोलिक परिस्थिती आणि परंपरा वेगवेगळ्या असू शकतात. उदा. लातूर ग्रामीण भागातील व गडचिरोली-नंदुरबार मध्ये असलेले प्रश्न, महाराष्ट्रातील ग्रामीण भाग व दक्षिण भारत तसेच उत्तर किंवा ईशान्य भारतीय आव्हाने ह्यांमध्ये खूप फरक आहे. शहरी व ग्रामीण भागात काम करताना प्रश्नांची माहिती व प्रश्न कसे हाताळतात, त्या संदर्भात लोकप्रतिनिधी व प्रशासन ह्यांची भूमिका ह्याबाबत विविध अनुभव आले, प्रत्यक्ष काम करताना ज्ञान मिळत गेले. ज्या ठिकाणी आम्हाला पोस्टिंग मिळते, तो नवीन अनुभव, नवीन शिकण्याची संधी देते व शिकण्याची ही निरंतर प्रक्रिया ही दिशा देण्याचे काम करते मग लातूर, सोलापूर, पुणे, नागपूर असो किंवा वसई; शिकण्याची व त्यातून प्रशासकीय अधिकारी म्हणून संविधानाच्या चौकटीत लोकाभिमुख काम करण्याची प्रेरणा मिळत राहते.

**वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून राज्य शासनाकडून काय अपेक्षा आहेत?**

* महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविणे हे सरकारचे स्वप्न आहे. पूर्वीचा भारत हा ग्रामीण भागात होता. आताचा भारत हा शहरीकरणाकडे वाटचाल करणारा भारत आहे. ग्रामीण विकासासोबत शहरी विकास हे सरकारचे धोरण आहे. विकासाचे इंजिन म्हणून शहरी भागावर सरकारचे विशेष लक्ष आहे; शहरी भागांतील पाणी-रस्ते-मूलभूत सेवासुविधा, दळणवळण, आरोग्य-शिक्षण, मजबूत इंटरनेट सेवा इत्यादी पायाभूत सुविधा सोबतच शहरीकरणाचे प्रश्न उदा. सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, शहरांतील पर्यावरण ह्याबाबत सरकार कार्य करीत आहे. उदा. दिल्ली आपल्या देशाची राजधानी आहे. परंतु नोव्हेंबर-डिसेंबर-जानेवारी ह्या महिन्यात प्रदूषणामुळे दिल्लीत जगणे कठीण होते. बंगलोर IT साठी मोठे शहर, पण प्रचंड वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे विकास साधताना प्रदूषणासोबत जगायचंय, वाहतूक कोंडीला तोंड देत विकासाची परिभाषा व विकासाची दिशा ह्यांचा पर्यावरणाशी सांगड घालणे ह्या दृष्टीने वसई शहर विकसित करण्याचा सरकारचा व वसई-विरार महानगरपालिकेचा प्रयत्न आहे.

**आपल्या मते, वसईतील मुख्य समस्या कोणत्या आहेत व त्यावर उपाय काय?**

* माझ्या दृष्टीने वसईतील मुख्य समस्या :

**पूरग्रस्त वसई :** भौगोलिक परिस्थिती व हवामान बदल ह्यामुळे पूरग्रस्त शहर म्हणून वसईची ओळख बनत आहे. वसईला पूरमुक्त करणे हा प्राथमिक व प्राधान्यक्रम आहे.

**घनकचरा व्यवस्थापन :** शास्त्रशुद्ध पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन न केल्याने वसईमधील डम्पिंग ग्राउंड व कचरा ही मोठी समस्या बनली आहे. सोबत कचरा जाळल्यामुळे नागरिकांना होणारा त्रास व कचऱ्याची विल्हेवाट लावताना महानगरपालिकेची दमछाक ह्यामुळे घनकचरा व्यवस्थापन ही एक महत्त्वाची समस्या बनली आहे.

**रस्ते - खड्डे, वाहतूक कोंडी, फुटपाथवर फेरीवाला अतिक्रमण :** शहरातील प्रचंड रहदारी व वाहतूक कोंडी लक्षात घेता, कायमस्वरूपी उपाय शोधून अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. त्यादृष्टीने वसई, नालासोपारा, विरार व नायगाव रेल्वे स्टेशनच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक कोंडी होते त्यावर मार्ग काढण्यासाठी तेथील अतिक्रमण हटवून रस्ते व फूटपाथ रुंद व दुरुस्त केल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या गाईडलाईनचे पालन होईल. सोबत फेरीवाल्यांना

ओळखपत्र व नियोजनबद्ध जागा दिल्याने त्यांचा रोजगार बाधित होणार नाही. राज्य शासन व M.M.R.D.A.च्या मदतीने आपण हायवे ते शहर ह्यांना जोडणारे मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व त्याचे काँक्रिटीकरण करणार आहोत. आवश्यक ठिकाणी ७ मोठे उड्डाणपूल व रेल्वेच्या मदतीने ४ नवीन उड्डाणपूल बनवीत आहोत. सदर रस्त्याबाबत निविदा प्रकिया सुरू आहे. पुढील २-३ महिन्यात प्रत्यक्ष कामालाही सुरुवात होईल.

वसईसाठी रिंगरूट प्रकल्प आवश्यक आहे. परंतु त्यासाठी होणारा साधारण ४००० ते ५०००  कोटीचा खर्च हा महानगरपालिकेच्या आवाक्याबाहेर आहे. राज्य व केंद्र शासनामार्फत निधीसाठी प्रयत्न करीत आहोत. पुढील २-३ वर्षांत वसईतील महत्त्वाचे रस्ते मजबूत, रुंद व काँक्रिटचे होतील. सोबत 'खड्डे व खड्ड्यांचे रस्ते' हे समीकरण बदलून मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेप्रमाणे टप्याटप्याने वसईतील इतर रस्ते  काँक्रिटचे करून कायमस्वरूपी खड्डेमुक्त करण्याचा संकल्प महानगरपालिकेने केला आहे.

**टिकावू रस्ते :** रस्त्यावरील खड्डे व दरवर्षी पावसाळ्यानंतर होणारे खड्डे यामुळे नागरिकांचा महानगरपालिकेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. वसईमध्ये मागील वर्षी रस्त्यात खड्डे पडले होते व ते खड्डे बुजवण्याचा ठेका दिलेल्या ठेकेदारासोबत सभा घेऊन, पुन्हा तिथेच खड्डे पडल्यास  स्वखर्चाने भरावेत अन्यथा, त्यांना 'ब्लॅकलिस्ट' केले जाईल. ह्याविषयी त्यांना सक्त ताकीद दिली आहे. तसेच पावसाचे पाणी साचून  होणाऱ्या खड्ड्याच्या संदर्भात  एक वा दोन मीटरपुरताच नाही, तर तेथे सलग पाच ते १५ मीटरचा पॅच मारणे व तो पावसाच्या पाण्यात टिकून राहील अशा विकसित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच पुन्हा पुन्हा त्याच त्याच रस्त्याचा किंवा खड्ड्यांचा ठेका निघू नये ह्यासाठी गुणात्मक, टिकावू, दर्जेदार काम व कामाबाबत आधुनिक यंत्रणाद्वारे व्यवस्थापन ह्यावर भर देण्यात येत आहे.

**संस्थात्मक प्रशासकीय व्यवस्था :**  महानगरपालिकेमध्ये प्रभावी व प्रशिक्षित मनुष्यबळ असावे ह्या दृष्टीने  'कृतिबद्ध आराखडा' तयार करण्यासाठी एक मोठे पाऊल महानगरपालिकेने उचलले आहे. ह्यासाठी टी.सी.एस. सोबत करार केला आहे. महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करून  प्रशिक्षण, क्षमता वाढ व गुणात्मक बदल घडवून आणण्यासाठी पाऊले उचलली आहेत. तसेच नवीन प्रशिक्षित, अनुभवी मनुष्यबळ महानगरपालिकेला मिळावे ह्यासाठी शासनासोबत सकारात्मक पाठपुरावा जारी आहे.

**वसई विरार महानगरपालिकेचे नियोजित प्रकल्प कोणते आहेत?**

* श्री बँकेच्या (WB) मदतीने दीर्घकालीन आराखडा (CIP), त्यात आगामी ५ ते ६ वर्षांत शहरात कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण करायच्या आणि  किती खर्च होणार ह्याबाबत अहवाल बनवत आहोत. त्यामध्ये पिण्याचे पाणी, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी निचरा, मलनिस्सारण केंद्र ह्यांचा समावेश आहे.  ह्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, एम.एम.आर.डी.ए. व आपली वसई-विरार शहर महानगरपालिका एकत्र येऊन विकासात्मक कामावर भर देणार आहोत. वसईच्या समस्या एका दिवसात सुटणार नाहीत. त्यामुळे आपण अती तात्काळ, तात्काळ, ठरावीक कालावधीत व दीर्घकाळ असे प्राधान्यक्रम ठरवून प्रश्न सोडवण्यावर भर देणार आहोत.  उदा. वसईमध्ये पूरपरिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी धारण तलाव आवश्यक आहे. सोबत नाले-रुंदीकरण, महसूल वनविभागासोबत पाठपुरावा, भूमिगत गटार व्यवस्था आदींबाबत प्राधान्यक्रम ठरवून प्रकल्प हातात घेण्यात येतील.

**कामे करण्यासाठी महानगरपालिकेचे उत्पन्नाचे किंवा महसूलाचे स्त्रोत कोणकोणते आहेत?**

* महसूल-वाढ हे आपल्या शहराचे इंजिन आहे व तो तीन पद्धतीने मिळतो : मालमत्ता कर, विकास कर, महानगरपालिकेकडे असलेल्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न. आपण  युरोप सोबत आपल्या शहराची तुलना करतो तेव्हा लक्षात येते की युरोपमध्ये  नागरिक जवळजवळ ५० ते ६०% मालमत्ता कर भरतात. आपण साधारण २०%  मालमत्ता कर भरतो. त्यामुळे आपल्या शहराचा महसूल वाढत नाही, तोपर्यंत आपल्याला शहराचा विकास साधणे कठीण होते. नागरिकांना योग्य सेवासुविधा, रस्ते, पाणी, आरोग्य व्यवस्था दिल्या तर मालमत्ता करवाढीला विरोध होत नाही असे चित्र आहे. त्यामुळे शहरातल्या सेवासुविधा विकसित व पारदर्शी करणे व त्याद्वारे महसूल वाढ करून पालिकेला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या आम्ही प्रयत्नात आहोत.

**आपण हाती घेतलेले नवीन उपक्रम व भविष्यातील योजना याबाबत माहिती द्याल?**

* वसईची 'हरित वसई' ही ओळख टिकावी ह्यासाठी वसईमध्ये 'सौंदर्यीकरण समिती' बनविण्यात येत आहे. त्यामध्ये रहिवासी संघटना, नागरी संघटना, एनजीओ, उद्योगिक ग्रुप, लोकप्रतिनिधी ह्यांचा समावेश असेल. शहरांतील तलाव, बावखले, नद्या, खाड्या ह्यांचे संवर्धन, सोबत चौक, रस्ते येथे विशिष्ट पद्धतीची झाडे ह्यांद्वारे हरित आच्छादन वाढवण्यावर भर

असेल. शहरांतील मैदान, बगीचे हे फक्त नावापुरते राहू नये. त्याचा वापर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान, माहिती व विरंगुळा केंद्र ह्यासाठी होईल. समुद्र किनारपट्टीवर स्वच्छता मोहीम, सुरक्षा व पर्यटन केंद्र, स्वच्छतागृह, पर्यावरण पूरक माहिती केंद्र उभारणे ह्यादृष्टीने नियोजन होत आहे. वसईचा २० वर्षांसाठी विकास आराखडा बनत आहे. त्यामध्ये वसईमधील सर्व बावखले समाविष्ट करण्यात येतील.

वसईमध्ये लातूर व पुण्याच्या धर्तीवर दिव्यांग केंद्र उभारत आहोत. मल्टिपल उद्दिष्ट असलेल्या दिव्यांग केंद्रात विकलांग व्यक्तीसोबतच मोबाईलचे किंवा व्यसन असलेल्यांसाठी मार्गदर्शन केंद्र, मानसिक आजाराबाबत मार्गदर्शन केंद्र आदी उपाययोजना असतील.

शहरांमध्ये आपण लाईट हाऊससारखी संकल्पना राबवत आहोत. त्यात तरुण, महिला, विधवा, विधूर, बेरोजगार, निराधार अशा सर्व गरजू लोकांसाठी ‘कौशल्यविकासासोबत नोकरी’ अशी अभिनव पद्धत राबविणार आहोत. त्यामुळे नागरिकांमध्ये कला, कौशल्य वाढीस लागेल, सोबत रोजगाराचे साधन उभे राहील.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता आहेत. काही पडिक किंवा दुर्लक्षित आहेत. त्या मालमत्तेचे मूल्यांकन करणे व त्यापैकी कोणत्या मालमत्ता वेगवेगळ्या उद्दिष्टासाठी वापरता येतील आणि त्यामधून उत्पन्न कसे मिळेल यासाठी अहवाल बनविणे सुरू आहे.

**वसईतील अनधिकृत बांधकाम कसे रोखता येईल?**

* अनधिकृत बांधकामावर कारवाई करताना, सदर बांधकाम अनधिकृत का होते त्यामागचे कारण शोधायला हवे. वसईत कमी किमतीमध्ये घर मिळते आणि म्हणून सामान्य माणसे चाळ किंवा अनधिकृत इमारतीमध्ये घर घेतात. केंद्र सरकार व म्हाडासारख्या सरकारी योजनांचा लाभ घेत, परवडणारी घरे विकसित करण्यावर भर दिल्यास अनधिकृत बांधकाम रोखता येईल. तसेच अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी आम्ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. त्याद्वारे सॅटॅलाइट यंत्रणेचा वापर करीत बांधकाम होत आहे त्याची निगराणी राखणे सोपे जाईल. बांधकाम पाहणी करून, कमी मनुष्यबळ वापरून कारवाई करणे सोपे जाईल. मुंबई महानगरपालिकेच्या मदतीने सदर तंत्रज्ञान आपण वापरणार आहोत.

**शिक्षण,आरोग्य व परिवहन आदी सुखसोयी व सेवा ह्याबद्दल आपले धोरण?**

**शिक्षण :** महानगरपालिकेच्या क्षेत्रात अजूनपर्यंत जिल्हापरिषद शाळा आहेत. त्या हस्तांतरित केल्या नाहीत. ह्या संदर्भात राज्य शासनासोबत पाठपुरावा सुरू आहे. लवकरच त्याला कॅबिनेट मंजुरी मिळेल. दर्जेदार शाळा विकसित करण्यासाठी महानगरपालिका पुढाकार घेणार आहे.

**आरोग्य :** महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये असलेल्या सुविधांच्या कमतरतेमुळे नागरिक मुंबईचा रस्ता धरतात. आता आचोळे येथे ४०० बेडचे सुसज्ज हॉस्पिटल उभे राहत आहे. या हॉस्पिटलच्या शेजारीच पुणे, अहमदाबाद धर्तीवर, ट्रस्ट मॉडेलवर,मेडिकल कॉलेज बनविण्यासाठी विचार चालू आहे.

**परिवहन :** महानगरपालिकेला ५०० बसेसची गरज आहे. वास्तवात सध्या १२० बस आहेत, त्यापैकी प्रत्यक्ष ८० बस रस्त्यावर धावत आहेत. नोव्हेंबरपासून टप्प्या-टप्प्याने १०० विद्युत बसेस शासनाकडून मिळत आहेत. सोबत आपण परिवहन समिती व एन.सी.सी. मॉडेलच्या आधारे अजून १०० बसेस मिळविण्याच्या प्रयत्नात आहोत. संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात ‘एकच बस तिकीट’ असावे व ‘एकात्मिक परिवहन सेवा’ असावी ह्या दृष्टीने राज्य शासन व MMRDA विचार करीत आहे. त्यामुळे पुढील काळात एक ‘परिपूर्ण परिवहन सेवा’ आपल्याला लाभणार आहे.

**सत्ताधारी व विरोधक ह्यांचा सहयोग आपणास कसा मिळतो?**

* जनहितार्थ सहकार्य, सहयोग, सकारात्मक संवाद, विश्वास व सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची पद्धती ह्यामुळे आपण विकास साधू शकतो.

**आपल्या वसईकर जनतेला काय संदेश द्याल?**

वसईमध्ये विकासाच्या खूप संधी आहेत. जगामध्ये एकाच शहरात समुद्र, नद्या, धबधबे, खाडी, डोंगर, जंगल, पाणथळ जागा असे विविधतेने नटलेले फार कमी प्रदेश आहेत. वसईत पर्यटनाला चालना देताना विविध उद्योगाला आपण आकर्षित करू शकतो. सोबत मुंबई व सूरत जवळ असल्यामुळे आपण ह्या शहराला विकासाच्या नकाशावर मोठ्या स्थानी नेऊ शकतो. पर्यावरण व विकासाची सांगड घालत ‘पर्यावरण पूरक शहर’ कसे निर्माण करता येईल ह्या दृष्टीने आपल्या सगळ्यांना प्रयत्न करायचा आहे.

आपल्याला वसईला ‘उत्तम शहर’ म्हणून जगाच्या नकाशात उंचवायचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. आम्हालाही जाणीव आहे की चुटकीसरशी वसईचे प्रश्न सुटणार नाहीत. आम्हाला थोडा वेळ दिल्यास वसईचे वरील प्रश्न मार्गी लावत असताना, पर्यावरणाचा समतोल अबाधित ठेवत सर्वसमावेशक विकास साधू शकतो. त्यासाठी वसईमधील विविध नागरी-रहिवासी संघटना, विविध उद्योगसमूह, माध्यम, प्रशासन व लोकप्रतिनिधी ह्या सर्वांशी सांगड घालून वसईला एक चांगले, विकसित, सुसज्ज, ‘जागतिक दर्जाचे शहर’ आपण एकत्रितपणे बनवू या.



# नागरी समस्या आणि संविधानिक उपाययोजना

**- अजय कैतान मेन**
एखाद, भुईगाव




भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि सार्वजनिक समस्या मांडण्यासाठी अनेक सनदशीर (कायदेशीर व घटनात्मक) मार्ग दिले आहेत. ज्वलंत नागरी समस्यांविरुद्ध (उदा. पाणी टंचाई, रस्ते, कचरा व्यवस्थापन, वीज समस्या, किंवा आरोग्य समस्या) दाद मागण्यासाठी आपण संविधानाच्या चौकटीत राहून पुढील उपाययोजना करू शकतो :

**१. मूलभूत हक्कांचा वापर**

**अनुच्छेद २१** (जीवनाचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार) : स्वच्छ पाणी, रस्ते, आरोग्यदायी पर्यावरण आणि सुरक्षित वातावरण हा आपल्या 'जीवनाच्या अधिकारा'चाच (Right to Life) एक भाग आहे असे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये स्पष्ट केल आहे.

**अनुच्छेद ३२ आणि २२६** (याचिका दाखल करणे) : जर प्रशासनाकडून नागरी समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असेल, तर आपण उच्च न्यायालयात (अनुच्छेद २२६) किंवा सर्वोच्च न्यायालयात (अनुच्छेद ३२) जनहित याचिका (PIL - Public Interest Litigation) दाखल करू शकतो.

**संविधानाच्या चौकटीत राहून नागरी समस्यांसाठी आपण काय करू शकतो?**

**२. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे तक्रार व पाठपुरावा (७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती)**

संविधानाच्या ७४व्या घटनादुरुस्तीनुसार शहरात महानगरपालिका/नगरपरिषद आणि ७३व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामीण भागात ग्रामपंचायत/पंचायत समिती ह्या नागरी सुविधांसाठी जबाबदार असतात.

**लेखी तक्रार देणे :** समस्यांबाबत वॉर्ड अधिकारी (Ward Officer), गट विकास अधिकारी (BDO), किंवा महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार करा आणि त्याची पोचपावती (Acknowledgement Receipt) लिहून घ्या.

**ग्रामसभा / वॉर्ड समिती सभा** (Gram Sabha / Ward Committee) : ह्या सभांमध्ये आपले प्रश्न अधिकृतपणे मांडा.

**३. माहितीचा अधिकार** - आर टी आय (Right to Information - RTI) माहितीचा अधिकार हा संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) (भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य) अंतर्गतचा भाग आहे.

**माहिती मागा :** रस्त्याचे काम का थांबले आहे? निधी कुठे खर्च झाला? पाण्याच्या पाईपलाईनचे बजेट किती होते? अशा प्रश्नांची माहिती RTI अर्जाद्वारे मागा.

**परिणाम :** प्रशासनात पारदर्शकता येते आणि अधिकाऱ्यांवर काम पूर्ण करण्यासाठी नैतिक व कायदेशीर दबाव निर्माण होतो.

**४. शांततापूर्ण आंदोलन व निदर्शने** (Right to Protest)

संविधानाचे अनुच्छेद १९(१)(ब) नागरिकांना एकत्र येण्याचा आणि शांततापूर्ण मार्गाने विरोध दर्शवण्याचा अधिकार देते.

- तुम्ही संबंधित प्रशासकीय कार्यालयासमोर शांततापूर्ण धरणे, मोर्चा किंवा स्वाक्षरी मोहीम राबवू शकता.
- महत्त्वाचे : विरोध प्रदर्शन नेहमी कायदेशीर परवानगी घेऊन आणि हिंसाचार न करता (Non-violent) केले पाहिजे.

**५. लोकपाल आणि लोकायुक्त** (Lokayukta / Administrative Grievance) जर नागरी समस्या ही अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे किंवा निष्काळजीपणामुळे निर्माण झाली असेल, तर आपण राज्याच्या लोकायुक्तांकडे किंवा शासकीय तक्रार निवारण पोर्टलवर (उदा. 'आपले सरकार' / CPGRAMS) ऑनलाइन तक्रार नोंदवू शकता.

**६. संविधानातील 'मूलभूत कर्तव्ये'** (Article 51A) **संविधान फक्त हक्क देत नाही, तर नागरिकांना कर्तव्येही सांगते :**

- सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे,
- परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे (अनुच्छेद 51A(g)).
- त्यामुळे समस्येच्या निवारणात स्वत: नागरिकांनीही सहभाग (Public Participation) नोंदवणे अभिप्रेत आहे.

**७. थोडक्यात पायऱ्या** (Action Steps)

**पहिली पायरी** : संबंधित अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार + पोचपावती.

**दुसरी पायरी** : RTI टाकून कामाचा पाठपुरावा व पारदर्शकता.

**तिसरी पायरी** : लोकप्रतिनिधी (नगरसेवक/आमदार) व प्रसारमाध्यमांचे (Media) लक्ष वेधणे.

**शेवटची पायरी** : कायदेशीर मार्ग (जनहित याचिका PIL).

मो : 99 23 44 07 27

# लोकशाही : दैनंदिन घडामोडींचे प्रतिबिंब

-जॉन लुईस परेरा
घोसाळी, नंदाखाल



लोकशाहीची सर्वांत प्रसिद्ध आणि सर्वमान्य व्याख्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन ह्यांनी दिली. अजून तिला जवळून अनुभवयाचे असेल तर एखाद्या ग्रंथात किंवा पाठ्यपुस्तकात न शोधता तिचे प्रतिबिंब आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या दैनंदिन घडामोडींतून अनुभवले तर ती समजण्यास अधिक सोपे जाईल.

मुंबईची लोकल ही आपली जीवनवाहिनी आणि प्राण आहे. ती आपल्या रोजच्या जाण्या-येण्याचे केवळ साधन नसून लाखो मुंबईकरांच्या धडपडीची एक जिवंत कथा आहे. लोकलच्या दुसऱ्या वर्गात रोज लाखो माणसे प्रवास करतात. गर्दी असते, घाई असते, गैरसोयी असतात; तरीही त्या डब्यात एका अबोल लोकशाहीचे प्रतिरूप जाणवते.

''जरा सरका'', ''इथे बसा'', ''तुमचं स्टेशन आलं'', ''सामान द्या, वर ठेवतो'' ही वाक्ये केवळ आपल्यातील सुसंस्कृतपणाचे दर्शन घडवीत नाही, तर सहप्रवासी जरी अपरिचित असला तरी प्रथम तो माणूस आहे आणि माणसाला माणसासारखे वागवणे हे आपले कर्तव्य आहे ह्याचे ते लक्षण आहे. जरी तो अनोळखी असला तरी काही क्षणांसाठी त्याच्या सामानाची आपण जबाबदारी स्वीकारतो. आपल्या हक्काबरोबर त्याच्याही हक्काची जाणीव ठेवतो. अशा प्रकारे एका अर्थाने आपण लोकशाही जगत असतो.

ह्याउलट, पहिल्या श्रेणीचा डबा हा अधिक सुविधा, जास्त वैयक्तिक अवकाश आणि उच्च प्रतीच्या जीवनशैलीचे प्रतीक मानला जातो. अर्थात, पहिल्या वर्गातील प्रत्येक प्रवासी असहकारी किंवा उन्मत्त असतो असं नाही. परंतु जर व्यक्तीभोवती सुविधा वाढल्या तर हळूहळू त्याची सामूहिकतेची गरज कमी होत जाते आणि गर्दीत इतरांना सहकार्य करणे गरजेचे आहे ह्याचा त्याला विसर पडतो.

दुसऱ्या वर्गातील प्रवाशांना जास्त मोकळी जागा मिळत नसल्याने त्यांना सहकार्याशिवाय प्रवास त्रासदायक आहे, हा धडा परिस्थिती शिकवते. मनुष्य परिस्थितीला तोंड देण्यास सज्ज होतो. लोकशाहीसुद्धा सहकार्याच्या मजबूत पायाविना उभी राहू शकत नाही, ह्याची जाणीव होते.

लोकलच्या दुसऱ्या वर्गाचे डबे आपल्याला एकच संदेश देतात - 'लोकशाही म्हणजे केवळ राज्यघटना नव्हे; ती एक जगण्याची पद्धत आहे.' जो समाज दुसऱ्याला सामावून घेतो, तोच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा वारसदार ठरतो. आज भारताला गरज आहे ती पहिल्या वर्गाची नव्हे, तर दुसऱ्या वर्गाची. देशाचा प्रवासही एका लोकलप्रमाणेच आहे. तो तेव्हाच सुखरूप पूर्ण होतो जेव्हा प्रत्येक प्रवासी एक दुसऱ्याला सोबत घेऊन चालतो.

मोबाईल : 90 96 98 29 85

●



संत परिचय

# संत जेरोमची आध्यात्मिकता

-फा. (डॉ.) रॉबर्ट बी.डिसोजा
बहारे, तलासरी

## मृत्यूच्या काळोखातील दिव्य साक्षात्कार

'सोफ्रोनियूस युजेबीयूस हिएरोनिमूस' असे लांबलचक नाव असलेला जेरोम इ.स. ३४०साली युगोस्लाव्हियामध्ये जन्माला आला. सार्दिकचा बोनोसुस ह्या आपल्या मित्रासोबत तो रोम येथे शिक्षणाला गेला असताना तेथे त्याने लॅटिन आणि ग्रीक ह्या भाषांवर प्रभुत्व मिळविले. दुर्दैवाने तेथील काही विकृत चालीरीतींचा त्याच्यावर इतका भडीमार झाला की तो ह्या अपराधीपणाच्या भावनेने अक्षरशः होरपळून निघाला. आपल्या सदसद्‌विवेकाची टोचणी सौम्य करण्यासाठी तो प्रेषित आणि रक्तसाक्षी संतांच्या थडग्यांना भेटी देऊ लागला. ते म्हणतात, ''सर्वत्र मृत्यूचा भयंकर काळोख पसरलेला असताना तेथील भयाण शांतता माझे काळीज कापून जात होती.'' ही शिकवण देणाऱ्या ख्रिस्ती धर्माची त्याला भीतीच वाटू लागली. परंतु एक दिवस त्याला जाणवले की मृत्यू हा शेवट असूच शकत नाही. ह्या जीवनानंतर काहीतरी असले पाहिजे तरच मृतांच्या थडग्यांना भेट देण्यात काहीतरी अर्थ आहे. ह्या दिव्य साक्षात्काराची आठवण म्हणून त्याने आपल्या खोलीत लिखाणाच्या टेबलावर माणसाची कवटी ठेवली. लवकरच त्याने बाप्तिस्मा घेतला. इतकेच नाही तर तो विरक्तीचे जीवन जगण्यासाठी जंगलात राहू लागला. इथेच त्याला वाचन आणि लेखनाची आवड वाटू लागली. इ. स. ३८०साली त्याला धर्मगुरुपदाची दीक्षा देण्यात आली.

## भाषा प्रभू संत जेरोम

पुढे तो एका धर्मांतरित यहुदी माणसाकडून शास्त्रशुद्ध हिब्रू शिकला आणि अंत्युखियातील यहुदी ख्रिस्ती लोकांच्या संपर्कात राहून जुन्या करारातील हिब्रू धर्मग्रंथांची तो पारायणे करू लागला. पोप दमासस पहिले ह्यांनी लगेच जेरोम ह्यांना रोम मध्ये बोलावून घेतले. तिथे त्याला पोप दमाससचा सेक्रेटरी म्हणून पाच वर्षे कार्य करण्याची संधी मिळाली. त्याच्यावर बायबलच्या लॅटिन भाषांतराची



जबाबदारी सोपविण्यात आली. त्यासाठी त्यांना बेथलेहेम येथे पाठविण्यात आले. इ. स. ३८२ साली त्यांनी हे काम सुरू केले आणि ४०५ साली ते पूर्णत्वास नेले.

## बायबल पंडित संत जेरोम

संत जेरोम हे त्यांच्या काळातील विख्यात बायबल पंडित म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी हिब्रू, अरेमाईक आणि ग्रीक भाषांतून बायबलचे लॅटिन भाषेत भाषांतर केले. बायबलच्या काही पुस्तकांचे भांषातर लॅटिन भाषेत झाले होते. मात्र ते 'से पटू आजींत' ह्या ग्रीक बायबल वरून करण्यात आलेले होते. जेरोमने थेट हिब्रू भाषेतून संपूर्ण, जुना करार लॅटिनमध्ये आणला. जेरोम ह्यांनी केलेले भाषांतर लोकांनी हृदयाशी कवटाळले. त्यामुळे ते 'व्हल्गेट' (लोकप्रिय) ह्या नावाने प्रसिद्ध झाले. पुढे मार्टिन ल्युथर ह्यांनी १५३४ मध्ये बायबलचे जर्मन भाषेत भाषांतर करताना मक्काबी १ आणि २, तोबीत, ज्युडिथ, बारुख, बेनसिरा आणि ज्ञानग्रंथ ह्यांसारखी पुस्तके वगळली. त्यामुळे १५४८ ते १५६३ दरम्यान झालेल्या ट्रेंटच्या विश्वपरिषदेत ख्रिस्तसभेने संपूर्ण बायबलच्या पुस्तकांची संहिता (यादी) जाहीर केली. ते करताना ख्रिस्तसभेने जेरोमचे 'व्हल्गेट' हे अधिकृत असल्याचे जाहीर केले. आज त्यावरूनच बायबलची कॅथलिक आवृत्ती अंतिम स्वरूपात आपल्या हाती आलेली आहे.

संत जेरोमच्या मते, ''पवित्र शास्त्राचे वाचन करण्याआधी आपण प्रार्थना केली पाहिजे आणि प्रार्थना केल्यानंतर आपण पवित्रशास्त्र वाचले पाहिजे'' ह्या त्याच्या शब्दांतून संत अंब्रोजचे विचारही प्रतिध्वनित होतात : **''जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण देवाशी बोलतो आणि जेव्हा आपण बायबल वाचतो तेव्हा देव आपल्याशी बोलतो.''**

## सिद्धहस्त लेखक

प्रेषितांच्या काळापासून स्वतःच्या काळापर्यंत होऊन गेलेल्या सर्व लेखकांची व त्यांच्या साहित्याची संदर्भ सूची त्याने तयार केली. ह्या संदर्भ सूचीचा उपयोग थेट ख्रिस्ती श्रद्धा प्रसारित करण्यासाठी आणि तिच्यावर होणारे हल्ले परतवून लावण्यासाठी कित्येक शतके केला जात होता. विशेषतः पहिल्या काही शतकांत जेव्हा ख्रिस्ती लिखाणाकडे तुच्छतेने

पाहिले जाई तेव्हा ही संदर्भसूची पाहून मोठ-मोठ्या साहित्यिकांचे धाबे दणाणले.

त्यानंतरची पंधरा वर्षे जेरोमने बायबलमधील काही महत्त्वाच्या पुस्तकांवर भाष्य लिहिण्यात आपले अवघे आयुष्य वेचले. ह्या भाष्यावर हिब्रू विचारसरणीचा प्रचंड प्रभाव असल्याचे दिसून येते.

जेरोमने लिहिलेली पत्रे त्याच्या विद्वत्तेचा जिता जागता पुरावा मानली जातात. त्यात विद्वत्ताप्रचुर भाष्य, नैतिक मार्गदर्शन, दुःखितांचे सांत्वन करणारे लेख, आपल्या मित्रांना दिलेले मौलिक सल्ले, तत्कालीन विकृतींवर ओढलेले ताशेरे, विरक्त वृत्तीची शिफारस, धार्मिक जीवन शैली, आध्यात्मिक प्रगतीचा आलेख, मरणोत्तर जीवन, तारण, अशा विविध अंगांनी त्याने आपल्या लोकांना मार्गदर्शन केलेले आहे.

### विद्वत्ता आणि नम्रता

संत जेरोम जितके विद्वान होते तितकेच ते नम्र देखील होते. ख्रिस्तसभेच्या दैनंदिन प्रार्थना पुस्तकामध्ये देण्यात आलेले संत जेरोमचे प्रवचन त्याच्या ह्या विद्वत्तेचे आणि नम्रतेचे जिते जागते उदाहरण आहे. ते म्हणतात, ''प्रभूने आज्ञापिल्याप्रमाणे मी शास्त्र धुंडाळतो आणि 'शोधा म्हणजे सापडेल' ह्या त्याच्या वचनाचा अनुभव घेतो. अन्यथा यहुद्यांप्रमाणे मलाही प्रभूचे हे शब्द ऐकावे लागतील : ''तुम्ही शास्त्र आणि देवाचे सामर्थ्य जाणीत नसल्यामुळे संभ्रमात पडला आहात.'' संत पॉल म्हणतो, ''ख्रिस्त हे देवाचे सामर्थ्य आणि देवाचे ज्ञान असा आहे.'' त्यामुळे शास्त्राविषयीचे अज्ञान म्हणजे देवाच्या सामर्थ्याविषयीचे अज्ञान आहे. बायबलविषयीचे अज्ञान म्हणजे ख्रिस्ताविषयीचे अज्ञान होय. त्यासाठीच मी ''प्रत्येक शास्त्री जो देवाच्या राज्याचा शिष्य झाला आहे आणि जो आपल्या भांडारातून नव्या आणि जुन्या वस्तू काढणाऱ्या गृहस्थासारखा आहे'' त्याचे अनुकरण करीन. यशयाच्या पुस्तकात तर येशूविषयीच्या महान रहस्यांचा साठा दडलेला आहे. ह्या पानांमध्ये इम्मानुएल म्हटलेला आणि कुमारीपासून जन्मलेला येशू ह्याचा जन्म, त्याचे कार्य, त्याचे दुःखसहन, मरण आणि पुनरुत्थान अशा सर्व रहस्याचे भाकीत करण्यात आलेले आहे.''

### आणखी एक दिव्य साक्षात्कार

नाताळ सणाची पूर्वसंध्या. संत जेरोम आपल्या अभ्यासिकेत आपल्या भाषांतराच्या कामावरून शेवटचा हात फिरवीत होते. त्यावेळी त्यांना येशूबाळाचे दर्शन झाले. येशूबाळाने त्याच्याकडे वाढदिवसानिमित्ते भेटवस्तू मागितली. जेरोम ह्यांनी आपले सर्व काबाडकष्ट ओतून तयार केलेले भाषांतराचे काम मोठ्या अभिमानाने येशूबाळाला अर्पण केले. त्यावेळी येशूबाळाने त्याला सांगितले, ''मला तुझी सर्व पापे अर्पण कर. ती मी माझ्या अतिपवित्र हृदयाच्या प्रेमाच्या भट्टीत जाळून टाकीन आणि तुला पावित्र्याचे वरदान देईन.'' बाळ येशूच्या ह्या शब्दांनी जेरोम पुरता ओशाळून गेला. त्याने येशूबाळासमोर लोटांगण घातले आणि उरलेले आयुष्य पावित्र्यात घालविले. इ. स. ४२०साली त्याला मृत्यू आला.

### विद्वता आणि विरक्त वृत्ती

विद्वता आणि विरक्त वृत्ती हे जेरोमच्या अध्यात्माचे दोन महत्त्वाचे पैलू होते. त्याच्या पूर्वायुष्यात त्याने सिरीयाच्या अरण्यात वेळ घालविला आणि त्यानंतर बायबलचे भाषांतर करताना त्याने बेथलेहेमच्या एका खोलीत स्वतःला अक्षरशः कोंडून घेतले. संत अगस्तीननंतर सर्वाधिक लेखन करणारा लेखक म्हणून जेरोमचे नाव घेतले जाते. विद्वत्तापूर्ण चर्चा करताना सुद्धा त्याला आपल्या दुबळेपणाची जाणीव असल्याने तो नम्रपणे आपली चूक मान्य करायचा. त्यासाठी तो जागरणविधी आणि उपास-तापास सुद्धा करीत असे.

'विद्वान सर्वत्र पूज्यते' ह्या उक्तीनुसार आज जिथे कुठे बायबलचा विषय अभ्यासाला घेतला जातो तिथे संत जेरोमचे नावही घेतले जाते. उदाहरणार्थ, कॅथलिक ख्रिस्तसभेमध्ये बायबलचा अभ्यास करणाऱ्यांसाठी फा. रेमंड ब्राऊन, जोसेफ फिट्समायर आणि रोलंड मर्फी ह्या बायबल पंडितांनी एकत्र येऊन 'द (न्यू) जेरोम बिब्लिकल कॉमेंटरी' ह्या महान ग्रंथाचे संपादन केलेले आहे. त्यात बायबल ह्या विषयावर अनेक लेख, प्रत्येक पुस्तकाची पार्श्वभूमी आणि प्रत्येक वचनाचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. पांडित्यापेक्षा पावित्र्य आणि विद्वत्तेपेक्षा विश्वास श्रेष्ठ मानणाऱ्या संत जेरोमचा सण ख्रिस्तसभा दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी साजरा करीत असते.

मोबाईल : 96 37 20 44 33

## साद-प्रतिसाद

**'सुवार्ता' ऑक्टोबर २०२६च्या अंकासाठी**

**विषय : अहिंसात्मक चळवळी, दिशा व दशा**

शब्दमर्यादा : १५० शब्द

आपला अभिप्राय/अनुभव १० सप्टेंबर २०२६पर्यंत

**'सुवार्ता' ई-मेल आयडी**

**suvartavasai@gmail.com वर पाठविणे.**

# द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ : फादर शॉख

-सायमन डाबरे
भुईगाव, नवाळे नाका





फादर रुडॉल्फ रॉबर्ट शॉख (Schoch) ह्यांचा जन्म २७ सप्टेंबर १९१३ रोजी स्वित्झर्लंडमधील बासेल येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण ऑस्ट्रिया येथे झाले. पदवीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांनी १९३२मध्ये वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी 'सोसायटी ऑफ जिझस'मध्ये प्रवेश केला. त्यानंतर जर्मनीमधील 'बर्चमान कॉलेज युनिव्हर्सिटीत' सहा वर्षे त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानी, जगद्‌गुरू श्री. आदि शंकराचार्य आणि भक्ती चळवळीचा अभ्यास केला आणि १९३८ मध्ये ते भारतात आले.

फादर शॉख ह्यांनी भारतात आल्यानंतरही धर्मशास्त्राचे शिक्षण सुरूच ठेवले. २० मार्च १९४५ रोजी शॉख ह्यांना धर्मगुरूची दीक्षा मिळाली. त्यानंतर त्यांच्याकडे नाशिकजवळील संगमनेरमधील ज्ञानमाता विद्यालयाच्या प्राचार्यपदाची जबाबदारी देण्यात आली. ते एतद्देशीय नसूनदेखील त्यांनी मराठी आणि संस्कृत भाषेचे अध्ययन केले आणि ह्या दोन्ही भाषांत उत्तम प्रावीण्यही संपादित केले. पुणे विद्यापीठानेही त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान करत 'सिनेट सदस्य' म्हणून त्यांची नियुक्ती केली. त्याच प्रमाणे त्यांना विद्यापीठाच्या शिक्षण परिषदेचे सदस्यत्वही देण्यात आले. 'पूना स्कूल्स ॲथलेटिक्स असोसिएशन'चे त्यांनी सचिव आणि अध्यक्ष म्हणून १२ वर्षे कार्यभार सांभाळला.

भारतीय प्रशासन आणि इतिहासाचा त्यांचा गाढा अभ्यास होता, त्यामुळेच त्यांनी तत्कालीन माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळासाठी इतिहास आणि नागरिकशास्त्र ह्या विषयांची पुस्तके लिहिली. सतराव्या शतकातील मराठी कवी संत तुकाराम महाराज ह्यांच्या ३९ कवितांचे त्यांनी जर्मनी भाषेत भाषांतर केलेले आहे. 'महाराष्ट्र विश्वकोश' ह्या पुस्तकात त्यांनी २०० युरोपियन तत्त्वज्ञानी कॅथलिक चर्च आणि ख्रिश्चन विश्वस्त ह्यांच्या नोंदी लिहिलेल्या आहेत. ह्याशिवाय 'God on weekdays' ह्या पुस्तकाचे लेखनही त्यांनी केलेले आहे. कालांतराने फादर शॉख ह्यांची सेंट विन्सेंट विद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली. फादर शॉख ह्यांनी त्यांच्या प्राचार्य पदाच्या कार्य काळात विद्यालयात मोठ्या प्रमाणावर सुधारणा घडवून आणल्या. महाविद्यालयासाठी नवीन इमारती आणि मोठाल्या प्रयोगशाळा बांधण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे त्यांनी मुलांना खेळण्यासाठी विस्तीर्ण मैदानेही निर्माण केली.

**मूळचे जर्मन असलेले फादर रुडॉल्फ शॉख पुण्याच्या भूमीत मुळावले.**

फादर शॉख एका समारंभासाठी राजभवनामध्ये गेले असताना तेथे त्यांची भेट राष्ट्रीय रासायनिक प्रयोग शाळेचे (एन. सी. एल.) तत्कालीन संचालक डॉ. व्यंकटरमण ह्यांच्याशी झाली. डॉ. व्यंकटरमण ह्यांनी त्यांना एन. सी. एल. जवळ काही जमीन देण्याची तयारी दर्शवत तेथे एक शाळा सुरू करण्याबाबत सुचविले. व्यंकटरमण ह्यांच्या सल्ल्यानुसार त्या जागेवर शाळा बांधण्यात आली. ह्या शाळेचे नाव 'लॉयोला विद्यालय' असे ठेवण्यात आले. आज पुण्यातील सर्वोत्तम विद्यालयामध्ये लॉयोला विद्यालयाचा समावेश होतो.

फादर शॉख ह्यांना क्रीडाक्षेत्राची विशेष आवड होती. त्यांनी आपल्या शालेय जीवनामध्ये जलतरण तलाव असण्याचे प्रचंड फायदे पाहिले होते. त्यानुसार लॉयोला महाविद्यालयात जलतरण तलाव बांधण्यात आला. जलतरण तलाव असलेले लोयोला विद्यालय पुण्यातील पहिले विद्यालय ठरले. ह्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर जलतरण स्पर्धामध्ये शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. फादर शॉख ह्यांना जरी क्रीडाक्षेत्राबद्दल विशेष प्रेम असले तरी त्यांनी पायाभूत शिक्षणाकडे मात्र कधीच दुर्लक्ष केले नाही.

फादर शॉख हे 'पूना स्कूल्स ॲथलेटिक्स असोसिएशन'चे अविभाज्य भाग होते. ह्या संस्थेच्या वतीने सुमारे शंभर वर्षांपासून आंतर शालेय क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात येत होते. दुर्दैवाने आज ही संस्था अस्तित्वात नाही. मात्र फादर शॉख ह्यांच्या स्मरणार्थ लॉयोलाच्या माजी विद्यार्थ्यांनी आंतरशालेय हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यास सुरुवात केली आहे. सेंट विन्सेंट विद्यालयाचे माजी प्राचार्य फादर केनेथ मिस्किटा ह्यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास, ''ह्या हॉकी स्पर्धाच्या माध्यमातून फादर शॉख ह्यांचे नाव अजरामर झाले आहे.''

# विकास हवा, पण वसई बुडवून नव्हे!

-जॉय जोसेफ फरगोज
लहान सरगोडी, गास

वसई - नालासोपारा - विरार परिसरातील नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात पूरस्थितीचा गंभीर सामना करावा लागतो. नैसर्गिक नाले व पाण्याचे प्रवाह अडविणे, मोठ्या प्रमाणात मातीचे भराव, अतिक्रमणे आणि अनियोजित बांधकामांमुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचरा मोठ्या प्रमाणात बाधित झाला आहे. त्यामुळे भविष्यातील पूरस्थिती रोखण्यासाठी उर्वरित नैसर्गिक पाणीसाठा, पाणथळ क्षेत्रे आणि जल निचरा मार्गांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

ह्या पार्श्वभूमीवर नालासोपारा पश्चिम येथील गोगटे मिठागराची सुमारे १५०० एकर विस्तीर्ण जागा वाचविणे ही काळाची गरज आहे. ही जागा पावसाळ्यात परिसरातील अतिरिक्त पाणी सामावून घेणारे महत्त्वाचे नैसर्गिक जलसाठा क्षेत्र आहे. ह्या जागेवर मोठे कॉम्प्लेक्स, ग्रोथ सेंटर, औद्योगिक प्रकल्प किंवा मोठ्या प्रमाणात बांधकाम झाल्यास पावसाचे पाणी सामावून घेण्याची नैसर्गिक क्षमता कमी होऊन भविष्यातील पूरस्थिती अधिक गंभीर होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

सन १९६४ च्या सुमारास तत्कालीन वसईचे आमदार आणि खारभूमी मंत्री भाऊसाहेब वर्तक ह्यांच्या पाठपुराव्याने राज्य शासनाने उद्योजक बाळकृष्ण महादेव गोगटे (रावसाहेब गोगटे) ह्यांना सुमारे १५०० एकर जमीन मिठागर आणि केमिकल उद्योगासाठी लीजवर दिली होती. स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. प्रस्तावित केमिकल उद्योग प्रत्यक्षात सुरू झाला नाही; मात्र ह्या परिसरात मिठागराचा व्यवसाय सुरू राहिला. गास ग्रामपंचायत आणि गोगटे सॉल्ट अँड केमिकल कंपनी ह्यांच्यात झालेल्या करारानुसार दरवर्षी मे महिन्यात गास गावातील ग्रामस्थांना मोफत मीठ दिले जात असे. सन २००९ मध्ये लीजची मुदत संपेपर्यंत ही परंपरा सुरू होती. गाससह नंदाखाल, आगाशी आणि आसपासच्या गावांतील नागरिकही मीठ घेण्यासाठी गास येथील मिठागरात येत असत.

सध्या उपलब्ध माहितीनुसार, सदर जमीन पालघर जिल्हाधिकारी ह्यांच्या अखत्यारितील शासकीय जमीन असून ती 'No Development Zone' मध्ये असल्याचे नमूद केले जाते. तसेच सदर जमिनीचा सातबारा उतारा वसईचे उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) ह्यांच्या नावावर असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या जमिनीचा भविष्यातील वापर निश्चित करताना तिचे शासकीय स्वरूप,

**सुमारे १५०० एकर गोगटे मिठागरावर कॉम्प्लेक्स नको, पूर नियंत्रणासाठी धारण तलाव हवा!**

पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक जल निचरा, जैव विविधता आणि पूर नियंत्रणातील भूमिका ह्यांचा सर्वंकष विचार करणे अत्यावश्यक आहे. गोगटे मिठागराचा परिसर हा गास, सोपारा, निर्मळ, वाघोली, नवाळे, सालोली, सांडोर, चुळणे, दिवाणमान, भुईगाव, गिरीज, आचोळे, बोळींज, उमराळे–करमाळे, समेळपाडा, नालासोपारा तसेच नवघर–माणिकपूर परिसरातील पावसाच्या



पाण्याच्या निचऱ्याशी महत्त्वाच्या स्वरूपात जोडलेला आहे.

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचून ह्या भागाला मोठ्या खाडीचे स्वरूप प्राप्त होते. गास, सोपारा, चुळणे, आचोळे आणि लगतचे अनेक भाग समुद्र सपाटीपेक्षा कमी उंचीवर असल्याने ह्या नैसर्गिक पाणीसाठा क्षेत्राचे महत्त्व अधिक वाढते. आज गोगटे मिठागर पावसाचे पाणी सामावून घेत आहे; उद्या ह्याच जागेवर मोठ्या प्रमाणात बांधकाम झाले तर हे पाणी कुठे जाणार? हा प्रश्न संपूर्ण वसई – नालासोपारा परिसराच्या सुरक्षिततेचा आणि भवितव्याचा आहे.

गोगटे मिठागर परिसराचे आणखी एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील खाडी, पाणथळ क्षेत्रे, मिठागरातील जलक्षेत्र आणि चिखलपट्टे हे विविध जलचर व पक्ष्यांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण करतात. पावसाळा आणि हिवाळ्याच्या काळात ह्या परिसरात स्थानिक पक्ष्यांसोबतच दूरवरून स्थलांतर करून येणारे परदेशी व हिवाळी ‘पाहुणे पक्षी’ आढळतात. खाडी आणि पाणथळ भागांमध्ये उपलब्ध होणारे मासे, लहान जलचर, कीटक, शिंपले, खेकडे आणि इतर खाद्यस्रोत ह्या पक्ष्यांसाठी महत्त्वाचे ठरतात. पाणथळ जागा, खाडी आणि चिखलपट्टे हे त्यांच्या विश्रांती व खाद्यशोधासाठी आवश्यक असतात.

म्हणूनच गोगटे मिठागराचे संरक्षण म्हणजे केवळ जमीन आणि पाणी वाचवणे नव्हे; तर या परिसरातील पक्षी, जलचर, जैव विविधता आणि संपूर्ण पाणथळ परिसंस्था जपणे होय.

भविष्यातील कोणताही विकास आराखडा तयार करताना पक्ष्यांच्या अधिवासावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा स्वतंत्र पर्यावरणीय अभ्यास करणे हेदेखील गरजेचे आहे.

गोगटे मिठागराच्या १५०० एकर जागेवर मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करून प्रकल्प उभारले गेल्यास पावसाचे पाणी सामावून घेणारे नैसर्गिक क्षेत्र कमी होईल. परिणामी परिसरातील दाट लोकवस्तीवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

शेतजमिनी जलमय होऊन भातशेती व बागायती शेतीचे नुकसान होऊ शकते. रस्ते, रेल्वे, वीजपुरवठा आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊ शकते. त्यामुळे नैसर्गिक पाणीसाठा क्षेत्रावर बांधकाम करण्याऐवजी त्याचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

गोगटे मिठागराच्या आसपास अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत. ह्या परिसरात भात शेती आणि बागायती शेती केली जाते.

खाडीशी जोडलेल्या ह्या परिसरातील पाणथळ जागा ही एक प्रकारची नैसर्गिक परिसंस्था आणि जैव विविधतेची साखळी आहे. मोठ्या प्रमाणात मातीचा भराव, काँक्रिटीकरण आणि बांधकाम झाल्यास ह्या परिसंस्थेचे तुकडीकरण होऊन पक्षी व जलचरांच्या अधिवासावर परिणाम होऊ शकतो. गोगटे मिठागर वाचवणे म्हणजे केवळ १५०० एकर जमीन वाचवणे नाही; तर वसईचा पर्यावरणीय समतोल, शेतकऱ्यांच्या जमिनी, नैसर्गिक जलनिचरा, पाणथळ परिसंस्था, स्थलांतरित पक्ष्यांचे अधिवास आणि लाखो नागरिकांचे भवितव्य सुरक्षित करणे आहे.

**पूरनियंत्रणासाठी Holding Ponds उभारण्याची मागणी :** वसई –नालासोपारा – विरार परिसरातील पूरस्थिती कमी करण्यासाठी गोगटे मिठागराच्या जागेचा Holding Pond / धारण तलाव म्हणून उपयोग करण्याचा तातडीने विचार करणे आवश्यक आहे. ह्या मागणीसाठी वसई विरार शहर महापालिकेच्या माजी नगरसेविका जोस्पिन जोसेफ फरगोज ह्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, महसूल मंत्री, आपत्ती व्यवस्थापन मंत्री, कोकण विभागीय आयुक्त, पालघर जिल्हाधिकारी तसेच वसई-विरार शहर महापालिकेचे महापौर आणि आयुक्त ह्यांच्याकडे सातत्याने पुढाकार व पाठपुरावा सुरू ठेवला आहे. गोगटे मिठागराच्या संपूर्ण क्षेत्राचा जल वैज्ञानिक, पर्यावरणीय, जैव विविधता आणि तांत्रिक अभ्यास करून आवश्यक त्याठिकाणी मोठ्या क्षमतेचे धारण तलाव उभारण्याची शक्यता तपासण्यात यावी. पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी नियंत्रित पद्धतीने साठविल्यास आसपासच्या गावांवरील पूराचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते. या परिसरातील पावसाचे पाणी पुढे सोपारा खाडीमार्गे वसई–भाईंदर खाडीला मिळते. त्यामुळे संपूर्ण जलनिचरा व्यवस्थेचा एकात्मिक पद्धतीने अभ्यास करून दीर्घकालीन पूरनियंत्रण आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आचोळे रेल्वे ब्रिज क्रमांक ७८ चे रुंदीकरण व उंची वाढविणे, तसेच परिसरातील नैसर्गिक नाले आणि जल निचरा मार्ग अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

गोगटे मिठागराच्या १५०० एकर जागेवर कोणत्याही मोठ्या प्रकल्पाला किंवा बांधकामाला परवानगी देऊ नये.

सदर जागा कायमस्वरूपी 'ना विकास क्षेत्र' (No Development Zone) म्हणून संरक्षित करावी.

पूर नियंत्रणासाठी ह्या जागेवर Holding Pond / धारण तलाव उभारण्यासाठी तातडीने सविस्तर जल वैज्ञानिक व तांत्रिक अभ्यास करावा.

आचोळे रेल्वे ब्रिज क्रमांक ७८ चे रुंदीकरण व उंची वाढविण्याचे काम तातडीने हाती घ्यावे.

गोगटे मिठागराच्या आसपासच्या शेतजमिनी, पाणथळ क्षेत्रे आणि वसईचा पश्चिमेकडील हरित पट्टा संरक्षित करावा. कोणताही मोठा प्रकल्प प्रस्तावित करण्यापूर्वी पर्यावरणीय, जल वैज्ञानिक, जैव विविधता आणि पूर जोखीम अभ्यास अनिवार्य करावा. ह्या संपूर्ण परिसरासाठी दीर्घकालीन एकात्मिक पूर नियंत्रण व जल व्यवस्थापन आराखडा तयार करावा. विकास हवा; पण वसई बुडवून नाही!

वसईला विकासाची गरज आहे; मात्र विकासाच्या नावाखाली नैसर्गिक पाणीसाठे, पाणथळ क्षेत्रे, खाडीचे क्षेत्र, जल निचरा मार्ग व पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट करणे योग्य नाही.

गोगटे मिठागरावर कॉम्प्लेक्स नको; पूर नियंत्रणासाठी Holding Pond हवा!

*गोगटे मिठागर वाचवा,*
*हरित वसई वाचवा!*
*स्थलांतरित पक्ष्यांचे अधिवास वाचवा,*
*वसईची जैव विविधता वाचवा!*
*विकास हवा, पण वसई बुडवून नाही!*

मोबाईल : 73 87 95 97 96

# आल्या पावसाच्या सरी

-सतीश पुंडलिक नवघरे
कोळपेवाडी, कोपरगाव, अहिल्यानगर

आषाढ महिना कधी धसमुसळा बरसतो तर कधी एखादी रिमझिमती सर घेऊन येतो. एक प्रकारे आषाढ श्रावणाचे चित्र काढण्यास सुरुवात करतो. चित्रात एक एक रंग भरले जातात. आषाढ फक्त रंग घेऊन येत नाही तर गंधही घेऊन येतो. मातीला सुगंध देण्याची किमया केवळ पावसातच. तो कधी जोरदार बरसून जातो तर कधी दोन-दोन दिवस रिपरिप चालते. अशावेळी नको नको वाटतो पाऊस. ''पाऊस कधीचा पडतो झाडांची हलती पाने...'' कवी ग्रेस ह्यांच्या भाषेत अशी आपली अवस्था होते. परंतु झाडांच्या अंगोपांगी आंघोळी होतात.

उन्हाळाभर कोळपून निघालेला लाल करड्या मातीचा कोपरान्‌कोपरा हिरवागार होतो. निसर्ग हिरवी जादू जमिनीवर पांघरून टाकतो. कोकीळ आदी पक्ष्यांनी मिलनाच्या आर्त हाका देऊन झालेल्या असतात. पावसाने 'पेरते व्हा, पेरते व्हा...' म्हणत शेतकरी राजाला पेरणीचे संकेत दिलेले असतात. शेतकरी हे संकेत पाळत पेरणी उरकतो. त्यातून पोपटी अंकुर तरारून येतात. मातीच्या पोटात झिरपणारा पावसाचा एक एक थेंब पिऊन पिकं सरसरून वाढू लागतात. बघता बघता शेतांमध्ये पिकांच्या हिरव्या टवटवीत रांगा वाऱ्यावर सळसळू लागतात. कवी ना. धों. महानोर ह्यांच्या भाषेत ह्या नभाने ह्या भुईला हिरवेकंच दान दिलेले आणि मातीतून चैतन्यही उगवून आलेले. भराभर गवत वाढीस लागते. उन्हाळ्यात चाऱ्यासाठी दातावर दात घासणाऱ्या जनावरांच्या तोंडी हिरवा घास पडलेला असतो. ही जित्राबं गवतावर कुरू कुरू ताव मारतात. कितीतरी प्रकारच्या कोवळ्या रानभाज्या तजेलदारपणे सळसळता. सृष्टीचा अवघा सृजनसोहळा रंगलेला असतो.

कोरडेठक्क डोंगर नितळकंच पाण्याने पाझरू लागतात. धबधबे फेसाळत कोसळत असतात. नद्या नाले



दुथडी वाहत असतात. जुने वाडे आणि भिंतीवर मखमली पोपटी शेवाळ रसरसून येते. बाभळीच्या हळदुल्या फुलांना अत्तरी सुगंध येत असतो. वर्षभरही झाडांना फुले येतच असतात. पण फुलांनी झाड लदबदून जाणे ही खास पावसाळ्याचीच देणगी. घाणेरीची झुडपे रस्त्याकडेने फोफावलेली नेहमीच दिसतात. परंतु घाणेरीच्या एकाच फुलात लाल, गुलाबी, केशरी रंग खुलतो तो पावसाळ्याच्या रिमझिम धारांमध्ये. जाई, जुई, मोगऱ्याचा वेल ह्यांनी खुलण्या-फुलण्याचा कळस गाठलेला असतो. पावसाची सर थांबली की एखादा पक्षी पाऊस थेंबांनी जड झालेल्या झाडाच्या फांदीवर अलगद येऊन बसतो. अचानक आलेल्या पावसात पक्षी नेमके कुठे आश्रय घेतात हा एक

**सृष्टीला अवघे हिरवेपण बहाल करत आषाढ श्रावणापर्यंत येऊन पोहोचतो.**

प्रश्नच असतो. अशावेळी बा. सी. मर्ढेकरांची 'ओल्या पानातल्या रेषा वाचतात ओले पक्षी आणि पोपटी रंगाची रान दाखविते नक्षी...' ही ओळ मनात रेंगाळू लागते.

सृष्टीला अवघे हिरवेपण बहाल करत आषाढ श्रावणापर्यंत येऊन पोहोचतो. पावसाचा आषाढातला जोर विरळ होत जातो. आणि अचानक निसर्गात काही बदल जाणवू लागतात.

सकाळी सकाळीच वाऱ्यावर भुरभुरत पावसाचे काही कण येतात. आकाशभर धावणाऱ्या करड्या ढगांमधून अचानक सूर्य डोकावतो. आपण हे दृश्य पाहत असतानाच पुन्हा झाकोळून येते. पुन्हा पावसाची रिमझिम सुरू होते. क्षणाक्षणाला ऊन-पावसाचा खेळ सुरू होतो. आपोआपच मनात आनंदलहरी उमटू लागतात. बाल कवींनी रेखाटलेला हाच तो 'हर्षमानस'. आपल्या डोळ्यासमोर लखलखितपणे बालकवींचा 'श्रावण मास' येतो.

श्रावणातल्या एखाद्या दुपारी पाऊस झुरमुरत येतो. अंगातून एक थंडीची लहर उठते आणि अचानक केसरी ऊन पांघरले जाते. आपण ह्या उबदार उन्हात जाऊन उभे राहतो. उन्हाचे कोमट हात आपल्या अंगावरून फिरत असतात. तितक्यात पूर्वेकडे आभाळ लक्ष वेधून घेते. बालकवींच्या भाषेत 'इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे...' ह्या काव्य ओळीचा तंतोतंत प्रत्यय आपल्याला येतो. आणि आपण स्वगत म्हटल्यासारखे स्वतःशीच म्हणतो, 'वाह क्या बात है'... भिरभिरणाऱ्या फुलपाखरांच्या पंखांवरील विविध रंगांच्या नक्षीकामात आपण हरवून जातो. निसर्गाइतका मोठा चित्रकारच नाही हे फुलपाखरांच्या पंखांवरील अद्‌भुत कोरीव कामातून आपल्याला कळते. निसर्गाने दिलेले सृष्टीवैभव आपल्याला जपता येईल. त्याचा आनंदही घेता येईल.

*'श्रावणसरीत मृदगंध ओला,*
*फुलाफुलांतून गंध भरला'*

मंगेश पाडगावकरांनी लक्ष वेधलेला हा ओला मृदगंध आपल्याला श्वासा-श्वासात भरून घेता येईल. फुला-फुलात ओतप्रोत भरलेला हा अलौकिक दरवळ जगण्याची नवी उभारी देईल.

मोबाईल : 83 08 03 37 05



# POSH कायदा

- स्मिता लोपीस
चुळणे



'देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली.' — उत्पत्ती १:२७

प्रत्येक स्त्री आणि पुरुष देवाच्या प्रतिमेत निर्माण झाला आहे. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा जपणे ही केवळ सामाजिक किंवा कायदेशीर नव्हे, तर ख्रिस्ती श्रद्धेची मूलभूत शिकवण आहे. माता मरियेचे जीवन नम्रतेचे, धैर्याचे आणि देवावरील विश्वासाचे प्रतीक आहे. तिच्या जीवनातून प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण करण्याची प्रेरणा मिळते.

आज महिला शिक्षण, आरोग्य, उद्योग, प्रशासन, चर्च संस्था, सामाजिक सेवा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देत आहेत. मात्र त्यांच्या प्रगतीबरोबर कार्यस्थळी सुरक्षिततेचा प्रश्नही अधिक महत्त्वाचा बनला आहे. भीतिमुक्त आणि सन्मानपूर्ण वातावरणात काम करण्याचा अधिकार हा केवळ नैतिक मूल्य नाही, तर भारतीय संविधान आणि कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१३ (POSH Act) यांनी दिलेला कायदेशीर अधिकार आहे.

POSH कायद्याचा उद्देश केवळ तक्रारींचे निवारण करणे नाही; तर लैंगिक छळ होणारच नाही, अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे हा आहे. प्रत्येक आस्थापनाने (शैक्षणिक संस्था, रुग्णालय, धार्मिक संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग किंवा कार्यालयाने) सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि विश्वासार्ह वातावरण निर्माण करणे ही त्यांची प्रथम जबाबदारी आहे.

ह्या कायद्यानुसार दहा किंवा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनेत / संस्थेत अंतर्गत तक्रार समिती (Internal Committee – IC) स्थापन करणे बंधनकारक आहे. दहापेक्षा कमी कर्मचारी असलेल्या संस्थांसाठी किंवा तक्रार नियोक्त्याविरुद्ध असल्यास जिल्हा-स्तरावरील स्थानिक समिती (Local Committee – LC) तक्रारीची दखल घेते. तक्रार लेखी स्वरूपात केली जाते; मात्र पीडित महिलेला मानसिक धक्का, भीती किंवा इतर कारणांमुळे लेखी तक्रार देता येत नसेल, तर IC किंवा LC ने तिचे निवेदन ऐकून ते लेखी स्वरूपात नोंदवून घेण्यास मदत करणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. त्यानंतर गोपनीय, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी केली जाते. आवश्यक असल्यास संस्थेने पीडितेला पोलीस तक्रार दाखल करण्यासाठी तसेच कायदेशीर साहाय्य मिळवून देण्यासाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे.

**भीतिमुक्त आणि सन्मानपूर्ण वातावरणात काम करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला राज्यघटनेने दिलेला आहे.**

अनेकदा काहीजण असा युक्तिवाद करतात की, 'पुरावा नसल्यामुळे काहीच सिद्ध होणार नाही.' हा समज चुकीचा आहे. लैंगिक छळ बहुतांश वेळा बंद कार्यालयात, एकांतात किंवा डिजिटल माध्यमातून घडत असल्याने प्रत्यक्ष साक्षीदार असतीलच असे नाही. म्हणूनच POSH चौकशीत संदेश, ई-मेल, व्हॉट्सॲप चॅट, कॉल रेकॉर्ड, सी.सी.टी.व्ही., परिस्थितीजन्य पुरावे, सहकाऱ्यांची निरीक्षणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पीडितेची विश्वासार्ह व सुसंगत साक्ष ह्यांचा एकत्रित विचार केला जातो. न्यायव्यवस्था आणि POSH समित्या सत्याचा शोध केवळ प्रत्यक्ष पुराव्यावर नव्हे, तर उपलब्ध सर्व परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे घेतात. त्यामुळे प्रभाव, पद किंवा भीती दाखवून कोणालाही न्यायप्रक्रियेवर प्रभाव टाकता येत नाही.

त्याच वेळी POSH कायदा तक्रारदार आणि उत्तरदाता ह्या दोघांनाही आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते.

POSH हा केवळ कायदा नाही; तो न्याय, सन्मान, समानता आणि जबाबदार वर्तनाची संस्कृती आहे. सुरक्षित कार्यस्थळ ही प्रत्येक महिलेची अपेक्षा नव्हे, तर तिचा मूलभूत आणि अबाधित अधिकार आहे.

मोबाईल : 99 70 81 53 89

## शोकसमाचार व इतर जाहिरातीविषयी पाळावयाची पथ्ये

'सुवार्ता' मासिकात शोकसमाचाराची माहिती दिली जाते. लांब-दूरच्या लोकांना मृत व्यक्तीविषयी व मरणोत्तर होणाऱ्या विधीविषयी माहिती मिळते. मृत व्यक्ती त्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना फार मोलाची असते. त्या व्यक्तिविषयी स्मृती उजळविण्यासाठी चांगल्या शब्दांत कुटुंबातील मंडळी त्यांच्याविषयी काव्यात्मक गुंफण करून किंवा अन्य प्रकारे भावना व्यक्त करून मजकूर पाठवत असतात. आपल्या भावनांचा आम्ही आदर करतो. तथापि सारासार विचार करता व संपादक मंडळाचा अनुभव लक्षात घेता, अशा कविता किंवा मृत व्यक्तींना वाहिलेली स्तुतिसुमने 'सुवार्ता' मासिक छापू शकत नाही. त्याऐवजी आपण बायबलमधील सुवचने अंतर्भूत करावी, ही विनंती!

**- संपादक**

# शिक्षक दिन

-विल्यम गोन्सालविस
जोसघर, उमराळे

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांचा जन्मदिन ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन एक उत्तम शिक्षक होते. शिक्षण क्षेत्रात सर्वोकृष्ट विकास घडून यावा ह्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. इंग्लंड येथील ऑक्सफर्डसारख्या नामांकित विद्या पीठातील तत्त्वज्ञान विषयाचे ते प्राध्यापक होते. आजच्या शिक्षकाने त्यांना आपला आदर्श मानून त्यांच्यातील एखाद-दुसरा गुण अंगी बाणावा हा उदात्त हेतू 'शिक्षक दिन' साजरा करण्यामागे असू शकतो.

शाळा ही मुलांचे दुसरे घर असते. घरी पालक आपल्या मुलांचे गुरू असतात तसेच शाळेत शिक्षक मुलांचे गुरू असतात. देशाची भावी पिढी घडविण्यातही शिक्षकांची भूमिका फार महत्त्वाची असते. त्यामुळे शिक्षकांनी सतत अद्यावत असणे आणि त्यासाठी त्यांनी अवांतर वाचन करणे फार महत्त्वाचे असते. त्यांच्या अवांतर वाचण्याचा फायदा विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे होऊ शकतो. पाठ्य-पुस्तकाबाहेरचे व चार भिंती पलीकडचे अनुभव विद्यार्थ्यांना द्यायला हवेत. शिक्षकांनी आपले स्वयंमूल्यमापन करायला हवे. उत्तम शिक्षक केवळ शिकवित नाही तर एखाद्या कसबी कलाकारांप्रमाणे विद्यार्थ्यांना घडवित असतो. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास झाल्यास आपण भविष्यात चांगली पिढी घडवू शकतो.

आज शैक्षणिक मूल्ये रसातळाला जात असताना काही अपवाद वगळता बहुदा सगळीकडे शिक्षणाचे बाजारीकरण झालेले दिसत आहे. अशा वेळी एक शिक्षक म्हणून अध्यापन करणाऱ्या



शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे. चरित्र घडविणारे, मनोबल उंच करणारे, बुद्धी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे शिक्षण देणे क्रमप्राप्त आहे. शालेय शिक्षणाबरोबर जीवनात शिस्त, वक्तशीरपणा, टापटीपपणा, सेवावृत्ती अशा काही मूल्यांची पाखरण आपण विद्यार्थ्यावर करायला हवी. कारण अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यावर

> **शाळा ही मुलांचे दुसरे घर असते.**

शैक्षणिक मूल्यांचे महत्त्व पटवून देत त्यांना शिकविले तर भविष्यात त्याचा सकारात्मक परिणाम झालेला आपल्याला दिसून येईल. शाळेत केवळ पारंपरिक शिक्षण न देता आधुनिक तंत्रज्ञान, संस्कार आणि नावीन्य उपक्रम राबवणारी केंद्र असावी ह्याकरिता शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प, वादविवाद, शैक्षणिक सहली आणि व्यवसाय मार्गदर्शन ह्यांसारख्या संधी उपलब्ध करणे ही काळाची गरज आहे.

काही महिन्यांपूर्वी भारतातील जम्मू आणि काश्मीर येथील रुबल नागी ह्या शिक्षिकेला झोपडपट्टीतील मुलांसाठी केलेल्या अतुलनीय कार्यासाठी दुबई येथे 'ग्लोबल टीचर अवॉर्ड २०२६' पुरस्काराने गौरविण्यात आले. जग-भरातील १३९ देशांतून ग्लोबल टीचर अवॉर्ड २०२६ पुरस्कारासाठी पाच हजाराहून अधिक नामांकने आली होती. ह्यामधून रुबल नागी ह्या शिक्षिकेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कारापोटी मिळालेले दहा कोटी त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा बांधण्यासाठी वापरण्याचा मनोदय व्यक्त केला.

आज शिक्षकांपुढे अनेक आव्हाने आहेत. आजचा विद्यार्थी हा खूप संवेदनशील आहे. अशा वेळी प्रसिद्ध समुपदेशक व ज्येष्ठ शिक्षक फ्रान्सिस डिमेलो ह्यांचे 'लाखो इथले गुरू' पुस्तक शिक्षकांसाठी खूप महत्त्वाचे आहे. वयाच्या पंच्याहत्तरीतही ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. ह्या पुस्तकात त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा आणि दुःखद कथा सांगितलेल्या आहेत. आज शिक्षणाचे व्यापारीकरण झालेले असता हे पुस्तक अध्यापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षकांना उत्तम मार्गदर्शक व दिशादर्शक ठरू शकते. प्रत्येक शिक्षकाने ह्या पुस्तकाचे वाचन करणे गरजेचे आहे. मानवी जीवनात आपल्या प्रत्येकाला अनेक गुरू भेटत असतात ज्यांच्या मौलिक आणि त्यांनी योग्य वेळी केलेल्या मार्गदर्शनाने आपल्या जीवनात आमूलाग्र बदल होतो. अशा सर्व गुरूंना कृतज्ञतेचा नमस्कार..!!

मोबाईल : 99 69 22 94 57

# ज्ञान संक्रमणातील शिक्षक

-सौ. मेबल बेसील पिमेंटा
सेवानिवृत्त प्राचार्या, पुष्पांजली कॉलेज ऑफ एज्यु.



'शिक्षक' ही संकल्पनाच मुळी खूप व्यापक आहे. शिक्षक ह्या शब्दाची उत्क्रांती घरापासून सुरू होऊन वाटचाल जगाच्या पाठीवर कुठे पोहोचेल ते सांगता येत नाही.

आई-वडील व पालक हे कुटुंबातील पहिले शिक्षक. नंतर के.जी ते पी.जी.पर्यंतचे शिक्षक, आपल्यासाठी धर्मशिक्षण देणारे धर्मशिक्षक, आध्यात्मिक जीवन खोलवर रुजविणारे धर्मगुरू तसेच गरजेनुसार मानसिक सल्ला देणारे मानसतज्ज्ञ असे नाना प्रकारचे 'गुरू' आपले जीवन घडवित असतात. शिक्षकाचे कार्य म्हणजे शहाणे करणे.

''युक्ति बुद्धि शहाणपण ।
जेणे राहे समाधान ।'' (समर्थ रामदास)

शहाणपण कशासाठी? तर अविरत, अखंडपणे यथार्थ जीवन जगण्यासाठी. जीवनात प्रत्येक व्यक्तीला दोन स्तरांवर संघर्ष करावा लागतो. पैकी **पहिला स्तर म्हणजे 'स्व'**. ह्या लढाईची सुरुवात समजायला लागल्यापासून होते, ती वार्धक्यापर्यंत आपली पाठ सोडीत नाही. नैराश्येच्या गर्तेतून वर येण्यासाठी शिक्षकाचा एक हात पुरेसा असतो. परीक्षांमुळे येणारा ताणतणाव, आजारामुळे येणारी दुर्बलता, प्रिय व्यक्तीच्या मृत्यूमुळे येणारा एकाकीपणा, आर्थिक परिस्थितीमुळे येणारी असाहाय्यता इत्यादी कारणांमुळे नैराश्य येते. अशा वेळी शिक्षकांचे कृतिशील व शाब्दिक आश्वासन विद्यार्थ्यांना वाचवते, ''मला फक्त एक फोन कर...'' हा सूरही खूप देऊन जातो.

एरिक एरिकसन ह्या मानशास्त्रज्ञाने आपल्या व्यक्तिमत्त्वविषयक उत्पत्तीत मनो-सामाजिक विकासाच्या एकूण आठ अवस्था सांगितल्या आहेत, जन्मापासून मृत्यूपर्यंत. त्यांच्या मते जीवनात येणारे संघर्ष हे त्या विशिष्ट विकासाच्या अवस्थेपुरते मर्यादित नसून ते आयुष्यभर एकावर एक साचत जातात. जर हे जीवन संघर्ष सकारात्मक पद्धतीने सोडविले तर मानवी व्यक्तिमत्त्व 'पॉझिटिव्ह पर्सनॅलिटी' म्हणून ओळखले जाते. ह्याउलट हेच संघर्ष जर नकारात्मक पद्धतीने सोडविले तर आपले व्यक्तिमत्त्व नकारात्मक बनते. जसे की आई-वडिलांचे प्रेम, मूलभूत गरजांची पूर्तता, बालपणातील स्वातंत्र्य व भिस्त, सहा ते बारा ह्या वयातील मोकळेपणा व वैचारिक वाढ अशा सकारात्मक अनुभवांमुळे

> **जीवनात प्रत्येक व्यक्तीला दोन स्तरांवर संघर्ष करावा लागतो.**

मुलांचे व्यक्तिमत्त्व सकारात्मक दिशेने घडत जाते.

मानवी संघर्षाचा **दुसरा स्तर म्हणजे 'सामाजिक जीवन'**. समाजात योग्य वेळी, योग्य प्रमाणात समाजमान्य वर्तन करणे हा धडा आपणास शिक्षकांकडून मिळतो. संभाषण करताना इतरांना बोलण्याची संधी देणे, त्यांचे म्हणणे ऐकून घेणे व नंतर स्वत:चे मत मांडणे हे आंतरक्रियात्मक शिक्षणातून आपण शिकतो. संवाद साधताना आपले बोलणे हे बहुधा प्रतिक्रियात्मक असते ज्यामुळे इतरांची मने दुखावली जाऊ शकतात. आपले बोलणे हे प्रतिसादात्मक असले तर सूर वेगळा असतो. सर्वसाधारण प्रश्न विचारले जातात, कुटुंबविषयक चौकशी केली जाते. त्यानंतर ती व्यक्ती स्वत:हून प्रकट होते. हेच शिक्षणामुळे येणारे शहाणपण आहे.

शिक्षणक्षेत्र ही सातत्याने संक्रमित होणारी कार्यभूमी आहे. शिक्षणामुळे विविध क्रांती घडून आल्या. आजची क्रांती ही वैचारिक आहे. जेन झी हे ह्या क्रांतीचे फलित आहे. विचारांना वेगवान करण्यासाठी 'मास मीडिया' आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' उपयुक्त ठरत आहेत. मात्र ह्या प्रवाहात आपली आधुनिक पिढी वाहवत जाणार नाही, ह्याकडे शिक्षकांचे व प्रौढ पिढीचे लक्ष असावे. सध्याची पिढी ही आव्हानात्मक आहे. त्यांचे प्रश्न, भाषा, संकल्पना आदींचे काळानुसार संक्रमण झाले आहे. त्या अनुषंगाने शिक्षकांना सदर आव्हान पेलण्यासाठी अनौपचारिक शिक्षण घ्यावे लागेल. ह्या जेन झीशी संवाद साधल्यास त्यांचे मन समजण्यास व जिंकण्यास नक्कीच मदत होईल.

मोबाईल : 99 60 63 19 60

# हाच माझा मोठा पुरस्कार



-जॉना वि. फरेरा
पाली

मी सौ. जॉना वि. फरेरा, वय वर्षे ८०. मी एका प्राथमिक शाळेची शिक्षिका. झेड.पी. शाळेत पहिली ते सातवीपर्यंत शिकविणारी. ३५ वर्षे नोकरी. सुरुवातीच्या पाच वर्षांत दोन शाळेवर बदली आणि नंतर भाईंदर पश्चिमेस मुर्धा गावातील प्राथमिक विद्यामंदिर ह्या शाळेत वीस वर्षे काम केले. सुधारलेला गाव. आगरी समाज. सातवी पर्यंतची शाळा. आठ-दहा हिंदू शिक्षिका आणि मी एक अविवाहित ख्रिस्ती शिक्षिका. सुरुवातीला मला भीती वाटली; परंतु प्रेमळ ग्रामस्थ आणि हुशार विद्यार्थी ह्यामुळे शिकवायलाही आनंद वाटायचा.

त्या शाळेने 'आदर्श शाळा' म्हणून ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला होता. त्या शाळेत मी १९७४ ते १९९५ पर्यंत होते. १९९४ला मी इयत्ता पहिलीचा वर्ग घेतला. परंतु १९९५ला झेड.पी.च्या शाळा महानगर पालिकेने घेतल्या आणि आम्हां सर्व शिक्षकांच्या बदल्या केल्या. मी दुसऱ्या शाळेवर गेले तेव्हा पहिलीतून दुसरीत आलेला नितेश नावाचा मुलगा माझ्याच शाळेत येण्याचा हट्ट करत होता. परंतु ते अशक्य होते. एके दिवशी मधल्या सुट्टीत हा मुलगा आईला घेऊन मला भेटायला आला. मला मिठी मारली. मी त्याला वेंगेत घेतले. डोक्यावरून मायेचा हात फिरवला आणि माझा आशीर्वाद घेऊन आनंदाने घरी गेला. अजूनही त्याचे फोन येत असतात.

दुसरा एक विद्यार्थी भाईंदर नगर पालिकेतील शिक्षणाधिकारी ह्यांच्याकडे कामाला असता त्यांनी आम्हां शिक्षकांच्या बदलीची यादी पाहिली. त्यात माझे नाव पाहिले. मला दूरवर दिलेल्या शाळेचे नाव पाहताच त्याने मला थांगपत्ता नसताही माझी बदली रेल्वे स्टेशनजवळ दोन मिनिटावर असलेल्या शाळेत करून घेतली. त्याच शाळेतून मी २००४साली सेवानिवृत्त झाले.



२०२२ला मुर्धा शाळेला ७५वर्षे पूर्ण झाली म्हणून अमृत महोत्सव साजरा केला. १९९५ ते २०२२पर्यंत २७ वर्षे त्या शाळेपासून दूर असूनही खास आम्हां पाच-सहा शिक्षिकेचे स्वागत केले. स्टेजवर मानाचे स्थान देऊन शाल-श्रीफळ-साडी आणि मान चिन्ह देऊन सत्कार केला.

आता मला निवृत्त होऊन २२वर्षे झाली तरी ही मुले स्वत:ची मुले, नातवंडे घरी ठेवून माझा वाढदिवस साजरा करण्यासाठी माझ्या घरी येतात. अशा ह्या मुलांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. माझ्या १९९५ला मिळालेल्या आदर्श शिक्षिका महापौर पुरस्कारापेक्षा हा पुरस्कार मोठा आहे.

मोबाईल : 86 98 73 88 67





निमित्त

# शिक्षकांच्या कथा आणि व्यथा

**-रोविना वाझ**
पापडी

कुणी सांगितले ‘‘मी शिक्षक आहे’’ की आपल्या मुखातून सहज निघते, ‘‘तुझं काय बाबा! अर्ध्या दिवसाची नोकरी, दुपारी जेवायला घरी, सणासुदीला सुट्टी, उन्हाळ्याची सुट्टी!’’

पण आज ह्या शिक्षकांची परिस्थिती पूर्वीसारखी राहिली नाही. ह्या युगात शाळेचे काम हे फक्त शाळेपुरता मर्यादित नसून ते कधीकधी आपल्याला आपली रात्रीची झोप त्यागण्यास भाग पाडते. पाठ नियोजन, नोट्स, शैक्षणिक साहित्य, विद्यार्थ्यांच्या वह्या-पेपर तपासणे, प्रश्नपत्रिका काढणे, रजिस्टर नोंद, लॉगबुक, रेकॉर्डबुक, प्रगतिपुस्तक, दैनंदिन मूल्यमापन नोंदी, सहशालेय उपक्रम अशा अनेक कामाने ग्रस्त असलेल्या शिक्षकांची कथा आणि व्यथा आपण जाणण्याचा कधी प्रयत्न केला आहे का?

शिक्षकी पेशा हा व्हाईट कॉलर जॉब म्हणून ओळखला जातो; पण आज ह्या व्हाईट कॉलर जॉबमधील शिक्षक सुरक्षित आहेत का? विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास करणारी व्यक्ती स्वत: शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यात आहे का? आज प्रत्येक शिक्षकाला कसली ना कसली चिंता ग्रासित आहे. कुणाला आपली शाळा बंद पडण्याची, सरप्लस होण्याची, तर कोणाला आपली शाळा ICSE, CBSE, IB, IG मध्ये रूपांतर होण्याची भीती, कोणाला सहा-सात वर्षे वाट पाहूनसुद्धा मान्यता (Approval) न मिळण्याची चिंता, तर कोणाला स्कूल पॉलिटिक्स म्हणून डिप्रेशनमध्ये जाण्याची भीती, कुणाला लोकल ट्रेनमधील वाढणारी गर्दी बघून रिटायरमेंटपर्यंत नोकरी करणे शक्य होणार की नाही ह्याची चिंता.



मुलांची परीक्षा म्हणजे जणू शिक्षकांची परीक्षा होय. परीक्षेच्या निकालावरून प्रथम शिक्षकाचे मूल्यमापन केले जाते आणि नंतर मुलांचे. शिक्षकाच्या शिकवण्याची कला, त्यांचे प्रयत्न ह्यांचं मूल्यमापन शाळा व पालक करत असतात.

माझ्या विद्यार्थ्यांनी किती गुण काढले ह्यापेक्षा तो किती ‘चांगला व्यक्ती बनला आहे’, हीच माझ्या शिकवण्याची पोचपावती होय. आज मुलांना कळून चुकले आहे की शिक्षक हा शाळा व्यवस्थापक आणि पालक ह्यांच्यामधील कठपुतळी झाली आहे. म्हणून मुलांची शिक्षकांप्रति वागणूक बदलली आहे. तो मान-सन्मान, ती आदरयुक्त भीती कुठेतरी नाहीशी झाली आहे.

> **आज व्हाईट कॉलर जॉबमधील शिक्षक सुरक्षित आहेत का?**

वर्गात आवाज आला की शिक्षक जबाबदार, मुलांनी अभ्यास केला नाही, त्याला गुण कमी मिळाले की शिक्षक जबाबदार, मुलांच्या बेशिस्ततेला शिक्षक जबाबदार, मुलाने डब्बा खाल्ला नाही तरीही शिक्षक जबाबदार, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांनी इंग्रजी बोलले नाही तरीही शिक्षक जबाबदार, मुलांची वह्या-पुस्तके अपूर्ण असतील तरीही शिक्षक जबाबदार. ह्या सर्वांमध्ये मुलांची स्वत:ची जबाबदारी ती काय? त्यांच्या पालकांची जबाबदारी काय?

मुलांना शाळेत पाठवले, शुल्क भरले म्हणजे आपली जबाबदारी पूर्ण झाली असे पालकांना वाटते काय? आज शाळेत काय झाले? काय शिकलास? काय गृहपाठ दिला आहे? ह्याची चाचणी करणे पालकांची जबाबदारी नव्हे काय? निकालाच्या दिवशी शिक्षकांविषयी अनेक तक्रारी घेऊन पालक येत असतात. हा शिक्षक बरोबर शिकवत नाही, तो शिक्षक माझ्या मुलाला ओरडतो, इत्यादी... पण का ओरडतो? का शिकवलेलं समजत नाही? त्या शिक्षकाने शिकवलेलं माझ्या मुलांनी त्या दिवशी घरी येऊन सराव केला आहे का? योग्य ती उजळणी केली आहे का? हे बघण्याची पालकांची जबाबदारी नव्हे काय? प्रत्येक गोष्टीला शिक्षकाला जबाबदार ठरवण्यापेक्षा माझ्या मुलांनी त्याची जबाबदारी पूर्ण केली आहे का? रोजचा अभ्यास रोज करून उजळणी केली आहे का? हे बघण्याची जबाबदारी पालकांची नव्हे काय?

शिक्षक हा पाण्यासारखा इतरांचे जीवन फुलविण्याचा प्रयत्न करत असतो. ज्ञानामृत पाजून आपल्याला शहाणपण देणारा, जीवनाला आधार व आकार देणारा असतो. त्यांचा मान-सन्मान हा फक्त शिक्षकदिनासाठी मर्यादित नसून आपल्या रोजच्या जीवनात तो दिसून यावा.

•

अनुभव

# शिक्षकी पेशातील आनंदयज्ञ

-डॉ. सुभाष डिसोजा
उपप्राचार्य, सेंट जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा

मागील तीस वर्षांहून अधिक काळ मला १६ ते २१ ह्या वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे, त्यांच्यावर प्रेम करण्याचे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे भाग्य लाभले. मानस शास्त्रात ह्या वयोगटाला अनेकदा 'वादळी व तणावपूर्ण वय' (Storm and Stres Period) असे संबोधले जाते. शरीरात संप्रेरकांचे बदल, मनात असंख्य प्रश्न, भविष्याची स्वप्ने, स्वातंत्र्याची ओढ, स्वतःची ओळख शोधण्याची धडपड आणि भावनांचा प्रचंड कल्लोळ - ह्या सर्वांचा संगम म्हणजे ही किशोरावस्था. अशा विद्यार्थ्यांसोबत प्रवास करणे हे माझ्यासाठी केवळ नोकरी नव्हे, तर ईश्वराने दिलेली सेवाकार्याची संधी आहे, असे मी मानत आलो आहे. मला ह्या 'वादळी वयोगटातील' विद्यार्थ्यांना जवळून पाहता आले आणि त्यांना घडविण्याचे भाग्य लाभले, हीच माझ्या आयुष्यातील मोठी कमाई आहे.

शिक्षक म्हणून माझे कार्य विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञान भरविणे नव्हते; तर त्यांच्यात दडलेली क्षमता, संवेदनशीलता, नेतृत्वगुण व सेवाभाव जागविणे हे होते. ''शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसतो; तो व्यक्तिमत्त्व घडविणारा शिल्पकार असतो.''

प्रापंचिकांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या ज्ञानदीप मंडळ संचलित सेंट जोसेफ महाविद्यालयात रुजू झाल्यानंतर मी वर्गात पहिले लेक्चर सुरू होण्यापूर्वी हार्मोनियमच्या साथीने प्रार्थनागीत सुरू केले. ह्या स्वरांच्या जगात मुलांचे मन रमू लागले. कॉलेजच्या आवारात एक अद्‌भुत शांतता आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. संगीत हे ह्या वयातील चंचल ऊर्जेला एकाग्र करण्याचे एक प्रभावी माध्यम ठरले. त्यांच्या



चेहऱ्यावर दिसणारी प्रसन्नता पाहून पुढे हीच संकल्पना संपूर्ण महाविद्यालयाच्या सामूहिक संगीतबद्ध प्रार्थनेत विकसित झाली.

महात्मा गांधी ह्यांच्या मते, ''शिक्षणाचे अंतिम ध्येय म्हणजे चारित्र्यनिर्मिती.'' ह्या विचाराची खरी अनुभूती मला राष्ट्रीय सेवा योजना (NSS) 'प्रोग्राम ऑफिसर' म्हणून आठ वर्षे काम करताना आली. मुंबई विद्यापीठाच्या नियमानुसार दहा दिवसांचे निवासी शिबिर आयोजित करणे बंधनकारक होते. आजच्या सोयी-सुविधांच्या काळात त्या शिबिरातील

> **शिक्षक हा विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणारा शिल्पकार असतो.**

जीवन विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान असे. जमिनीवर झोपणे, पहाटे उठून प्रार्थना व योग करणे, वेळेचे काटेकोर पालन करणे, स्वतःची ताटे धुणे, स्वच्छतागृहे साफ करणे, गटाने स्वयंपाक करणे आणि सर्वांनी तोच स्वयंपाक एकत्र बसून खाणे - ह्या प्रत्येक कृतीतून स्वावलंबन, शिस्त, समानता व श्रमाची प्रतिष्ठा शिकवली जात होती. मुला-मुलींचे मिश्र गट तयार करून पथनाट्य, समूहगीत, ग्रामस्वच्छता, जनजागृती, दत्तक गावातील गरीब कुटुंबांना भेटी आणि सामाजिक प्रश्नांवर काम अशा अनेक उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ह्या १० दिवसांत मुलांचे होणारे रूपांतर थक्क करणारे असायचे. पुस्तकांतील शिक्षण प्रत्यक्ष जीवनाशी जोडण्याची ही सुवर्णसंधी होती.

माझ्या अध्यापनाच्या सुरुवातीच्या काळात एका वर्गात १२० विद्यार्थ्यांना, त्यात १०%अतिरिक्त प्रवेशामुळे तब्बल १३२विद्यार्थ्यांना शिकवावे लागत असे. एवढ्या विद्यार्थ्यांना सामावून घेणे आणि तासभर एकाग्र ठेवणे हे वाटते तितके सोपे नव्हते. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली - विद्यार्थी प्रथम तुमचा विषय ऐकत नाहीत; ते तुमचे हृदय वाचतात. ह्या वयोगटातील विद्यार्थी प्रेमाची, विश्वासाची, आदराची व प्रोत्साहनाची भाषा सर्वांत लवकर समजतात. त्यांना दुर्लक्षित केले तर ते बंडखोर होतात; पण त्यांच्यावर निःस्वार्थ प्रेम केले, त्यांचे ऐकून घेतले, त्यांच्या यशाचे कौतुक केले आणि चुका समजावून सांगितल्या तर ते अशक्य वाटणारी कामेही करून दाखवतात.

महात्मा गांधीजींनी शिक्षणाबद्दल फार सुंदर म्हटले आहे : ''खरे शिक्षण तेच, जे विद्यार्थ्यांचे हृदय, बुद्धी आणि आत्मा ह्यांचा सर्वांगीण विकास करते.''

आज मागे वळून पाहताना माझे विद्यार्थी उच्च विद्याविभूषित होऊन जगाच्या कानाकोपऱ्यात विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. मोठे भाग्य म्हणजे, ६ जण धर्मगुरू आणि ५ हून अधिक मुली धर्मभगिनी बनून ईश्वराची आणि समाजाची सेवा करत आहेत. ही माझ्या आयुष्याच्या आशीर्वादांची यादी आहे. ईश्वराने मला हे महान कार्य करण्याची संधी दिली, ह्यासाठी मी त्याचा सदैव कृतज्ञ आहे.

मोबाईल : 98 81 62 26 61

# छडी वाजे छम् छम्, विद्या येई घम् घम्...

-फा. किरण लोपीस
प्राचार्य - थॉमस बॅप्टिस्टा कॉलेज, पापडी

'मास्तर' हे नाव उच्चारताच माझ्या प्राथमिक शाळेतील ते दिवस डोळ्यांसमोर उभे राहतात. साधे कपडे, साधी राहणी व विद्यार्थ्यांबद्दल अपार तळमळ हीच त्यांची खरी ओळख होती.

शाळेचा गणवेश असो, गृहपाठ असो, वर्गात रांगेने जाणे असो, वर्गात लक्षण देणे असो, पाढे म्हणणे असो, कविता म्हणणे असो किंवा परीक्षेत नापास होणे असो - अशा कितीतरी प्रसंगांमध्ये मार खाल्ल्याशिवाय आम्ही वर्गातून घरी परतायचो नाही.

मार खाल्ल्यानंतर घरी मात्र शांत राहायचे. घरात एक शब्दही बोलायचा नाही. कारण शाळेत मास्तरांनी मारल्याचे घरी कळले तर घरातील वडील हा 'दुसरा मास्तर' आणखी शिक्षा करणार, ह्याची प्रचंड भीती वाटायची. अशा वेळी आम्हाला आधार असायचा तो फक्त आईचा पदर.

प्रिय मित्रांनो, 'मास्तर' या शब्दामध्ये प्रचंड शिस्त होती. 'Master was always right' अशी समाजाची धारणा होती. त्यामुळे बाजारात मास्तर दिसले की विद्यार्थी पळून जायचे. आज मात्र परिस्थिती उलटी झाली आहे. आज बाजारात किंवा मॉलमध्ये विद्यार्थी दिसला की मास्तरच कधी कधी दुसऱ्या दिशेने निघून जातो. कारण हा विद्यार्थी कोणत्या रूपात, कोणत्या स्वरूपात समोर येईल आणि काय बोलेल याचा नेम नसतो. मास्तर ह्या शब्दाचा अर्थ समजून घेणे आज फार आवश्यक आहे. 'सर' हे आदराचे संबोधन आहे; मात्र 'मास्तर' ह्या शब्दात संस्कार, आत्मीयता, तळमळ, बांधिलकी, मूल्यांची पेरणी करणारा व भविष्यवेधक असा व्यापक अर्थ दडलेला आहे.



'मास्तर' हा शब्द इंग्रजीतील 'Master' ह्या शब्दापासून मराठीत आला आहे. Master हा शब्द लॅटिन भाषेतील Magister या शब्दापासून निर्माण झाला आहे. Magister म्हणजे मार्गदर्शक, ज्ञान देणारा, ज्ञानवंत, नेतृत्व करणारा आणि प्रभावी शिक्षक.

मास्तर म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक शिकवणारा शिक्षक नव्हे; तर जीवन घडविणारा, आयुष्याची आव्हाने पेलून नेण्यास तयार करणारा व्यक्तिमत्त्व निर्माता होय. हातात त्यांच्या खडू असतो. फळा हे त्यांचे मैदान असते आणि हातातील डस्टर जणू चौकार-षट्कार

**मातेच्या स्तरावर येऊन विद्यार्थ्यांना जो शिकवतो तो मास्तर!**

मारणारी त्यांची बॅट असते.

मास्तरांच्या हातात छडी असायची आणि ते म्हणायचे, ''छडी वाजे छम् छम्, विद्या येई घम् घम्...!'' ''चला, पाढे बोला... कविता मोठ्याने म्हणा... एबीसीडी जोरात बोला...'' मास्तरांच्या हातात काठी दिसताच सारा वर्ग एका तालात अभ्यास करू लागायचा. मग आम्हाला मैदानावर खेळायला सोडले जायचे. तो आमच्यासाठी अभूतपूर्व आनंदाचा क्षण असायचा.

आज 'कॉर्पोरल पनिशमेंट (शारीरिक शिक्षा) की स्वयंशिस्त?' हा शिक्षण क्षेत्रातील चर्चेचा विषय आहे. शिक्षणात शिस्त नसेल तर विद्यार्थी दिशाहीन, अज्ञानी आणि बेफिकीर होऊ शकतो. आजची काही उदाहरणे आपल्या समोर आहेत. पूर्वीच्या काळात मास्तरांचा धाक, त्यांचा पहाडी आवाज, हातातील काठी आणि त्यांनी केलेली शिक्षा ह्यामुळे अनेक विद्यार्थी घडले. आज अनेक यशस्वी विद्यार्थी स्वत: कबूल करतात, ''मास्तरांच्या शिक्षेमुळेच आमचे भविष्य घडले.''

मात्र आजचा विद्यार्थी वेगळा आहे. त्याच्यासाठी स्वयंशिस्त अधिक महत्त्वाची आहे. त्याला समजून घेणे, त्याच्याशी संवाद साधणे, त्याला प्रेरणा देणे, प्रोत्साहन देणे, मुख्य प्रवाहात सामावून घेणे आणि त्याच्या चुका सकारात्मक पद्धतीने त्याच्यासमोर मांडणे ह्याकडे आधुनिक शिक्षणात विशेष लक्ष दिले जात आहे.

आजच्या शिक्षणाची दिशा 'Fear to Respect' आणि 'Punishment to Positive Discipline' अशी असली पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020), बालहक्क आणि आधुनिक शिक्षणशास्त्र यांचीही हीच अपेक्षा आहे.

शाळेत लागलेली शिस्त विद्यार्थ्याला घरातही शिस्तप्रिय बनवते. तो देशाचा जबाबदार नागरिक बनतो. समाजाप्रति आपली बांधिलकी ओळखतो आणि आपल्या सर्व भूमिका जबाबदारीने पार पाडतो. आता प्रश्न असा आहे की शाळेतील पूर्वीची 'मास्तरांची शिक्षा' योग्य होती, की आजची 'स्वयंशिस्त' ही संकल्पना अधिक योग्य आहे?

मोबाईल : 91 58 45 43 34


FLORENCE
TOURS & TRAVELS
FLORENCE TOURS & TRAVEL
• INTERNATIONAL •
DUBAI
13th January 2027
4N / 5D
JAPAN
CHERRY BLOOSAM
29th March 2027
SOUTH KOREA
CHERRY BLOOSAM
15th April 2027
CHINA HONG KONG AND MACAO
6th November 2026
29th Mar 2027
7N / 8D
VIETNAM
5th November 2026
26th January 2027
7N / 8D
EUROPE
MAY 2027
SINGAPORE MALAYSIA AND THAILAND
MAY 2027
ONLY THAILAND
MAY 2027
• DOMESTIC •
ASSAM MEGHALAYA
10N / 11D
20th Apr 2027
KASHMIR
JANUARY 2027
INCLUSIONS
Pickup Drop
Flight
Visa
Hotels
Sightseeing
All Meals.
Brian Dabre
7710027271
Wilfred Pereira
9922638520

# अदृश्य शत्रू : बुलिंग

-शिल्पा कोरिया/डिकुन्हा
नानकोडी, आगाशी



मी इन्स्टाग्राम चाळत असताना एका बातमीने माझे लक्ष वेधून घेतले. राजस्थान मधील एका शाळेत घडलेल्या एका दुर्दैवी घटनेविषयी ती बातमी होती. इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या अवघ्या ९ वर्षांच्या निष्पाप मुलीने, २०२५ च्या नोव्हेंबर महिन्यात आपल्याच शाळेच्या इमारतीवरून उडी मारून स्वतःचे जीवन संपवले. ह्या टोकाच्या पाऊलामागचे कारण समोर आले, ते सी.सी.टी.व्ही.फुटेजमुळे. वर्गात मुलांकडून तिला सतत हिणवले जाणे, चिडवणे, नावे ठेवणे असे प्रकार सुरू होते. शेवटी ह्या सततच्या छळाला कंटाळून त्या कोवळ्या बालमनाने स्वतःचा जीव देण्याचा निर्णय घेतला.

ही घटना 'बुलिंग' (Bullying)चे एक जिवंत आणि भयानक उदाहरण आहे. ज्यात केवळ शारीरिक हिंसा नाही; तर बहुतांश वेळी मानसिक छळ होत असतो. ह्यात अगदी सामान्य वाटणाऱ्या जसे की एखाद्याला सतत चिडवणे, टोमणे मारणे, त्याला समूहापासून वेगळे पाडणे, किंवा विशिष्ट नावांनी हाका मारून त्याचा अपमान करणे, ह्या सर्व गोष्टींचा समावेश होतो. जशी वाळवी लाकडाला आतून पोखरून निकामी करते, तसेच बुलिंग मानसिक आरोग्य धोक्यात आणते. ज्याचे आघात हे त्रासदायक आणि कायमस्वरूपी असतात. आपल्यापैकी अनेकांनी लहानपणी अशा समस्येचा सामना केलेला असेल आणि त्याचे पडसाद कुठेना कुठे तरी आपल्या जीवनात उमटतच असण्याची शक्यता आहे.

'बुलिंग' ही समस्या केवळ शाळेपुरता मर्यादित नाही. तर कुटुंबातही पालक कित्येकदा आपल्याच मुलांची तुलना करतात, शिस्तीच्या नावाने मारहाण करतात, सदैव टीका करत असतात. त्याचप्रमाणे डिजिटल युगात जगत असल्यामुळे सोशल मिडियाद्वारेही मुलाचा मानसिक छळ केला जातो. परिणामस्वरूप मुलांच्या वर्तनात बदल दिसून येऊ लागतात. जे मूल अभ्यासात हुशार असते त्याची प्रगती खुंटू लागते. शाळेत सतत गैरहजर राहू लागते. शाळा किंवा कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे टाळते, स्वतःला अलिप्त ठेवते. मूल कमालीचे अबोल आणि एकाकी होते.

> **'बुलिंग' ही समस्या केवळ शाळेपुरता मर्यादित राहिलेली नाही.**

सर्व लक्षणे मुलांच्या वागण्यातून स्पष्ट दिसत असूनही, अनेकदा मोठ्यांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. उलट, 'तुझीच काहीतरी चूक असेल' असे म्हणून आपण पीडित मुलालाच दोष देतो किंवा त्याला नावे ठेवतो. अशा कठीण परिस्थितीत जर पालकांनी मुलांच्या बाजूने आवाज उठवला, तर त्यांनाही शाळा प्रशासनाकडून किंवा समाजाकडून अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दुरून केवळ एक लहानशी समस्या वाटणारा हा प्रकार, जवळून पाहिला की एखाद्या डोंगराएवढा मोठा भासतो. त्यामुळेच, ह्या समस्यांना सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर गांभीर्याने हाताळणे गरजेचे आहे.

जे मूल दुसऱ्याला त्रास देते (Bully), त्याला शिक्षेची नाही, तर मदतीची गरज असते. त्याची ही हिंसक आणि विघातक वर्तणूक कोणत्या कौटुंबिक किंवा मानसिक समस्येतून निर्माण झाली आहे, ह्याचा शोध घेणे गरजेचे आहे. अशा मुलांना योग्य 'समुपदेशन' (Counselling) मिळाले, तर तेही पुढे जाऊन एक सुजाण आणि निरोगी व्यक्ती (Healthy Adult) म्हणून जीवन जगू शकतात. दुसरीकडे, जे मूल ह्या त्रासाचा बळी (Victim) ठरले आहे, त्याला समाजाने आणि कुटुंबाने कोणतेही 'लेबल' न लावता प्रेमाने जवळ केले पाहिजे. 'तुझ्या जगण्याला अर्थ आहे', 'तू प्रेमाचा हक्कदार आहेस' आणि 'तू जसा आहेस तसा स्वीकारार्ह आहे', हा विश्वास त्याच्या मनात निर्माण केला पाहिजे. त्यांच्या मनातील भीती आणि न्यूनगंड दूर करण्यासाठी व्यावसायिक समुपदेशनाची मदत घेतली, तर नक्कीच त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल.

दुसऱ्यांची चेष्टा-मस्करी करणे हा आपल्यासाठी केवळ विनोदाचा एक भाग असू शकतो; पण त्या विनोदामुळे एखाद्याच्या मनावर कायम टिकणाऱ्या जखमा होत असतील, तर तो विनोद राहत नाही. तो मानसिक छळ ठरतो. बुलिंगविरोधी प्रतिबंध लस ही प्रेम, स्वीकृती, आणि समजूतदारपणा हीच आहे.

मोबाईल : 83 69 90 77 91

•

प्रबोधन

# नवतरुणांना स्वत:चा जीव जड का होतो?

-वनिता पटवर्धन
vanita.patwardhan@gmail.com

जगभरातल्या आत्महत्त्यांच्या वेळो-वेळी केलेल्या विश्लेषणांमधून एकमुखाने एक महत्त्वाचा निष्कर्ष नोंदलेला आढळतो. तो म्हणजे उत्फुल्ल नवतरुण - साधारण १७ ते २० ह्या वयोगटामध्ये - आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे. या उभरत्या वयोगटासाठी मरणाचे हे एक कारण आहे. त्यातही मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण जास्त आहे. पुढचा सर्वांना अस्वस्थ करणारा मुद्दा म्हणजे गेल्या दोन-तीन दशकांमध्ये हे प्रमाण जगभरात वाढते राहिलेले आहे.

राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरोच्या (NCRB) आकडेवारी नुसार, शैक्षणिक अपयश हे नव-तरुणांच्या आत्मघाताच्या कारणांपैकी एक प्रमुख कारण आहे. विशेषत: वैद्यकशास्त्र व अभियांत्रिकी ह्यांसारख्या प्रतिष्ठेमुळे आकर्षक मानल्या जाणाऱ्या क्षेत्रांमधील अपयशाबाबत ते नोंदवले गेलेले आहे. ह्याशिवाय प्रेमभंग हेही कारण आढळते. अशा अपयशामुळे नवतरुणांमध्ये निराशा, अस्वस्थता, चिंता, भीती, चिडचिड, असाहाय्यता, न्यूनगंड अशा तीव्र प्रमाणातील भावनांचा पगडा असू शकतो आणि त्यामुळे ते आत्महत्येच्या दुःखद मार्गाने जातात. बहुतेक वेळा या भावनांचा आवेग (attack) मर्यादित काळापुरता असतो, पण घटना घडून जाते. अत्यंत अवघड परिस्थितीचा सामना करायचा की, सर्वस्वी माघार घेऊन जीवन संपवायचे, ही निवड करणारा माणूस असतो, परिस्थिती नव्हे!

ह्या मुलांबाबत मेंदूतील 'प्रीफ्रंटल कॉर्टेक्स' (prefrontal cortex) हा भाग पूर्णपणे विकसित झालेला नसतो. तर्क, निर्णय क्षमता, समस्या परिहार ह्यांसारख्या उच्च बौद्धिक प्रक्रियांची जबाबदारी मेंदूच्या ह्या भागावर असते. परिणामी, त्यांना ही कौशल्ये नीट साधत नाहीत. मग विचार बाजूला राहून कधी केवळ भावनावेगामध्ये मुले घाईघाईने भलतेच काही करून बसतात. ते आत्महत्येचा प्रयत्न करण्याला बळी पडण्याजोगे (Vulnerable) असतात. शिवाय सोबत्यांचा प्रभाव आणि दबाव असतो. जोडीला अन्य मानसिक त्रुटीही असू शकतात. त्यांची आत्महत्येची इच्छा ही मृत्यूची नाही, तर असह्य भावनिक वेदनेतून सुटका मिळवण्याची असते. त्यावेळी सभोवतालचे जर आधीच परिस्थितीचे भान राखणारे, सतत समजून घेणारे असले, तर हे टोकाचे पाऊल उचलले जात नाही.



**१७ ते २० ह्या वयोगटामधील युवक-युवतींच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक का आहे?**

शिक्षणक्षेत्रांतील अतिप्रचंड स्पर्धेत उतरताना, ह्या सळसळत्या नवतरुण छात्रांच्या बौद्धिक क्षमता, कल, आवडी, व्यक्तित्वगुण, अभ्यास कौशल्ये हे सर्व विशिष्ट अभ्यासक्रम निवडीसाठी पूर्ण अनुकूल आहेत ना, हे अजमावणे आणि अपयश आल्यास आधीच ठरवलेले अनेक सुयोग्य पर्याय सामोरे दिसणे, ह्या दोन गोष्टी त्यांना मोठ्या आधारस्तंभ ठरतात.

आपल्या पालकत्वाच्या सुजाण पद्धती मुलांमधील आत्महत्येचा धोका कमी करू शकतात. मुले काही वेळा अवाजवी हट्ट करतात, त्याला पालकांनी किती बळी पडायचे, हेही ठरवायला हवे ना ? त्यांना खंबीरपणे 'नाही' म्हणणे, अन्य मार्ग सुचवणे हे जमत आहे ना? की पालकत्वाची भूमिका उलटी-पालटी होऊन आता आम्ही पालकच मुलांशी बोलायला घाबरत आहोत? काहीही झाले तरी आपल्या मुलांनी बिथरू नये, वादविवाद नकोतच, अशी भूमिका आपण घेत आहोत का? त्यांच्या समस्या 'भिजत घोंगड्या'सारख्या कुजवून टाकतो की, सोडवण्याचा प्रयत्न करतो? आपण ह्या प्रश्नांची उत्तरे नक्की शोधायला हवीत.

आत्महत्येच्या प्रयत्नांआधी ८०% व्यक्तींमध्ये काही पूर्वखुणा दिसून येतात. त्या ध्यानात घेतल्यास त्यांना आत्महत्येच्या विचारापासून निश्चितपणे परावृत्त करता येते, असेही संशोधन सांगते. •

## ७५ व्या जन्मदिवसाचा अमृत महोत्सव
**६ सप्टेंबर २०२६**



**श्री. सिडनी जस्टीन मोरायस**
नायगाव, पाली

प्रिय डॅडी,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी वयाची ७५वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाचे आभार व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखा-समाधानाचे व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**सेल्डॉन व क्रिस्पिना; स्वाती व ॲश्ली व बेबी स्कायलीन;**
**आशीर्वाद : ख्रि. तेरेजा सिडनी मोरायस**
(9604385985)



## हार्दिक अभिनंदन



**डायलन जॉन्सन कोयलो**
मुलारवाडी, मर्सिस

प्रिय डायलन,

ईश्वराच्या कृपार्शिवादाने आणि तुझ्या अथक परिश्रमाने तू WILFRID LAURLER UNIVERSITY ONTARIO, CANADA येथून M.S. IN APPLIED COMPUTING ही पदवी संपादन केल्याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन व तुझ्या पुढील वाटचालीसाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

**मम्मी-डॅडी : ललिता व जॉन्सन कोयलो;**
**बहीण : स्लावी जॉन्सन कोयलो;**
**कोयलो व करवालो कुटुंबीय**


# पिटरमेरी इंडिया निधी लि. (वित्तसंस्था)

PETERMARY

**मुख्य कार्यालय व शाखा: बंगली वसई**
पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉप्लेक्स, बंगली हॉस्पीटल समोर, बंगली, वसई (प), पालघर - ४०१ २०१.

Registration No -: U65999MH2019PLC323412
Establishment -: 2019
**Contact Details : 8669955317 / 18** | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com

वसईत प्रथमच !!! कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी



आमची वैशिष्ट्ये
- आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर अधिक व्याजदर.
- वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था

★अतिज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्याजदर १२%

**Enjoy Higher Returns in FIXED DEPOSIT Scheme**

| Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizen |
|---|---|---|---|
| 1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30% |
| 2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50% |
| 3. | Dam Duppat in | 72 Months | |

ALOYSIUS PEREIRA
Managing Director

कार्यालयीन वेळ: सकाळी ९:३० ते संध्याकाळी ७:०० पर्यंत


ST. JOHN TECHNICAL & EDUCATIONAL CAMPUS, PALGHAR
CHRISTIAN MINORITY INSTITUTES
AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE
ALDEL EDUCATION TRUST
EXCELLENCE IN PHARMACY EDUCATION
SINCE 2008
ADMISSIONS OPEN 2026-27
51% SEATS RESERVED FOR CHRISTIAN MINORITY
ST. JOHN INSTITUTE OF PHARMACY AND RESEARCH
AUTONOMOUS
DTE CODE 3240
M. PHARM
• PHARMACEUTICAL QUALITY ASSURANCE (15)
• PHARMACEUTICAL CHEMISTRY (15)
• PHARMACEUTICS (09)
• PHARMACOLOGY (15)
ACCREDITED WITH GRADE A NAAC
B. PHARM (100)
D. PHARM (60)
9975316616
office@sjipr.edu.in
aldel.sjipr
sjipr_official
www.sjipr.edu.in
ALDEL COLLEGE OF PHARMACY AND RESEARCH
B. Pharm(100)
D. Pharm(60)
DTE CODE 3714
9920841900
office@acpr.in
aldel.acpr
acpr_official
www.acpr.edu.in

## अभिनंदन

**ईश्वरी सेवेत समर्पित जीवनाचा सुवर्ण महोत्सवी प्रवास**

**१५/०९/१९७६ ते १५/०९/२०२६**





### सिस्टर वेरोणिका एलायस घोन्सालविस

नारळीबाग, वसई

Canossian Daughter of Charity (FDCC)

**।। अर्पिते मी प्रभूला जीवन हे माझे सारे ।।**

प्रिय सिस्टर वेरोणिका,

एस.एस.सी.नंतर कनोसा कॉन्व्हेंटद्वारे सेवाकार्य करण्याचा तू निर्णय घेतलास आणि त्याप्रमाणे १५ सप्टें. १९७६ रोजी तू पहिले व्रत घेतले. त्यानंतर तलासरी, झरोली, धरमपूर, शिर्लयवाडी, झांबुआ (M.P.) बेळगाव आणि आता रायगड अशा दुर्गम भागांत हसतमुखाने प्रभूची सेवा करताना तू तेथील गरिबांची मने जिंकून घेतलीस. विशेषत: बचतगटाद्वारे महिलांचे सक्षमीकरण करून त्यांच्या संसाराला हातभार लावण्यास तू विशेष योगदान दिलेस.

आजही वयाच्या ७३व्या वर्षी रायगडसारख्या डोंगराळ भागात तू आनंदाने सेवा करीत आहेस, त्याबद्दल प्रभूला धन्यवाद आणि तुझे मन:पूर्वक अभिनंदन! ह्यापुढेही असेच सेवाकार्य करण्यास तुला प्रभूचा आशीर्वाद लाभावा, चांगले आरोग्य व मानसिक स्वास्थ्य लाभावे, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

नेहमीच आतुरतेने वाट पाहणारे तुझे :-

**भाऊ व वहिन्या : रेमंड व लीना घोन्सालविस**
**ऑल्विन व मेरी घोन्सालविस**

**बहिणी व भाऊजी : जेनेट थॉमस बरबोज**
**हेलन जोसेफ करवालो**

**भाचरे : रिमा, ॲक्लीन, जेरॉल्ड, ग्लेविन, मार्क, ग्लोरिया आणि छोटी एजरा**

---

**७७वा वाढदिवस व व्रतस्थ जीवनाची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रार्थनामय शुभेच्छा**

**जन्म : २९/०८/१९४९**

**सेवाकार्य : १५/०९/१९७६ ते १५/०९/२०२६**





### सिस्टर इजाबेल मनवेल डिमेलो

पोखरणीवाडी, तामतलाव, पापडी

सध्या वास्तव्य : बेळगाव; संस्था : कनोशियन प्रीतीकन्या

(Canossian Daughters of Charity)

पुढील प्रेषितीय कार्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थनामय शुभेच्छा!

**सर्व भाचे व भाच्या**

---

**७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन**

**२६/०९/१९५१ ते २६/०९/२०२६**



### सिस्टर मेरी (प्रबला) मर्यान लोबो

वटलई, नंदाखाल

संस्था : प्रेषितांची राणी संघ (SRA), आगाशी

सध्या वास्तव्य : व्हिवियन निवास, गोवा

प्रिय सिस्टर बाय,

परमेश्वराच्या कृपेने व पवित्र मरिया मातेच्या आशीर्वादाने तुम्ही आपल्या व्रतस्थ जीवनाची ७५वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखी-समाधानी व शांतीपूर्ण जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**तुमचे प्रिय भाऊ : मॅथ्यू मर्यान लोबो व लोबो कुटुंबीय**


— A PROJECT BY —
RUBY LIFESPACES
ALTURA UMELE
Strategic Selling Partner
NAAUV
YOUR NEXT BEGINS NOW
A Home Beyond Expectations
Residences crafted for comfort, elegance, and family living.
1 & 2 BHK Homes
Avaliable At
₹39.99 LACS*
ONWARDS
NAIGAON WEST
9920 305 655 | 9702 500 555
MAHA RERA NO.: P99000048381

## ७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

२३/०९/१९५१ ते २३/०९/२०२६










**श्री. मायकल सिल्वेस्टर लोपीस**

'लुमेन हाऊस', कातरवाडी, शिरलय

प्रिय तात्या,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक २३/०९/२०२६ रोजी तुम्ही आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन!

तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखी-समाधानी व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**: शुभेच्छुक :**

**पत्नी : कॅथरीन लोपीस**

**मुले : प्रशांत व गॅल्विन** — **सुना : लविना व स्टेफी**

**मुलगी : रोमिला** — **जावई : सॅमसन**

**नातवंडे : लॉरेल, लॉरस, जेनिसिस, गिऑन, स्मेरा, सियाना व लान्स**

# 5th Death Anniversary

## In Loving Memory of







# Late Ruby Emelyan Pereira

**1st July 1946 - 19th Sep 2021**

***"I am the resurrection and the life. The one who believes in me will live, even though they die"***

***(John 11:25)***



**'Prerna' Medical Relief Fund at Cardinal Gracias Memorial Hospital**

***Deeply Remembered by Family Members***

## In Loving Memory of



*"If we live, we live to the Lord and*
*if we die, we die to the Lord.*
*So then whether we live or whether we die,*
*we are the Lord's."*
(Romans 14:8)

**Fondly remembered by :-**
- **Rev. Fr. Stanny John Ferreira**
- **Lancelot & Gretta D'Mello**
- **Darryl & Pushpa D'Mello**
- **Joyce & Peter Andrades**
- **Glen, Bernard, Rovina, Villiona & Selena**

### Late Rev. Fr. William John Ferreira

Malungiwadi, Mulgaon

D.O.B. :21/01/1946 ; D.O.D. : 23/07/2026

### सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी जॉना लिप्सन डिसिल्वा**

राजोडी

जन्म : ३०/०७/१९५६; मृत्यू : २५/०३/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक २७/०९/२०२६ सकाळी ७.३० वाजता, आरोग्यमाता चर्च, राजोडी.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय राज्यात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुझेच शोकाकुल : पती : लिप्सन; मुलगी : लिओना व डिसिल्वा परिवार**

### २० वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी जोजेफ पास्कोल डिसा**

माणिकपूर, नौपाडा

जन्म : ०७/०९/१९५१ ; मृत्यू : ११/०९/२००६

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***
(यशया ५५:८)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या डॅडींना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : मेरी; मुली : डेलिया विवियन मिनेझीस व डिंपल व्हॅलेरियन लोपीस; मुलगा व सून : डिनल-ग्रीनल नातवंडे : डेलवीन, ओशन, जोॲन, क्लेर**

## ७५व्या जन्मदिवसाचे पुण्यस्मरण



**ख्रिस्तवासी विल्सन अ‍ॅन्थोनी आल्मेडा**

सातोडी, गिरीज

जन्म : १४/०९/१९५१; मृत्यू : ३०/०५/२०२३

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी फेलिक्स इनास फर्नांडीस**

गायवाडी, सांडोर

जन्म : १६/०७/१९४७; मृत्यू : ०५/०३/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६ सकाळी ७.३० वाजता, संत थॉमस चर्च, सांडोर.

***''अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या डॅडीच्या आत्म्याला चिरशांती दे!*

**पत्नी : फ्लॉरी; नात : एविआ रूपेश फर्नांडीस**

**फर्नांडीस व लुज्बो कुटुंबीय**

## दहा वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी एलायस विक्टर परेरा**

मृत्यू : ०४/०९/२०१६

## चार वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी विक्टर एलायस परेरा**

मृत्यू : २२/०९/२०२२

गास, लहान सरगोडी

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**जॉना एलायस परेरा आणि कुटुंबीय**

## तीन महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी रॉबर्ट फ्रान्सिस परेरा**

खरभाट वाडी, सालोली, सांडोर

जन्म : ०८/११/१९४४; मृत्यू : ०८/०६/२०२६

वय वर्षे ८१

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय राज्यात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : आल्बिना, मुलगा : रॉस्टन; मुलगी : जेनिस**

**सून : शामिन; नात : स्कार्लेट, ख्रि. स्कायल परेरा**

## ५० वर्षांची आठवण ३९ वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी जॉन मॅथ्यू रॉड्रीग्ज** **ख्रिस्तवासी मेरी जॉन रॉड्रीग्ज**

पापडी

जन्म : २२/०६/१९१४ जन्म : ११/०९/१९१९
मृत्यू : १९/०९/१९७६ मृत्यू : ०२/०८/१९८७

***''ज्याने मला पाठविले त्याची इच्छा हीच आहे की, त्याने जे सर्व मला दिले आहे त्यातून मी काहीही हरवू नये, तर शेवटल्या दिवशी मी ते उठवावे.''***

(योहान ६:३९)

*हे प्रभू परमेश्वरा, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-वडिलांना चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पॅट्रीक व लिना रॉड्रीग्ज आणि कुटुंबीय**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी बिशप एडविन कोलासो**

उत्तन

जन्म : ०२/११/१९३७; मृत्यू : २२/०९/२०२५

***''कारण जर आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो; म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत.''***

(रोम १४:८)

*हे प्रभू, आमच्या बिशपांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कोलासो कुटुंबीय**

## एक महिन्याची आठवण



**ख्रिस्तवासी इग्नेशियस व्हिक्टर डिमेलो**

दोनतलाव, नंदाखाल

जन्म : ३०/०५/१९४६; मृत्यू : २९/०७/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ३०/०८/२०२६ सकाळी ७.३० वाजता, होली स्पिरीट चर्च, नंदाखाल.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्याकडे या आणि मी तुम्हाला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : लुजान व स्वप्नदीप कुटुंबीय**

## सतरा वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी शीतल जॉन कोलासो**

आकाशवाडी, गिरीज

जन्म : १९/०७/१९८२; मृत्यू : ०४/०९/२००९

***प्रभू म्हणतो, ''पहा मी तुला कधीच विसरणार नाही. कारण मी तुला माझ्या तळहातावर कोरले आहे.''***

(यशया ४९:१५-१६)

*हे प्रभू, आमच्या शीतलला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**जॉनाथन कॅजीटन कोलासो व शीतल कॅजीटन कोलासो**

## वार्षिक स्मृती





### ख्रिस्तवासी कोसू जोजेफ डाबरे

मेरोडी, मर्सिस

जन्म : २२/०९/१९४७; मृत्यू : ०७/०९/२०२५

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय राज्यात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## तीन महिन्यांची आठवण



### ख्रिस्तवासी आग्नेस (डुलू) मॅन्युएल डिसोजा

'क्लेमेंट विला', माणिकपूर, पिठा,

जन्म : २९/१०/१९४१; मृत्यू : ०३/०६/२०२६

तीन महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६
सकाळी ७.०० वाजता, सेंट मायकल चर्च, माणिकपूर.

***''परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे.''***

(स्तोत्र २७:१)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**डिसोजा व पिंटो कुटुंबीय**

## एक वर्षाची आठवण



### ख्रिस्तवासी नाझरेथ जसीन पिमेंटा

पिंपळभाट, पापडी

जन्म : २८/०७/१९३९; मृत्यू : १३/०९/२०२५
वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १३/०९/२०२६
सकाळी ७.१५वाजता, पापडी कथिड्रल.

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या*
*डॅडींना चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : लीना नाझरेथ पिमेंटा**
**मुले : सुनिल, संदिप, स्नेहल**
**सुना : सॅन्ड्रा, सुप्रिया, स्वीटी**
**मुलगी : स्वीटी; जावई : ब्रायटन रिबेलो**
**नातवंडे : जेफ, जेना, ब्रेट, बेथन, ड्रीम, ब्रिटनी व ॲनलिझ**

# प्रेमळ स्मरणार्थ







## ख्रिस्तवासी फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : २६/०९/१९०१ मृत्यू : २६/१०/१९७४

## ख्रिस्तवासी एलिझा फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : ०६/०३/१९०९ मृत्यू : २६/०८/१९८४







## ख्रिस्तवासी फा. कायस फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : ०४/०१/१९४१ मृत्यू : २८/०७/२००७

## ख्रिस्तवासी सि. बाल्बिना फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : १७/१०/१९३७ मृत्यू : ०७/११/२०१७







## ख्रिस्तवासी ज्युस्तिना फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : ३१/१२/१९४२ मृत्यू : ०४/१०/२०२०

## ख्रिस्तवासी व्हिक्टर फ्रान्सिस कर्व्हालो

पारनाका, रमेदी

जन्म : ०६/११/१९३९ मृत्यू : १६/०३/२०२६

**''प्रभूमध्ये मरणारे आत्तापासून धन्य आहेत.
आपल्या कष्टांपासून सुटून त्यांना विसावा मिळेल.''** (प्रकटीकरण-१४:१३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**ख्रिस्तवासी व्हिक्टर फ्रान्सिस कर्व्हालो**

**सहा महिन्यांची मिस्सा: रविवार दि. २० सप्टेंबर २०२६, सकाळी ७.३० वाजता, रमेद माता तिर्थस्थान, रमेदी**

## तीन महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी सायमन लुईस रॉड्रीग्ज**

ख्रिश्चनआळी, बोळींज

जन्म : २८/०९/१९५५ ; मृत्यू : २०/०६/२०२६

तीन महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक २०/०९/२०२६ सकाळी ७.०० वाजता, ख्रिस्तराजा चर्च, बोळींज.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***

(यशया ५५:८)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या पप्पांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## दोन वर्षांची आठवण / ११ वर्षांची आठवण





**ख्रिस्तवासी मॅथ्यू सेबेस्टीयन डिमेलो**

जन्म : १८/०४/१९४३

मृत्यू : २३/०९/२०२४

**ख्रिस्तवासी लुजान मॅथ्यू डिमेलो**

जन्म : १३/१०/१९४७

मृत्यू : २१/१२/२०१५

नंदाखाल, दोनतलाव (पुण्याई)

दोन वर्षांची मिस्सा : बुधवार दिनांक २३/०९/२०२६ सकाळी ६.१५ वाजता, नंदाखाल चर्च.

***''नीतिमानाचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***

(स्तोत्र ११६:१५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**'पुण्याई' कुटुंबीय**

## एक वर्षाची प्रेमळ आठवण



**ख्रिस्तवासी निक्सन पॉल परेरा**

खराळेवाडी, सांडोर

जन्म : २७/०८/१९७२ ; मृत्यू : ०१/०९/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६ सकाळी ७.३० वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या भावाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## ३० वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी ॲसिल्टिना आल्बर्ट आल्मेडा**

लोणी, बसरोडी, गिरीज

जन्म : ३०/०६/१९८० ; मृत्यू : २५/०९/१९९६

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***

(यशया ५५:८)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या ॲसिल्टिनाला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**डॅडी : आल्बर्ट; मम्मी : हेलन; बहिणी : सिस्टर अर्लिना, ॲड्रीना व केनेथ; भाचे : आहन व ब्रॉन**

## ७४व्या जन्मदिवसाची आठवण



# ख्रिस्तवासी रेनॉल्ड फ्रान्सिस मिस्किटा

सोनभाट, सांडोर

जन्म : १२/०९/१९५२; मृत्यू : १७/०५/२०२६

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय राज्यात तुम्हाला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**-: तुझे शोकाकुल :-**

**पत्नी : जॉईस, मुलगी : जेनिफर घोन्साल्विस; मुले : लॉय व थिओफिल मिस्किटा; जावई : स्वप्निल घोन्साल्विस; सुना : मोरिसा लॉय मिस्किटा आणि रश्मी थिओफिल मिस्किटा; नातवंडे : ॲझरा, आयझेल, केडेन्स व नॉक्स**

# वार्षिक पुण्यस्मरण व ७५ व्या जन्मदिवसाची आठवण



## ख्रिस्तवासी रुबिना (रुबी) आल्फ्रेड लोपीस

**पिंपळभाट, पापडी**

**जन्म- २३/०९/१९५१; मृत्यू - १७/०९/२०२५**

**वार्षिक मिस्सा: रविवार, दिनांक २०/०९/२०२६**
**सकाळी ७:१५ वाजता, कृपामाता कॅथेड्रल, पापडी.**

**प्रभू परमेश्वर म्हणतो, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे.**
**जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल."**
**(योहान ११:२५)**

**प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,**
**हीच प्रभूचरणी प्रार्थना!**

**पती: आल्फ्रेड लोपीस**

**मुली व जावई: रुथ स्नेडन रिबेलो, सारा रुफस कर्व्हालो**

**नातवंड: एझेक व एलाया**

# धार्मिकतेतून आध्यात्मिकतेकडे

-प्रा. स्टीफन आय. परेरा
खरभाट, सांडोर

### धर्म

धर्म हा शब्द 'धृ' ह्या धातूपासून आलेला असून त्याचा अर्थ धारण करणे, धरून राहणे किंवा आधार देणे. जो समाजाला एकत्र धरून राहतो व स्थिर ठेवतो तो धर्म. धर्म म्हणजे केवळ पूजाअर्चा नाही; तर जीवन जगण्याची एक पद्धत आहे, ती माणसाला दु:खातून सुखाकडे नेते.

पाश्चात्त्य संस्कृतीत 'रिलिजन' हा शब्द बहुतेकदा ईश्वर आणि उपासना पद्धतीशी जोडलेला असतो; परंतु भारतीय संस्कृतीतील 'धर्म' हा शब्द अधिक व्यापक असून त्यात नीतिमत्ता आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा समावेश होतो. धर्म ह्या शब्दापासूनच 'धार्मिक' शब्द बनलेला असून धार्मिक म्हणजे धर्माचे पालन करणारा, देवावर श्रद्धा असणारा किंवा धार्मिक रूढी, परंपरा, उपासना पद्धती वगैरे पाळणारा. अशा धार्मिक व्यक्तींचा बाह्य कर्मकांडांवर जास्त भर देण्याचा कल दिसून येतो.

### अध्यात्म

'अध्यात्म' म्हणजे स्वत:च्या आत्म्याचे ज्ञान करून घेणे. मी कोण आहे ह्याचा शोध घेणे व आपल्या अंतरंगाला जाणून घेणे. 'अध्यात्म' हा शब्द अधि (विषयी) + आत्मन् (आत्मा) असा बनला आहे. ते शरीर, मन आणि आत्मा ह्यांच्या पलीकडचे सत्य शोधून दैनंदिन जीवनातील दु:खातून मुक्ती मिळवून आंतरिक शांती आणि सर्वोच्च आनंद देणारे शास्त्र आहे. अध्यात्म म्हणजे स्वत:च्या आत्म्याचे ध्यान करणे, स्वत:चे



अस्तित्व, जीवनाचा उद्देश आणि ईश्वरी संबंध समजावून घेणे होय. हा बाह्य गोष्टींपेक्षा अंतर्गत जीवनावर, शांतीवर आणि स्वज्ञानावर लक्ष केंद्रित करणारा वैयक्तिक प्रवास आहे, जो चिरंतन आनंद व सत्याचा शोध घेतो.

ख्रिस्ती धर्मातील अध्यात्म म्हणजे पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली येशू ख्रिस्ताशी वैयक्तिक आणि जिवंत नाते जोडणे होय. ही केवळ धार्मिक नियम पाळण्याची प्रक्रिया नसून बायबलच्या आधारे देवाच्या इच्छेनुसार दैनंदिन जीवन जगणे, देवावरील श्रद्धेपोटी त्याची प्रार्थना करणे तसेच शेजाऱ्यांवर प्रेम करून व गरजवंतांना सेवा देऊन देवाशी एकरूप

**संत पोप दुसरे जॉन पॉल ह्यांनी गरजवंतांच्या सेवेला 'ख्रिस्तोलॉजी' म्हटले आहे.**

होण्याची आयुष्यभराची आध्यात्मिक साधना आहे. परमेश्वर मोशेला म्हणाला, ''इस्राएलच्या सर्व मंडळीस सांग की, तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे'' (लेवीय १९:२).

आपणा सर्वांना परमेश्वराने त्याच्या प्रतिमेप्रमाणे निर्माण केले. आपण सर्वजण देव जो पावित्र्याने परिपूर्ण आहे त्याच्यापासून आलो असल्याने आपली निर्मिती होतानाच आपल्या प्रत्येकावर पावित्र्याचा शिक्का मारण्यात आलेला आहे. प्रभू येशूनेही म्हटले आहे, ''जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्हीही परिपूर्ण व्हा'' (मत्तय ५:४८).

स्नानसंस्काराच्या वेळी आपल्या शरीराला पवित्र तेलाने अभिषिक्त केल्याने तसेच त्यावेळी आपण दिलेल्या कबुली जबाबामुळे आपण देवपित्याची लेकरे बनतो, पवित्र आत्म्याचे मंदिर बनतो. त्यामुळे आपल्याठायी वास करणारा पवित्र आत्मा आपणांस क्षणोक्षणी प्रभू येशूच्या शिकवणुकीनुसार चालण्यास प्रवृत्त करीत असतो. खुद्द प्रभू येशूने म्हटले आहे, ''पिता ज्याला माझ्या नावाने पाठवील, तो कैवारी पवित्र आत्मा तुम्हाला सर्वकाही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगितल्या त्या सर्वांची तो तुम्हाला आठवण करून देईल'' (योहान १४:२६).

पवित्र आत्मा आपणांस प्रभू येशूची 'देवप्रीती आणि शेजारप्रीती' अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत करतो. आपणास धार्मिकतेतून आध्यात्मिकतेकडे जाण्यास मार्गदर्शन करीत असतो, कारण आपणा सर्वांना आध्यात्मिक बनण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे. आपण रोज मिस्साला जातो, ख्रिस्तशरीर स्वीकारतो, निरनिराळ्या प्रार्थना आणि नोव्हेना करतो. हे करताना दुर्दैवाने आपण कर्मकांडात

गुरफटून जातो आध्यात्मिकतेकडे जात नाहीत. शेजारप्रीती सोडाच, वेळप्रसंगी शेजाऱ्यांवर आपल्याकडून अन्यायही घडतो. अशावेळी धार्मिकता आणि आध्यात्मिकता ह्या दोन्ही संकल्पना एकमेकांस पूरक न राहता त्यांच्यामध्ये परस्पर विरोध दिसू लागतो.

गरीब, भुकेले, तान्हेले, निराश्रित, उपेक्षित, बेकार ह्यांची सेवा करणे हीच खरी प्रभुसेवा आहे असे प्रभू येशूने म्हटले आहे (मत्तय २५:३४-४६). ही सेवा म्हणजे खरी आध्यात्मिकता आहे असे पोप फ्रान्सिस ह्यांनी म्हटले आहे. संत पोप दुसरे जॉन पॉल ह्यांनी गरजवंतांच्या सेवेला 'ख्रिस्तोलॉजी' (ख्रिस्त ईशपरिज्ञान शास्त्र) म्हटले आहे, कारण त्यातून ख्रिस्ताच्या रहस्यावर प्रकाशझोत टाकला गेला आहे.

आजच्या काळात युद्ध, नैसर्गिक आपत्ती, राजकीय दडपण आणि दहशतवाद ह्यांमुळे गरीब, भुकेले, तान्हेले, निराश्रित, उपेक्षित व बेकार झालेल्यांसाठी, तसेच गर्भपात व इच्छामरण ह्यांना बळी पडणाऱ्यांसाठी आपण सेवा दिली, त्यांच्याप्रति सहानुभूती व्यक्त केली तर आपण खरीखुरी आध्यात्मिकता जगू शकतो.

मोबाईल : 98 50 87 81 89

•


## अल्फान्सो टूर्स ॲण्ड कॅटरर्स

**१) संत ज्यूड नोव्हेना :** झांशी, ग्वालियर, दिल्ली- आग्रा सहल. (जाता येता राजधानी प्रवास) दिनांक २४ऑक्टो. ते २नोव्हें.२०२६ एकूण खर्च प्रत्येकी रु. २९,०००/-मात्र.

**२) मनमोहक मौज मजेची, बरोडा (स्टॅचू ऑफ युनिटी) सुंदर सुरत सहल :** दिनांक २५सप्टें. ते २७ सप्टें. २०२६. २ रात्र - ३दिवस हॉटेल वास्तव्य. एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,५००/- मात्र.

**३) मजेदार आणि फुल एन्जॉय सहल थायलंड बँकॉक पटाया :** दिनांक ८ नोव्हें. ते १३ नोव्हें.२०२६ (पाच दिवस सहा रात्र ) एकूण खर्च प्रत्येकी रु. ७५,०००/-मात्र. फ्लाईट तिकीट व व्हिजा सर्व काही समाविष्ट.

**४) गो गोवा सहल धमाल व फुल एन्जॉय सहल :** दिनांक २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६. संपूर्ण प्रवास ३ टायर ए.सी. ट्रेनने. एकूण खर्च प्रत्येकी रु. १९,०००/-मात्र.

**-: संपर्क :-**

नेल्सन अल्फान्सो, गास : 9970650770
नीलम कोरिया, आगाशी (पापडी) : 9130541082
हेलन डिमेलो, रमेदी : 7559125435
मॅलेट फर्नांडीस, सांडोर : 9545329770



# त्याने मला स्पर्श केला आणि बरे केले

**दैवी उपचार आणि अढळ विश्वासाचे आत्मकथन**

**रेव्ह. फा. डॉ. जर्वासिओ मार्सेलीन फर्नांडिस**



श्रद्धा, उपचार आणि आशेची प्रभावी साक्ष

रुग्णालयातील वेदनामय दिवसांपासून ते दैवी अनुभूती पर्यंतचा हा प्रेरणादायी सत्य प्रवास आहे. त्याने मला स्पर्श केला आणि बरे केले हे पुस्तक वैयक्तिक अनुभव, पवित्रशास्त्र, कॅथलिक धर्मशास्त्र आणि श्रद्धा व वैद्यक यांचा समन्वययांद्वारे देवाच्या उपचारक कृपेचे जिवंत साक्षीदार बनवते. दुःख, आजार, संकट आणि अनिश्चिततेच्या काळात बळ, धैर्य आणि आशा शोधणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक प्रेरणादायी मार्गदर्शक ठरेल.

तुमच्या यशाचा आम्हाला मनापासून अभिमान आहे! आपले स्नेहांकित, प्रेमपूर्वक हार्दिक शुभेच्छा,
**ब्रुनो बर्नार्ड अल्मेडा व कुटुंब,**
**मान, डहाणू**



☐ दैवी उपचार आणि अढळ विश्वासाचा विलक्षण प्रवास.
☐ ख्रिस्त–दैवी वैद्ययांच्या वरील बायबलाधिष्ठित आणि धर्मशास्त्रीय चिंतन.
☐ श्रद्धा, वैद्यक आणि आध्यात्मिकन व चैतन्य यांचा समन्वय.
☐ आशा, धैर्य आणि देवाच्या अखंड सहवासाचा प्रेरणादायी संदेश.

'जिथे मानवी सामर्थ्य संपते, तिथे दैवी कृपा कार्य करू लागते.' आता उपलब्ध
प्रत्येक हृदयाला प्रेरणा, सामर्थ्य आणि नवजीवन देणारे पुस्तक
रेव्ह. फा. डॉ. जर्वासिओ मार्सेलीन फर्नांडिस

**KOSU-RUBY PUBLICATION**

तळेगाव, गोवा–४०३००२
एच. क्र. ३७५, मुलगाव-सुतारभाट, वसई, महाराष्ट्र–४०१२०१

**पुस्तके खालील ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत :**
ऑर्डर साठी संपर्क : ७७७४९०१३४४
जीवन दर्शन केंद्र, गिरीज, वसई
अलका कलेक्शन, माणिकपूर, वसई
ब्रॉडवे बुक सेंटर, पणजी, गोवा
होली क्रिएशन, होली क्रॉस श्राइन, बांबोळी, गोवा



श्रद्धा

# पवित्र मरियेचा जन्मदिवस

**-फादर व्हॅलेंटाईन पावकर**
मर्सेस धर्मग्राम

परमेश्वराचे मानवावर अतोनात प्रेम होते म्हणून मानवाला अंधारातून प्रकाशमय करण्यासाठी त्याने पवित्र मरियेला निवडले. दयाघन पित्याची इच्छा होती की, परमपुत्राचा अवतार ह्या जगी येण्याअगोदर नियोजित आईचा होकार असणे जरुरीचे आहे. म्हणजेच स्त्रीमुळे (एवा) जगात मरण आले तसे स्त्रीमुळे (मरिया) जगात जीवन आले. आपण मूळ पाप घेऊन जन्मलो. पवित्र मरिया ही सुरुवातीपासून तारलेली होती.

मरियेने विचाराची शुद्धता राखली. ती अशुद्धतेपासून दूर राहिली. येशूचा जन्म पवित्र आत्म्याच्या योगाने कुमारी पवित्र मरियेच्या उदरी पुरुष संबंधाविना झाला होता. देवाचा पुत्र हा आपल्यासारखा मनुष्य जन्मला. हे दैवी कार्य मानवी सामर्थ्याच्या व आकलन शक्तीच्या पलीकडे आहे. तिच्याद्वारे जन्म घेणारा हा पवित्र आत्म्यापासून होता असे दूताने मरियेच्या वाग्दत्त असलेल्या योसेफला स्वप्नात सांगितले.

अंत्युखियाचे संत इग्नेशियस ह्या बाबतीत साक्ष देतात की, पवित्र मरियेचे कौमार्य, बाळाचा जन्म व प्रभूचे मरण ह्याकडे ह्या जगाच्या राजपुत्राचे लक्ष वेधले गेले नाही. ही तीन रहस्ये घोषित करण्याची फार आवश्यकता आहे. ती देवाच्या अबोलततेत पूर्ण झाली आहेत.

कौमार्य ही ईश्वरी देणगी आहे. ईश्वरावर नितांत प्रीती, ईश्वराशी एकनिष्ठ, ईश्वराप्रति पूर्ण शरणागती म्हणजे कौमार्य. आपले कौमार्य टिकविण्यात स्वर्गीय आनंद आहे. देवाच्या देणगीचा मान आहे. स्वर्गीय जीवनाचा अनुभव आहे. मरियेने पाप केले नाही. पापांवर तिने विजय



मिळविला. पापी वातावरणात व पापी व्यक्तींच्या जगात जगत असतानादेखील ती मोहाला बळी पडली नाही. तिने सैतानावर विजय मिळविला. सैतानावरील दिग्विजयाचा फायदा सर्वप्रथम मरियेला झाला. ती मूळ पापापासून विरक्त होती. ईश्वरी कृपेच्या सामर्थ्याने जगत असताना

**'तुझ्या शब्दाप्रमाणे होवो' ह्या तिच्या शब्दांत आज्ञाधारकपणा होता.**

तिने कोणतेही पाप केले नाही. 'तुझ्या शब्दाप्रमाणे होवो' ह्या तिच्या शब्दांत आज्ञाधारकपणा होता. तिने देवाच्या इच्छेला प्राधान्य दिले. स्वत:ची इच्छा बाजूला ठेवली. त्यामुळे मरिया देव पुत्राची माता बनली.

पवित्र मरिया जन्माच्या पहिल्या क्षणापासून कृपापूर्ण आहे. तिचा पुत्र ख्रिस्त ह्याच्या तारणाचे ती प्रथम फळ आहे. परमपित्याने ह्या पृथ्वीवरील सर्व लोकांपेक्षा पवित्र मरियेला ख्रिस्तामध्ये आध्यात्मिक कृपेची अधिक वरदाने देऊन धन्य केले. मरिया नित्य साहाय्य करणारी माता आहे. ती एलिझाबेथ- सारख्या गरजवंताच्या मदतीला धावते हे स्पष्ट होते (लूक १:४६-५५).

पवित्र मरियेने देवाची इच्छा शेवटपर्यंत पूर्ण करून मानवी जगाला एक फार मोठा नैतिक व आध्यात्मिक आदर्श उभा केला आहे. पवित्र मरिया आपल्या श्रद्धेने व त्यागाने तारणकार्यात येशूची सहकारी बनली. म्हणून ती आपली मध्यस्थिनी झाली. तिच्या मध्यस्थिनीचा एक सुंदर नमुना आपल्याला काना येथे लग्नप्रसंगात मिळतो.

ख्रिस्ताच्या व पवित्र आत्म्याच्या रहस्यात पवित्र मरियेची भूमिका आपण अनुभवतो. तिने ख्रिस्ताला जन्माला घातले व पर्यायाने ख्रिस्तसभेत श्रद्धावंतांना, ख्रिस्ताचे सभासद आहेत त्यांना, जन्म देण्यात देवाला सहकार्य केले. अशा प्रकारे पवित्र मरिया ही देवाची आई तसेच ख्रिस्तसभेची आई आहे.

ख्रिस्तसभा पवित्र मरियेच्या नावाने सोहळे व सण साजरे करते. 'धन्य-धन्य पवित्र मरिया' परमेश्वराचे मोठे दान तुला प्राप्त झाले. तू येशूची आई झालीस. ''तुझ्यासारखी आई असता पडेल आम्हां कसली वाण!''

मोबाईल : 98 90 22 78 40

# मरिया मातेची तीर्थक्षेत्रे

-अनिल एल. गोन्सालवीस
रमेदी





ख्रिस्ताची माता मरिया हिच्या जन्मदिन सोहळ्यानिमित्त दरवर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात भाविकांच्या तीर्थक्षेत्री वाऱ्या सुरू होतात. मुंबईत माउंट मेरी बॅसिलिका प्रमाणेच दक्षिण भारतात दोन तीर्थस्थानी मरियेची भक्ती व जन्मदिन सोहळा अति उत्साहात साजरा केला जातो.

**अवर लेडी ऑफ गुड हेल्थ वेलंकनी बॅसिलिका, नागापट्टीनम**

नागापट्टीनम हे नगर 'नागूर'वरून आले आहे, जो पूर्वी नाग देवांचा प्रदेश म्हणून ओळखला जात होता. हे क्षेत्र समुद्रकिनाऱ्याच्या महत्त्वपूर्ण भागाजवळ आहे. चेन्नई (३०१.९कि.मी.) सारख्या ठिकाणांहून २४ तास बसेस उपलब्ध आहेत. सलग प्रवासासाठी कॅब किंवा सामायिक टॅक्सी वापरण्याचा पर्यायदेखील आहे. तामिळनाडूच्या नागापट्टीनम जिल्ह्यात वसलेले 'वेलंकनी' हे जगप्रसिद्ध तीर्थस्थान बनले आहे. येथे 'अवर लेडी ऑफ गुड हेल्थ' (आरोग्यदायीनी माता) म्हणजेच 'पवित्र मरिया' 'वेलंकन्नी' गावावरून आपण वेलंकनी माता संबोधतो. आज या स्थानाला 'पूर्वेकडील लुर्ड्स' (Lourdes of the East) म्हणून ओळखले जाते. तिची प्रार्थना करण्यासाठी संपूर्ण जगभरातून सर्व धर्मांचे लोक एकत्र येतात.

**पुंडी माता चर्च (अवर लेडी ऑफ इमॅक्युलेट कन्सेप्शन)**

पुंडी माता चर्च  हे तंजावूरपासून सुमारे ३३ कि.मी. अंतरावर, तिरुवैयारू तालुक्यात तिरुकट्टुपल्लीजवळ वसलेले एक छोटेसे गाव आहे. पुंडी गाव बॅसिलिकाच्या बाजूला असलेल्या अलामेलुपुरम गावाशी संबंधित आहे आणि म्हणून अधिकृतपणे ते पुंडी-अलामेलुपुरम ह्या नावाने ओळखले जाते. पुंडी हे कावेरी आणि कोलरून अलमेलुपुरम नद्यांच्या मध्ये वसलेल्या एका छोट्याशा पुंडी गावात आहे. पुंडी हे नाव 'पुंडू' ह्या झुडपावरून तमिळ भाषेत नाव पडले आहे. पूर्वी येथे मुबलक प्रमाणात झाडे उगवत होती. पुंडी माता तीर्थस्थान हे रोमन कॅथलिकांसाठी एक महत्त्वाचे तीर्थस्थान असून ते तामिळनाडू-मध्येच असलेल्या वेलंकन्नी प्रमाणे प्रसिद्ध आहे. अढळ विश्वासाने भारतभरातून हजारो श्रद्धाळू भक्त ह्या चर्चमध्ये जातात. ह्या चर्चचे उंच मनोरे आकाशाला भिडत असल्यामुळे ते चर्च दुरूनही सहज नजरेस पडते.

जेव्हा फ्रेंच मिशनरी फादर्स (एम. ई. पी. फादर्स) कुंभकोणम धर्मप्रांतातील पास्टरल मिशनची जबाबदारी सांभाळत होते, तेव्हा रेव्ह. फा. कॉन्स्टन्टाईन जोसेफ बेस्की (एस.जे.) जे वीरममुनिवर ह्या नावाने लोकप्रिय होते, एक इटालियन जेज्वीट धर्मप्रचारक आणि तमिळ विद्वान धर्मगुरू, ह्यांनी १७१४ ते १७१८ दरम्यान 'चर्च ऑफ मेरी क्वीन ऑफ इम्याक्युलेट कन्सेप्शन' नावाने सदर चर्च बांधले. सन १८५८ मध्ये फ्रान्समधील लुर्ड्सच्या पवित्र मातेच्या इमाजी जगाच्या विविध भागांमध्ये पाठवण्यात आल्या. भारतात आलेल्या तीन इमाजींपैकी एक इमाज फा. डॅरेस ह्यांनी पुंडी चर्चमध्ये आणली. फा. मेटे लुई ज्युएल्स ह्यांनी १९०० साली पुंडी येथे धर्मशिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी एक धर्मशिक्षण शाळा सुरू केली. चर्चच्या घुमटामध्ये पुंडी गावाच्या मनोकामना पूर्ण करणारी मारिया मातेची इमाज आहे. परमपूज्य सायमन कार्डिनल लुर्ड्स्वामी ह्यांनी पुंडी येथील अवर लेडीच्या तीर्थस्थानाला 'अवर लेडी ऑफ इम्याक्युलेट कन्सेप्शनचे तीर्थक्षेत्र' म्हणून घोषित केले. ३ ऑगस्ट, १९९९ रोजी, संत पोप द्वितीय जॉन पॉल  ह्यांनी ह्या तीर्थस्थानाला 'मायनर बॅसिलिका' म्हणून घोषित केले.

तीर्थस्थानाच्या सध्याच्या रचनेत गॉथिक आणि फ्रेंच वास्तुशैलींचे मिश्रण आहे. प्रवेशमंडपाच्या दर्शनी भागावर बारा प्रेषित, संत फ्रान्सिस झेवियर आणि फादर कॉन्स्टन्टाईन जोसेफ बेस्की ह्यांच्या पुतळ्यांची रांग आहे. समोर प्रवेश-मंडपाच्या वर, फा. कॉन्स्टन्टाईन जोसेफ बेस्की ह्यांचा एक भव्य पुतळा आहे.

येरुशलेम येथील गुलगुथा टेकडी-वरील 'मूळ क्रॉस'चा एक छोटा तुकडा (अवशेष) पुंडी माता बॅसिलिका मध्ये ठेवलेला आहे. पवित्र क्रुसाच्या सणाच्या दिवशी विशेष आशीर्वाद दिला जातो आणि उपवास काळाच्या पाचव्या शुक्रवारी, मायकल पट्टी गावापासून पुंडी माता बॅसिलिका पर्यंत अवशेषांची मिरवणूक काढली जाते, त्यानंतर पवित्र मिस्सा होते. ह्या चर्चमध्ये त्याचा इतिहास आणि संग्रह प्रदर्शित करणारे एक छोटे संग्रहालय आहे.

मोबाईल : 90 49 91 93 14

•

संत परिचय

# शांत शाश्वत मार्गदर्शक : पाद्रे पिओ

**-फा. नितीन डिसोजा**
उमराळे चर्च

पाद्रे पिओ (संत पिओ) म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर काय येते? हातांवरील स्टिग्माटा, चमत्कार, आजार बरे झाल्याच्या कथा, मनातील गोष्टी ओळखण्याची त्यांची विलक्षण क्षमता. कदाचित म्हणूनच पाद्रे पिओ आपल्याला कधी कधी आपल्यापासून खूप दूरचे वाटतात - एक गूढ संत, ज्यांच्या जीवनात अशा घटना घडल्या ज्या आपल्या सामान्य आयुष्यात घडत नाहीत. त्यांच्या हातांवरील जखमांपेक्षा त्यांच्या हातांत सतत असलेली जपमाळ अधिक महत्त्वाची होती. त्यांच्या नावाशी जोडल्या गेलेल्या चमत्कारांपेक्षा तासन्तास पापनिवेदन (कुमसार) ऐकणारा धर्मगुरू अधिक महत्त्वाचा होता आणि लोकांना त्यांच्यात जाणवणाऱ्या विलक्षण शक्तींपेक्षा, स्वतःच्या वेदना घेऊन रोज पुन्हा वेदीसमोर उभा राहणारा एक साधा कॅप्युचिअन फ्रान्सिस्कन!

पाद्रे पिओ आणि असिसीकर संत फ्रान्सिस ह्या दोघांच्याही शरीरावर ख्रिस्ताच्या जखमांची चिन्हे आली; पण दोघांनीही त्या जखमांना स्वतःची ओळख होऊ दिली नाही. संत फ्रान्सिसने आपल्याला शिकवले की ख्रिस्ताला अनुसरणे म्हणजे केवळ त्याच्याविषयी बोलणे नव्हे; तर हळूहळू त्याच्यासारखे होणे. अनेक शतकांनंतर पाद्रे पिओने तीच शिकवण पुन्हा जगून दाखवली. संत फ्रान्सिसचे समर्पण पिओच्या जीवनात पुन्हा दिसले आणि म्हणूनच पाद्रे पिओची सर्वांत प्रसिद्ध शिकवण आजही इतकी साधी वाटते - '**प्रार्थना करा, आशा ठेवा** आणि **चिंता करू नका.**' ते दुःख अनुभवलेल्या माणसाचे शब्द होते. चिंता करू नका म्हणजे आयुष्यात समस्या



येणार नाहीत, असे पाद्रे पिओ सांगत नव्हते. ते जणू म्हणत होते - तुमची चिंता देवापेक्षा मोठी होऊ देऊ नका. आपण प्रत्येक गोष्ट नियंत्रित करू शकत नाही; पण ज्याच्याकडे ती सोपवतो, त्याच्यावर विश्वास ठेवू शकतो. त्यांच्या शिकवणीत आणखी एक गोष्ट वारंवार जाणवते - प्रार्थना म्हणजे परिस्थिती बदलण्याचे साधन नव्हे; ती प्रथम आपल्याला बदलते. म्हणून त्यांच्या हातात जपमाळ इतकी महत्त्वाची होती. त्यांनी प्रार्थनेला 'देवाच्या हृदयाची किल्ली' म्हटले. आज आपण उत्तर मिळाले नाही की प्रार्थना निष्फळ झाली असे मानतो. पाद्रे पिओ मात्र आपल्याला थांबायला शिकवतात - उत्तर येईपर्यंत नव्हे, तर आपले हृदय देवाच्या उत्तरासाठी तयार होईपर्यंत.

> **संत फ्रान्सिसचे समर्पण पाद्रे पिओच्या जीवनात पुन्हा दिसले.**

पापनिवेदनाबद्दलची त्यांची निष्ठाही ह्याच कारणाने महत्त्वाची आहे. लोक त्यांच्या जवळ आपले सर्वोत्तम रूप घेऊन येत नव्हते. ते आपली चूक, अपराध, लज्जा आणि तुटलेपण घेऊन येत आणि पाद्रे पिओ त्यांना पुन्हा देवाकडे पाठवत. त्यांच्या दृष्टीने संत होणे म्हणजे कधीही न पडणे नव्हते; प्रत्येक वेळी देवाकडे परतण्याचे धैर्य ठेवणे होते.

लोक पाद्रे पिओकडे चमत्कार घेऊन गेले नाहीत; ते आपली दुःखे घेऊन गेले आणि अनेक जण आशा घेऊन परतले.

पाद्रे पिओ ह्यांचा हा स्पर्श केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या अगदी जवळ राहून, त्यांच्यासोबत कार्य केलेल्या व्यक्तींमधून त्यांचे कार्य आजही पुढे चालले आहे. फादर गुलियारमो हे त्यांपैकीच एक. पाद्रे पिओ ह्यांच्या निकट सहवासात राहून त्यांच्यासोबत कार्य करण्याची आणि त्यांची सेवा करण्याची अनमोल संधी त्यांना लाभली. आजही वयाच्या ९७ व्या वर्षी आपल्या प्रेषितीय कार्याच्या माध्यमातून ते पाद्रे पिओ ह्यांचा हा वारसा पुढे नेत आहेत.

२३ सप्टेंबर १९६८ रोजी त्यांच्या आयुष्याचा शेवट जवळ आला, तेव्हा कोणतेही मोठे भाषण नव्हते. आयुष्यभर ज्या दोन नावांमध्ये त्यांनी आश्रय शोधला, तीच नावे त्यांच्या ओठांवर होती - 'येशू... मरिया...'

पाद्रे पिओ यांच्याशी असलेली ही जवळीक माझ्यासाठी केवळ त्यांच्या जीवनाविषयी वाचण्यापुरती राहिली नाही. ऑक्टोबर २०२३ मध्ये पियात्रेलचीना येथे, ज्या खोलीत पाद्रे पिओ स्वत: राहिले होते, त्याच खोलीत माझे वडील बंधू फादर आल्बर्ट डिसोजा ह्यांच्या समवेत मिस्सा अर्पण करण्याची एक अनपेक्षित

आणि धन्य संधी मलाही लाभली. ज्या जागेत त्यांनी आपले जीवन, प्रार्थना, त्याग आणि देवाला संपुर्ण समर्पणात व्यतीत केले, त्याच जागी वेदीसमोर उभे राहण्याचा तो क्षण माझ्यासाठी त्यांच्या आध्यात्मिक वारशाचा एक जिवंत स्पर्श होता.

कदाचित पाद्रे पिओला समजून घेण्यासाठी त्यांच्या चमत्कारांचे रहस्य उलगडण्याची गरजच नाही. त्यांच्या शिकवणीतील तीन साध्या गोष्टी पुरेशा आहेत - प्रार्थना थांबवू नका. आशा सोडू नका आणि पडल्यावर देवापासून दूर पळू नका. कारण शेवटी पाद्रे पिओ आपल्याला जखमांकडे पाहायला शिकवत नाहीत. ते जखमांमधूनही देवाकडे पाहायला शिकवतात.

पाद्रे पिओ यांच्याविषयी वाचताना एका क्षणी इतिहास, चमत्कार आणि शब्द सारेच मागे पडतात. उरते ती केवळ एक विलक्षण जवळीक - जणू काळाच्या पलीकडूनही त्यांची शांत उपस्थिती आपल्याला सांगत असते, 'घाबरू नकोस... प्रार्थना कर.' जिथे चिंता संपते आणि खरा विश्वास सुरू होतो, तिथेच पाद्रे पिओ ह्यांचा अदृश्य हात आपल्या पाठीवर असतो.

मोबाईल : 94 83 24 19 82


# जॉली टूर्स

**१) केरळ दर्शन : त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, अलॅप्पी (हाऊसबोट), थेक्कडी व मुन्नार सहल :**
दिनांक ५ नोव्हें. ते १४ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. ३९,०००/-मात्र.

**२) हैद्राबाद-रामोजी सिटी-स्नोवर्ल्ड-गोवळकोंडा सहल**
दिनांक ७ नोव्हें. ते १२ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. १७,५००/- मात्र.

**३) स्टॅच्यू ऑफ युनिटी - बडोदा-सुरत सहल :**
दिनांक १२ नोव्हें. ते १४ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. ११,०००/- मात्र.

**-: संपर्क :-**

१) श्री. डॉमणिक : 8087036615
२) श्री. लुईस : 9823844883
३) श्री. पिटर : 8806212751

# डिसिल्वा टूर्स अँड कॅटरर्स

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.

**९८६०५६८५५३, ९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) सेंट ज्युड झांशी नोव्हेना : अ)** दिनांक २४ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६. ३ स्टार ए.सी. हॉटेल. जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. जेवणासहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,०००/-. **ब)** दिनांक २४ ऑक्टो. ते २९ ऑक्टो. २६. झांशी, ग्वालियर, साईडसीन व सर्व एट्रीफीसहीत, ३ स्टार ए.सी हॉटेल, जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. एकूण खर्च प्रत्येकी रु. १९,५००/-.

**२) रॉयल राजस्थान सहल : जयपूर, बिकानेर, जैसेलमेर, जोधपूर, उदयपूर, चित्तोडगड सहल :** दिनांक ४ नोव्हे. ते १४ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४२,०००/-. (दोन व्यक्तीस एक रूम प्रमाणे) व रु. ४०,०००/-. (फॅमिलीसाठी).

**३) हैद्राबाद रामोजी फिल्मसिटी सहल :** दि. ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२६. वास्तव्य एसी डिलक्स हॉटेल, एसी बस, जाता-येताना ३ टायर एसी तिकीट. रामोजी फिल्मसिटी, लेझर शो, स्नोवर्ल्ड, सालारजंग म्युझियम, गोवळकोंडा, झू व इतर बरेच काही. संपूर्ण साईटसीन व गेटटुगेदर पार्टीसहित. एकूण रु. १८,०००/-, मुलांसाठी रु. १५,५००/- (वय ४ ते ११).

**४) केरळ दर्शन :** दिनांक ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२६. एर्नाकुलम, कोची, मुन्नार, टेकडी, कोट्टयम, त्रिवेंद्रम, अलेप्पी, कन्याकुमारी. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४२,०००/-. (दोन व्यक्तीस एक रूम प्रमाणे) व रु. ४०,०००/-. (फॅमिलीसाठी).

**५) कोकण-गोवा दर्शन सहल : अ)गोवा-कोकण सहल :** दि. २६ डिसें ते ३१ डिसें. २६. संपूर्ण ए.सी पॅकेज. दोन रात्र कोकण मालवण, दोन रात्र गोव्यात. वसई ते सावंतवाडी ए सी ट्रेन व येताना मडगाव ते वसई राजधानी. क्रूझ सफर, एक तासाची समुद्र सफर विथ डॉल्फिन दर्शन. मसाला गार्डनमध्ये गोवानीस जेवणाचा आस्वाद. कोकण-तारकर्ली बीच, सिंधूदुर्ग किल्ला. व लाकडाच्या खेळणीचा बाजार व इतर भरपूर काही. गेट टुगेदर पार्टी. खर्च प्रत्येकी रु. १८,५००/-. (५ ते ११ मुलांस रु. १५,५००/- मात्र.)

* **सर्व सहलींमध्ये रु. ५,०००/- ॲडव्हान्स भरून नांवनोंदणी करणे. सर्व सहलीमध्ये बुकींग चालू आहे.**

**: संपर्क :**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 8552009748,9049110595 २) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269
३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664 ४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117
५) अॅन्ड्र्यू रूमाव, नंदाखाल : 9788592847, 9284106936 ६) कॅरोल बडी, उत्तन : 9221311122

# संत कॉसमस आणि संत डेमियन - जुळे भाऊ

**-ॲन्थनी मनवेल डाबरे**
गिरीज



दर वर्षी २६सप्टेंबर रोजी ख्रिस्ती कॅथलिक समाजात संत कॉसमस व डेमियन ह्यांचा सण साजरा केला जातो. इ. स. २८७ ते ३०५ साली अरबी कुटुंबात जन्मलेली हीच ती जुळी भावंडे! ते दोघेही व्यवसायाने वैद्य होते. त्यांनी आपली वैद्यकीय सेवा तुर्कस्थान व सिरिया येथे केली. ते वैद्यकीय तपासणी विनामूल्य करत. आपली वैद्यकीय सेवा करत असताना ते रुग्णांना येशू ख्रिस्ताचे प्रेम, सेवा, त्याने केलेले चमत्कार व त्याची शिकवण आदी माहिती देत असत.

त्या काळात मूर्तिपूजा होत असे. मिशनरी म्हणून येशूची शिकवण, परिसरातील लोकांपर्यंत ते पोहोचवत होते. त्यांच्या ह्या कामामुळे रोमन सम्राट डायोक्लेशियन ह्यांच्या राजवटीत त्यांचा छळ सुरू झाला. त्यांना अमानुष मारहाण करण्यात आली, अत्याचार करण्यात आले, त्यांनी ते सर्व सहन केले. प्रत्येक वेळी येशूवर असीम प्रेम व श्रद्धा असल्याने रोमन जुलमी राजवटीला ते सामोरे गेले.

दोघांनाही अटक झाली. त्यांना मरणदंडाची शिक्षा दिली व त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. त्यामुळे ते दोघेही ख्रिश्चन धर्मासाठी प्राण देणारे 'Martyrs - बलिदान दिलेले हुतात्मे' म्हणून ओळखले जातात .

सहाव्या शतकात त्यांना 'संत' म्हणून घोषित करण्यात आले व आल्ताराचा मान देण्यात आला. संत कॉसमस आणि डेमियन ह्यांच्या स्मरणार्थ जेरूसालेम, इजिप्त, मेसोपोटेमिया आदी शहरांत अनेक चर्चेस बांधण्यात आली आहेत. त्यांना वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, सर्जन, केमिस्ट, डेन्टिस्ट तसेच 'जुळी मुले' ह्यांचे रक्षक संत (Patron) म्हणून ओळखले जाते.

संत कॉसमस आणि डेमियन ह्यांच्याद्वारे आरोग्यासाठी व आजारातून बरे होण्यासाठी केली जाणारी प्रार्थना :

**''हे संत कॉसमस व डेमियन, आम्ही तुमच्या सोबत मध्यस्थीची याचना करतो की आमच्यासाठी प्रार्थना करा, आम्हाला आमच्या आजारापासून मुक्त करा. अनपेक्षित येणाऱ्या कठीण परिस्थितीत देवावर श्रद्धा ठेवण्याचा संयम व शक्ती आम्हाला द्या. देवावरील भक्ती अखंडित ठेवून, आमच्यात सदैव सेवाभाव निर्माण करा. येशूची 'सुवार्ता' सर्वत्र घोषित करण्याची सुबुध्दी व प्रेरणा आमच्यात सदैव जागृत ठेवा. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांच्या नावे, आमेन.**

मोबाईल : 98 22 89 31 78

## ॲरॉन टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**
**मो. : 9850533214, 9284503961**

**१) बडोदा (Statue of Unity) व सुरत सहल :** दि. १२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २६. व दि. २६ सप्टें. ते २८ सप्टें. २०२६. (२ रात्री , ३ दिवस). हॉटेल ३ स्टार, सयाजी एफोटेल. पॅलेस गार्डन, निराधार माता व रोझरी चर्च, सरदार वल्लभ भाई पटेल **(Viewing Callery)** नर्मदा धरण, जंगल सफारी, सुरत मार्केट खरेदी. खर्च प्रत्येकी रु. ११,०००/-. (४ जणांस एक रूम), रु. १२,५००/- (तीन जणांस एक रूम), रु. १३,५००/- (दोन जणांस एक रूम).

**२) सेंट ज्युड-झांशी :** दि. २४ ते २९ ऑक्टोबर २०२६.

**३) कोकण-गोवा सहल:** दि. १६ नोव्हें. ते २२ नोव्हें. २६.

**४) केरळ सहल :** दि. ५ ते १५ नोव्हेंबर २०२६. अर्नाकुलम १ रात्र, मुन्नार २ रात्र, टेकडी १ रात्र, अलप्पी १ रात्र, त्रिवेंद्रम २ रात्री, कन्याकुमारी १ रात्र. प्रवास ३ ए.सी., बस २X२ AC पुश बॅक. एकूण खर्च रु. ४०,५००/- मात्र.

**५) दुबई-अबुधाबी :** दि. ५ जाने. २०२७ - ५ दिवस.

**६) राजस्थान :** दि. २८ जानेवारी २०२७.

## ट्रिनिटी टूर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स्

**१) निराश व असाध्य लोकांचा आश्रयदाता संत ज्युड (झांशी) नोव्हेना व साईट सीन :** दिनांक २४ ते २९ऑक्टो. २०२६. डिलक्स हॉटेल, ए.सी.रूम, प्रवास, निवास, भोजन, एकूण खर्च रु. २१,०००/- मात्र. राजधानी एक्सप्रेस, ३टायर ए.सी., पंजाब मेल ३ टायर ए.सी. एकूण खर्च रु. १९,०००/- मात्र.

**२) राजस्थान सहल :** दिनांक ५ ते १६ नोव्हें.२०२६. संपूर्ण ए.सी.प्रवास. जोधपूर, जैसलमेर, बिकानेर, जयपूर, चितोडगढ, उदयपूर, माऊंट अबू, एक दिवस ट्रेंटमध्ये वास्तव्य. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-मात्र.

**३) दिल्ली-आग्रा-भरतपूर, जयपूर सहल :** दिनांक ५ ते १३ नोव्हें. २०२६. लोटस टेम्पल, जंतरमंतर, इंडियागेट, अक्षरधाम, राजघाट, ताजमहाल, आग्रा किल्ला, अभयारण्य, जयपूर पिंक सिटी, हवामेहल व शॉपिंग. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३४,०००/-. संपूर्ण ए.सी.प्रवास.

**४) केरळ-कन्याकुमारी सहल :** दिनांक ६ ते १६ नोव्हें.२०२६. त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, कोट्टायम, टेकडी, मुन्नार, कोचिन. संपूर्ण ए.सी.प्रवास. एकूण खर्च प्रत्येकी रु.४४,०००/-.

**संपर्क :** मोजेस : 9850429351 राजेश : 9881489610
एलायस : 9767250373 पॅट्रीक : 9226181212
मतेस : 9561707125



## निसर्ग टूर्स आयोजित सहल

**आयोजक : ऑस्टीन : 9270080947 / 9422681516**
**विनय : 9225432233 / 9322046212**

**१) केरळ :** दिनांक ७ ते १७ नोव्हें. २०२६. कोचीन, मुन्नार, टेकडी (पेरियार), सेंट आल्फान्सो चर्च, अलॅप्पी, हाऊसबोट, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी सहल. रेल्वे प्रवास जाताना ३ए.सी. ने ट्रेन व येताना राजधानी एक्सप्रेस ३ टायर ए.सी. (वसई ते वसई) व सर्व साईड सीन २x२ पुश बॅक ए. सी. बसने असेल. सर्व एन्ट्री फी प्रवास, नाश्ता, जेवण, वास्तव्य व गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ४१,०००/- मात्र. (ट्रेन खर्च समाविष्ट).

**२) दिल्ली, आग्रा, फतेहपूर शिक्री, जयपूर :** दिनांक ८ नोव्हे. ते १४ नोव्हें. २०२६. रेल्वे प्रवास ३ टायर ए.सी व साईट सीन २x२ पुश बॅक ए.सी. बस ने असेल. सर्व एन्ट्री फी, प्रवास, नाश्ता, जेवण, वास्तव्य व गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च रु. २१,०००/-. (ट्रेन खर्च समाविष्ट).

**३) हैद्राबाद-रामोजी फिल्मसीटी :** दिनांक ९ नोव्हें. ते १४ नोव्हें. २०२६. प्रवास ३ ए.सी ने असेल. वास्तव्य डिलक्स हॉटेल, ए.सी. बस व ए.सी रूम. सर्व साईटसीन, एन्ट्री फीस, गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च रु. १८,५००/-(ट्रेन खर्च समाविष्ट).

**४) बरोडा : स्टॅच्यू ऑफ युनिटी, सुरत सहल :** दिनांक १४ ते १६ सप्टें. २०२६. ए.सी.रेल्वे प्रवास, वंदे भारत ए.सी.बस, थ्री स्टार हॉटेल, हॉटेल सयाजी इफ्फोटेल, बुफे जेवण, सुरत मार्केट व साईड सीनसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,५००/-मात्र. (दोन जणांस एक रूम). रु. १२,५००/- (प्रत्येकी तीन जणांस एक रूम). रु. ११,५००/- (प्रत्येकी चार जणांस एक रूम)

* **हनीमून पॅकेज, टुर्स पॅकेज, बस बुकिंग, फ्लाईट बुकिंग, रेल्वे बुकिंग आणि हॉटेल बुकिंग करून देतो.**



## SAMYAK
### COMPUTER CLASSES

**150+ BRANCHES WORLDWIDE**

**NOW AT DEVTALAV**

India's Leading IT Training Institute

| 1000k | 700K | 150+ | 100% | 250+ |
|---|---|---|---|---|
| Students Trained | Students Placed | Branches Worldwide | Placement Assistance | Certified Courses |

TALLY + GST | EXCEL
ACCOUNTING | WEB
PYTHON | ML | AI
DIGITAL MARKETING
GRAPHIC DESIGNING
DATA ANALYTICS
DATA SCIENCE | JAVA
SPOKEN ENGLISH
PROGRAMMING
MS OFFICE | DTP
VIDEO EDITING | VFX
AUTOCAD | UI UX

**100% JOB ASSISTANCE**

Contact Name :- Loison Nazareth

A/1, Atmosphere Bunglow, Opp TMT Art galary, Bangli road, Near Acton Bus Stop, Devtalav, Vasai (west)

9028626430/9975298949

## दोन वर्षांची आठवण



**खिस्तवासी मॉनिका (मीना) पास्कोल लोपीस**

कातरवाडी, शिर्लय

जन्म : ०४/०१/१९५८; मृत्यू : ०९/०९/२०२४

***प्रभू म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***

(यशया ५५:८)

*हे प्रभू, आमच्या मम्मीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*



**कुटुंबीय**



## पंचवीस वर्षांची आठवण





**खिस्तवासी फ्रान्सिस सेबेस्टीयन डिकुन्हा**

नानभाट, घोटेभाट

जन्म : २४/०७/१९४९; मृत्यू : ०३/०९/२००१

***''हे परमेश्वरा, तुझ्या घरातील समृद्धीने त्यांची तृप्ती होईल. कारण जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे.''***

(स्तोत्र ३६:८-९)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात त्यांना चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : मेरी; मुलगा : आयवन; मुली : अस्मिता, अलोदीना; जावई : डॉलेरियन रुमाव, ज्युलेस घोन्सालवीस; सून : सिल्विया; नातवंडे :फियान,सिरॉना,रिदम,लिरीक, क्राईस्ट**

## प्रेमळ स्मरणार्थ



**खिस्तवासी ग्लोरिया सिल्वेस्टर फर्नांडिस**

दिवानवाडी, पापडी

जन्म : १८/०९/१९५९; मृत्यू : १६/०७/२०२६

***''जे सुयुद्ध ते मी केले आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे; आता जे राहिले ते हेच की, माझ्यासाठी नीतिमत्त्वाचा मुकुट ठेविला आहे; प्रभू जो नीतिमान न्यायाधीश आहे तो त्या दिवशी मला तो मुकुट देईल.''***

(२ तीमथी ४:७-८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्माला चिरंतन शांती लाभो!*

**कुटुंबीय**

## १४ वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी व्हिक्टर सेंजॉन डिकोस्टा

चुळणे

जन्म : २८/१०/१९४७; मृत्यू : ०७/०९/२०१२

***प्रभू येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''***

(लूक २३:४३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : सांतान ; मुली : नूतन विनय मकासरे व सिल्वीया डिक्सन कोलासो; मुलगा : संजय; सून : हर्षा; नातवंडे : लिओन, स्कायलर, निओमी व व्हिक्टोरियो**

## एक वर्षाची आठवण



### ख्रिस्तवासी रेमंड जॉन डिसोजा

मडी, सांडोर

जन्म : २०/१०/१९४७; मृत्यू : ०८/०९/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक १३/०९/२०२६

सकाळी ७.३० वाजता, सांडोर चर्च.

***प्रभू येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''***

(लूक २३:४३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*

**पत्नी : ग्लॅडस; मुलगी : स्लाविया; मुलगा : क्लोफियस; जावई : लिनस वेल्सो; सून : ग्रिशल्डा; नातवंडे : लिओरा, लिंकन, क्लेर, क्लॅरिस**

## २६ वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी सांतान पिटर फर्नांडीस

जन्म : ०६/१२/१९३०

मृत्यू : ०६/१२/२०००

## ५ वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी प्रेसिला सायमन फर्नांडीस

मर्देस, फर्नातआळी

जन्म : ०४/०९/१९६३

मृत्यू : १०/१०/२०२१

## ३ वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी सायमन पिटर फर्नांडीस

जन्म : २२/०८/१९५७

मृत्यू : २७/०७/२०२३

## ३ वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी मोझेस पिटर फर्नांडीस

मर्देस, फर्नातआळी

जन्म : २०/११/१९६१

मृत्यू : ०६/०९/२०२३

तीन वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६ सकाळी ७.०० वाजता, वेलंकनी माता चर्च, मर्देस

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्याकडे या आणि मी तुम्हांला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**स्मरणार्थ देणार : मतेस पिटर फर्नांडीस व अम्मास फॅमिली**

## १००व्या जन्मदिवसाची आठवण



**ख्रिस्तवासी मार्तिन आसिस सिर्वेल**
होळी, रमेदी
जन्म : ०७/०९/१९२६; मृत्यू : ०७/०९/२०२६

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आईला सदैव आनंदी ठेव आणि तिला चिरंतन शांती दे, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुलगी : मॅगी परेरा; मुले : रेमंड, वॉल्टर व नोएल जावई, सुना, नातवंडे व पतवंडे**

## ५० वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी मायकल पॉल डायस**
दिघा क्रॉस, रमेदी
जन्म : २४/११/१९३२; मृत्यू : २९/०९/१९७६
मिस्सा : २९/०९/२०२६
सकाळी ७.००वाजता, रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी.

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या वडिलांना चिरंतन शांती लाभो!*

**पत्नी : जॉनमेरी; मुलगा-सून : राजन-उज्ज्वला डायस; मुली-जावई : सिबल-गिल्डस डिसोजा, लुसी-विजय रॉड्रीग्ज, मेरी-डेव्हिड डिकुना, लिली-प्रदीप परेरा; नातवंडे, पतवंडे**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी डायगो पॉल परेरा**
नंदाखाल, राणेभाट
जन्म : ०१/०६/१९५४; मृत्यू : १७/०९/२०२५
वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक २०/०९/२०२५
सकाळी ७.३० वाजता, नंदाखाल चर्च.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय राज्यात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : फिलोमीना; मुलगे, मुलगी, सुना, जावई व नातवंडे**

## प्रेमळ स्मरणार्थ



**ख्रिस्तवासी स्तेला क्लेमेंट मिस्किटा**
पापडी, मुलारभाट (वय वर्षे ८६)
जन्म : २७/१२/१९३९; मृत्यू : २०/०७/२०२६

***''मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे.''***
(यिर्मया ३१:३)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुलगी : अनिता डेनिस सिर्वेल; जावई : डेनिस जॉन सिर्वेल; नातू : ऑलफियस व ऑर्लियस सिर्वेल; नातसून : एलीन सिर्वेल**

**एक वर्षाची आठवण** **२६ वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी रोजमेरी (ओमर) जोसेप मच्याडो**

**ख्रिस्तवासी जोसेप डॉमणिक मच्याडो**

जीवनवाडी, मर्सेस

जन्म : ०८/०७/१९४३
मृत्यू : २४/०९/२०२५

जन्म : १८/१२/१९२९
मृत्यू : ०७/०१/२००१

वार्षिक मिस्सा :
रविवार दिनांक २०/०९/२०२६
सकाळी ७.१५वाजता, मर्सिस चर्च.

***''परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे.''***
(स्तोत्र २७:१)

*हे प्रभू, आमच्या आई-वडिलांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरशांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मच्याडो, चौधरी व कोयलो कुटुंबीय**

**प्रेमळ स्मरणार्थ - दोन महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी आयरीन (शायलू) स्टिफन कोयलो**

आल्दोडीवाडी, होळी, रमेदी

जन्म : २१/०५/१९४७; मृत्यू : ०५/०७/२०२६

***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तिला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल :- पती : स्टिफन एलायस कोयलो**
**कोयलो व कुटिन्हो कुटुंबीय**

**एक वर्षाची आठवण**



**ख्रिस्तवासी फ्लॉरी (फुल्केर) वालेंटाईन डायस**

विसरोडी, सांडोर

जन्म : ०७/०२/१९४९ ; मृत्यू : ०१/०९/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६
सकाळी ७.३० वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***प्रभू येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''*** (लुक २३:४३)

**शोकाकुल :- पती : वालेंटाईन डायस;**
**मुली-जावई : सँड्रा-अशोक, सिलिन-रॉबर्ट सुप्रिया-ब्रिस्टीन;**
**नातवंडे : शेरॉन, शॉन, रसेल, नायजेल, अ‍ॅश्बी, सारा**



**तीन महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी मॉनिका मनवेल मार्टिन**

भुईगाव, जोसोडी

जन्म : ०५/०९/१९४६; मृत्यू : १९/०६/२०२६

तीन महिन्यांची मिस्सा : शनिवार दिनांक १९/०९/२०२६ सकाळी ६.३० वाजता, भुईगाव चर्च.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्याकडे या आणि मी तुम्हाला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या 'बाय' ला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**सौ. क्लेरा व्हिक्टर मार्टिन,**

**सौ. क्लेव्हिया बॉनी परेरा, सौ. क्विनी केवीन डाबरे**



**वीस वर्षांची प्रेमळ आठवण**



**ख्रिस्तवासी कॅथरीना पास्काल मच्याडो**

वडवली, पाली

जन्म : ०६/१२/१९३६; मृत्यू : २६/०९/२००६

***''नीतिमानांचे आत्मे देवाच्या हातात आहेत. कोणतीही पिडा त्यांना स्पर्श करणार नाही. ते देवाच्या सहवासाला पात्र ठरलेले आहेत.''*** (ज्ञानग्रंथ ३:१)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी आमची विनम्र प्रार्थना !*

**दीपक मच्याडो आणि कुटुंबीय**

**८० व्या जन्मदिवसाची आठवण**



**ख्रिस्तवासी सेबेस्टीन डायगो परेरा**

गोखिवरे

जन्म : २१/०९/१९४६; मृत्यू : १८/०४/२०२१

***''मी देहाने दूर असलो तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)



*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या डॅडींना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**



**प्रेमळ स्मरणार्थ** **एक वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी मायकल जोसेफ फरेरा** **ख्रिस्तवासी जानमेरी मायकल फरेरा**

किरावली, पाली

जन्म : १८/०७/१९२८ जन्म : १८/१२/१९३५

मृत्यू : २६/०४/२०२५ मृत्यू : ११/०९/२०२५

**सहा महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी पॅट्रिसिया रॉबी फरेरा**

किरावली, पाली

जन्म : २८/०३/१९६५; मृत्यू : १५/०२/२०२६

एक वर्षाची व सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक २७/०९/२०२६
सकाळी ७.०० वाजता, मदर ऑफ गॉड चर्च, पाली.

***''धन्य ते जे प्रभूमध्ये मरण पावतात; आता पुढे ते त्यांच्या कष्टांपासून विश्रांती घेतात.''***
(प्रकटीकरण १४:१३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-बाबांना व पॅट्रिसिया ह्यांना चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**कुटुंबीय**

**७५व्या जन्मदिवसाची आठवण व वार्षिक स्मृती**



**ख्रिस्तवासी कॅथरीन थॉमस डिमेलो**

दोनतलाव (नारोळ), नंदाखाल

जन्म : २८/०९/१९५१; मृत्यू : ०३/०९/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६
सकाळी ७.३०वाजता, होली स्पिरीट चर्च, नंदाखाल.

***''मी शरीराने दूर असलो तरी आत्म्याने तुम्हांबरोबर आहे.''***
(कलस्सै. २:४)

*हे प्रभू, आमच्या मम्मीला तुझ्या नंदनवनात चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पती :थॉमस वि.डिमेलो; मुलगा : कॅलिस्टन; सून : रेक्झिना; मुली: स्विटी व प्रेसिला; जावई: प्रशांत व स्टीफन रॉड्रिग्ज**

**दोन वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी पीटर दुमींग (डॉमणिक) अथाईत**

कौलारवाडी, सालोली

जन्म : २५/१२/१९४६; मृत्यू : २७/०९/२०२४

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

**१२ वर्षांची आठवण** **एक वर्षाची आठवण**







**ख्रिस्तवासी मिल्टन जोसेफ रॉड्रिग्ज** **ख्रिस्तवासी जोस्पीन मिल्टन रॉड्रिग्ज**

गरोडीवाडी, पाली

जन्म : १०/०३/१९२८; मृत्यू : ०१/०८/२०१४ जन्म : ०९/०६/१९४२; मृत्यू : १०/०९/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६

सकाळी ७.०० वाजता, मदर ऑफ गॉड चर्च, पाली.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्मी-डॅडींना सहभागी कर, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

**सहा महिन्यांची आठवण** **सहा महिन्यांची आठवण**







**ख्रिस्तवासी सिस्टर सिसिलिया डॅनियल डिमेलो** **ख्रिस्तवासी इजमेराल्डा एलायस डिमेलो**

दोनतलाव, नंदाखाल

जन्म : २४/१०/१९४३; मृत्यू : ०१/०४/२०२६ जन्म : २४/०९/१९५७; मृत्यू : २५/०३/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक २७/०९/२०२६ सकाळी ७.३० वाजता,पवित्र आत्म्याचे चर्च, नंदाखाल.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ

**सहा महिन्यांची आठवण** | **एक महिन्याची आठवण**





**ख्रिस्तवासी अंतोनी मर्यान परेरा**

जन्म : २१/११/१९२९

मृत्यू : ०३/०३/२०२६

**ख्रिस्तवासी जॉना अंतोनी परेरा**

जन्म : ०१/०१/१९४१

मृत्यू : ०८/०८/२०२६

खरभाट, सालोली

सहा महिन्यांची व एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६
सकाळी ७.३० वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**परेरा व डिक्रुझ कुटुंबीय**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी फ्रान्सिस जॉन रॉड्रीग्ज**
'स्मृतिगंधा', परसाव, नंदाखाल
जन्म : २५/११/१९४०; मृत्यू : १५/०७/२०२६

***"मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे."***
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## मासिक स्मृती



**ख्रिस्तवासी मॅटिल्डा अँथनी घोन्साल्विस**
दिवनवाडी, पापडी

जन्म : १७ नोव्हेंबर १९५२ ; मृत्यू : ०७ ऑगस्ट २०२६
मासिक पुण्यस्मरण मिस्सा : शनिवार, १२ सप्टेंबर २०२६
सकाळी ७:०० वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

**"धन्य ते जे प्रभूमध्ये मरण पावतात, आता पुढे ते त्यांच्या कष्टांपासुन विश्रांती घेतील".**
**(प्रकटी १४:१३)**

हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे आणि अनंत तेजाने तिला प्रकाशित कर.

**कुटुंबीय**

**जन्मशताब्दी आठवण** **९६वा जन्मदिवस-आठवण**





**ख्रिस्तवासी पिटर डॉमणिक सिरेजो**
**ख्रिस्तवासी सांतान पिटर सिरेजो**

बरामपूर, माणिकपूर

जन्म : १६/०९/१९२६ जन्म : १२/०४/१९३०
मृत्यू : २५/०८/१९८२ मृत्यू : ०५/०४/२००४

***"जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील."***
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

**वार्षिक स्मृती**



**ख्रिस्तवासी पोशान सेबेस्टियन फुर्ट्याडो**
मारभाटवाडी, पापडी
जन्म : १८/११/१९३१; मृत्यू : २१/०९/२०२५
वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक २०/०९/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

***प्रभू येशू म्हणतो, 'जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे, अशी माझी इच्छा आहे."***
(योहान १७:२४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**फुर्ट्याडो कुटुंबीय**

प्रेमळ स्मरणार्थ

तीन वर्षांची आठवण

एक वर्षाची आठवण



खिस्तवासी सेबेस्टियन जॉन घोन्साल्विस - पाटील (बाठ्याशेठ)

खिस्तवासी जॉना सेबेस्टियन घोन्साल्विस (नानूबाय)

संत फ्रान्सिस शेजोळ, गोखिवरे

जन्म : २३/०७/१९४८

मृत्यू : ०१/१०/२०२३

जन्म : ०२/०८/१९५१

मृत्यू : २०/०९/२०२५

तीन वर्षांची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६

वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक २०/०९/२०२६

दोन्ही मिस्सा : सकाळी ७.३० वाजता, सेंट रॉक चर्च, गोखिवरे.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आई-बाबांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सदैव सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**: शोकाकुल :**

**मुलगा व सून : अमित व मनिषा घोन्साल्विस**

**मुली व जावई : अनिता व रेमंड डाबरे, अपर्णा व प्लासिड क्रास्टो, लुईजा व जॉस्लिन नुनीस**

**नातवंडे : केन व कीम डाबरे, ॲलिसा व रॉस घोन्साल्विस , नॉफ व एडन क्रास्टो, ऑरा व सेबियन नुनीस व समस्त पाटील बंधु परिवार**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी सिस्टर सांतान (मॅगी) रॉड्रीग्ज**

गास, लहान सरगोडी

जन्म : २८/०४/१९७८; मृत्यू : १०/०९/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक १३/०९/२०२६ सकाळी ७.०० वाजता, सेंट गोन्सालो गार्सिया चर्च, गास.

***''देवाचे होते ते देवाने नेले. त्याचे नाव धन्यवादित असो!''***

(ईयोब १:२:१)

*हे प्रभू, आमच्या सिस्टरांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## पाच वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी प्रिन्सली चार्लस ग्रेशिअस**

शामभाट वाडी, रमेदी

जन्म : ०८/०५/१९९४; मृत्यू : १५/०९/२०२१

***''जर आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो. म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत.''***

(रोमकरास पत्र १४:८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या प्रिन्सलीला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**मम्मी-डॅडी: व्हिक्टोरिया-चार्लस; भाऊ: ॲश्ली,रॉस्ली, शेरॉल बहिणी : वियाना ग्रिनिज परेरा, शर्ली ग्रेशिअस व कुटुंबीय**

## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी बेथ अंतोन घोन्सालविस**

गास, भाटोरी

जन्म : २७/०५/१९५७; मृत्यू : ०७/०३/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६ सकाळी ७.०० वाजता, सेंट गोन्सालो गार्सिया चर्च, गास.

***''तू जेथे जाशील तेथे परमेश्वर तुझ्या बरोबर आहे.''***

(यहोशवा १:९)

*हे प्रभू, आमच्या पप्पाला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**घोन्सालविस कुटुंबीय**

## एक महिन्याची आठवण



**ख्रिस्तवासी इजमाल ज्यॉकी दालमेद (आल्मेडा)**

गास, भाटोरी

जन्म : १५/०२/१९३५; मृत्यू : ०३/०८/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०६/०९/२०२६ सकाळी ७.०० वाजता, सेंट गोन्सालो गार्सिया चर्च, गास.

***''जेथे मी आहे, तेथे त्यांनीही असावे अशी माझी इच्छा आहे.''***

(योहान १७:२४)

**मुले : बिशप सायमन आल्मेडा (पुणे धर्मप्रांत); फा. पिटर आल्मेडा, इनास व जोस्पीन, हर्क्युलन व शैला; मुलगी : डॉमीनिका मार्कुस फरगोज**

## FIRST DEATH ANNIVERSARY



## LATE XAVIER JOSEPH GOMES

Dhupalwadi, Saloli

★ Born : 28/09/1951

✝ Died : 09/09/2025

### FIRST ANNIVERSARY MASS

SUNDAY, 20/09/2026

AT 7:30 A.M.

ST. THOMAS CHURCH, SANDOR



*"Though I am absent from you in body, I am with you in spirit, and I rejoice to see your faith in Christ."*
(Colossians 2:5)

*May the Lord grant him eternal rest and everlasting peace.*

| | | |
|---|---|---|
| Wife | : | Ruby Xavier Gomes |
| Son | : | Ashley Xavier Gomes |
| Daughter in law | : | Robeena Ashley Gomes |
| Daughter | : | Preeti Oliver Colaco |
| Son in law | : | Oliver Victor Colaco |

GOMES FAMILY

## प्रेमळ स्मरणार्थ



### ख्रिस्तवासी अपलान झुज्या घोन्साल्वीस

वंडा, पवित्र त्रैक्य चर्च, गोम्सआळी परिसर

जन्म : १९/११/१९२५; मृत्यू : १४/०४/२०२६

(वय वर्षे - १०१)

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, आमच्या आजीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**घोन्साल्वीस, वाझ, दोडती, डिसा परिवार**

## मासिक स्मृती



### ख्रिस्तवासी लीना फेलिक्स फर्नांडिस

**दिवाण वाडी, पापडी**

जन्म : २८/०९/१९५७ मृत्यू : ०७/०८/२०२६

**महिन्याची मिस्सा: रविवार, ६ सप्टेंबर २०२६, सकाळी ७.१५ वाजता अवर लेडी ऑफ ग्रेस कॅथेड्रल, पापडी**

*''मी शरीराने दूर असलो तरी आत्म्याने तुम्हाबरोबर आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''*
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**पती: फेलिक्स फर्नांडिस, मुलगा: डीन, मुलगी: रिनी**
**सून: फिओना डीन फर्नांडिस, जावई: इमॅन्युएल डिसोझा**
**नातवंडे: एली आणि कालेब**

## एक महिन्याची आठवण



### ख्रिस्तवासी मायकल आगुस्तीन तुस्कानो

घोटकाल, नंदाखाल

जन्म : १५/१२/१९५०; मृत्यू : १९/०८/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक २०/०९/२०२६ सकाळी ७.३० वाजता, होली स्पिरीट चर्च, नंदाखाल

***''जेथे मी आहे, तेथे त्यांनीही असावे अशी माझी इच्छा आहे.''***
(योहान १७:२४)

| | | |
|---|---|---|
| पत्नी | : | जॉना मायकल तुस्कानो; |
| मुलगा व सुन | : | रेमंड व शोनल तुस्कानो; |
| मुली व जावई | : | स्मिता दिलीप तुस्कानो; स्नेहल जेसन डिमोंटी व नातवंडे |

**पाच वर्षांची आठवण** **प्रेमळ स्मरणार्थ**





**ख्रिस्तवासी जोसेफ डॉम्णीक फरेरा**

**ख्रिस्तवासी कोसांव जोसेफ फरेरा**

न्यू चवरीवाडी, सांडोर

जन्म : २०/१२/१९३१ जन्म : १८/०६/१९३७

मृत्यू : १७/०९/२०२१ मृत्यू : ०७/०७/२०२४

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-बाबांना सामावून घे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पतवंडे : क्रिशॉन व क्लोई; नात : क्लॅरिसा**

**मुली : सि. शर्मिला फरेरा व सि. सॅन्ड्रा फरेरा**

---

**एक वर्षाची आठवण** **प्रेमळ स्मरणार्थ**





**ख्रिस्तवासी अनुबाई लुईस लोपीस**

बोळींज

**ख्रिस्तवासी मेरीबाई इनास लुद्रिक**

जन्म : २२/०८/१९३८ मृत्यू : ०७/०५/२०२५

मृत्यू : १७/०९/२०२५

वार्षिक मिस्सा :

गुरूवार दिनांक १७/०९/२०२६

सकाळी ६.३० वाजता, ख्रिस्तराजा चर्च, बोळींज.

***''जो मनुष्य परमेश्वराचे भय धरितो आणि ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे, तो धन्य!''***

(स्तोत्र ११२:१)

*प्रभुच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**अटलांटा कुटुंबीय, बोळींज**

---

**दोन वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी एडविन जॉन डिसोझा**

**मडी, सांडोर**

जन्म : ०६/०५/१९५४ मृत्यू : १८/०९/२०२४

**''प्रभूमध्ये मरणारे आत्तापासून धन्य आहेत. आपल्या कष्टांपासून सुटून त्यांना विसावा मिळेल.''**

(प्रकटीकरण-१४:१३)

***प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!***

**२९ वर्षांची आठवण**



**ख्रि. जॉन अंतोन डिसोझा**

**मडी, सांडोर**

जन्म : ०९/०९/१९१२

मृत्यू : २९/०६/१९९६

**२१ वर्षांची आठवण**



**ख्रि. इस्परांत जॉन डिसोझा**

**मडी, सांडोर**

जन्म : २७/०५/१९२०

मृत्यू : १९/१०/२००४

देणार,

पत्नी - एरिना एडविन डिसोझा

मुलगा - जोनिल एडविन डिसोझा

सून - रिओना जोनिल डिसोझा

मुलगी - जीनल बॉन लोपीस

जावई - बॉन लोपीस

नात - चिआरा बॉन लोपीस

## मासिक स्मृती



## ख्रिस्तवासी स्टेला फ्रान्सिस रिबेलो

खोपवाडी, रमेदी

जन्म : २५/०९/१९४१ मृत्यू : १२/०८/२०२६

**मासिक मिस्साः**
**रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६, सकाळी ७.३० वा, रमेदी माता तिर्थस्थान, रमेदी**

*प्रभू म्हणतो, "पहा, मी तुला कधीच विसरणार नाही. कारण मी तुला माझ्या तळहातावर कोरले आहे."* (यशया ४९:१५-१६)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्मीला सहभागी कर, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना!*

**- शोकाकुल कुटुंबीय**

---

**एक महिन्याची आठवण** | **चार वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी क्लेमेंट जोजेफ डिमेलो** | **ख्रिस्तवासी जॉना क्लेमेंट डिमेलो**

चित्तरभाटवाडी, सागरशेत, पापडी

जन्म : २३/११/१९४४ जन्म : ०५/०९/१९४६

मृत्यू : ११/०८/२०२६ मृत्यू : ०७/०९/२०२२

एक महिन्याची मिस्सा :
रविवार दिनांक १३/०९/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, पापडी चर्च,

***"आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत."*** (रोम १४:८)

**मुलगा-सून : मॉरीस व स्विडल डिमेलो;**
**मुलगी-जावई : मॅक्सीना व सुनील मिस्किटा;**
**नातवंडे : मायरॉन, ॲलरिच व स्कायलर**

---

## एक महिन्याची आठवण



## ख्रिस्तवासी नेल्सन डॉमिनिक लोपीस

गोखिवरे

जन्म : ०७/०३/१९५८; मृत्यू : १५/०८/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक १३/०९/२०२६
सकाळी ७.३० वाजता, संत रॉक चर्च, गोखिवरे

***"मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे."*** (कलस्सै. २:४-५)



*हे प्रभू आमच्या डॅडीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव!*

**पत्नी : जेनेट नेल्सन लोपीस**

**मुले - सुना : नोएल - अरजींदर, लिनस - अदिती**

**नातू : अडॉनीस**



# तीन प्रमुख परमेश्वरदूत

-फा. (डॉ.) पॅट्रिक मर्सेलिन डिसोजा
सांडोर



ख्रिस्तसभा दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी तीन प्रमुख परमेश्वरदूतांचा सण साजरा करते. ख्रिस्ती श्रद्धेनुसार, मायकल, गॅब्रिएल आणि राफेल हे 'तीन प्रमुख परमेश्वरदूत' आहेत. हे तीन परमेश्वरदूत एक विशिष्ट भूमिका बजावतात.

### महादूत मायकल

महादूत मायकल एका संरक्षकाची भूमिका बजावतो. तो स्वर्गीय सैन्यांचा नेता आहे आणि दुष्टाईपासून बचाव करणे ही त्याची भूमिका आहे.

दानीएलच्या पुस्तकात, महादूत मायकलचे वर्णन परमेश्वराच्या लोकांचा प्रमुख असलेला 'महान राजकुमार' म्हणून केले आहे आणि प्रकटीकरणाच्या पुस्तकात, सैतान व त्याच्या सैन्याविरुद्धच्या लढाईत परमेश्वरदूतांचे नेतृत्व करणारा महादूत म्हणून त्याचे वर्णन आहे.

महादूत मायकल आपल्या जीवनासाठी सैतान व त्याच्या सैन्याविरुद्धच्या लढाईत तो आपले नेतृत्व करतो.

'मायकल' म्हणजे 'परमेश्वरासारखा कोण आहे?' हे नाव परमेश्वरी न्याय टिकवून ठेवण्यामधील महादूत मायकलच्या भूमिकेचा संदर्भ देते. लोकांचा विश्वास आहे की महादूत मायकल त्यांचे आध्यात्मिक आणि शारीरिक धोक्यांपासून संरक्षण करील आणि म्हणूनच ते आध्यात्मिक आणि शारीरिक धोक्यांमध्ये संरक्षणासाठी त्याच्या नावाचा जप करतात.

**सैनिकांचा संरक्षक संत म्हणून मायकल :** मायकलला 'सैनिकांचा संरक्षक संत' म्हणून सन्मानित केले जाते कारण त्याने सैतान आणि त्याच्या सैन्याविरुद्धच्या लढाईत परमेश्वरदूतांचे नेतृत्व केले आणि त्याला व त्याच्या सैन्याला पराभूत करण्यात यश मिळवले.

**ख्रिस्ती श्रद्धेनुसार मायकल, गॅब्रिएल आणि राफेल हे तीन प्रमुख परमेश्वरदूत आहेत.**

येशूचे पहिले प्रतिसादक होण्यासाठी, आपल्याला ख्रिस्तासोबत जवळीक असणे आवश्यक आहे. म्हणून, ख्रिस्ती म्हणून पश्चात्ताप, प्रार्थना आणि ख्रिस्ताच्या शिकवणींचे पालन करून ख्रिस्तासोबत जवळीक निर्माण करण्याचे आवाहन आपल्याला केले आहे.

### महादूत गॅब्रिएल

गॅब्रिएल हा परमेश्वराचा संदेशवाहक आहे. परमेश्वराचा संदेशवाहक म्हणून, परमेश्वराचे महत्त्वाचे संदेश पोहोचवणे ही त्याची भूमिका आहे. त्याच नात्याने, गॅब्रिएल मरियेला भेटला आणि त्याने तिला येशूच्या जन्माची घोषणा केली.

तो मरियेला शुभसंदेशात दिसला आणि त्याने येशूच्या जन्माची घोषणा केली (लूक १:२६-३८).

आपल्यालाही परमेश्वराचे दूत होण्यासाठी पाचारण केले आहे. आपण तपश्चर्या, प्रार्थना आणि समर्पणाद्वारे स्वतःला ह्या भूमिकेसाठी तयार केले पाहिजे; परमेश्वराचे दूत होण्यासाठी स्वतःला तयार करायला हवे.

तसेच त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांपर्यंत परमेश्वरी मार्गदर्शन आणि प्रकटीकरण पोहोचवण्यास शिकवले पाहिजे.

गॅब्रिएलच्या हातात कमळाचे फूल दाखवले जाते. ते शुद्धतेचे प्रतीक आहे. आपणही गॅब्रिएलप्रमाणे विचारांनी व कृतींनी शुद्ध असले पाहिजे.

गॅब्रिएलकडे स्पष्टता, संवाद आणि परमेश्वराच्या इच्छेच्या आकलनाचा आदर्श म्हणून पाहिले जाते.

**स्पष्टतेचा आदर्श म्हणून गॅब्रिएल :** मानवी संबंधांमध्ये स्पष्टता हा एक आवश्यक घटक आहे. जेव्हा लोकांच्या विचारांमध्ये, त्यांच्या वर्तनामध्ये आणि त्यांच्या भावनांच्या अभिव्यक्तीमध्ये स्पष्टतेचा अभाव असतो, तेव्हा गोंधळ निर्माण होतो आणि मानवी संबंध विस्कळीत होतात. म्हणून, आपण गॅब्रिएलचा स्पष्टतेचा महान गुण

आत्मसात केला पाहिजे आणि इतरांनाही तो महान गुण आत्मसात करायला शिकवले पाहिजे.

**संवादाचा आदर्श म्हणून गॅब्रिएल :**

आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांशी सुदृढ मानवी नातेसंबंध निर्माण करण्यासाठी चांगला संवाद आवश्यक आहे. म्हणून, आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांशी सुदृढ मानवी नातेसंबंध निर्माण करण्यासाठी आपल्याकडे योग्य संवाद कौशल्ये असणे आवश्यक आहे. आपण इतरांनाही योग्य संवाद कौशल्ये आत्मसात करायला शिकवले पाहिजे.

परमेश्वराच्या इच्छेच्या आकलनाचे एक आदर्श उदाहरण म्हणून गॅब्रिएल दूत आहे. आपण परमेश्वराची इच्छा पूर्णपणे समजून घेतो, तेव्हाच आपण आपले जीवन परमेश्वराच्या इच्छेनुसार जगू शकतो आणि आपल्या जीवनासाठी असलेल्या त्याच्या योजना पूर्ण करू शकतो.

**महादूत राफेल**

राफेल हा रोग बरा करणारा आणि मार्गदर्शक आहे. हे टोबिटच्या पुस्तकातून स्पष्ट होते. टोबिटच्या पुस्तकात, राफेल टोबियाससोबत त्याच्या प्रवासात जातो आणि टोबिटच्या अंध वडिलांना त्यांची दृष्टी परत देऊन बरे करतो. आपल्याला राफेलकडे वळून, शारीरिक अंधत्व, भावनिक अंधत्व आणि आध्यात्मिक अंधत्व ह्यांसारख्या आपल्याला होणाऱ्या विविध प्रकारच्या अंधत्वापासून बरे करण्याची विनंती करायला हवी आणि त्या बदल्यात, इतरांनाही त्यांच्या विविध प्रकारच्या अंधत्वापासून बरे होण्यासाठी राफेलकडे वळण्यास प्रेरित करण्याची इच्छा आपल्यात असायला हवी.

तीन प्रमुख परमेश्वरदूतांच्या ह्या सणाच्या दिवशी, भाविकांना तीन प्रमुख परमेश्वरदूतांना त्यांच्यासाठी विशेष रीतीने प्रार्थना करण्याची विनंती करण्यास प्रोत्साहित केले जाते, जेणेकरून त्यांना त्या परमेश्वरदूतांचे पुढील गुण प्राप्त होतील :

- वाईटाविरुद्ध रक्षक व संरक्षक असणे.
(प्रमुख परमेश्वरदूत मायकल)
- परमेश्वराचा संदेशवाहक असणे.
(प्रमुख परमेश्वरदूत गॅब्रिएल)
- बरे करणारा आणि मार्गदर्शक असणे.
(प्रमुख परमेश्वरदूत राफेल)

मोबाईल : 70 30 44 79 34

**न्यू अ‍ॅन्जल टूर्स अ‍ॅन्ड कॅटरर्स**

**आयोजक : श्री. मायकल वाझ, दारसेंग, गोम्स आळी, मो. : 9209803602**

**१) सेंट ज्यूड नोव्हेना, झाँशी, ग्वाल्हेर :** दिनांक २४ ते २९ ऑक्टोबर २०२६. जाता येता ३ AC राजधानी + AC रूम + घरघुती जेवण + ग्वाल्हेर सिटी व झांशी सिटी साइटसीन (४ जणांस १ रूम), गेट-टुगेदर पार्टी सहीत एकूण खर्च रू. १८,५००/- प्रति व्यक्ती.

**२) सेंट ज्यूड नोव्हेना : झांशी, ग्वालियर आग्रा, दिल्ली :** दिनांक २४ ऑक्टो. ते ०१ नोव्हे २०२६. जाता-येताना ३ AC राजधानी + AC रूम + घरगुती जेवण + दिल्ली + आग्रा + ग्वालियर व झांशी साईटसीन (चार जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. २५,५००/- मात्र. प्रति व्यक्ती.

**३) संपूर्ण केरळ दर्शन : कोचीन, मुन्नार, टेकडी, अलॅप्पी, कोवलम, त्रिवेंद्रम सहल :** दिनांक ६ ते १४ नोव्हें. २०२६. जाताना ३ AC. (वसई ते कोचीन) येताना राजधानी (त्रिवेंद्रम ते वसई) +AC रूम + घरगुती जेवण + साईटसीन (३ जणांस एक रूम), गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३५,०००/- मात्र.

**४) रॉयल राजस्थान - जयपूर, उदयपूर, बिकानेर, जैसलमेर, माऊंट अबू सहल :** दिनांक ०४ ते १४ नोव्हें. २०२६. जाता-येताना ३ Tier AC. + AC रूम + घरगुती जेवण + साईट सीन (४ जणांस एक रूम), गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च रु. ४०,०००/- मात्र. प्रति व्यक्ती.

**५) निसर्ग रम्य कास पठार सहल :** दिनांक १८ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर २०२६. २×२ AC पुश बॅक बस प्रवास AC रूम + घरघुती जेवण + साइटसीन (४ जणांस १ रूम), गेट-टुगेदर पार्टी सहीत एकूण खर्च रू. ६,०००/- प्रति व्यक्ती.

**६) दुबई फेस्टिवल निमित्ताने दुबई दर्शन जानेवारी २०२७.**

* **लग्न, कुमसार, बर्थडे पार्टीच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.**

**संपर्क :**

प्रितम आल्मेडा, भुईगाव : 9271938211, क्लिफर्ड वाझ, दारसेंग : 8149208027, ॲलीयन डाबरे, वाघोली : 9987336830

बोध

# क्रुसाखाली उभी असलेली मरिया

-डॉ. ॲलिना गोन्सालविस
चुळणे

मरियेचे जीवन एखाद्या सुंदर, शांत धार्मिक चित्रासारखे नाही. तिच्या जीवनात देवदूताचा संदेश आहे, पण त्यासोबत अनिश्चितताही आहे; तिच्या हातात बाळ येशू आहे, पण त्याच्या भवितव्याबद्दल सिमेऑनची वेदनादायक भविष्यवाणीही आहे; तिच्या जीवनात काना येथील आनंद आहे, पण त्याच जीवनाच्या शेवटी गोलगोथाचा क्रूसही आहे. म्हणून मरिया केवळ मुकुटधारी, फुलांनी सजवलेली प्रतिमा नाही. ती जीवनाच्या उजेडातून अंधाराकडे आणि त्या अंधारातून आशेकडे गेलेली स्त्री आहे. सिमेऑन तिला सांगतो, 'तुझ्या स्वतःच्याही जिवातून तलवार भोसकून जाईल.' (लूक २:३५) त्या वेळी ह्या शब्दांचा संपूर्ण अर्थ तिला कदाचित समजला नसेल. पण काही वर्षांनी त्याच भविष्यवाणीचे दुःख तिच्यासमोर उभे राहिले.

योहानच्या सुवार्तेतील एक साधे वाक्य ह्या प्रसंगाला विलक्षण अर्थ देते : 'येशूच्या क्रुसाजवळ त्याची आई उभी होती.' (योहान १९:२५) बायबल तिच्या आक्रोशाचे वर्णन करत नाही. क्रुसाखाली उभी असलेली मरिया ही एक मौनातील कविता आहे. तिच्याकडे परिस्थिती बदलण्याची शक्ती नव्हती. ती आपल्या पुत्राला क्रुसावरून खाली आणू शकत नव्हती. त्याच्या जखमा भरून काढू शकत नव्हती. तरीही ती तिथून निघून गेली नाही. क्रूस तिच्या प्रेमापेक्षा मोठा झाला नाही.

आपण अशा समाजात जगत आहोत जिथे आनंद दाखवण्याची अनेक साधने आहेत, पण दुःख लपवण्याचीही तितकीच साधने आहेत. आधुनिक जीवनाने आपल्याला दुःखापासून लक्ष विचलित करण्याची असंख्य साधने दिली आहेत. दुःखाला दुर्लक्षित केले म्हणून ते नाहीसे होत नाही. आपण प्रत्येक वेळी 'सगळं ठीक होईल' किंवा 'सकारात्मक विचार कर' असे म्हणतो. ह्या शब्दांमध्ये चांगली भावना असली तरी दुःखी व्यक्तीला



प्रत्येक वेळी उत्तरांची गरज नसते. कधी कधी तिला फक्त ऐकून घेणारे मन, शांतपणे जवळ बसणारा माणूस आणि 'तू एकटा नाहीस' असे सांगणारी उपस्थिती हवी असते.

कधी कधी दुसऱ्याचे दुःख दूर करण्याची शक्ती आपल्या हातात नसते; पण त्या दुःखात त्याला एकटे न सोडण्याची निवड आपल्या हातात असते. ह्याच ठिकाणी मरिया आजच्या माणसासाठी अत्यंत जवळची वाटते. आपण आपल्या प्रिय व्यक्तीचे प्रत्येक दुःख दूर करू शकत नाही. मात्र आपण ऐकू शकतो. मरियेकडे क्रूस थांबवण्याची शक्ती नव्हती, पण क्रुसाखाली उभे राहण्याची शक्ती तिच्याकडे होती. तिची उपस्थितीच तिच्या प्रेमाची सर्वांत मोठी साक्ष ठरली.

**क्रुसाखाली उभी असलेली मरिया ही एक मौनातील कविता आहे.**

मरिया केवळ येशूची आई राहत नाही; ती दुःख सहन करणाऱ्या प्रत्येक आईच्या हृदयाचे प्रतीक बनते.

मरियेची कथा केवळ शोककथा नाही. क्रूस हा शेवट नव्हता. ख्रिस्ताचे पुनरुत्थान झाले आणि त्यामुळे क्रुसाला आशेचा अर्थ मिळाला. म्हणून क्रुसाखाली उभी असलेली मरिया ही निराशेचे प्रतीक नाही; ती अंधारातही विश्वास टिकवून ठेवणाऱ्या मनाचे प्रतीक आहे. आपल्या आयुष्यातही काही प्रसंग असे येतात की देवाची योजना आपल्याला समजत नाही. आपण प्रार्थना करतो, पण परिस्थिती बदलत नाही. विश्वास ठेवतो, पण मनात प्रश्न असतात. अशा वेळी विश्वास म्हणजे सर्व प्रश्नांची उत्तरे माहीत असणे नव्हे; प्रश्नांसहही देवाची साथ सोडू न देणे होय. मरियेनेही प्रत्येक गोष्ट सुरुवातीपासून समजून घेतली नव्हती, पण ती पुढे चालत राहिली. ह्या मरिया सोहळ्यात तिच्याकडे पाहताना आपण तिच्या मुकुटाकडे पाहण्याबरोबरच तिच्या क्रुसाकडेही पाहूया. तिच्या शांत चेहऱ्यामागचा संघर्ष समजून घेऊया. कारण मरियेची महानता केवळ ती देवाची माता होती ह्यात नाही; तर जीवनाला अपेक्षित नसलेले वळण मिळाले, वेदना असह्य झाली आणि भविष्य अस्पष्ट झाले, तरी तिने श्रद्धेचा हात सोडला नाही ह्यात आहे. आजच्या जगाला कदाचित ह्याच शिकवणीची सर्वाधिक गरज आहे. दुःखापासून आपण नेहमी पळू शकणार नाही; परंतु दुःखात एकमेकांना सोडून न जाणे आपल्या हातात आहे.

क्रुसाखाली उभी असलेली मरिया आपल्याला शेवटी एक साधा पण कठीण प्रश्न विचारते : दुसऱ्याचे दुःख मी दूर करू शकत नसलो, तरी त्या दुःखाच्या वेळी मी त्याच्या जवळ उभा राहीन का? क्रुसाच्या सावलीत उभी असलेली मरिया आजही आपल्याला दिसते : अंधार संपण्यापूर्वीही आशेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रेमाच्या रूपाने. प्रत्येक अंधार लगेच दूर करता येत नाही, पण त्या अंधारात आशेचा छोटासा दिवा घेऊन उभे राहता येते. क्रुसाखाली उभी असलेली मरिया आपल्याला ह्याच प्रेमाची, सहवेदनेची आणि विश्वासाची भाषा शिकवते.

मोबाईल : 77 98 35 27 69

## Sophia BEAUTY PARLOUR

"HIGHLIGHT YOUR NATURAL BEAUTY"

SOPHIA ANDRADES

9823301327
7744000333
9049000555

◈ अपॉईन्टमेन्ट स्विकारल्या जातील ◈

---

* रोज Rs.99 फक्त 15 वर्षे बचत करा आणि Rs. 9 करोडची Property बनवा.

*बचत करा रोज Rs.333 व Rs.1,40,000 दरवर्षी आयुष्यभर, टॅक्स फ्री घ्या. सोबत Rs. 40 लाखांची **Maturity** पण मिळवा. तसेच Rs. 80 लाख **Family** साठी देखील.

*ही Offer मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध.

* Contact For Mediclaim Policy, Cancer Cover Plan, Pension, SIP & SWP.

**Jayesh Chaudhari**
**9422483785**

---

## जेम्स ट्रॅव्हल्स आयोजित

**१) कोकण दर्शन : मालवण तारकर्ली , देवबाग, चिवला बीच, वेंगुर्ला बीच सहल** : दिनांक ६ ते ९ नोव्हें.२०२६. प्रवास २×२ ए.सी. बसने, निवास ए.सी. हॉटेल (चार जणांस एक रूम) एकूण खर्च प्रत्येकी रु. १४,०००/-मात्र.

**२) राजस्थान सहल : माऊंट अबू, उदयपूर, चित्तोडगड, जोधपूर, जेसलमेर, जयपूर सहल** : दिनांक ११ ते २२ नोव्हें. २०२६. रेल्वे प्रवास : ३ ए.सी.ने, बस प्रवास २×२ ए.सी.कोचने. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३९,५००/-. मात्र.

**३) अंदमान सहल : पोर्ट ब्लेअर, सेल्युलर जेल, हॅवलॉक आयलंड, बाराटांग रॉस आयलंड, नील आयलंड, नॉर्थ बे आयलंड सहल** : दिनांक ११ ते १६ नोव्हें. २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. २६,५००/- + विमान भाडे.

**संपर्क : जेम्स परेरा**
**7020547396 / 8975784472**

---

## Wanted Teacher

**St. Joseph High School**
Jail Rd. (East), Umerkhadi,
Mumbai - 400 009
Mob. : 91 52 33 45 30
**Email :**
st.josephumerkhadi@yahoo.co.in

Affiliated to the Archdiocesan Board of Education, Mumbai requires for English Medium Secondary School, B. A., D. Ed. / B. Ed. teacher – to teach Marathi & Hindi for the classes VI to VIII preferably with TET passed (likely to be clear vacancy in Govt. Aided Section). Apply immediately to The Head Mistress with hand written application at above address.

---

## वर पाहिजे

**वधू :** जन्म : दिनांक ३ मार्च १९९४, उंची : ५'-५'', शिक्षण : M.Sc. Chemistry, B.Sc. Computer Science, B.Ed., D.Ed., इंग्लिश मिडियम, नोकरी : शिक्षिका.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरूप.

**Contact : 82 61 02 58 65**

---

## वर पाहिजे

**वधू :** पदवीधर, वय ३० वर्षे, रोमन कॅथलिक, मुंबईत नोकरी.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, वय वर्षे ३० ते ३३ पर्यंत, नोकरी, पदवीधर, परदेशात स्थायिक असल्यास प्राधान्य.

**: Contact - Email ID :**
**chapterafterchater@gmail.com**
**and**
**Suvarta Box No. Sept. 02**

---

## ग्लोरिया मंडप डेकोरेटर

१) डिसेंबर २०२६ व जानेवारी २०२७ मुलाकडे, मुलीकडे व ग्राऊंड मंडप तिन्ही एकत्र बुकींग केल्यास डिस्काऊंट.
२) ख्रिस्मस सिझनमध्ये फक्त १ दिवसाच्या कार्यक्रमासाठी सूट दिली जाईल. १९ डिसेंबर २०२६ ते जाने. २०२७
३) मर्सेसला कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध नसल्यास जागेसाठी संपर्क :ग्लोरिया मंडप
४) गिरीज, भुईगाव, सांडोर, रमेदी, होळी ह्या ठिकाणी कार्यक्रमासाठी जागा भाड्याने द्यायची असल्यास संपर्क साधा.

* ग्लोरिया मंडप,मुसारवाडी :**9822608898**

---

## Wanted Groom

**Bride :** Roman Catholic from Vasai, Working in reputed Company in Mumbai, **Age :** 25 years, **Education :** M. B. A.

**Expected :** Suitable for bride well educated, good family background, working in Mumbai.

**: Contact :**
**sadhanac7219@gmail.com**

---

## वधू पाहिजे

**वर :** वाडवळ ख्रिश्चन, वय २९ वर्षे,

**शिक्षण :** इंजिनियर +, शीपवर ऑफिसर, सुशिक्षित व सुसंस्कृत कुटुंब.

**अपेक्षित वधू :** वाडवळ, ख्रिश्चन, वरास अनुरूप.

**'सुवार्ता', पो. बॉक्स नं. : सप्टें. ०१**
**Mob. : 98 19 00 60 91**

---



## वांद्रे येथील मोत मावली सणानिमित्त

**मुंबई दर्शन**
शनिवार १९ व रविवार २०/०९/२०२६

बस २ X २ डिलक्स कोच माणिकपूर क्रिकेट ग्राऊंडकडून बरोबर 7.00 सुटणार व मुंबईतून परतीचा प्रवास करून वसईत रात्री 8.00 येणार.
मुंबईत प्रथम 1) माउंट मेरी चर्च
2) बॅण्ड स्टॅण्ड ते वर्ली सिलिंक 4.7 किलोमिटर लांबीचा सागरी सेतू सुखद अनुभव 3) नेहरू सेंटर 4) नेहरू तारांगण 1.30 मराठी शो 5) हाजी आली दर्गा 6) वर्ली सी फेस वरून परतीचा प्रवास

प्रत्येकी 900 रूपये नास्ता व जेवणासहीत
आपली ०९/९/२०२६ पर्यंत नावे नोंदवावी
संपर्क : फेलिक्स - **9226373016**



# मक्याच्या भुशापासून राष्ट्रकुलच्या रौप्यपदकापर्यंत!

- जोसेफ एस. डाबरे
मावंडा, निर्मळ

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील देवगाव येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील सर्वेश कुशारे ह्या तरुणाने ग्लासगो येथील 'राष्ट्रकुल' क्रीडा स्पर्धेत उंच उडी प्रकारात २.२५ मीटर उंच उडी मारून रौप्यपदक पटकावले. ही कामगिरी ऐतिहासिक ठरली, कारण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत उंच उडी प्रकारात रौप्यपदक मिळवणारा सर्वेश हा पहिलाच भारतीय खेळाडू बनला.



सर्वेशचे प्रशिक्षक रावसाहेब जाधव आणि त्याचे शेतकरी वडील अनिल कुशारे ह्यांनी सराव करण्यासाठी पुरेशा सुविधा व निधी नसल्यामुळे जुने कपडे, मक्याचा भुसा आणि कापूस एकत्र भरून उडी मारण्याची गादी (Mattress) स्वतःच्या हाताने तयार केली. त्याच देशी जुगाडाच्या गादीवर सराव करून सर्वेशने आज आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा तिरंगा उंच फडकवला.

सर्वेशचे हे यश त्याच्या अफाट जिद्दीचे, कठोर परिश्रमाचे आणि त्याच्या प्रशिक्षक व वडिलांच्या त्यागाचे फलित आहे. परंतु ह्या यशाच्या लकाकीमागे भारतीय क्रीडा व्यवस्थेची निष्काळजी बाजू दडलेली आहे. भारतात क्रीडा कौशल्याची कोणतीही कमतरता नाही; गल्लीबोळात, ग्रामीण भागात आणि आदिवासी पाड्यांमध्ये हिऱ्यासारखे चमकणारे खेळाडू दडलेले आहेत. मात्र, दुर्दैवाची गोष्ट अशी की ह्या खेळाडूंच्या योग्य तयारीसाठी आणि त्यांना आधुनिक सुविधा देण्यासाठी सरकारी यंत्रणेमार्फत निधी उपलब्ध केला जात नाही.

जगातील अग्रगण्य आर्थिक महासत्ता आणि 'विश्वगुरू' बनण्याच्या वल्गना करणाऱ्या देशात जर एका राष्ट्रीय खेळाडूला सरावासाठी मक्याच्या भुशाची गादी वापरावी लागत असेल, तर ही बाब संपूर्ण व्यवस्थेच्या तोंडावर मारलेली एक चपराक आहे. जेव्हा शिक्षण, आरोग्य, आणि क्रीडा ह्यांसारख्या मानवी विकासाच्या मूलभूत क्षेत्रांसाठी निधी देण्याची वेळ येते, तेव्हा तिजोरीत खडखडाट असल्याचे चित्र उभे केले जाते. पण दुसरीकडे, राजकीय स्वार्थासाठी, अनावश्यक उधळपट्टीचा पैसा खेळाडूंच्या सुविधांवर खर्च केला, तर भारत क्रीडा जगतात नवनवीन कीर्तिमान रचू शकतो.

अवघा ६ लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेला 'केप व्हर्डे' (Cape Verde) सारखा छोटासा देश फुटबॉलसारख्या जागतिक खेळात बड्या-बड्या देशांच्या तोंडाला फेस आणतो आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ताकद दाखवतो. तर दुसरीकडे, १४० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेला आपला देश क्रीडा क्षेत्रात मोजक्याच पदकांसाठी झगडताना दिसतो. ह्याचे मूळ कारण खेळाडूंच्या क्षमतेत नाही, तर शासकीय धोरणांमधील आणि क्रीडा प्रशासनातील अनास्थेमध्ये व भ्रष्टाचारात आहे.

सर्वेश कुशारेचे यश हे आपल्या क्रीडा क्षेत्रातील त्रुटींवर पांघरूण घालण्याचे साधन बनू नये, तर ते व्यवस्थेला जागे करणारे एक आव्हान ठरले पाहिजे. जोपर्यंत ग्रामीण भागातील क्रीडा पायाभूत सुविधा सुधारल्या जात नाहीत, क्रीडा अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा थेट खेळाडूंपर्यंत पोहोचत नाही आणि भ्रष्टाचार रोखला जात नाही, तोपर्यंत जागतिक स्तरावर क्रीडा महासत्ता होण्याचे स्वप्न अधुरेच राहील.

अशा गुणवंत खेळाडूंना केवळ पदकानंतर कौतुकाची थाप व रोख पारितोषिके देण्यापेक्षा, त्यांच्या प्रवासाच्या सुरुवातीलाच त्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा आणि निधी उपलब्ध करून देणे हीच खरी देशसेवा ठरेल! •


## 'सुवार्ता' जाहिरात दर

**कमर्शियल**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २६,२५०/- |
| अर्धे पान | रु. १३,६५०/- |
| पाव पान | रु. ७,३५०/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १५,७५०/- |
| अर्धे पान | रु. ७,३५०/- |
| पाव पान | रु. ५,२५०/- |
| छोटी (१/६) | रु. ३,१५०/- |
| छोटी (१/१२) | रु. २,१००/- |

**शोक/अभिनंदन फोटो**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २३,१००/- |
| अर्धे पान | रु. ११,५५०/- |
| पाव पान | रु. ६,३००/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १२,६००/- |
| अर्धे पान | रु. ६,३००/- |
| पाव पान | रु. ४,२००/- |
| छोटी (१/६) | रु. २,६२५/- |
| छोटी (१/१२) | रु. १,५७५/- |

## 'सुवार्ता' वर्गणी दर

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| पोस्टाने वार्षिक वर्गणी | रु. २५०/- |
| पाच वर्षांची वर्गणी | रु. ९५०/- |

**संपर्क : 'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१२०१.
**मोबाईल : 9702090231**
E-mail : suvartavasai@gmail.com

# शपथ

-प्रमिला मेलवीन डिसोजा
ब्राह्मणआळी, पापडी

उमेश एका खाजगी दवाखान्यात वॉर्डबॉयचे काम करीत होता. नेहमी हसतमुख, प्रामाणिक, सर्वांना मदत करणारा व दांड्या न मारणारा उमेश सर्वांचा आवडता होता. संध्याकाळी तो पार्टटाईम नोकरीही करीत होता. सकाळी आठ वाजता गेलेला उमेश रात्री नऊ वाजता घरी येई. आज दवाखान्यातील काम संपल्यावर तो सरळ घरी आला. बायकोने केलेला चहा घेतला. थोड्या गप्पागोष्टी झाल्या व उमेश आराम-खुर्चीत डोळे मिटून विश्रांती घेऊ लागला.

समोरचा दरवाजा वाजल्याने उमेशने डोळे उघडले. त्याचा मोठा मुलगा भावेश घरात आला. आल्या-आल्या त्याने देवापुढे हात जोडले आणि मोठ्याने 'आई' अशी हाक मारली. भावेश धावत जाऊन आईच्या पाया पडला. एम.ए.चा निकाल लागल्याची शुभवार्ता त्याने आईला सांगितली. पप्पांकडे जाऊन त्यांच्याही पाया पडला व म्हणाला, ''पप्पा, मी एम.ए.ची परीक्षा चांगल्या मार्कांनी पास झालो.'' उमेश खुर्चीतून उठला. त्याने मुलाला वेंगेत घेतले. दोघांच्या डोळ्यांत आनंदाश्रूंचा महापूर आला. उमेशने त्याची पाठ थोपटली, ''असाच यशस्वी हो! मला परिस्थितीमुळे शिकता आले नाही. तू एम. ए. झालास. माझे आयुष्य सार्थकी लागले.'' तितक्यात आई साखरेचा डबा घेऊन आली. तिने मुलाच्या तोंडात साखर घातली. प्रेमाने त्याच्या पाठीवरून, डोक्यावरून हात फिरवला व देवापुढे दिवा लावला. उमेशचा थकवा आता कुठच्या कुठे पळाला. तो आता एकदम फ्रेश झाला. त्याला आपला भूतकाळ आठवला.

* * *

घरात अठराविश्वे दारिद्र्य. घर म्हणजे कुडाला असंख्य छिद्रे असलेले खोपट. पावसाळ्यात गळणाऱ्या छप्पराचे पाणी



अडवण्यासाठी घरभर पातेली व पत्र्याचे डबे ठेवावे लागत. चार भाऊ, एक बहीण आणि आई-वडील असे सात जणांचे कुटुंब. आई घरकाम करायची तर वडिलांना दारूचे व्यसन. ते नेहमी रस्त्याची लांबी-रूंदी मोजतच घरी येत.

जिल्हा परिषदेची शाळा घरापासून पाच मिनिटांच्या अंतरावर होती. सहा वर्षांचे झाल्यावर दोन्ही मोठ्या भावांना बाईच शाळेत घेऊन गेल्या होत्या. वडिलांना आपली मुले शाळेत जातात की नाही, ह्याचा काहीच पत्ता नव्हता. कधी दारू मस्तकात शिरली की चारही भावंडांना रांगेत उभे राहायला सांगत आणि भरपूर चोपून काढत. आपल्याला मार का मिळतो? ह्याचे कारण कोणालाच ठाऊक नसे.

> **''शाळेतील एका बाईंच्या शिक्षेच्या भीतीने शाळा सुटली होती, तर दुसऱ्या बाईंच्या प्रेमाने पुन्हा शाळेकडे ओढला गेलो...''**

भाऊ शाळेत गेल्यावर आपण गावभर भटकायचो. एके दिवशी बाईंनी पकडले व त्याच कपड्यांनी शाळेत घेऊन गेल्या व शाळेचा श्रीगणेशा झाला. शाळा सकाळी साडेदहा ते संध्याकाळी पाचपर्यंत असे. दुपारी एक तास जेवणाची सुट्टी. दुपारी घरी यावे, तर चूल पेटलेली नसे. बाबांबरोबर आईलाही दारूचे व्यसन लागले होते. दोघेही संध्याकाळी झिंगत झिंगत घरी येत. बाजूलाच आत्याचे घर होते. ती घरकाम करी. तिची परिस्थिती थोडी बेताची होती. तिच्या घरी दुपारी चूल पेटे. दुपारच्या जेवणासाठी आम्ही भावंडे शाळेतून तिच्याच घरी जात. ती जेवायला वाढी. ते अन्न पोटात ढकलून पुन्हा शाळेत जात. उमेश पहिलीतून दुसरीत व दुसरीतून तिसरीत गेला.

तिसरीत गेल्यावर अतिशय कडक शिस्तीच्या वैतीबाई शिकवायला आल्या. सर्व मुले त्यांना घाबरत. त्या बाई मुलांना कडक शिक्षा करीत. हळूहळू शाळा आवडेनाशी झाली. दांड्या मारू लागलो. घरी विचारायला होतेच कोण? थोड्या दिवसांनी दिवाळी सण आला आणि तीन आठवड्यांची सुट्टी मिळाली. गगनाएवढा आनंद झाला. आनंद होता वैतीबाईंच्या शिक्षेतून सुटल्याचा, रजेत आत्याला मिळालेल्या गोडधोडातले थोडे तोंडात पडेल ह्याचा तसेच मनसोक्त खेळायला मिळेल ह्याचाही.

सुट्टीत खूप मजा केली. दिवसभर तर खेळलोच; पण रात्रीही रस्त्यावरच्या दिव्याच्या अंधुकशा प्रकाशातही खेळत राहिलो. खेळता-खेळता तीन आठवडे कधी भरले ते समजलेच नाही. शाळेची आठवण झाली, वैतीबाई आठवल्या. बाईंनी दिलेला गृहपाठ आठवला... काहीच अभ्यास झाला नव्हता. आता सारा अभ्यास होणे शक्यही नव्हते. बाईंचा जमदाग्नीचा अवतार आठवला अन् खूप घाबरलो. शेवटी ठरवले, ''बाईंचा मार खाण्यापेक्षा शाळाच सोडून देऊ!'' दिवाळीनंतर शाळेत गेलोच नाही. तिसरीतच शाळा सुटली, अन् पाटी

फुटली. सकाळी बाईंच्या शाळेत जायच्या वेळेला लपून राहू लागलो. त्यानंतर दिवसभर मनाला वाटेल तिथे हुंदडत राहिलो.

गावात दुपारच्या वेळी असाच भटकत असता, गावातील दादूशेटनी पाहिले. वडील त्यांच्याकडे कधीकधी कामाला जात. त्यांनी जवळ बोलावून विचारपूस केली. शाळेत न जाण्याचे कारण विचारले. मी उत्तर दिलेच नाही. शेवटी शेट म्हणाले, ''शाळेत जाणार नसशील, तर माझ्या देशी दारूच्या दुकानात ग्लासं उचलायला चल. महिना १००/-रु.पगार, सकाळी भरपेट नाश्ता व टीपचे पैसेही मिळतील.'' खूप आनंद झाला. ''शाळा सुटली; पण नोकरी लागली.'' ह्या विचारात घरी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता शेटच्या ओटीवर जाऊन बसलो. त्यांनी मला त्यांच्या मागे मोटर सायकलवर बसवले. आज पहिल्यांदाच मोटर-सायकलवर बसलो होतो. गार वारा अंगाला लागत होता. लय भारी वाटत होतं. शेटबरोबर बारवर पोहोचलो. गेल्याबरोबर दोन वडापाव मिळाले. कितीतरी वर्षांनंतर असा नाश्ता मिळाला होता. दुपारी जेवायला घरी आलो. आत्या बाजूला बसली. पाठीवर हात फिरवित म्हणाली, ''पोरा, शाळा सोडू नको. तुझ्या आई-बापांचा तर ताळ नाही. अनपढ राहून पुढे काय करशील?'' काहीच बोललो नाही. संध्याकाळी पुन्हा बारमध्ये गेलो. गेल्याबरोबर कोल्ड्रिंक प्यायला मिळाले. रात्री अकरा वाजता टीपचे मिळालेले तीन रुपये घेऊन घरी आलो. दुसऱ्या दिवशी गेल्याबरोबर शेटनी समजावले, ''तुला भूक लागली तर मला सांग. बरणीत चणे, शेंगदाणे आहेत ते खा; पण दारूच्या थेंबालाही स्पर्श करायचा नाही.'' गळ्याला हात लावला व शपथ घेतली.

नियमितपणे बारमध्ये कामाला जाऊ लागलो, बारमधील जीवन आता आवडू लागले. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी दारू-सिगारेटच्या वासाची सवय झाली. आई-बाबा महिना भरायच्या आधीच काहीतरी कारण सांगून शेटकडून पगार आणत. पगार मिळाला की आई-बाबांचा दोन-तीन दिवस शिमगा चाले. टीपचे मिळणारे तीन-चार रुपयेही बाबा खिशातून काढून दारूवाल्याला नेऊन देत.

बारमध्ये दररोज नवनवीन लोक येत. त्यात खैरे साहेब नावाचे एक सद्‌गृहस्थही येत. सारे त्याला 'सर' म्हणत. हळूहळू त्यांच्याबरोबर ओळख झाली. एके दिवशी कामातील चलाखी पाहून त्यांनी जवळ बोलावले. हातावर चणे ठेवत म्हणाले, ''तू शाळा शिक. हे काम तुझे नाही. शिक्षणासाठी तुला जी मदत हवी, ती सर्व मी करीन.'' मान खाली घालून ऐकले व

> **''एका शपथेने निर्व्यसनी बनलो तर दुसऱ्या शपथेने शाळा शिकलो...''**

पुढच्या टेबलकडे गेलो. अधूनमधून सर मला शाळेची आठवण करून देत होते. बारमध्ये काम करता-करता तीन वर्षे पिसासारखी उडून गेली. माझ्या वयाची मुले सहावीत गेली. दररोज दुपारी शाळेच्या दारावरूनच मी आत्याकडे जेवायला जाई. शाळेतील मुलांचे खेळ, पाठांतराचा आवाज ऐकून क्षणभर वाईट वाटे, पण वैतीबाई आठवल्या की शाळेचे दर्शनही नकोसे होई.

मुसळधार पावसाच्या दिवशी शाळेच्या दारावरून मी जात होतो. डोक्यावर छत्री होती तरीसुद्धा घरत बाईंनी मला पाहिले. त्या दुसरीच्या बाई होत्या. त्यांनी दोन मुलांना पाठवून मला बोलावून घेतले. बाई वर्गातून बाहेर आल्या, ''अरे उमेश, कुठे आहेस?'' प्रेमाने पाठीवर हात फिरवित चौकशी केली व म्हणाल्या, ''शाळेत यायचंय का तुला?'' बाईंच्या प्रेमाने सद्‌गदीत झालो. लगेच बाईंना 'हो' म्हटले. त्या मला वर्गात घेऊन गेल्या. वर्गातील एका हुशार मुलीची बँग उचलून टेबलावर ठेवली. सर्व मुले माझ्याकडे बघत होती. मी शरमलो होतो. बाई मला म्हणाल्या, ''ह्या पुस्तकांवर हात ठेव व माझ्यामागे शपथ घे. मी उद्यापासून दररोज शाळेत येईन. गैरहजर राहणार नाही. मध्येच शाळा सोडून जाणार नाही.''

बाईंना 'हो' सांगून आत्याकडे निघालो. तोपर्यंत पाऊस थांबला होता. पण विचारचक्र थांबायला तयार नव्हतं. तीन वर्षांनी पुन्हा शाळेत जायचं, आपल्यापेक्षा तीन वर्षांनी लहान असलेल्या मुलांबरोबर वर्गात कसं बसायचं, वर्गातली सारी मुले आपल्याला हसतील. पण क्षणात पुस्तकांची शपथ देणाऱ्या घरत बाई डोळ्यांसमोर आल्या, खैरे सर आठवले व ठरवले, ''काहीही झालं तरी आता शाळेत जायचंच.''

एका बाईंच्या शिक्षेच्या भीतीने शाळा सुटली होती, तर दुसऱ्या बाईंच्या प्रेमाने पुन्हा शाळेकडे ओढला गेलो होतो.

संध्याकाळी शेटबरोबर बारवर कामाला गेलो. खैरे सरांची आतुरतेने वाट पाहत होतो. सर आल्याबरोबर त्यांच्या जवळ जाऊन ''उद्यापासून शाळेत जाणार'' ही शुभवार्ता त्यांना सांगितली. त्यांना खूप आनंद झाला. ते बाहेर आले व रिक्षा पकडून स्टेशनला गेले. अर्ध्या तासाने स्कूल बॅग, पुस्तके, पाटी, छोटी कंपास व वॉटर बॅग आणून माझ्या हातात दिली. आयुष्यात प्रथमच मिळालेले सारे

नव-नवे पाहून मला कोण आनंद झाला होता. माझ्या शेटलाही शाळेत जायची बातमी सांगितली. त्यांनी तर शाबासकी दिली व ''उद्यापासून संध्याकाळीच कामाला ये. तुला मी पूर्ण पगार देईन,'' असे म्हणाले. रात्री नवीन बॅग घेऊन घरी गेलो. आई-वडील गाढ झोपेत. हिरमुसलो. थोडे पोटात ढकलून झोपी गेलो.

सकाळी उठताच प्रथम आत्याचे घर गाठले. तिला 'आजपासून शाळेत जाणार' ही बातमी सांगितली. आनंदाने तिचे डोळे चमकले. तिने हातावर गुळाचा खडा ठेवला. नवीन बॅग, नवीन पुस्तके, वॉटरबॅग घेऊन शाळेत गेलो. सारी मुले माझ्याकडे आश्चर्याने पाहत होती. सर्वांपेक्षा तीन वर्षांनी मी मोठा होतो. बाईंनी माझे प्रेमाने स्वागत केले. सर्वांना माझी ओळख करून दिली. हळूहळू लाज कमी होत गेली. इतर मुलांपेक्षा मोठा, बारमध्ये काम केलेला, दररोज मिळणाऱ्या 'टीप'च्या पैशांचा हिशोब ठेवणारा मी, वर्गात पटापट गणिते सोडवू लागलो. प्रश्नांची उत्तरे देऊ लागलो. बाईंची शाबासकी मिळवू लागलो. अभ्यास आता आवडू लागला व शाळाही. पुढच्या इयत्तेत गेलो. एके दिवशी सातवी पास झालो व घरत बाईंचा आशीर्वाद घेऊन पुढच्या प्रवासासाठी बाहेर पडलो.

आठवीला दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला. अभ्यासाची गोडी लागली होती. सकाळी शाळा व संध्याकाळी न चुकता बारवर जाणे चालू होते. दहावी पास झाल्यावर दोन वर्षांचा आय. टी. आय. चा वेल्डींगचा कोर्स केला. पुढे खाजगी दवाखान्यात वॉर्डबॉय म्हणून कामाला लागलो. संध्याकाळी पार्टटाईम नोकरी करून जास्तीचे पैसे मिळवू लागलो. सरकारी जागेवर स्वत:चे छोटेसे घर बांधले. वयाच्या आठव्या वर्षापासून सलग २८ वर्षे बारमध्ये काम केले. 'दारूच्या थेंबालाही शिवणार नाही', ही त्यावेळी घेतलेली शपथ आजपर्यंत पाळली. चिखलात राहून कमळाप्रमाणे बेदाग राहिलो. बारच्या शपथेने निर्व्यसनी बनलो तर घरत बाईंच्या शपथेने शाळा शिकलो, अन् आयुष्य बदललं. मुलांना इंग्रजी माध्यमात शिकवलं. आज आमच्या आदिवासी कुटुंबाचा 'अनपढचा शिक्का' मुलाने उच्चशिक्षण घेऊन पुसून टाकला. ह्या विचारातच उमेश खुर्चीतून उठला. बाहेर किर्र काळोख दाटला होता पण उमेशच्या मनात मात्र ज्ञानाचा दिवा तेवत होता. उदबत्तीच्या सुवासाने सारे घर सुगंधित झाले होते अन् उमेशचे मनही!

मोबाईल : 77 98 35 27 69

●


**वेलंकन्नी माता यात्रेकरूंकरिता आनंदाची बातमी !**
**वेलंकन्नी मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या सर्व भाविकांकरिता खास सुविधा**

**खुशखबर** **खुशखबर**





**हॉटेल विल्सन आता नवीन व्यवस्थापनाखाली !**
**आता व्यवस्थापन करत आहेत-रायन रेसिडेंन्सी वेलंकन्नी (रायन केटरस - उत्तन डोंगरी)**
हॉटेल विल्सन वेलंकन्नी बसस्टँड जवळ, वेलंकन्नी, नागपट्टिनम, तामिळनाडू - 611111

**आमच्या विशेष सुविधा:**
- स्वच्छ व आरामदायी रुम्स.
- कुटुंबांसाठी सुरक्षित व शांत वातावरण.
- चर्चपासून कमीत कमी अंतरावर.
- स्विमिंग पूल उपलब्ध.
- मोफत पार्किंगची सुविधा.
- ४ स्वतंत्र बंगलो स्वयंपाकगृहासह उपलब्ध आहेत.
- डिलक्स रुम्समध्ये २४ तास गरम पाण्याची सुविधा.
- ग्रुपसाठी स्वतंत्र स्वयंपाकाची जागा उपलब्ध.
- भाविकांसाठी रेस्टॉरंट लवकरच सुरू होत आहे.

**ग्रुप यात्रा, कुटुंब सहल आणि मंडळांसाठी विशेष व्यवस्था उपलब्ध।**
**आपणा सर्वांची वेलंकन्नी यात्रा सुखकर व आनंददायी करण्यासाठी आजच बुकिंग करा !**

बुकींग माहितीसाठी संपर्क करा - 9076482336 / 7338860539
9987080007 / 8898578959 / 7977832861 / Email : ryanresidencyvelankanni@gmail.com



# वधू-वर सूचक मंडळ : काळाची गरज

-थॉमस ब्रिटो
आक्टण, सांडोर

लग्न हा आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा टप्पा असतो. मनाजोगता जोडीदार मिळाल्यानंतर सहजीवनाला सुरुवात करताना एक वेगळेच समाधान लाभते. पूर्वी सोयरिक आप्तस्वकीय, मित्र-मैत्रिणी ह्यांच्या परस्पर स्नेहसंबंधातून होत असे. आर्थिक व सामाजिक स्तरांचे बंधन हा एकमेव मान्यताप्राप्त निकष त्यामागे असे. विवाह शक्यतो गावात, क्वचित प्रसंगी शेजारच्या किंवा पंचक्रोशीतल्या गावांत घडून येत असे. त्यावेळेस वधू-वर हे वडिलधाऱ्यांचा मान ठेवत असत. त्यांचा शब्द प्रमाण मानत असत.

आजच्या युगात शिक्षण, नोकरी व नवविचारांचा अनुनय करणाऱ्यांनी विवाह संस्कृतीचा चेहरा-मोहराच बदलला. अनेक ठिकाणी वधू-वर सूचक मंडळे निघाली. वधू-वरांच्या पसंतीला जास्त प्राधान्य देऊ लागले व वधू-वरांना आपल्या पसंतीस स्वातंत्र्य मिळाले. आपला गाव, शहर, देश व परदेशांतूनही परस्परांसाठी मागणी येऊ लागली. कॉम्प्युटर, मोबाईल ह्यामुळे जग एकदम जवळ आले व ही प्रक्रिया फारच सुलभ झाली. ह्यामुळे चॅटिंग व ऑनलाईन पसंतीचे प्रमाणही वाढले आणि ह्या प्रक्रियेमध्ये शीघ्रता आली.

सन २०१४ मध्ये समाजाची गरज लक्षात घेऊन थॉमस ब्रिटो (सांडोर), श्रीमती एरीना डिसोजा (सांडोर) व श्री. ऑल्वीन घोन्सालविस (मर्सेस) ह्यांनी पुढाकार घेऊन दोन वधू-वर मेळावे लोकसेवा मंडळ, बंगली येथे भरविले होते. त्यावेळी नव वधू-वरांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यातून जवळपास २५ वधू-वरांची लग्ने जुळून आली. त्यावेळेस फा. हिलरी फर्नांडीस (उत्तन चर्च) हे आध्यात्मिक सल्लागार होते.

सुसंस्कृत व उच्चशिक्षित वसईतील कॅथलिक समाजामध्ये सध्या योग्य जीवनसाथी मिळणे कठीण झाले आहे. वसईत लोकसेवा मंडळाच्या विद्यमाने सर्व ख्रिस्ती परिवारासाठी ख्रिस्ती वधू-वर सूचक समितीची १ मे २०२३ रोजी स्थापना केली. त्या समितीद्वारे विवाह जुळविण्याचे कार्य सुरू आहे. कदाचित उच्च शिक्षण घेत असताना किंवा करिअरला प्राधान्य दिल्यामुळे किंवा आपल्या अपेक्षेप्रमाणे आपणांस जोडीदार न मिळाल्याने आपल्या वसईतील ख्रिस्ती समाजातील मुला-मुलींचे वधू-वर शोधायला जायचे कुठे? ह्या विवंचनेत लग्नाचे वय निघून जाते.

आज आपल्या वसईतील ख्रिस्ती मुले-मुली उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे वाडवळ, कुपारी, कोळी, ईस्ट इंडियन असा भेदभाव न करता ख्रिस्ती समाजातील मुला-मुलींना योग्य जीवन साथी निवडण्यास मदत व्हावी ह्या हेतूने त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणून ही वधू-वर सूचक समिती मेळाव्याचे आयोजन करीत असते. आतापर्यंत आठ वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तीन वर्षाच्या कालावधीत जवळजवळ ७७० वधू-वरांची नोंदणी झाली व २२४ वधू-वरांची लग्ने जुळून आली व यशस्वीही झाली.

सदर समितीचे कायदा सल्लागार ॲड. रॉबर्ट डाबरे आहेत. आध्यात्मिक सल्लागार फा. स्टीफन मच्याडो, अध्यक्ष लुकस परेरा व लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष गॉडफ्री कोरिया हे आहेत. वसईतील धर्मग्रामामध्ये संपर्कासाठी सभासदांची नेमणूक केली आहे. क्रुझ बोटीवर, मोठ्या हुद्द्यावर, तसेच स्वत:चा व्यवसाय असलेली, आय.टी. प्रोफेशनल्स, बँकर्स तसेच विधूर, विधवा व घटस्फोटीत स्थळेही भरपूर आहेत. प्रत्येक शनिवारी व रविवारी समितीचे सभासद रजिस्ट्रेशन व गरजूंना माहिती आदान-प्रदानाच्या कामासाठी सकाळी १०.०० ते दुपारी १२.००वाजेपर्यंत त्यांचा अमूल्य वेळ देत असतात.

पैसा, प्रॉपर्टी म्हणजे सुख नाही. पालकांनो व मुलामुलींनो, भविष्याचा विचार करून निर्णय घ्या. वय वाढल्यावर तडजोड करणे अपरिहार्य आहे. त्यासाठी तारुण्य पणाला लावून अपेक्षांचे ओझे कुठे, किती काळ वाहायचे? अवास्तव अपेक्षाच्या जंजाळात अडकून न पडता समजदारीने निर्णय घ्या. ह्यामध्ये पालकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. पाल्याला समजावणे हे आपले कर्तव्य आहे.

हाताची पाचही बोटे सारखी नाहीत. जगी सर्व गुणसंपन्न असा कोणी नाही. योग्य वेळेत, वयात विवाहाचा निर्णय घ्या. सुखी वैवाहिक जीवन हा मानवी जीवनाचा मोठा आनंद आहे.

मोबाईल : 94 22 66 87 22

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

लुकस परेरा : 99 60 28 98 34

गॉडफ्री कोरिया : 88 05 01 46 78

## जेरूसलेम टूर्स अॅन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

१) **मॅंगलोर, उडीपी, कुर्ग सहल** : दिनांक ७ ते १४ नोव्हें. २०२६. ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईट सीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रु. २७,०००/- व लहान मुलांस रु. २२,०००/-

२) **कोकण, मालवण, तारकर्ली सहल** : दिनांक २१ ते २६ नोव्हें. २०२६. थंड व हिरव्यागार निसर्गाची मजा लुटण्यासाठी ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईटसीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रुपये १९,०००/- व मुलांस रु. १५,०००/-.

* **Quality And Quantity No Compromise.**

* संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**(Whatsap)

* पायस घोन्सालवीस, उमराळे : **C/O 9766092738**

## युनिक पेस्ट कंट्रोल

**प्रो. : थॉमस वर्गिस**
माळुंगी, मुळगाव, वसई.
**7770026783,**
**9320032074**



१) २६ वर्षे कार्यरत असलेली.

२) सेवाभावी संस्था, हॉस्पिटल्स, कार्यालये, हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, बंगलोज, फॅक्टरी यांसारखे संतुष्ट ग्राहक.

३) नवीन बांधकाम, नूतनीकरण व राहत्या घरासाठी वाळवी प्रतिबंधक योजना.

४) झुरळ, मुंग्या, कोळी, रांगणारे किटक, उंदीर, पाली ह्यांच्यासाठी जनरल प्रतिबंधक योजना.

५) नॉन टॉक्सीन केमिकल हर्बल व जेलमध्ये सर्विस उपलब्ध.

**-: संपर्क :-**

**9323232074, 7768000260**

**ऑफिस :** डिकुनावाडी, मुळगाव, वसई.

## O2 HOLIDAY S

CONTACT NO. 9867681493- 9503569393
EMAIL :02holidays1403@gmail.com

१) **मद्रास - वेलंकनी माता सहल** : ०४ ते ०८ सप्टें.२०२६. वास्तव्य : हॉटेल व्ही पी एन ग्रॅण्ड - स्वतंत्र रुम पर्याय उपलब्ध आहे.

२) **व्हिएतनाम :** ३ ते ११ नोव्हेंबर २०२६. ७ रात्र - ८ दिवस , हनोई, दानांग, हो ची मिन, हॅलोग बे क्रुझ , जेवण व स्थळदर्शन, ४ वेळा विमान प्रवास. एकूण सहल खर्च प्रत्येकी रु. १२५०००/-मात्र.

३) **अंदमान हेवलॉक, नील, बाराटंगा आयलॅंड, पोर्ट ब्लेअर सहल** दिनांक ०५ ते १० नोव्हेंबर २०२६. एकूण सहल खर्च रु. ८०,०००/-मात्र.

४ ) **बडोदा (Statue of Unity) , बडोदा माता व सुरत सहल** : दिनांक :- १५ ते १७ सप्टेंबर २०२६. प्रवास :- Vande bharat सहल खर्च रु. ११५००/-मात्र.

**टिप :** देश - विदेशात स्वतंत्र, ग्रुप टुर, चर्च, शाळा, महिला व ज्येष्ठ नागरिक संघटना आणि हनिमून पॅकेजसाठी संपर्क करा.

**-: संपर्क :-**

मिल्टन डिकोस्टा : c/o ९८६७६८१४९३
विन्सेंट रॉड्रीग्ज : ९५०३५६९३९३
सोन्या गासकर : ९००४७५४६९६







# आनंदी संध्याछाया

**- सचिन इनास लोपीस**
राजोडी

३३ वर्षांपूर्वी दहावीत असताना आमच्या मॅडमने 'पॅरिस शहरामध्ये दिवसाला तीन वेळा फॅशन बदलते', असे एक विधान केलेले आठवते. आज मात्र आपल्या सगळ्यांचा जगण्याचा वेग इतका प्रचंड वाढला आहे की कालच्या संकल्पना आजच जुन्या व कालबाह्य ठरू लागल्या आहेत. वर्तमान सोडाच; पण नेहमी भविष्याचा वेध घेऊन त्यासाठीचा पदपथ आजच तयार करायची नितांत गरज जाणवू लागली आहे.

आज सारं जग एक वैश्विक खेडं (ग्लोबल व्हिलेज) म्हणून आकाराला आलं आहे. स्थलांतर आता जीवनाचा एक स्थायिभाव बनला आहे. आपली मुले शिक्षण, करिअर व प्रगत जीवनशैलीचे आकर्षण इत्यादी कारणांसाठी कायमचे स्थायिक होण्यासाठी परदेशी जात आहेत. त्यामुळे पुढेमागे वसईत आपल्या समाजात फक्त ज्येष्ठ नागरिकच राहणार आहेत. जरी ह्या ज्येष्ठांनी आपल्यासाठी भविष्यकालीन आर्थिक तरतुदी केल्या असतील, तसेच त्यांना कुटुंबीयांकडून आर्थिक साहाय्य लाभत असेल तरीही पंखातली ताकद संपली किंवा दुर्दैवाने खाटेवर पडून एकटेपणाचे जीवन जगण्याची वेळ आली तर?...

बायबलमधील 'जरी तुझे आई-बाबा म्हातारे झाले तरी त्यांच्यावर दया कर' (बेनसिरा ३:१-३६) ही आपली ख्रिस्ती श्रद्धा कितीही अंतर्यामी रुजलेली असली तरीही ह्या पुढच्या पिढीकडून आपली सेवाशुश्रूषा करण्याची अपेक्षा न केलेलीच बरी! आपल्या संध्याकाळची तजवीज आपण आधीच करून आत्मनिर्भर व्हायची वेळ आता आली आहे. आपल्या भारतीय प्राचीन संस्कृतीत वान-प्रस्थाश्रमाचे वर्णन केलेले आहे. माणसाने एका ठरावीक काळानंतर आनंददायी ध्यानासक्तीचं व्रत अंगीकारून देहाने नि



मनाने निवृत्त होऊन शांतीचे जीवन जगलेले बरे!

१) आपल्या प्रत्येक चर्चच्या मराठी शाळेच्या खोल्या विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे रिकाम्या झाल्या आहेत. त्या वर्गखोल्या सुसज्ज केल्या तर निवासाचा प्रश्न आपसूक सुटेल. चर्चचे भले मोठे आवार, मैदान, स्टेज असा सारा सेटअप आधीपासूनच तयार आहे.

२) दैनंदिन देखभालीसाठी नर्स, हाऊसकीपर, सुरक्षा रक्षक, मदतनीस, स्वयंपाकी इत्यादी कर्मचारी नेमता येतील.

३) शाळा चर्च आवारातच असल्याने ज्येष्ठांना आपल्याच पॅरिशमध्ये राहात असल्याची अनुभूती येईल. अडचणीच्या वेळी कुटुंबीयांशी वा इतर नातेवाईकांशी संपर्क साधता येईल. तसेच दररोजची मिस्सा, धार्मिक कार्यक्रम तसेच योगा, ध्यानधारणा असे इतर उपक्रम राबविता येतील. चर्च आवारात बागकाम, परसबाग फुलवून चर्च परिसराच्या हिरव्या सौंदर्यात भर पडेल.

४) ह्या प्रकल्पासाठी जो काही दैनंदिन देखभाल खर्च होईल तो त्या ज्येष्ठाकडून किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून करता येईल. जे ज्येष्ठ नागरिक आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील असतील त्यांनाही दानशूर व्यक्तींच्या साहाय्यातून मदत करता येईल. ह्या प्रकल्पासाठी आपली कॅथलिक बँकदेखील आपल्या भागधारकांसाठी काही अर्थसाहाय्यपर योजना राबवू शकते. खूप लोकांची ही गरज आहे.

आपल्या वसई धर्मप्रांतात बिशपांच्या नेतृत्वाने व धर्मगुरूंच्या प्रेरणेने समाजातील अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने मोठमोठे प्रकल्प उभारले आहेत. 'सावध ऐका पुढल्या हाका' ह्याप्रमाणे आपण हा विषय गांभीर्याने चर्चिला आणि एक नमुना सर्व्हे घेतला तर लोकांची वस्तुस्थिती प्रकर्षाने समजेल. ज्येष्ठांना त्यांच्या हक्काचे, समाधानाचे साधे सोपे व कमीत कमी गरजाधिष्ठीत शांतीचे व सेवेचे सहजीवन जगण्यासाठी आजच पाऊल उचलले तर आपली 'सेकंड इनिंग' ओझे न बनता ज्येष्ठांच्या अनुभवाच्या शिदोरीने समाजाला विधायक ऊर्जा मिळेल व आपल्याला खऱ्या अर्थाने 'हॅप्पी संध्याकाळ'चं कृतज्ञतेचं गिफ्ट त्यांना देता येईल.

मोबाईल : 99 69 22 94 57

## जाहिरातदारांसाठी खुलासा

**'सुवार्ता'मध्ये जाहिराती व शोकसमाचार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंतच स्वीकारल्या जातात** हे आपणास माहीतच आहे. मात्र एकूण पृष्ठसंख्या व जाहिरातींची पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागत असल्यामुळे रंगीत व कृष्णधवल जाहिरातींची पाने वरील तारखेच्या आत भरली गेल्यास नाईलाजास्तव आम्ही आपली जाहिरात स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून कृपया शेवटच्या घटकेपर्यंत थांबणाऱ्यांना जाहिरातीसाठी जागा उपलब्ध होऊ शकेलच ह्याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही.

**- व्यवस्थापक**

## व्ही.एम्. टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी
**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405**

**सेंट ज्यूड नोव्हेना, झाँसी (२४ ते ३० ऑक्टो. २६)**

२१,०००– जाता–येता राजधानी 3AC+ए.सी.रूम+ जेवण+ १दिवस– आग्रा सिटी/ ताजमहाल/लाल किल्ला, १ दिवस– ग्वाल्हेर सिटी, ३ दिवस– झाँसी सिटी/ किल्ला व शॉपिंग (सर्व एन्ट्री समाविष्ट) (४ जणांसाठी १ रुम). **निवासव्यवस्था:** हॉटेल यात्रिक एसी डायनिंग हॉल+लिफ्ट+वायफाय (स्पॉट प्राईजसह स्पेशल गेट टुगेदर– २७ ऑक्टो.) (चर्च पाच मिनिटे पायी अंतरावर)

**झाँसी–दिल्ली–आग्रा–ग्वाल्हेर (२४ ऑक्टो. ते २ नोव्हें. २६)**

४ दिवस झाँसी/३ दिवस दिल्ली. **दिल्ली साईटसीन–** कुतुब मीनार, अक्षरधाम मंदिर, राजघाट, लोटस टेंपल, जामा मस्जिद, इंडिया गेट, राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, चांदनी चौक, शॉपिंग– मीना बाजार, सदर बाजार.
**एकूण खर्च : रु. ३५,०००–** जाता–येता राजधानी 3AC + ए.सी. रूम+ जेवण

**रॉयल राजस्थान : ४ ते १६ व ९ ते २१ नोव्हें. २०२६**

**जयपूर** (२ रात्र)– हवा महल, बिर्ला मंदिर, आमेर किल्ला, पॅलेस. **पुष्कर** (१ रात्र)– ब्रह्मा मंदिर, पुष्कर लेक. **बिकानेर** (१ रात्र)– जुनागड किल्ला, पटवा हवेली. **जेसलमेर** (२ रात्र)– कँपमध्ये १ रात्र वास्तव्य, कॅमल सफारी, कलबेलीया नृत्य, जेसलमेर फोर्ट, तनोत माता मंदिर, गडिसर लेक. **जोधपूर** (१ रात्र)– मेहरागड फोर्ट, जसवंत थडा, उमेद भवन. **चित्तोडगड** (१ रात्र)– कुंभा पॅलेस, मीरा मंदिर, विजयस्तंभ, जोहार स्थल, पद्मिनी पॅलेस, कीर्तिस्तंभ. **उदयपूर** (२ रात्र)– सिटी पॅलेस, सहेलीयों की बारी, पिचोला लेक, फतेहसागर लेक. **माऊंट अबू** (१ रात्र)– अचलगड किल्ला, नखखी लेक, दिलवाडा मंदिर, सनसेट पॉईंट.
**मुंबई ते जयपूर आणि माऊंट अबू ते मुंबई (3AC) साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) एकूण खर्च : रु. 45,000/- लहान मुलांचे रु. 39,000/- (४–११ वर्षे)**

**केरळ टूर : ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२६**

**मुन्नार** (२ रात्र)– माटुपेटी व कुंडला डॅम, टी म्युझियम, ब्लॉसम पार्क, बोटॅनिकल गार्डन ग्लास ब्रीजसह, झिप लेन, एर्नाकुलम नॅशनल पार्क, रोझ गार्डन. **ठेकडी** (१ रात्र)– मसाले प्लँटेशन, स्वखर्चाने एलिफंट सफारी, बोटींग, स्वखर्चाने कथकली नृत्य व इतर. **अलेप्पी** (१ रात्र)– हाऊसबोटमध्ये वास्तव्य. **कोवालम** (१ रात्र)– जटायू अर्थ सेंटर, वरकला बीच. मंदिरे व चर्चला भेट, शॉपिंग इ.
**वसई ते एर्नाकुलम व एर्नाकुलम ते वसई (3AC Rajdhani) साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) एकूण खर्च : रु. 43,000/- लहान मुलांचे रु. 40,000/- (४–११ वर्षे)**

**श्रीलंका : ५ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२६ (५ रात्री/६ दिवस)**

**एकूण : रु. 71,000/- (कोलंबो– कँडी– नुवारा एलिया– एला– गॅले– बेन्टोटा)**
**वास्तव्य–** सुंदर ठिकाणी वसलेल्या ४ स्टार हॉटेलमध्ये सुपर डिलक्स रुम्स, **ब्रेकफास्ट/लंच/डिनर–** श्रीलंकन/भारतीय पद्धतीचे, **एसी लक्झरी बसने सर्वत्र प्रवास, सर्व साईटसीन** प्रवेश फी समाविष्ट, इन्शुरन्ससह फ्लाईट खर्च समाविष्ट.

**वेलंकनी ख्रिसमस वीक टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६**

**रु. १०,००० :** जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), **रु. २७,००० :** संपूर्ण पॅकेज. जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम) मुंबई ते चेन्नई विमानप्रवास व चेन्नई ते वेलंकनी (**3AC**) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन (**१ दिवस पाँडेचेरी आणि १ दिवस पुंडीमाता तंजावर**)

**हैदराबाद टूर : २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६**

१८,०००– जाता–येता ३ टीयर एसी ट्रेन, हैदराबादमध्ये ३ रात्र/४ दिवस, ए.सी.रूम+ जेवण. निवासव्यवस्था– **सुपर डिलक्स हॉटेल** (घरगुती जेवण दिले जाईल. व्हेज/नॉनव्हेज. ब्रेकफास्ट+लंच+डिनर+गेट टुगेदर+चहा/नास्ता)
**साईटसीन–** सालारजंग म्युझियम, चारमिनार, गोळकोंडा, बिर्ला टेंपल, निजाम पॅलेस, लुंबिनी पार्क, लाइट अ‍ॅन्ड साऊंड, एनटीआर गार्डन, रामोजी फिल्मसिटी (संपूर्ण दिवस) शॉपिंग, कराची बेकरी व इतर साइटस् (वेळेनुसार)

**Contact : Alister- 9011890360 / Francis- 9765443414 / Dennis- 8766589780 / Aurice- 9960107733**



## SARAH & SARAH TOURS

Since 2005

१) **व्हिनस व्हिएतनाम-हनोई, दा नांग, हालॉग बे क्रूज, हो ची मिन्ह :** दिनांक 06 ते 15 Nov. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 1,22,000/-. With Disc. व्हिएतनाम एअरलाइन्स विमानाने.

२) **रमणीय श्रीलंका-कॅन्डी बेनटोटा, न्यूवारा एलिया, कोलंबो :** दिनांक 07 ते 12 Nov. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 72,000/-.With Disc. एअर इंडिया विमानाने.

३) **थायलंड,बँकॉक,पट्टाया :** दिनांक 16 ते 22 Nov. 26.

४) **रॉयल राजस्थान-जयपुर,बिकानेर, जेसलमेर, जोधपुर, उदयपूर, चित्तोडगड :** दिनांक 13 ते 22 Nov. 26. Rs. 43,000/-.With Disc. All 3 STAR HOTELS.

५) **स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत सहल :** दिनांक 25 ते 27 Sept. 26. व दिनांक 28 ते 29 Dec. 26. Rs. 11,000/-. (चार जणांस एक रूम). वंदे भारत व इंटरसिटी ए.सी. ट्रेन, श्री स्टार हॉटेल सयाजी इफोटेल.

६) **दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, सेंट ज्युड नोव्हेना, झाशी :** राजधानी ट्रेनने. दिनांक 20 ते 29 Oct. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 31,000/-. प्रती व्यक्ती (4 Sharing).

७) **सेंट ज्युड नोव्हेना झाशी :** राजधानी ट्रेनने. दिनांक 24 ते 29 Oct. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 21,000/-. प्रती व्यक्ती (4 Sharing).

८) **धम्माल ख्रिस्मस गोवा सहल :** कोकण रेल्वेने. दिनांक 26 ते 30 Dec. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 19,000/- प्रती व्यक्ती (4 Sharing).

९) **हैद्राबाद-रामोजी फिल्मसिटी, स्नोवर्ल्ड ख्रिस्मस सहल :** दिनांक 26 ते 31 Dec. 26. एकूण खर्च प्रत्येकी Rs. 18,500/-. प्रती व्यक्ती (4 Sharing).

रेल्वे बुकींग ६१ दिवस आगाऊ असल्यामुळे आजच नावनोंदणी करा.

**10) Dubai Shopping Festival With Abu Dhabi. Dt. 09 To 14 Jan. 2027.**

**11) Japan-Cherry Blossom Tour : Dt. 2nd April 2027.**

* **आम्ही देश विदेशातील हनिमून पॅकेजेस तसेच शाळा, कॉलेज, चर्च संलग्न संघटना, सिनियर सिटीझन आणि स्वतंत्र ग्रुप सहली आयोजित करतो.**

**Cont. : Prop. Charles : 9930871303**

**C/O - William : 9930832035**

Office No. 1, Near PASAYDAN Church, Nalla

# नागरी समस्या निवारण : संविधानानुसार कार्य

## सत्य-अहिंसेचा मार्ग

भारतीय संविधान नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्याचा, न्याय मिळवण्याचा आणि लोकशाही मार्गाने शासनाकडे दाद मागण्याचा अधिकार देते. त्यामुळे कोणत्याही नागरी समस्येवर कायदेशीर, शांततापूर्ण मार्गांचा अवलंब करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि हेच आपण आजवर शिकत आलो आहोत. ह्यासाठी आपण RTI कायद्याची माहिती घेऊन वेळोवेळी याचिका दाखल करू शकतो. सामाजिक माध्यमेसुद्धा प्रश्न मांडण्याचे सर्वोत्तम मार्ग आहेत. लोकशाही अबाधित ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि त्यासाठी सत्य अहिंसेचा मार्ग धरणे उचित आहे.

**- ब्रिनल सेल्विन क्रास्टो,** परसाव, नंदाखाल




## स्वत: एक पणती व्हावे

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला आपले जीवन जगण्यासाठी काही हक्क व जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्यातील महत्त्वाचा हक्क म्हणजे नागरी सुविधा मिळणे होय. प्रत्येक नागरिकाला ह्या गोष्टी मिळविण्यासाठी पावलोपावली सामना करावा लागतो. नागरी समस्या निवारण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपण संविधानाचे एक घटक आहोत, ही जाणीव ठेवली पाहिजे. समस्या न्यूनतम असतानाच ती निस्तारली पाहिजे. आपल्या समस्या निवारण्यासाठी आपण योग्य तो विधायक मार्ग निवडला पाहिजे. ह्यासाठी सूर्य बनण्याची गरज नाही; तर एखादी पणती बनून इतरांना मार्गदर्शनाने त्यांच्यातील ऊर्जा प्रज्वलित करणे हे आपले कर्तव्य ठरते. अशाने आपण संविधानाला मदत करून इतरांचे जीवन सुखकर करतो. काही वेळेस नागरी समस्या राजकारणाला वळसा घालतात म्हणून योग्य ती कमिटी स्थापन करून त्यांना मार्गदर्शन करणे आपले इति कर्तव्य ठरते.

**-जेम्स अँथनी लोपीस,** पाली
Mob. : 84 07 93 51 78

## लोकप्रतिनिधी व प्रशासनाशी संवाद

पाणी, रस्ते, आरोग्य, स्वच्छता ह्या ज्वलंत नागरी समस्या सोडविण्यासाठी भारतीय संविधानाच्या तत्त्वांनुसार लोकशाही मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत पुढील उपाय करावेत :

समस्येबाबत नागरिकांनी जागरूक होऊन योग्य माहिती मिळवावी. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे (महापालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत) लेखी तक्रार करावी. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा वापर करून प्रशासनाकडे न्याय्य मागणी करावी. मूलभूत कर्तव्यांचे पालन करत स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक मालमत्तेची काळजी घ्यावी. लोकप्रतिनिधी व प्रशासनाशी संवाद साधून समस्या मांडावी. आवश्यक असल्यास जनहित याचिका किंवा न्यायालयीन मार्गांचा अवलंब करावा. आंदोलन करायचे असल्यास ते शांततामय, अहिंसक आणि कायदेशीर पद्धतीने करावे.

**- कॅथरीन इरेमस फरगोज,** गास

## संविधान रस्त्यावर उतरवले पाहिजे

नळाला पाणी येत नाही, रस्त्यावर खड्डे, कचऱ्याचे डोंगर... ओरडून-ओरडून दमलो. पण पुढे काय? संविधान फक्त हक्क देत नाही, कर्तव्यसुद्धा सांगते. कलम ५१ अ नुसार स्वच्छता ठेवणे, सार्वजनिक मालमत्ता जपणे हे आपले काम आहे आणि कलम २१नुसार जगण्याचा अधिकारसुद्धा आपलाच आहे. तक्रार निवारण्यासाठी गप्प न बसता महापालिकेला जाब विचारा. RTI टाका, नगरसेवकांना घेराव घाला. मतदान करून जबाबदार माणूस निवडा. जोपर्यंत प्रत्येक नागरिक जबाबदार होत नाही, तोपर्यंत 'वसईचा कायापालट' हा फक्त नारा राहील. संविधान फक्त पुस्तकात नाही. ते रस्त्यावर उतरवले पाहिजे. तेव्हाच 'वसईचा कायापालट' खऱ्या अर्थाने होईल.

**-नागेश प्रमोद राऊत,** भंडारवाडा, आगाशी
Mob. : 90 28 28 38 75

## श्वेतपत्रिका सादर करणे

आजच्या घडीला वसई-विरार ही पावसाळ्यात बुडणारी नगरी झाली आहे. ही मोठी व ज्वलंत समस्या आहे.

गेल्या पंचवीस वर्षांपासून आम्ही चुळणकर पावसाळ्यात येणाऱ्या पुरात बुडतो. सर्व प्रकारचे दळणवळण बंद पडते. चाकरमानी आठ-आठ दिवस घरात बसतो, गटाराचे पाणी घरात घुसल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरते. सर्वत्र रोगराई पसरते. शेतातील बी-बियाणे कुजू लागतात, शेतकऱ्यांनी आता शेती करायची सोडून दिली आहे. विकासकांना कवडीमोलाच्या भावाने जमीन उपलब्ध होणार आहे. संविधानाच्या मार्गाने त्याच्यावर उपाययोजना करायची म्हणजे, सत्ताधाऱ्यांनी संबधित लोकांची सभा लावावी, दरवर्षी येणाऱ्या पुरासंदर्भात एक श्वेतपत्रिका सादर करावी, निरी व IIT च्या अहवालाची पूर्तता करावी किंवा त्यात काय अडचणी आहेत त्या सांगाव्यात. जर सत्ताधाऱ्यांची इच्छाशक्ती असेल तर समस्या सुटायला वेळ लागणार नाही.

- **जॅक गोम्स,** चुळणे
Mob. : 90 28 19 58 88

## प्रश्नांचा पाठपुरावा करणे

आज वसईत झपाट्याने लोकसंख्या वाढली आहे. रस्ते, पूल, पाणीपुरवठा व्यवस्था आणि इमारतीची अनधिकृत बांधकामे ह्यामुळे पावसाचे पाणी साचून घरे-दारे पाण्यात जातात. ह्यावर उपाय म्हणजे वाढणाऱ्या लोकसंख्येला थांबविणे, अनधिकृत बांधकामावर बंधने आणणे, बावखलं साफ करणे, आरोग्य सुविधा, शिक्षण, विजेची सुव्यवस्था, इंटरनेट, महिला स्वरक्षण करणे, लोकांचा विश्वास संपादन करणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवणे, आरोग्य शिक्षण, वाहतूक प्रतिबंधक बंधारे, घनकचरा, मत्स्यव्यवसाय ह्यावर व्यवस्थापन करणे व संरक्षण करणे ह्या सगळ्या प्रश्नांचा सातत्याने नेहमी पाठपुरावा करणे. वसईमधील आदिवासी पाड्यांना रस्ते, शिक्षण, पाणी, वीज, आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

**-वनितामेरी वॉल्टर डिमेलो,** वरभाट, मुळगाव
Mob. : 86 98 22 76 59

## हक्कांबरोबर कर्तव्याची जाणीव




भारताचे संविधान समजून घेणे, अभ्यासणे हे केवळ न्यायाधीश, वकील, नेते, पोलीस ह्यांचेच काम आहे असे नाही. संविधानाचा अभ्यास शाळेत नागरिकशास्त्र, कॉलेजमध्ये राज्यशास्त्र ह्यापुरताच मर्यादित ठेवला जातो. एक जागृत सामान्य नागरिक म्हणून देशाचा कायदा समजून घेण्यासाठी, सर्वांनी संविधान अभ्यासले पाहिजे. संविधान इतिहासजमा करून चालणार नाही. कारण ते जरी इतिहासात लिहिले गेले तरी त्याचा वापर आजच्या वर्तमानकाळातही तितकाच मार्गदर्शक व उपयुक्त आहे. सत्ता बदलते, नेते बदलतात, समाजजीवनही बदलते तरी संविधान जे काल होते, तेच आज आहे आणि तेच उद्याही असणार आहे. सामाजिक स्थित्यंतरानुसार त्यामध्ये दुरुस्त्या होतील.

कोर्टात अंतिम न्यायनिर्णय देताना न्यायाधीश संविधानाचाच आधार घेतात. संविधानाची मूलभूत संरचना, मूळ चौकट कोणीही बदलू शकत नाहीत. वकिलांना देखील आपल्या अशिलाची बाजू मांडण्यासाठी संविधान मार्गदर्शक ठरते. प्रत्येक भारतीय नागरिकाला संविधानाने मूलभूत हक्क आणि कर्तव्ये बहाल केलेली आहेत. हक्क आणि कर्तव्य ह्यांमुळे भारतीय सामान्य नागरिक चांगले जीवन जगू शकतो. परंतु तसे प्रत्यक्षात घडत नाही. कारण सामान्य नागरिकांमध्ये संविधानाविषयी असलेले अज्ञान जाणून घेण्याबाबत असलेली उदासिनता. भारतासारख्या लोकशाही देशात भ्रष्टाचार, बेरोजगारी, लैंगिक अत्याचार, सामाजिक-आर्थिक विषमता, भेदभाव ह्या सर्व समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी, त्याविरुद्ध लढा देण्यासाठीच सर्वांनी संविधानाने बहाल केलेले मूलभूत हक्क आणि कर्तव्ये अभ्यासावीत. निदान त्याची जाणीव, माहिती अचूक असावी.

हक्कांबद्दल, अधिकारांबद्दल नेहमीच सजग असतो. परंतु त्याबरोबरच आपण आपल्या कर्तव्याबद्दलही जबाबदार, जागृत असावे. माणसाला जीवन जगताना बहुतेकदा कर्तव्याचा विसर पडतो. कर्तव्य ही एक नैतिक जबाबदारी असते. हक्क, अधिकारासाठी आपण भांडतो, लढतो. पण तेच कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपण कंटाळा करतो, दुर्लक्ष करतो. प्रत्येक नागरिकाने आपली कर्तव्ये बजावण्यास देखील तेवढेच तत्पर असावे.

- **सेल्मा अनिल डिकुन्हा,** नंदाखाल
Mob. : 98 22 75 53 53

## कोण बहिरा...

अविरत प्रलयगर्जनांनी उन्मत्त झालेल्या
पर्जन्याचे अनंत धारांचे अस्त्र
ह्या महानगराच्या देहसंहितेवर
असंख्य विदीर्ण जखमा कोरत आहे.

रस्त्यांवरून सरपटणारे जलप्रवाह
आदिम नरभक्षकांच्या अतृप्त जिव्हाळ्याने
अस्थिमज्जेतील शेवटचे उष्ण स्वप्नही
चघळत आहेत.

वंचितांच्या आकांक्षांचा मेरुदंड
कुजक्या गाळासारखा इतिहासाच्या
अंधाऱ्या नाल्यात विलीन होत आहे.

कालच्या भग्नावशेषांवर उभारलेली
आजची दर्पोन्मत्त वास्तुराज्ये,
काचांच्या त्वचेवर सभ्यतेची सुवर्णाक्षरे कोरणारी
एका महापुराच्या निःशब्द कंठात
सांडपाण्याच्या फेसाइतकी क्षुद्र ठरून
स्वतःच्या अहंकारासह विरघळून जातात.

या महानगराच्या कॉस्मोपॉलिटन मुखवट्यावर
प्रगती, विकास, स्वर्ग आणि समृद्धीची
भ्रामक सुवचने कोरणारे शब्द आता
रसायनिक धुक्यांत परिवर्तित झाले आहेत;
श्वासांना गुदमरवणारे,
वर्तमानाचे अस्थिकलश फोडणारे
आणि भविष्याला अनिश्चिततेच्या
अधांतरी निर्वासित करणारे.

मात्र, ह्या शहराच्या कंठाभोवती अदृश्य
पाश आवळणारे हात अजूनही कोरडेच आहेत;
एका पर्जन्यबिंदूच्या आत्मकथेशीही
संवाद साधण्याइतके ओलावाहीन.

स्मृतीच्या निर्जल विवरातून
एकच प्रश्न अखंड प्रतिध्वनित होतो,
बहिरा खरोखर पाऊस झालाय का?

की बहिरे आपणच, ज्यांच्या अंतरात्म्यांनी
मेघांच्या गर्जनांना केवळ ध्वनी समजले,
इशारे नव्हे;

ओघळणाऱ्या प्रत्येक थेंबात विलाप
करणाऱ्या पृथ्वीची भाषा ज्यांना कधी
उलगडलीच नाही;
ज्यांनी काँक्रिटच्या अधोगर्भात
स्वतःच्या लोभाचीच प्रेते पुरली,
आणि तिलाच विकासाचे स्मारक म्हणत राहिले.

पाण्याला शस्त्र बनवणारे हात पर्जन्याचे नव्हते
ते आपल्या संस्कृतीच्या रक्तपिपासू हस्ताक्षरांचे होते.
म्हणूनच प्रत्येक ढासळणाऱ्या भिंतीच्या प्रतिध्वनित,
प्रत्येक वाहून गेलेल्या घराच्या हंबरड्यात,
प्रत्येक बुडालेल्या स्वप्नाच्या किंकाळीत
उद्ध्वस्ततेची ध्वनिमुद्रा आपलेच नाव कोरत राहते.

कारण ह्या प्रलयकाव्याचा खरा नायक पाऊस नाही
आणि खरा खलनायकही तो नाही.
न्यायासनावर उभा आहे, स्वतःचा विनाश स्वतःच
लिहिणारा मनुष्य,एकाच वेळी साक्षीदार, अपराधी,
आणि स्वतःच्या प्रलयाचा अंतिम शिलालेख.

**- फा.ओनिल फरोज**



**'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक 'The Suwarta Trust' ह्या नावाने काढावा.**

**- व्यवस्थापक**



## 'सुवार्ता ' मासिक

जगभरात नावाजलेली तू 'सुवार्ता' माऊली,
काळाच्या चाकावर अविरत चालत राहिली,
तुझी दिव्य ज्योत संतत तेवत आहे,
वसईच्या मातीत तू शब्दांचा परिमळ आहे.

तुझ्या कुशीतून जन्मले असंख्य साहित्य-वीर,
लहान-थोर कवींच्या लेखणीला दिलास तू धीर
कार्यकर्त्यांहाती सोपविला मशालीचा प्रकाश
विचारांच्या वाटेवर तूच दाविलास विश्वास.

दरवर्षी साहित्य संमेलनांचा मांडलास थाट,
वसईच्या अंगणी जमविला शब्दांचा घाट.
थोर साहित्यिकांच्या विचारांची मेजवानी,
वाचन-श्रवणाची सवय जडविली रसिकामनी.

'सुवार्ता', तू ना कधी थकली,ना थांबलीस,
कागदाच्या पानापानांतून तू बोलतच राहिलीस,
सुख-दुःखाच्या वार्ता, समाजाच्या करुण व्यथा
अक्षरातून उमटल्या निसर्गरम्य वसईच्या कथा.

जातपात सोडूनी वसईची संस्कृती जपलीस,
माणुसकीची भाषा साऱ्यांच्या मनात रुजविलीस
पिढ्यान्‌पिढ्या घडवुनी ज्ञानाचे दीप लाविले,
वसईच्या इतिहासाला सुवाच्च अक्षरांत बांधले.

'सुवार्ता', तू केवळ वाचायचे मासिक नाहीस,
तर तू एक चळवळ व युवकांची प्रेरणा,
कित्येक वर्षांची तुझी कठोर तपश्चर्या,
अनेक शतके वाचकांची बनली ती दिनचर्या.

तुझ्या पानापानांवर उमटू दे नवनवे विचार,
नवख्या कवींच्या कल्पना घेऊ देत आकार
वसईच्या संस्कृतिचा सुगंधित ठसा,
युगानुयुगे दरवळत राहो 'सुवार्ते'चा वसा.

**- फ्रँक कोलासो,** चुळणे
मो.: 9975743432

# माझे मत

## विद्यार्थी आंदोलन



काही दिवसांपूर्वी दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनामुळे देशभरातील तरुणांबद्दल नव्याने चर्चा सुरू झाली. अनेकदा असे म्हटले जाते की आजचे तरुण फक्त सोशल मीडियात रमले आहेत, स्वतःच्या करिअरचा विचार करतात आणि समाजातील प्रश्नांकडे फारसे लक्ष देत नाहीत. पण ह्या आंदोलनातून अनेक तरुण शिक्षणाशी संबंधित प्रश्नांसाठी एकत्र येऊन शांततेच्या मार्गाने आवाज उठवू शकतात, हे दिसून आले. त्यामुळे तरुण पिढी केवळ स्वतःच्या भविष्यासाठीच नाही, तर समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांबद्दलही जागरूक आहे, असा संदेश ह्या आंदोलनातून मिळाला. हे आंदोलन पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासंबंधी असलेल्या अनेक प्रश्नांमुळे सुरू झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या मांडण्यासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीला ह्या आंदोलनाकडे फारसे लक्ष गेले नाही. मात्र सोशल मीडियामुळे आंदोलनाची माहिती देशभर पोहोचली. विविध राज्यांतील विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि काही सामाजिक संघटनांनी ह्या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यामुळे हा विषय फक्त दिल्लीपुरता मर्यादित राहिला नाही. शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह कशी बनवता येईल, ह्यावर देशभर चर्चा सुरू झाली. अनेक पालकांनीही विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. ह्या आंदोलनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी सातत्याने आपल्या मागण्या मांडण्याचा प्रयत्न केला. अनेक दिवस त्यांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू ठेवले. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील अनेक प्रश्नांकडे लोकांचे आणि सरकारचे लक्ष वेधले गेले.

सरकार कोणत्याही पक्षाचे असो, नागरिकांना प्रश्न विचारण्याचा आणि आपल्या समस्या मांडण्याचा अधिकार असतो. त्याच वेळी सरकारनेही नागरिकांचे म्हणणे ऐकून त्यावर योग्य वेळी निर्णय घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते. संवादातून अनेक प्रश्न अधिक सोप्या पद्धतीने सोडवता येऊ शकतात.

जंतर-मंतर येथील विद्यार्थी आंदोलनाने देशातील अनेक तरुण समाजातील प्रश्नांबद्दल जागरूक आहेत, हा संदेश दिला. ह्या आंदोलनाने शिक्षण व्यवस्थेतील समस्यांकडे लक्ष वेधले आणि लोकशाहीत शांततेच्या मार्गाने आपले मत मांडण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.

- **फ्रँक मिरांडा,** उमराळे,
मोबाईल : 86 00 99 21 15

## हरित वसई झाली काँक्रिटची वसई

एक वेळ अशी होती की आपली वसई फक्त हिरवळ, बागायती, शेती-वाडी आणि संस्कृतीसाठी प्रसिद्ध होती. मात्र सध्याची परिस्थिती पाहता, वसई आता डुबणारी वसई, खराब रस्ते आणि वाढती लोकसंख्या यासाठी ओळखली जाऊ लागली आहे. हळूहळू हे चित्र आणखी गंभीर अन् बिकटहोत जाणार असून, पर्यटनस्थळ म्हणून वसईचे नाव होईल, पण स्थानिक पातळीवर खोलवर पाहिले तर हा एक मोठा धोक्याचा इशारा आहे.

वसईचा एवढा मोठा कायापालट होण्यामागे सर्वांत जास्त हात हा स्थानिक भूमिपुत्रांचा आहे.

आपल्याच लोकांनी पैशाच्या हव्यासापोटी जमिनी विकल्या आणि आताही विकत आहेत बिल्डरांना आणि त्याचा परिणाम सर्व जण उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. जर तीच जागा बिझनेस करण्यासाठी वापरली असती आणि आपल्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला असता तर आज ट्रेनचा धक्का खात मुंबईला जाण्याची गरज आली नसती. पडीत जमिनींवर विविध व्यवसाय सुरू करता आले असते. सोलार पॅनल लावून वीज निर्मिती करणे, गार्डन एरिया करणे, जेणेकरून गावातील आणि परिसरातील लोक निवांत वेळ घालवण्यासाठी, आणि मुले खेळण्यासाठी येऊ शकतील, क्रिकेट, फुटबॉल ग्राउंड करणे, लग्नकार्यासाठी किंवा इतर कार्यक्रमांसाठी ग्राऊंड ठेवणे असे एक ना अनेक गोष्टी करू शकले असते; पण जमिनी बिल्डरांना विकण्याचा सोपा मार्ग निवडला गेला.

अनेक जमिनी आज बाहेरील लोकांच्या आणि बिल्डर्सच्या ताब्यात गेल्या आहेत. तिथे मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या



आहेत आणि परप्रांतीय वस्ती खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आजच्या घडीला वसई ईस्ट, नालासोपारा ईस्ट... खूप झपाट्याने विकसित होत आहेत. चांगल्या टुमदार इमारती कमी किमतीत विकल्या जात आहेत. आपलीच माणसे स्वतःच्या पायावर धोंडा मारत आहेत. आपण हिरवळ, निसर्गाच्या कुशीत राहण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जातो आणि आपल्याकडे असलेली हिरवळ मात्र आपण स्वतःहून नष्ट करत आहोत.

आता हरित वसईची काँक्रिटी वसई होऊन ती सत्य/ अंधारी परिस्थिती एक एक पाऊल पुढे सरकत आहे. जमिनीची दलाली आपलेच स्थानिक लोक हे सर्व गैरव्यवहार करून स्वत:चा फायदा करून पूर्ण वसईला हानी पोहचवत आहेत. एक डील (जमिनीचा सौदा) वसईच्या गावासाठी किती हानिकारक ठरू शकतो ह्याची जरा देखील जाणीव न ठेवता मूठभर स्थानिक दलाल फक्त आपले खिसे भरण्याचे काम  करत आहेत.

आजच्या घडीला एक कटू सत्य असे आहे की जमिनी विकल्या अगोदरच्या पिढीने  आणि त्याची शिक्षा मिळत आहे आताच्या तरुण आणि येणाऱ्या पिढीला.

वसई-विरार गावात Tourist place and Resort system वाढत चालली आहे.. काही स्थानिक लोक ह्याचा फायदा घेत  व्यवसाय सुरू करत आहेत. जिकडे बघावे तिकडे कचरा, ट्रॅफिक, गोंधळ, दादागिरी, गुंडगिरी... एकेकाळचे वसईचे शांत गाव आता अशांत झाले आहे.

**- मेल्सीना तुस्कानो परेरा,** नंदाखाल
मोबाईल : 90 28 60 66 31

## नोटांच्या बाजारात हरवलेली माणुसकी..

आजचा समाज झपाट्याने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगतीमुळे माणसाचे जीवन अधिक सुखकर झाले तरी  काही अमूल्य गोष्टी मागे पडत चालल्या आहेत. त्यापैकी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणुसकी. आज  माणसाची किंमत त्याच्या विचारांवर, चारित्र्यावर किंवा कर्तृत्वावर नव्हे; तर त्याच्या आर्थिक स्थितीवर ठरवली जात आहे. पैशाला दिलेल्या अवास्तव महत्त्वामुळे समाजातील अनेक मूल्ये धोक्यात आली आहेत.

एकेकाळी आपल्या समाजात 'शब्दाला किंमत' होती. एखाद्या व्यक्तीने दिलेले वचन म्हणजे करार समजला जात असे. माणूस आपल्या शब्दासाठी आणि प्रतिष्ठेसाठी कोणत्याही संकटाला सामोरे जायचा. परंतु आजची परिस्थिती ह्याच्या अगदी उलट दिसते. लोकांचे विचार, भूमिका आणि निष्ठा क्षणोक्षणी बदलताना दिसतात. सकाळी घेतलेली भूमिका संध्याकाळपर्यंत बदललेली दिसते. स्वार्थासाठी तत्त्वे बदलणे, सोयीनुसार मत बदलणे आणि फायद्यासाठी कोणत्याही बाजूला उभे राहणे ही सामान्य बाब बनली आहे.

पैशासाठी भाऊ भावाचा, मित्र मित्राचा आणि कधी कधी मुलगाही आई-वडिलांचा विश्वासघात करताना आपण ऐकतो. ही परिस्थिती केवळ चिंताजनक नाही, तर समाजाच्या भवितव्यासाठी धोकादायक आहे.

सर्व संतांनी प्रेम, करुणा, समता आणि बंधुभावाचा संदेश दिला होता. पण आजच्या स्पर्धात्मक युगात ह्या मूल्यांकडे दुय्यम नजरेने पाहिले जात आहे.

सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळेही ह्या परिस्थितीत भर पडली आहे. आज अनेक लोक प्रत्यक्ष जीवनापेक्षा आभासी जगात अधिक रमलले दिसतात.  अनेकजण वास्तवातील नाती आणि जबाबदाऱ्या विसरत आहेत. खोटेपणा, दिखावा आणि बनावटीपणा ह्यांना प्रतिष्ठा मिळत आहे, तर प्रामाणिकपणा आणि साधेपणाला मागासलेपणाचे लेबल लावले जात आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती पैशासाठी आपली निष्ठा विकते, तेव्हा ती केवळ स्वतःचा आत्मसन्मान गमावत नाही, तर समाजातील विश्वासाच्या पायालाही तडा देते.

आजही अनेक लोक प्रामाणिकपणे आपली मूल्ये जपत आहेत. अनेक कुटुंबे, शिक्षक, समाजसेवक आणि जागरूक नागरिक समाजात चांगुलपणा जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या कार्यामुळेच समाजातील माणुसकीचा दिवा अजूनही तेवत आहे. प्रामाणिकपणा, विश्वास, निष्ठा आणि सामाजिक बांधिलकी ह्यांचे महत्त्व ते पुढील पिढीपर्यंत पोहोचवत आहेत. कारण पैसा संपतो, सत्ता बदलते, प्रसिद्धी ओसरते; पण चांगल्या माणसाची ओळख कायम स्मरणात राहते.

**- डेव्हिस डाबरे,** भुईगाव

## आठवणींतील गोष्टी




'आठवणींवर बोलू काही' चित्रकार फ्रान्सिस कोळी ह्यांचा हा कथासंग्रह म्हणजे केवळ स्मरणरंजन नसून आयुष्यात भेटलेल्या व्यक्तींची जणू पुनर्भेट आहे.

जात्याच कलावंताची दृष्टी लाभलेले फ्रान्सिस कोळी पेशाने आर्टिस्ट होते. सरकारी नोकरीत असूनही त्यांनी आपल्या प्रतिभा देणगीची निगुतीने जपणूक केली. गोष्ट रंगवून सांगायची कला त्यांना लाभलेली आहे. माणूस वाचणं, त्याला समजून घेणं आणि त्यांच्या अंतरंगाचा ठाव घेणं हा त्यांचा स्वभावगत गुण असल्याचे ह्या कथांमधून जाणवते. त्यांच्या सर्वच कथांच्या केंद्रस्थानी माणूस आहे; अन् त्याच्यातील माणुसपणाशी ते समरूप होताना दिसतात.

फ्रान्सिस कोळी समाजाच्या अगदी खालच्या थरातील. माणसांशी सहज सख्य जोडतात. निर्हेतूकपणे त्यांच्या अंतरंगात शिरून तशाच निर्लेप मैत्रभावाचा त्यांना आधार देतात. ह्यातनं वंचितांच्या, दुर्लक्षितांच्या जीवनाचं एक वेगळं विश्व आपल्यापुढे कथांमधून उलगडतं.

'अनामिक' ह्या कथेतील भिकारी लेखकाकडे वडा-पावासाठी फक्त पाच रुपयांची मागणी करतो. तेव्हा लेखक खिशातील सर्व २०-२५ रुपयांची चिल्लर काढून त्याला देऊ करतो. पण तो पंगू भिकारी पाच रुपयांची तेवढी नाणी उचलून चालू पडतो. त्याच्या त्या ताठ कण्याची जाणीव होऊन लेखकाला स्वत:ची विकलांगता प्रकर्षाने जाणवते.

एकदा चायनीज गाडीवर एक मुलगा भेटतो. स्वत:साठी व आपल्या आजारी आईसाठी काहीतरी खायला देण्याची तो याचना करतो. एक पाहुणा म्हणून लेखक त्याला फ्राईड राईसची दोन पार्सल द्यायला सांगतो. तो मुलगा नमस्कार करीत म्हणतो, ''आज तुम मेरे लिए भगवान हो, कल दुसरे भगवानको ढूँढना पडेगा ।'' त्यानंतर अनेकदा शोध घेऊनही त्या परिसरात तो मुलगा लेखकाला दिसला नाही.

लोकल गाडीच्या रोजच्या प्रवासात आपल्या ठरलेल्या जागा पकडून अनेक कंपू पत्ते कुटत, भजनं गात व गप्पा छाटीत प्रवास करीत असतात. ह्या कंपूत सामील झालेल्या एका अनोळखी, वयस्कर काकांशी लेखक संवाद साधतात. हमाली करून कुटुंबाला उर्जितावस्था प्राप्त करून देणारे हे काका पुढे काही काळानंतर त्यांच्या एकूणच जीवनाची शोकांतिका वर्णन करतात तेव्हा लेखकाच्या तोंडून शब्द उमटत नाहीत... आणि वाचकही नि:शब्द होतो ('हमाल').

अशाच जीवनसंघर्षात भरडल्या गेलेल्या, नियतीपुढे हतबल ठरलेल्या लोकांच्या कथा प्रस्तुत संग्रहात आहेत. जीव लावून गेलेला हॉटेलमधील वेटर-'सुबू', जोकर, राजा, बबड्या, अन्त्या, बबन्या, रुखसाना इत्यादी व्यक्तींची कथाचित्रे प्रत्ययकारी उतरली आहेत. साधी-सोपी व निवेदनात्मक कथनशैली हे लेखकाचे बलस्थान आहे. लेखकाने स्वत: रेखाटलेली चित्रे कथागत व्यक्तिमत्त्वांना उठावदारपणा आणतात. मुखपृष्ठही अर्थवाही आहे. एकूणच पुस्तकाची निर्मिती आणि सजावट अतिशय देखणी झाली आहे.

**'आठवणींवर बोलू काही'**
लेखक : फ्रान्सिस कोळी
प्रकाशक : माध्यम प्रकाशन, वसई
पृष्ठे : १२४ मूल्य : रु. २००/-

## शब्दचित्रांचा आविष्कार




विविधरंगी कापडांच्या तुकड्यांपासून बनविलेले पांघरूण म्हणजे दुलई. दुलईच्या प्रत्येक तुकड्यातून आठवणींची ऊब अंगावर पांघरली जायची. असेच वेळोवेळी केलेले कवितालेखन - प्रेम, प्रेमातील वैफल्य, विरह, प्रेमपूर्ती, मातृमहिमा, आयुष्याच्या संध्याकाळची कातरता, जीवनाची व्यामिश्रता, नियतीचे खेळ, एकाकी वृद्धत्व, नात्यांमधील पेच इत्यादी एकत्रित करून शिवलेली ही काव्यदुलई म्हणजे फ्रान्सिस कोळी ह्यांचा 'दुलई' कवितासंग्रह. ही काव्यरचना मुक्तछंदात केली आहे. फ्रान्सिस कोळी ह्यांना उपजतच दृष्टीपलीकडचे अदृष्ट पाहण्याची नजर लाभली आहे. फ्रान्सिस कोळी सहज लिहून जातात.

*आयुष्यही असंच असतं ।*
*आपलं असूनही आपलं नसतं ।।*
*जिवंतपणी इथे मरण असतं ।*
*तरीही त्यात खरं जगणं असतं ।।*

('जीवनरंग' पृष्ठ ४१)

'जीवनाचं गाणं' ह्या कवितेत कवी लिहितात,

*सावल्या पायात आल्या जरी ।*
*उभं ऊन झेलावं लागतं ।।*
*गुंतून साऱ्या मोहात परी ।*
*मोकळं होऊन चालावं लागतं ।।*

ह्या शब्दांना कवीच्या स्वत:च्या रेखाटनांमुळे आणखी वजन प्राप्त झाले आहे. प्रस्तावनेत सायमन मार्टिन म्हणतात, ''हा कवितासंग्रह म्हणजे शब्द आणि चित्रांची जुगलबंदीच आहे. कविता सरस की चित्र? संस्काराच्या धाग्यांनी त्यांनी शब्द विणले आहेत.''

कवीवर झालेल्या धार्मिक, कौटुंबिक आणि सामाजिक संस्कारांचे प्रतिबिंब ह्या कवितांच्या शब्दभाषांतून प्रतीत होते.

स्त्री-भ्रूण हत्येवरील 'माझ्या त्या मुलीस' ही पश्चात्तापदग्ध पित्याची आळवणी आपल्याही हृदयाला घरे पाडते. 'आम्ही सारे कावळे' ही 'चिऊताई, दार उघड' ह्या कथेचं रूपक वापरून लिहिलेली कविता म्हणजे वर्तमानकाळावरील मर्मभेदक टिप्पणी म्हणावी लागेल.

भाषिक अलंकाराची आभूषणे न मिरवणारी साधी शब्दकळा आणि सात्त्विक सौंदर्याने नटलेली ही कविता आहे. शब्द-चित्रांचा हा आविष्कार वाचनीय बनला आहे.

**- स्टॅन्ली गोन्सालविस,** पापडी

**'दुलई'**
लेखक : फ्रान्सिस कोळी
प्रकाशक : माध्यम प्रकाशन, वसई
पृष्ठे : १३५ मूल्य : रु. २००/-.

- झेविअर डिमेलो

## आशियाई बिशपांचे अधिवेशन

**जकार्ता (इंडोनेशिया) :** फेडरेशन ऑफ आशियाई बिशप कॉन्फरन्सेसचे बारावे अधिवेशन जकार्तामध्ये २० ते २६ जुलै ह्या कालावधीत पार पडले. कार्डिनल्स, बिशप्स तसेच प्रादेशिक



व इतर प्रतिनिधी मिळून सुमारे १५० प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. त्यावेळी आशियातील तीव्र राष्ट्रवाद, राजकीय ध्रुवीकरण आणि धार्मिक मूलतत्त्ववाद ह्यावर चिंता व्यक्त करण्यात आली. वाढते स्थलांतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरण ह्यांवर चर्चा करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुवार्ता प्रसार आणि सकारात्मक बदलाची नवी संधी म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन मांडला गेला. आशिया खंडातील विविध भौगोलिक आव्हानांना तोंड देण्यासाठी चार उपविभाग स्थापन करून स्थानिक चर्चला मार्गदर्शन करण्यासाठी नियमावली तयार करण्याचे निश्चित झाले. पोप लिओ ह्यांचे विशेष दूत म्हणून उपस्थित असलेले मुंबईचे सेवानिवृत्त आर्चबिशप कार्डिनल ऑझवल्ड ग्रेशस ह्यांनी सभेला मार्गदर्शन केले.

## पोप विश्रांतीसाठी कॅसल गांडोल्फोमध्ये



**व्हॅटिकन :** कॅसल गांडोल्फो रोमपासून २५ कि.मी. अंतरावर असून ५५ हेक्टर जागेवरील ह्या ठिकाणी पॅलेस, सरोवर व गार्डन्स आहेत. पोप लिओ तेथे विश्रांतीसाठी गेलेले असताना त्यांनी आपल्या मोठ्या भावाबरोबर कारमधून फेरफटका मारून निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला. प्रार्थना, वाचन, लेखन व आपली दैनंदिन कामे केल्यानंतर टेनिस खेळणे, पोहणे आणि घोडेस्वारी करणे त्यांना आवडते. सातत्याने काम केल्यानंतर आराम आणि विश्रांती हवीच, ज्यामुळे कार्यक्षमता वाढते, असे ते म्हणतात.

## व्हॅटिकन गार्डन्समध्ये एका प्रतिमेचे अनावरण

**व्हॅटिकन :** व्हॅटिकन गार्डन्समध्ये अवर लेडी ऑफ फातिमा, अवर लेडी ऑफ लुर्ड्स, अवर लेडी ऑफ गुड कौन्सिल, अवर लेडी ऑफ ग्वाडालुपे अशा मरिया मातेच्या २७



वेगवेगळ्या प्रतिमा वा पुतळे आहेत. ते जगभरातील विविध संस्कृतीचे, भक्तीचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये आता पोलंडमधील वर्जिन मेरी ऑफ गिट्रझबाल्डच्या प्रतिमेची भर पडली आहे. तिने पोलंडमधील मुलींना दर्शन दिल्याला २०२७मध्ये १५० वर्षे पूर्ण होत आहेत. पोलंड तसेच व्हॅटिकनच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ह्या प्रतिमेचे अनावरण झाले.

## गरीब लोकांसमवेत भोजन

**रोम :** रोम धर्मप्रांतामधील सुमारे २००गरीब, वंचित, निर्वासित व स्थलांतरित लोकांबरोबर पोप लिओ ह्यांनी दुपारचे भोजन घेतले. भोजनाचा हा कार्यक्रम पोपचे उन्हाळी निवासस्थान कॅसल गांडोल्फो येथे आयोजित करण्यात आला होता. प्रारंभ मिस्साविधीने झाला. पोपनी उपस्थितांबरोबर वार्तालाप करून त्यांचे विचार व समस्या जाणून घेतल्या.

## व्हॅटिकनला मिळाली फियाट गाड्यांची भेट

**व्हॅटिकन :** फियाट वाहन निर्मात्या कंपनीने व्हॅटिकनला २०इलेक्ट्रिक फियाट गाड्या भेट म्हणून दिल्या. व्हॅटिकनच्या पर्यावरण धोरणानुसार कार्बन फूटप्रिंट कमी करण्याच्या उद्देशाने 'इकोलॉजिकल कन्व्हर्जन २०३०' नावाचा शाश्वत गतिशीलता विकास कार्यक्रम राबविला जात आहे. सदर वाहनांमुळे ह्या दशकाच्या अखेरपर्यंत शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य करण्यास व्हॅटिकनला बळकटी मिळेल.

## १५० वर्षानंतर कॅथलिक चर्चचे लोकार्पण

**बर्गन (नॉर्वे) :** १५०वर्षांपूर्वी येथील सेन्ट पॉल चर्च सुरू करण्यात आले होते. त्यावेळी कॅथलिक भाविकांची संख्या अगदीच नगण्य होती. आज ह्या धर्मग्रामात १२०हून अधिक



देशांमधील सुमारे वीस हजार कॅथलिक आहेत. अनेक भाषा, अनेक परंपरा व अनेक संस्कृती असणारे भाविक आपापल्या भाषेत किंवा कधी एकत्र प्रार्थना व मिस्साविधीमध्ये सहभागी होतात. ह्या चर्चचा लोकार्पण व अभिषेक सोहळा ओस्लोचे बिशप फ्रेडरिक हॅन्सेन ह्यांच्या हस्ते पार पडला.

## चीनमध्ये दोन बिशपांच्या नेमणुका

**व्हॅटिकन :** चीनमधील फा. फ्रान्सिस झेवियर दुआन योंगकुन, ४५, ह्यांनी बेमेंगचे बिशप म्हणून आणि फा. जोसेप चांग यानफेंग, ४२, ह्यांनी चिफेंगचे बिशप म्हणून शपथ घेतली. व्हॅटिकन आणि चीन ह्यांच्यात झालेल्या तात्पुरत्या करारानुसार पोप चीनमधील बिशपांच्या नेमणुकांना अंतिम मान्यता देतात, तर बिशपांच्या नावाची शिफारस चीन सरकार करते. चीनमधील कॅथलिक समाज हा सरकारच्या नियंत्रणाखालील संघटना व व्हॅटिकनशी एकनिष्ठ असलेले भूमिगत चर्च अशा दोन भागांत विभागला गेला आहे.

## ख्रिस्ती हॉस्पिटलवर इस्रायलचा हवाई हल्ला



**गाझा :** गाझा शहराच्या मध्यभागी असलेल्या चर्च संचलित हॉस्पिटलवर इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात हॉस्पिटलचे नुकसान झाले आहे. हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या वैद्यकीय टीमला ह्या हल्ल्यामुळे मानसिक धक्का बसला आहे. कारण पुन्हा कधी हल्ला होईल ह्याची त्यांना खात्री नाही.

## पवित्र साक्रामेंताच्या मिरवणुकीची शतकपूर्ती

**कॉर्क (आयर्लंड) :** पावसाची संततधार आणि जोराचा वारा ह्यांची पर्वा न करता पवित्र साक्रामेंताची पारंपरिक मिरवणूक कॉर्क शहरात निघाली होती. यंदाच्या मिरवणुकीत सुमारे पाच हजार स्थानिक व परदेशी नागरिक सहभागी झाले होते. कॉर्कचे बिशप फिंटन गॅविन ह्यांनी मिरवणुकीचे नेतृत्व केले. ते म्हणाले, शंभर वर्षांपूर्वी भांडणांमुळे विभागलेल्या लोकांना एकत्र आणण्यासाठी ही मिरवणूक सुरू झाली. ती परंपरा आजही सुरू आहे.

## जगातील सर्वांत मोठी जपमाळ

**देईर एल अहमर (लेबनॉन) :** देईर एल अहमर टेकडीवर सुमारे दोन हजार फूट जागेमध्ये ११×१२ फूट मापाच्या ५९ प्रचंड सिमेंटच्या मण्यांनी युक्त जपमाळ तयार केली जात आहे. प्रत्येक मण्याचा एक आध्यात्मिक संदेश आहे. जपमाळेची रचना प्रार्थनास्थळ म्हणून करण्यात आली आहे. २००८पासून जपमाळेचे काम सुरू झाले आहे.

## तरीही त्यांची श्रद्धा कमी झालेली नाही

**आदिस अबाबा (इथिओपिया) :** इथिओपिया सध्या गंभीर राजकीय, आर्थिक व मानवी संकटांचा सामना करीत आहे. अंतर्गत युद्ध आणि दुष्काळामुळे देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. कुपोषणामुळे लहान मुले आणि गर्भवती महिलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दुष्काळ व पुरामुळे शेती व पशुपालन उद्ध्वस्त झाले आहे. बेकारी वाढल्याने तरुण देश सोडून जात आहेत. ह्या पार्श्वभूमीवर कॅथलिक चर्च गरजवंतांना सर्वतोपरी मदतीचा हात देत आहे.

## एक जिवंत शहीद



**रोम :** पोप फ्रान्सिस ह्यांनी ज्यांचे वर्णन 'एक जिवंत शहीद' असे केले होते ते कार्डिनल अर्नेस्ट सिमोनी, वय ९७, ह्यांनी 'नॅशनल कॅथलिक रजिस्टर'ला मुलाखत दिली आहे. १९९३मध्ये कम्युनिस्ट अल्बानियामध्ये मिस्सा करीत असताना पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांना १८ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. छळ, अत्याचार होऊनही त्यांनी आपला धर्म सोडण्यास नकार दिला. तुरुंगातून सुटका झाल्यावर त्यांना खाणीत सक्तीचे काम करण्याची आणि सांडपाण्याची गटारे साफ करण्याची शिक्षा झाली. कार्डिनल अर्नेस्ट तरुणांना उपदेश करताना म्हणतात, क्षमा करा. प्रार्थना करा. शत्रूवर प्रेम करा. ख्रिस्ताचे साथीदार बना. त्याच्यासारखे पवित्र जीवन जगा!

## कॅथलिक चर्चचा गौरव



**लिमा (पेरू) :** बहुमताने निवडून आलेल्या पेरूच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष केको फजिमोरी ह्यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेताना पेरूच्या सांस्कृतिक आणि नैतिक जडणघडणीमधील कॅथलिक चर्चचे योगदान अधोरेखित केले. परमेश्वर, देश व पवित्र बायबलची शपथ घेऊन त्यांनी सर्वांच्या, विशेषत: गरिबांच्या कल्याणासाठी अविरत कार्य करण्याचे वचन दिले. दक्षिण अमेरिकास्थित पेरूमधील ६४% जनता कॅथलिक आहे.

## युनोमधील व्हॅटिकनचे नवीन दूत

**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी आर्चबिशप क्रिस्टोफ जाखिया एल-कसीस ह्यांची व्हॅटिकनचे युनोमधील दूत (कायम निरीक्षक) म्हणून नेमणूक केली आहे. ते आर्चबिशप गॅब्रिएल कॅसिया ह्यांची जागा घेतील. त्यांची नेमणूक व्हॅटिकनचे अमेरिकेतील राजदूत (नुन्सिओ) म्हणून करण्यात आली आहे. आर्च. क्रिस्टोफ ह्यांना राजनैतिक कामाचा भरपूर अनुभव असून त्यांना इंग्रजी, अरेबिक, फ्रेंच, इटालियन, इंडोनेशियन, स्पॅनिश आणि जर्मन ह्या भाषा येतात.

## आर्चबिशपांनी घेतली नायजेरियन अध्यक्षांची भेट

**लागोस :** नायजेरियन कॅथलिक बिशपांचे प्रमुख आर्चबिशप मॅथ्यू मॅन-ओसो ह्यांनी नायजेरियाचे अध्यक्ष बोला टिनबु ह्यांची भेट घेतली. देशातील ढासळत्या लोकशाही मूल्यांबद्दल आणि देशातील स्थिरतेला व सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या आव्हानांबद्दल त्यांनी अध्यक्षांना आठवण करून देण्यासाठी आणि त्यावर काही ठोस कृती करण्यासाठी एक निवेदन सादर केले. ●

# अनोखी आंतरधर्मीय सुसंवाद सभा



**गिरीज :** वसई धर्मप्रांत आयोजित आणि धर्मप्रांतीय आंतरधर्मीय सुसंवाद आयोग संयोजित आंतरधर्मीय सुसंवाद सभा रविवार १६ ऑगस्ट रोजी सायं. ४.३० ते ६.३० पर्यंत जीवन दर्शन केंद्र, गिरीज येथे संपन्न झाली. गास गायकवृंदाने 'वंदे मातरम्' आणि 'सारे जहाँसे अच्छा' ही राष्ट्रभक्तिगीते सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

फा. नितीन डिसोजा ह्यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर टॉक शो चे संयोजन फा. (डॉ.) मायकल रोझारिओ ह्यांनी केले. ह्या टॉक शोमध्ये डॉ. सोमनाथ विभुते (हिंदू श्रद्धावंत), मुफ्ती अबुल कलाम (मुस्लिम श्रद्धावंत), राजकुमार चपलुथ (जैन श्रद्धावंत), फादर (डॉ.) जोएल डिकुना (ख्रिस्ती श्रद्धावंत), सुरिंदर सेठी (शीख श्रद्धावंत), भारती ब्रह्मकुमारी ह्यांनी सहभाग घेतला. टॉक शो मधील प्रत्येक सहभागी व्यक्तीस (१) भारताच्या कोणत्या बाबीबद्दल आपणाला विशेष अभिमान वाटतो? (२) संविधानातील उद्देशिकेतील कोणते मूल्य तुम्हाला अधिक भावते? (३) उद्देशिकेतील कोणते मूल्य आपल्या धर्मातील शिकवणुकीद्वारे कार्यान्वित करता येईल? आणि (४) राष्ट्र उभारणीसाठी मी आणखी काय करायला हवे? ह्या प्रश्नांच्या अनुषंगाने आपली मते मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा होते. ते म्हणाले, ''माझी भाषा कवी, लेखकांची नाही; परंतु हृदयाची आहे. १९७७पासून आपण वसईत सर्वधर्मीय एकत्र येऊन संवाद करीत आहोत. हा सुसंवाद अधिक मोठ्या प्रमाणात वारंवार व्हावा म्हणून आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. 'मला शांतीचे साधन बनव' ही संत फ्रान्सिस असिसीची प्रार्थना आचरणात आणून आपण सर्वधर्मीय बंधुभाव जोपासला पाहिजे. आपण सगळे मानवतावादी कुटुंबाचे घटक आहोत. शांती आणि आशा ह्यासाठी आपण एकत्र आलेलो आहोत. हीच शांती आणि आशा आपणांस पुढे न्यायची आहे.''

ते पुढे म्हणाले, ''आजची सुसंवादाची सभा आपल्या बहुभाषिक, बहुधर्मीय देशाची ओळख आहे. आपण भारताचे नागरिक आहोत, हे आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवायला हवे आणि सर्वांचे कल्याण करणारे मानवतावादी विचार पुढे न्यायला हवेत. माणुसकी म्हणजे दुबळेपणा नसून आपली ताकद आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅव्हरलस आल्मेडा ह्यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. नूतनीकरण केलेल्या ख्रि. कार्डिनल सायमन पिमेंटा हॉलमध्ये प्रस्तुत कार्यक्रम संपन्न झाला. असेच कार्यक्रम वेळोवेळी आयोजित केले जावेत अशी मनीषा उपस्थित विविध धर्मीय श्रोत्यांनी केली. ●





## क्रीडा

### ॲडेराल्ड रिबेलो ह्याची चमकदार कामगिरी

**रमेदी :** वसईतील रमेदी गावचा रहिवासी आणि सध्या दुबई येथे वास्तव्यास असलेला ॲडेराल्ड निलेश रिबेलो ह्या चिमुकल्या




स्केटरने नेदरलँडमधील वर्व्हर्सपूव व मेडेमब्लिक येथे आयोजित रॅडबीड इंटरनॅशनल इनलाइन स्पीड स्केटिंग रेस २०२६ स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अंडर-८ मुलांच्या गटात स्पर्धा करताना ॲडेराल्ड ह्यानी युरोपीय देशांतील अनेक स्पर्धकांना कडवी झुंज देत स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## सामाजिक

### फा. दिब्रिटो ह्यांचा स्मृतिदिन



**वसई :** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि हरित वसई चळवळीचे प्रणेते ख्रि. फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांच्या द्वितीय स्मृतिदिना निमित्त २५ जुलै रोजी फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचे कुटुंब आणि प्रबोधन प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या प्रसंगी वसईतील पाणी आणि पूर समस्या ह्या विषयावरील अभ्यासपूर्ण चिंतन पर्यावरणतज्ज्ञ मॅकेन्झी डाबरे ह्यांनी श्रोत्यांसमोर मांडले. तसेच वसईच्या अनिर्बंध विकासामुळे ओढवलेली दुरावस्था आकडेवारीसह स्पष्ट केली. फा. रेमंड रुमाव ह्यांनी प्रास्ताविक केले. तसेच ह्या कार्यक्रमाचा समारोप करताना नंदाखाल धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फा. डॉमणिक डिआब्रिओ ह्यांनी फादरांसोबतच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

### इच्छापूर्ती गौरव पुरस्कार



**नेवासा :** येथील ज्ञानमाऊली चर्चचे निर्माते फा. प्रकाश राऊत ह्यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना देवळाली प्रवरा येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय 'इच्छापूर्ती गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. फा. प्रकाश राऊत ह्यांनी गावोगावी गरज तेथे कूपनलिका बसवून पिण्याच्या पाण्याच्या समस्या सोडवल्या होत्या. त्यासाठी सौर पंप देखील बसवले होते. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

### वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन उपक्रम





**गास :** गासकर सामाजिक संस्थेच्या वतीने २ ऑगस्ट रोजी गास येथे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन उपक्रम पार पडला. प्रमुख धर्मगुरू फा. मायकल रोझारिओ ह्यांनी प्रार्थना केली. हरित वसईचे प्रणेते ख्रि. फा. फ्रान्सिस दिब्रिटो आणि पर्यावरण प्रेमी ख्रि. फा. आलेक्स तुस्कानो ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ह्या प्रसंगी फा. जेम्स डिसिल्वा उपस्थित होते. ह्या उपक्रमांतर्गत चर्च परिसरासह गावातील विविध ठिकाणी पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.

### आठवणींना उजाळा देणारा स्नेहमेळावा

**निर्मळ :** शनिवार दिनांक १८ जुलै रोजी समाजसेवा मंडळ, निर्मळ येथे होली क्रॉस हायस्कूल, निर्मळ १९८९-९० ह्या एस.एस.सी. बॅचचा स्नेहमेळावा संपन्न झाला. फादर निलेश तुस्कानो ह्यांच्या प्रार्थनेने स्नेहमेळाव्याची सुरुवात झाली. प्रास्ताविक भाषणात लुकस परेरा ह्यांनी आठवणींना उजाळा



दिला. उपस्थित मित्रमैत्रिणींनी खेळ, गप्पागोष्टी, गाणी व सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविधतेने हा स्नेहमेळावा संपन्न झाला. होली क्रॉस शाळेतील गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याचा संकल्प ह्यावेळी करण्यात आला. ह्याप्रसंगी किरण रानडे, विजय रॉड्रीग्ज, संजय मार्टिन ह्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रसाद डाबरे ह्यांनी सूत्रसंचालन केले. राजू दोडती ह्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन साजरा

**गोखिवरे :** विद्याविकासिनी हायस्कूल, फादरवाडी, गोखिवरे येथे रविवार ९ ऑगस्ट रोजी 'आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन' कार्मेलमाता मिस्सा केंद्र, फादरवाडी, जानकीपाडा ह्या माध्यमातून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र मिस्साबलिदानाने झाली. मिस्साबलिदानाचे पौरोहित्य बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी केले.

मिस्सानंतर कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक आदिवासी



नृत्यगीताने झाली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिशप थॉमस डिसोजा होते. तसेच फा. ॲन्ड्र्यू रॉड्रिग्ज, कार्मेल माता मिस्सा केंद्राचे प्रमुख फा. संजय बनसोडे, फा. ऑल्वीन तुस्कानो, फा. नोबेल मेन, फा. आलेक्स घोन्सालविस, फा. आल्बर्ट डिसिल्वा, विद्याविकासिनी संस्थेचे ब्रदर्स, बोरिवली संस्थेचे ब्रदर्स, हेल्पर्स ऑफ मेरी संस्थेच्या सिस्टर्स, शांती भगिनी सिस्टर्स व अन्य मान्यवर उपस्थित होते.

ह्याप्रसंगी बिशप थॉमस डिसोजा म्हणाले, ''आदिवासी



समाज हा आपल्या देशाचा मूळ वारसा आहे. त्यांचे जल-जंगल-जमिनीवरील हक्क, शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन ह्यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान करणे, ही आपली जबाबदारी आहे.''

ह्यानिमित्त पारंपरिक वेशभूषा, आदिवासी नृत्य करण्यात आले. मान्यवरांनी आदिवासी बांधवांच्या हक्कांबाबत आणि विकासाबाबत मार्गदर्शन केले.

## ख्रि. फादर ऑस्कर कोलासो स्मृतिदिन

**उमराळे :** ख्रि. फादर ऑस्कर कोलासो मेमोरिअल मेडिकल असोसिएशन तर्फे ९ ऑगस्ट रोजी फा. रॉबर्ट गोन्सालविस ह्यांनी 'पर्यावरण, निसर्गसंवर्धन आणि मानवसेवा' ह्या विषयांवर मार्गदर्शन केले. ह्या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख धर्मगुरू फा. नितीन डिसोजा व संघटनेचे अध्यक्ष मॅन्युअल मोंथेरो उपस्थित होते.

त्यानंतर लेखक सॅबी परेरा संचलित 'कादोडी माई कवतिकाई' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

## भूमिपुत्रांचे महानगरपालिकेसमोर धरणे आंदोलन

**वसई :** पाणीप्रश्न, खड्ड्यांनी विदीर्ण झालेले रस्ते, अवाजवी करवाढ आणि महापालिका प्रशासनाच्या विकासकधार्जिण्या धोरणामुळे हरित वसईची झालेली वाताहत, ह्या प्रश्नांवरून संतप्त वसईकरांनी शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी महापालिकेविरोधात आंदोलन केले. सात तासानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.





वसई जनशक्ती आघाडीच्या पुढाकाराने आयोजित ह्या आंदोलनात मिलिंद खानोलकर, मॅकेन्झी डाबरे, कुमार राऊत, जयश्री सामंत, डॉमिनिका डाबरे, जॉन परेरा ह्यांच्यासह असंख्य नागरिक सहभागी झाले होते.

मूलभूत सेवा-सुविधा उपलब्ध होईपर्यंत नवीन बांधकामांना मंजुरी देऊ नये, हरित पट्ट्यात वाढविण्यात आलेला एफएसआय रद्द करून अनधिकृत ठरविण्यात आलेली स्थानिकांची घरे नियमबद्ध करावीत अशी मागणी मिलिंद खानोलकर, मॅकेन्झी डाबरे, डॉमिनिका डाबरे ह्यांनी केली. लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## रिक्षाचालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, महाराष्ट्रात वास्तव्यास असलेल्या इतर प्रांतीय रिक्षाचालकांना स्थानिक मराठी बांधवांशी दैनंदिन व्यवहार मराठी भाषेत सुलभतेने करता यावा, ह्या हेतूने संपूर्ण महाराष्ट्रभर मराठी भाषा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

ह्या उपक्रमाचा एक भाग म्हणून संत रॉक चर्च, गोखिवरे, वसई-पश्चिम येथील चर्चलगत असलेल्या जिल्हा परिषद शाळेत रिक्षाचालकांसाठी दोन महिन्यांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक रिक्षाचालकासाठी चार आठवड्यांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित करण्यात आला होता. ह्या शिबिराचा १,२२६ रिक्षाचालकांनी लाभ घेतला.

ह्या दोन महिन्यांच्या कालावधीत संत रॉक चर्चचे प्रशस्त



पटांगण रिक्षाचालकासांठी जणू काही रिक्षा स्टॅन्ड झाले होते. सहजच त्यांच्या प्रशिक्षणाबद्दल विचारणा केली असता विशेष आनंदाची बाब म्हणजे, त्यांचे उत्तरही अनेकदा मराठीतच असे, 'आमचे प्रशिक्षण चांगले चालले आहे.'

कधी तुटक शब्दांत, कधी मोडक्या-तोडक्या वाक्यांत, तर कधी संकोचत का होईना; परंतु मराठी बोलण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न मनाला स्पर्शून जात असे. 'महाराष्ट्रात राहतो, तर मराठी आलीच पाहिजे,' ही भावना त्यांच्या बोलण्यातून आत्मीयतेने प्रकर्षाने जाणवत होती.

भाषा माणसाला केवळ बोलायला शिकवत नाही; ती माणसाला माणसाशी जोडते, मनाला मनाशी भिडवते आणि समाजात आपलेपणाची वीण घट्ट करते.

गेल्या दोन महिन्यांत संत रॉक चर्चचे पटांगण ह्या विधायक उपक्रमासाठी उपयोगी पडले, ही आमच्यासाठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. शासनाच्या एका समाजहितकारी आणि लोकाभिमुख उपक्रमात आम्हालाही अल्पसा सहभाग देता आला, याबद्दल आम्ही सर्वशक्तिमान परमेश्वराचे मनःपूर्वक आभार मानतो.

प्रशिक्षणाच्या माध्यमातून रिक्षाचालकांनी मराठी भाषेशी जोडलेला हा छोटासा जिव्हाळ्याचा धागा पुढे अधिक दृढ होवो; मराठी त्यांच्यासाठी केवळ शिकण्याची भाषा न राहता व्यवहाराची, आपलेपणाची आणि नातेसंबंधांची भाषा बनो.

**- फा. आल्बर्ट डिसिल्वा,** गोखिवरे चर्च

## रक्तदान शिबिर

**उमराळे :** साफल्य मेडिकल अ‍ॅण्ड वेल्फेअर संस्था आणि फा. ऑस्कर कोलासो मेडिकल असोसिएशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने सेंट जोसेफ चर्च, उमराळे येथे १६ ऑगस्ट रोजी टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिरात १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## बालसंघ प्रेरकांसाठी प्रशिक्षण

**गिरीज :** १६ ऑगस्ट रोजी संत फ्रान्सिस झेविअर चर्च, गिरीज येथे जीवन ज्योती आयोजित बालसंघ प्रेरकांसाठी प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. १८ धर्मग्रामांतून ११५ बाल संयोजकांनी



सहभाग दर्शविला. 'मुलांना घडवू या, विश्वासात वाढवू या आणि ख्रिस्ताकडे नेऊ या' ह्या विषयावर प्रबोधन करण्यात आले. संत थॉमस चर्च, सांडोर येथील प्रेरकांनी प्रार्थनेने सुरुवात केली. त्यानंतर फा. निलेश तुस्कानो ह्यांनी सांगितले, ''प्रत्येक बालसंघ प्रेरकासाठी बालसंघ एक मिशन आहे. कधीकधी आपण बालसंघाकडे फक्त एक उपक्रम म्हणून पाहतो. बालसंघ म्हणजे विश्वासाची छोटी शाळा आहे. बालसंघ म्हणजे प्रेमाचे कुटुंब आहे. बालसंघ म्हणजे सेवाभावाची प्रयोगशाळा आहे. बालसंघ म्हणजे मुलांना येशूशी मैत्री करण्याचा मार्ग आहे.'' त्यानंतर गिरीज बालसंघ प्रेरक प्रतिनिधींनी डेमो सभा सादर केली. गटचर्चा घेण्यात आली. फा. अविनाश ह्यांनी आभार मानले.

### साहित्यिक




## 'भाग्यविधाता' ग्रंथाचे प्रकाशन

**गास :** ख्रि. मॉन्सिनिअर एल. सी. डिसोझा ह्यांच्या ४४व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रेरणादायी जीवनकार्य अधोरेखित करणाऱ्या 'भाग्यविधाता' ह्या ग्रंथाचे प्रकाशन गास येथे २ ऑगस्ट रोजी झाले. मॉन्सिनिअर फ्रान्सिस कोरिया ह्यांनी संपादित केलेल्या ह्या ग्रंथात तत्कालीन गासच्या इतिहासाचा मागोवा घेतला आहे.

वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोझा ह्यांनी ह्या

सोहळ्याचे अध्यक्षस्थान भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून मॉन्सिनिअर फ्रान्सिस कोरिया उपस्थित होते. विशेष अतिथी श्री. वसंत नाईक गुरुजी, फा. पिटर आल्मेडा, फा. जॉन्सन मिनेजीस, फा. मायकल रोझारियो, सिस्टर मेबल फिगेर, डॉ. जोसेफ डिसोझा, डॅनियल रुमाव तसेच मॉन्सिनिअर एल. सी. डिसोझा ह्यांचे नातेवाईक - फा. ऑस्कर नाझरेथ, श्री. ब्रायन व श्री. कॅरोल डिसोझा, सौ. मारिया डिसा आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक जोसेफ परेरा यांनी केले. बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी, 'भाग्यविधाता' हा ग्रंथ केवळ एका व्यक्तीचे चरित्र नसून एका दूरदर्शी धर्मगुरूच्या त्यागमय जीवनाचा, शिस्तप्रिय नेतृत्वाचा, अढळ श्रद्धेचा आणि समाज प्रबोधनाच्या कार्याचा प्रेरणादायी इतिहास आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेव्हरलस आल्मेडा आणि संजीवनी तुस्कानो ह्यांनी केले. आभार प्रदर्शन फ्रान्सिस रॉड्रिग्ज ह्यांनी केले.



## अभिनंदन

**उमराळे :** कु. शालीन संजीव परेरा लिखित 'The Lesson Life forced me to learn' ह्या पुस्तकाचे प्रकाशन १५ ऑगस्ट रोजी झाले. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

## सहवेदना

### श्रीनिवास कुलकर्णी ह्यांचे निधन



**पुणे :** 'डोह', 'सोन्याचा पिंपळ', 'कोरडी भिक्षा' ह्यांसारख्या साहित्यकृतींनी वाचकांच्या मनात घर करून राहिलेले ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी ह्यांचे गुरुवार ८ ऑगस्ट रोजी वयाच्या ९१व्या वर्षी निधन झाले. त्यांनी आपल्या साहित्यातून ललित गद्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. मानवी मनाच्या खोल संवेदनाचे दर्शन त्यांच्या साहित्यकृतीतून घडते.

### ज्येष्ठ कवी द.भा.धामणस्कर कालवश



**डोंबिवली :** निसर्गाची बहुविध रूपे आणि मानवी जाणिवांचे संदर्भ भावोत्कट शब्दांत मांडणारे ज्येष्ठ कवी दत्तात्रय भास्कर धामणस्कर ह्यांचे शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते. 'प्राक्तनाचे संदर्भ', 'बरेच काही उगवून आलेले', 'भरून आलेले आकाश' ह्या कवितासंग्रहांनी वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे.



**निर्मळ :** Msgr. Herculano Convent साकीनाका, अंधेरी येथे कार्यरत असलेल्या सिस्टर फिलोमीना मनवेल दोडती (दोडतीआळी) ह्यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६७व्या वर्षी शुक्रवार ३१ जुलै रोजी निधन झाले.



**उत्तन-पाली :** 'सुवार्ता' वितरक मरीना सायमन मुनिस, उत्तन-पाली ह्यांचे २ जून रोजी निधन झाले.



**नंदाखाल :** 'सुवार्ता' वितरक आणि सेंट विन्सेंट डी पॉल संघटनेचे सक्रिय सभासद मायकल ऑगस्टीन तुस्कानो, घोटकाल ह्यांचे १९ ऑगस्ट रोजी वयाच्या ७५व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



**रमेदी :** फा. रॉबिन डिसिल्वा ह्यांच्या मातोश्री मेरी मार्शल डिसिल्वा (भाटघर) ह्यांचे २० ऑगस्ट रोजी वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले.

'सुवार्ता' परिवारातर्फे मृत व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली!

**दोन वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी लिली रिचर्ड कर्वालो**

सालभाटवाडी, गिरीज

जन्म : २६/०५/१९५४; मृत्यू : २९/०९/२०२४

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या मम्मीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## GHM TRAVELS

GHM TRAVELS, Office. 8, Divine Residency,
Opp. Mulgaon Church, Mulgaon, Vasai West, Vasai – 401201
Ruth: 9730421602 / Gavin: 7709561700 / 9890214681
https://ghmtravels.my.canva.site

**** Customised Domestic Tours ****

* Goa - 3N/4D * Vadodara with Statue of Unity - 3D
* Kerala - 5N/6D * Velankanni / Pondicherry * Konkan - 5N/6D
* Hyderabad - 3N/4D * Mahableshwar / Panchgani * Kashmir
* Himachal with Shimla / Kullu Manali - 5N/6D * Andaman Island ...

**** International Tours ****

* Nepal * Sri Lanka * Maldives * UAE (Dubai) * Vietnam
* Singapore * Malaysia * Thailand (Bangkok / Phuket / Pattaya) ...

**** We Offer ****

Train Booking / Bus Booking / Airline Tickets / Hotel Booking
(Best Hotels with Good Deals)
Passport (New & Renewal) / Tourist Visa / Customized Tours
Car – Mini Bus Rental / Honeymoon Package

BOOK NOW



**ACE SOLAR 9923004080**

**Dual coated tanks for longer life**
**(Marine & Epoxy coated)**
**can sustain water hardness upto 600 ppm TDS**

****Service and quality is our recognition****

For more details please contact
**Mr. Vinay Andrades - 9923004080**

## In Loving Memory of



**Late Sr. Lucy Francis D'Souza (MSI)**
Nandwan, Girij
D-O-B : 14/12/1963
D-O-D : 01/03/2026



**Six Month's Mass :**
**August 30, 2026 at 7.00 am**
**St. Xavier Church, Girij, Diocese of Vasai, INDIA**

- Joined the Missionary Sisters of the Immaculate (MSI) : 22nd Aug. 1986
- First Profession in Vijayawada (A.P.) : 16th July 1990
- Final Profession in St. Xavier Church at Girij, Vasai (Maharashtra) : 9th June 1996
- MSI Mission Mandate for Papua New Guinea (PNG) : 20th April 2001.
- Coordinator Diocesan Family Life, Vanimo (PNG) : 2001-2010.
- Administrator, MSI Delegation of PNG : 2011-8th March 2020.
- Coordinator, National (4 Archdioceses & 18 Dioceses) of Family Life Commission for PNG & Solomon Islands Catholic Bishop's Conference : 1st May 2020 onwards.
- Solemn Burial in the MSI Convent, Cementery, Alotau, PNG in the Diocese of Alotau-Sidela

**Prayerful Tribute**
**MSI, D'Souza Family & Friends**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी संदीप काळू धोरटे**

कोर्लई

जन्म : १५/०७/१९९० ; मृत्यू : २३/०८/२०२३

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत.''***

(यशया ५५:८)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या संदीपला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**शांती वनम आश्रम**
**कोर्लई**

---

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मार्गारिट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

---

**प्रेमळ स्मरणार्थ** **२५ वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी पास्कोल चिमा डाबरे** **ख्रिस्तवासी ॲनी पास्कोल डाबरे**

भुईगाव, नवाळे नाका

मृत्यू : २३/०७/२००९ मृत्यू : १९/०९/२००१

स्मरणार्थ मिस्सा : शनिवार दिनांक १९/०९/२०२६
संध्याकाळी ७.३०वाजता, भुईगाव चर्च.

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच प्रार्थना!*

**कुटुंबीय**

---

**४४ वर्षांची आठवण**

**ख्रिस्तवासी अपलन थॉमस डिसिल्वा**

सिलचीवाडी, बदामीस्टॉप

मृत्यू : १०/०९/१९८२

**मुलगा : क्लेमेंट; सून : रूबी**



---

**जन्मदिवसाची व ७ महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी आग्नेलो जॉन लोपीस**

माणिकपूर

जन्म : १६/०९/१९९०; मृत्यू : १३/०२/२०२६

***प्रभू परमेश्वर म्हणतो,***
***''माझ्याकडे या आणि मी तुम्हांला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*हे प्रभू, आमच्या आग्नेलोला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुझ्या प्रेमळ आठवणीत... तुझी लाडकी बेबी, नंदाखाल**

# 'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक - १३

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | X | २ | X | ३ | X | ४ |
| | X | ५ | | X | ६ | | |
| ७ | ८ | | X | | | X | |
| X | | X | ९ | | १० | ११ | |
| १२ | | X | १३ | | X | १४ | |
| | X | १५ | | X | १६ | X | X |
| १७ | १८ | | X | १९ | | | २० |
| २१ | | | | | | X | |

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

**आडवे शब्द :-**

१) फिफा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ विजेता संघ ×× (२)
५) सापाने टाकलेली जुनी त्वचा किंवा कातडी ×× (२)
६) संकल्प, पण, शपथ ××× (३)
७) स्त्री, महिला, नारी ××× (३)
१०) 'वाहेम' शब्द उलट करा ××× (३)
१२) विभाग, भाग, कप्पा, चोळीचा तुकडा ×× (२)
१३) अन्न, भोजन, आहार ×× (२)  १४) हिस्सा, भाग ×× (२)
१५) नवरा ×× (२)  १७) देश, जन्मभूमी ××× (३)
१९) ×××× (४) ची राजधानी रांची आहे
२१) वसईतील ज्येष्ठ समाजसुधारक आणि दिवंगत लोकनेते डेव्हिड डिकुन्हा ह्यांचे मार्च २०१७ मधील प्रसिद्ध झालेले चरित्रग्रंथ ××× ××× (६)

**उभे शब्द :-**

१) महत्त्वाचा खास (इंग्रजी) ××× (३)
२) वारा, हवा, आयुर्वेदातील त्रिदोषापैकी एक दोष ×× (२)
३) अद्वितीय, अजोड, अनुपम ×××× (४)
४) वसईतील ज्येष्ठ विज्ञान व पर्यावरण लेखक जोसेफ तुस्कानो ह्यांचे एक पुस्तक ××× ×× (५)
५) येशू ख्रिस्ताने गालील प्रांतातील ×× (२) नावाच्या गावात एका लग्न समारंभादरम्यान पाण्याच्या घड्यातून द्राक्षारस केला होता.
८) एक कंदयुक्त, अनेक आजारावर उपयुक्त वनस्पती, जिचा स्वयंपाकात मसाल्याच्या पदार्थामध्ये वापर केला जातो ××× (३)
९) गोदाम किंवा वेअरहाऊस म्हणजे उत्पादित वस्तू, शेतीमाल, धान्य किंवा कच्चा माल सुरक्षित ठेवण्याची आणि साठवण्याची मोठी इमारत होय ××× (३)
११) द्वेष, मत्सर ×× (२)  १२) चीक, पियुष ×××× (४)
१५) कमळ (हिंदी) ××× (३)
१६) मृतदेह, अग्नी देण्यासाठी लाकडांची केलेली रचना म्हणजे ××× किंवा चिता होय (३)  १८) काळजी, फिकीर ×× (२)
१९) तोटीचे भांडे ×× (२)  २०) ×× मारणे, म्हणजेच चोरी करणे, लूट करणे, अपहार करणे असा होतो ×× (२)

**'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक - १२ चे उत्तर**

**आडवे शब्द :-** १) भा. रा. तांबे ५) निर्भय ७) मोची ८) दहा ९) तवा ११) कडवा १३) नस १५) डर १६) कार १७) कासव २०) काळवेळ २१) सुवार्ता

**उभे शब्द :-** १) भार नियमन २) बेट ३) मातीची हाक ४) श्रीराम पवार ६) यकृत ७) मोद १०) वाडवळ १२) डक १४) सकाळ १८) सवे १९) वसु

# हास्यरंग

## जेवण

एक महिला घाबरलेल्या अवस्थेत पोलीस स्टेशनमध्ये आल्या. तेथील इन्स्पेक्टरला त्या म्हणाल्या, ''माझे पती बाजारात कोथिंबीर आणायला गेले होते. पण बराच वेळ झाला अजून घरी परतलेले नाहीत.'' ह्यावर पोलीस इन्स्पेक्टर म्हणाले, ''आजचा दिवस कोथिंबीर न घालता जेवण करा!''

* * * *

## कर

पत्नी : काय हो, 'प्रत्यक्ष कर' व 'अप्रत्यक्ष कर' ह्यांमध्ये फरक काय?
पती : अतिशय सोप्पं आहे. तू जेव्हा माझ्याकडून पैसे मागून घेतेस तेव्हा तो प्रत्यक्ष कर असतो.
पत्नी : मग अप्रत्यक्ष कर केव्हा असतो?
पती : ...आणि तू जेव्हा मला न सांगता माझ्या खिशातून परस्पर पैसे घेतेस तो अप्रत्यक्ष कर होय.

## बहीण आहे ना!

युवती : असा काय बघतोयस माझ्याकडे? तुला बहीण नाही का?
युवक : आहे ना! म्हणून तर बघतोय.
युवती : का?
युवक : कारण माझी बहीण म्हणते, 'गोरी गोरी पान फुलासारखी छान, दादा मला एक वहिनी आण!'

* * * *

## खोटं बोलणे

मम्मी : बेटा, मी तुझ्या वयाची असताना एकदाही खोटं बोलले नाही.
बेटा : मम्मी, मग तू कोणत्या वर्षापासून खोटं बोलायला लागलीस?
मम्मी : लग्न झाल्यापासून...

# ज्ञान, सुज्ञान, प्रज्ञा

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. तुम्ही ऐकली असेल, वाचली असेल. पण आज सांगणे अपरिहार्य आहे... एक खेडे होते. बरेच लोक राहत होते. खूपच गरीब होते. त्यात भर म्हणून की काय, काही लोक सतत आजारी पडायचे. परंतु त्यांना आजाराचे कारण कळत नव्हते. तशी सोय नव्हती. आजाराचे निदान कोणी केले नव्हते. अशा परिस्थितीत गावात एक वैद्य होता. त्याच्याकडे ते जायचे. तो देईल ते औषध घ्यायचे नि बरे व्हायचे. कोणतेही दुखणे असो, एकच औषध, पुडीतील औषध! असे बराच काळ चालले होते.

हे गाव, ते वैद्य नि त्याच्या एकाच औषधाविषयी आजूबाजूच्या परिसरात चर्चा सुरू झाली. नक्की आजार आहे तरी काय? ह्याचा शोध सुरू झाला. विविध ठिकाणांहून चिकित्सक लोक येऊ लागले. नाना वार्ताहर येरझाऱ्या घालू लागले. शोधपत्रकारितेने आव्हान स्वीकारले. अंध:श्रद्धा निर्मूलन कार्याचे धुरीण येऊन गेले. ह्या सर्वांच्या अथक प्रयत्नांमुळे दृकश्राव्य माध्यमाची तुकडीदेखील गावात उतरली. गावाचा आरोग्यविषय ऐरणीवर आला. नुसती चर्चा नव्हे, मूळ शोधण्याकरिता. बुद्ध्या इलाज वापरण्याकरिता.



हे सारे ऐकून, वाचून, टी. व्ही. वर पाहून, एक निष्णात डॉक्टर अस्वस्थ झाले. ते अनुभवी होते, पारंगत होते. सुस्थितीत होते. बातमी कळल्याबरोबर ते निघाले. त्या गावात पोहोचले. लोकांच्या मुलाखती घेऊ लागले. आजाराचे स्वरूप (चिन्हे, इलाज, आजाराचा कालावधी,परिणाम, इ.) समजून घेऊ लागले. आजार 'सिकल सेल' (Sickle Cell) हा मराठीतील 'विळ्याचा आजार' (C Cell) ह्या प्रकारात मोडत होता हे त्याना ठाऊक होते. आजाराचे रुग्ण अवघ्या ३० ते ३५ वयात जगाचा निरोप घेतात हेही त्यांना कळले.

झाले... ते निष्णात डॉक्टर निघाले आणि गावात परतले. त्यांनी त्या गावात तळ ठोकला. त्यांनी आपल्या दवाखान्यातील माणसाचा सांगाडा व भलेमोठे चित्र ह्या गावात आणले. गावच्या त्या वैद्यांना बोलावले. त्यांचे मानपान केले, त्यांची पार्श्वभूमी जाणून घेतली. दयाभावनेतून वैद्याने सुरू केलेल्या जडीबुटीच्या औषध प्रकल्पाची माहिती गोळा केली, त्यांच्या केलेल्या सेवेबद्दल त्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर त्यांनी ह्या आधी गावातील अडीअडचणींतील लोकांना केलेल्या मदत व कार्याबद्दल वैद्यांचे जाहीर आभार मानले. सर्वांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

अर्थात, डॉक्टरनी वैद्यांना बोलावले. खाजगीत त्यांना माणसाच्या विविध अवयवांचे चित्र व सांगाडा दाखवला. त्यातील वेगवेगळे अवयव व त्यांचे काम स्पष्ट केले. शरीराच्या प्रत्येक भागाचे एकमेकांशी असलेले नाते, त्यातील बिघाडाची कारणे नि त्यासाठी विविध औषधोपचार कसे आवश्यक असतात, ते नमूद केले. अचूक निदानामुळे योग्य इलाज होतो, सर्व आजारांवर एकच औषध दिले तर त्यापासून होणारे परिणाम काय आणि त्याची जबाबदारी कोण घेणार? हे त्या तज्ज्ञ डॉक्टरानी वैद्यांना सविस्तर समजावून सांगितले. आता कुठे वैद्याच्या लक्षात आले.

वैद्यांना ज्ञान प्राप्त झाले होते. अज्ञान पळाले होते. त्यांनी उलटसुलट प्रश्न विचारले. डॉक्टरच्या वैद्यकीय ज्ञानाची ती दुसरी परीक्षा ठरली, जणू काही त्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहिला गेला. पण डॉक्टर संत ज्ञानेश्वरांच्या 'स्थितप्रज्ञवृत्ती' साठी प्रसिद्ध होते ते सिद्ध झाले. शेवटी, ज्ञानवंत डॉक्टरच्या ज्ञानाचा वैद्यांनी मोठ्या मनाने स्वीकार केला. तज्ज्ञ डॉक्टरांचे आभार मानले. एव्हढेच नव्हे; तर आपला दवाखाना त्या सुज्ञानी डॉक्टरांना समर्पित केला आणि त्यांच्या सकारात्मक प्रवृत्तीबद्दल गावभर सर्वांना सांगू लागले.

सत्य असेच असते. ते आदर्श नि वास्तव ह्यात सांगड घालते. ज्ञानावर आधारित वस्तुस्थिती स्वीकारायला मदत करते. मग ज्ञानाचा प्रवास सुज्ञानाकडे वळतो. ज्ञानामुळे इतर व्यक्ती सुद्धा बंधमुक्त होऊ लागतात. त्यांचे आचार-विचार-उच्चार बदलण्यासाठी ज्ञान आधारभूत ठरते. त्यामुळे हळूहळू ज्ञानाचे रूपांतर सुज्ञानात होऊ लागते. मग सत्कार्ये घडू लागतात. लोकांच्या जीवनातील परिवर्तन प्रत्यक्ष सुविचार, सुआचार, सुउच्चार ह्यात दिसू लागते. अशी माणसे जेथे जातात तेथे चांगलंच करतात आणि इतरांना सत्यं-शिवं-सुंदरमची गोडी लावतात.

माणसाला मोकळे करते ते ज्ञान कृतीद्वारे सुज्ञानात, प्रत्यक्षात आणते. त्याकामी प्रज्ञा सतत ऊर्जा देत राहते चांगले करण्यासाठी, भले करण्यासाठी, इतरांनी दुखवले तरी त्याचे चांगले तेच करण्यासाठी. प्रज्ञावंत माणसे चांगले तेच पाहतात, चांगले तेच सुचवतात, चांगले तेच करीत राहतात. ह्याला साने गुरुजी 'गोडचि करित जावे' असे म्हणत. अशी माणसे माणसाना माणुसकीने वागवतात, जगतात नि जगू देतात. अजातशत्रू बनतात. प्रज्ञा प्राप्त झालेली माणसे सगळ्यांना 'माणूस हा परमेश्वराचा अंश आहे, भाग आहे', ते आपल्या जीवनाने दाखवून देतात.

प्रज्ञावंत माणसे सत्याची कास धरताना आपले जीवन, जीवनशैली व आध्यात्मिकता ह्याद्वारे असत्याला भिडतात - प्रेमाने, क्षमेने, संवादाने. अशी माणसे 'देव सर्वांचा आहे, सर्वांसाठी आहे', अशा परमेश्वराची आपल्या जीवनाने ओळख करून देतात; धर्म, पक्ष, जात,भाषा, देश, प्रदेश, लिंग अशा भेदांच्या पलीकडे असलेल्या शाश्वत सत्याशी मानवाला जोडतात. अशी माणसे मरण पावली तरी त्यांचे स्मरण होते. अशी माणसे आपल्या आजूबाजूला, राज्यात, देशा-परदेशात अजूनही आहेत. ती शोधण्यासाठी आरसा हवाय का?

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

# उपासना वर्ष दिनदर्शिका : सप्टेंबर २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. १करिंथ २:१०-१६
स्तोत्र १४५:८-१४
लूक ४:३१-३७

२. १करिंथ ३:१-९
स्तोत्र ३३:१२-१५,२०-२१
लूक ४:३८-४४

३. **संत ग्रेगरी द ग्रेट - स्मृती**
१करिंथ ३:१८-२३
स्तोत्र २४:१-६
लूक ५:१-११

४. १करिंथ ४:१-५
स्तोत्र ३७:३-६,२७-२८, ३९-४०
लूक ५:३३-३९

५. **कोलकत्त्याची संत तेरेजा- स्मृती**
१करिंथ ४:६-१५
स्तोत्र १४५:१७-२१
लूक ६:१-५ **किंवा**
होशेय २:१४-१५,१९-२०
स्तोत्र ४५:११-१२,१४-१७
मत्तय २५:३१-४६

६. **सामान्यकाळ- २३वा रविवार**
यहेज्केल ३३:७-९
स्तोत्र ९५:१-२,६-९
रोम. १३:८-१०
मत्तय १८:१५-२०

७. १करिंथ ५:१-८
स्तोत्र ५:५-७,१२
लूक ६:६-११

८. **पवित्र मरियेचा जन्मदिन-सण**
बालिका दिन
मीखा ५:१-५ **किंवा**
रोम ८:२८-३०
स्तोत्र १३:६-७
मत्तय १:१-१६,१८-२३

९. १करिंथ ७:२५-३१
स्तोत्र ४५:११-१२,१४-१७
लूक ६:२०-२६

१०. १करिंथ ८:१-७,११-१३
स्तोत्र १३९:१-३,१३-१४, २३-२४
लूक ६:२७-३८

११. १करिंथ ९:१६-१९,२२-२७
स्तोत्र ८४:३-६,१२
लूक ६:३९-४२

१२. **मरियेचे पवित्र नाव - स्मृती**
१करिंथ १०:१४-२२
स्तोत्र ११६:१२-१३,१७-१८
लूक ६:४३-४९

१३. **सामान्यकाळ २४वा रविवार**
बेनसिरा २७:३०-२८:७
स्तोत्र १०३:१-४,९-१२
रोम १४:७-९
मत्तय १८:२१-३५

१४. **पवित्र क्रुसाचा विजयोत्सव - सोहळा**
गणना २१:४-९
स्तोत्र ७८:१-२,३४-३८
योहान ३:१३-१७

१५. **दुःखी माता मरिया-स्मृती**
इब्री ५:७-९
स्तोत्र ३१:२-६,१५-१६,२०
योहान १९:२५-२७ किंवा
लूक २:३३-३५

१६. **संत कॉर्नेलिऊस व संत सिप्रियन - स्मृती**
१करिंथ १२:३१-३३:१३
स्तोत्र ३३:२-५,१२,२२
लूक ७:३१-३५

१७. १करिंथ १५:१-११
स्तोत्र११८:१-२,१५-१७,२८
लूक ७:३६-५०

१८. १करिंथ १५:१२-२०
स्तोत्र १७:१,६-७,८,१५
लूक ८:१-३

१९. १करिंथ१५:३५-३७,४२-४९
स्तोत्र ५६:१०-१४
लूक ८:४-१५

२०. **सामान्यकाळ २५वा रविवार**
यशया ५५:६-९
स्तोत्र १४५:२-३,८-९, १७-१८
फिलिप्पे. १:२०-२४,२७
मत्तय २०:१-१६

२१. **प्रेषित संत मत्तय (सुवार्तिक) - सण**
इफिस ४:१-७,११-१३
स्तोत्र १९:२-५
मत्तय ९:९-१३

२२. नीतिसूत्रे २१:१-६,१०-१३
स्तोत्र ११९:१,२७,३०, ३४-३५,४४
लूक ८:१९-२१

२३. नीतिसूत्रे ३०:५-९
स्तोत्र ११९:२९,७२,८९, १०१,१०४,१६३
लूक ९:१-६

२४. उपदेशक १:२-११
स्तोत्र ९०:३-६,१२-१४,१७
लूक ९:७-९

२५. उपदेशक ३:१-११
स्तोत्र १४४:१-४
लूक ९:१८-२२

२६. **संत कॉसमस व संत डॅमियन -स्मृती**
उपदेशक ११:९-१२:८
स्तोत्र ९०:३-६,१२-१४,१७
लूक ९:४३-४५

२७. **सामान्यकाळ २६वा रविवार**
यहेज्केल १८:२५-२८
स्तोत्र २५:४-९
फिलिप्पे २:१-११
मत्तय २१:२८-३२

२८. इयोब १:६-२२
स्तोत्र १७:१-३,६-७
लूक ९:४६-५०

२९. **संत मायकल, गॅब्रियल व राफायल महादूत - सण**
दानिएल ७:९-१०,१३-१४ **किंवा**
प्रकटी १२:७-१२
स्तोत्र १३८:१-५
योहान १:४७-५१

३०. **संत जेरोम-स्मृती**
इयोब ९:१-१२,१४-१६
स्तोत्र ८८:१०-१५
लूक ९:५७-६२

## ऑक्टोबर २०२६

१. **बाळ येशूची संत तेरेजा- सण**
यशया ६६:१०-१४
स्तोत्र १३१:१-३
मत्तय १८:१-५

२. **रक्षक दूतांचा सण - स्मृती**
निर्गम २३:२०-२३
स्तोत्र ९१:१-६,१०-११
मत्तय १८:१-५,१०

३. ईयोब ४२:१-३,५-६, , १२-१७
स्तोत्र ११९:६६,७१,७५, ९१, १२५,१३०
लूक १०:१७-२४

४. **सामान्यकाळ २७वा रविवार**
यशया ५:१-७
स्तोत्र ८०:९,१२,१३-१६, १९-२०
फिलिप्पे ४:६-९
मत्तय २१:३३-४३

५. गलती १:६-१२
स्तोत्र १११:१-२,७-१०
लूक १०:२५-३७

६. गलती १:१३-२४
स्तोत्र १३९:१-३,१३-१५
लूक १०:३८-४२

७. **जपमाळेची कुमारी मरिया- स्मृती**
प्रे.कृ.१:१२-१४
स्तोत्र : लूक १:४६-५५
लूक १:२६-३८

८. गलती ३:१-५
स्तोत्र : लूक १:६९-७५
लूक ११:५-१३

९. गलती ३:७-१४
स्तोत्र १११:१-६
लूक ११:१५-२६




JEWEL OF CHIRABAZAR
MK JEWELLERS
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124 | Fax : 022 - 2206 5421
Email : mkshahjewellers@gmail.com
HALLMARK JEWELLERY 100%
नवीन तेज, नवी ओळख,
तुमच्या प्रत्येक क्षणाला
आमच्या दागिन्यांची साथ!
फेस्टिवल कलेक्शन आता उपलब्ध!
गणपती बाप्पा मोरया
SHOWROOM WILL BE CLOSED ON
7th September
Janmashtami
14th September
Ganesh Chaturthi
& Paryushan Parva
25th September
Anant Chaturdashi
Dear Customer Please Save Our Mob No 7718019981 to your Contact List & get Daily updates of New Collection & Prices
OUR NEW LANDMARK
Now Facing Kalbadevi Metro Station
WE HAVE NO BRANCH AT VIRAR, VASAI & MUMBAI
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
Valet Parking Available

RNI MAHMAR - 11692 / 1960




हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.